**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १४३/२००९

**१) श्री ले.कर्नल एस.वाय.काणे(सेवानिवृत्त),**
**११२-बी शिवाजी नगर, नागपूर ४४००१०.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती दिग्रस, जिल्हा यवतमाळ.** **गैरतक्रारदार**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय वाई लिंगी, ता.दिग्रस, जि.यवतमाळ.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ८.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर आहे. व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. गैरतक्रारदार यांनी दाखल केलेल्या कागदपत्रावरुन तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येत असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २७९/२००९**

**१) श्री रमेश गुलाबराव दापूरकर,**
**मु.पो.जयहरी नगर, प्लॉट नं.७२, मिलन चौक,**
**चनकापूर, पो. खापरखेडा, ता.सावनेर, जि. नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य,**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांच्या उपरोक्त अपीलाचे संदर्भात चर्चा करुन माहिती घेण्यात आली. त्यामुळे स्वतःहून अपील मागे घेत आहे, असे आयोगास लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २८०/२००९**

**१) श्री रमेश गुलाबराव दापूरकर,
मु.पो.जयहरी नगर, प्लॉट नं.७२, मिलन चौक,
चनकापूर, पो. खापरखेडा, ता.सावनेर, जि. नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्था सचिव,
इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा,
ता.सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,
इंदिरा अध्यापक विद्यालय, खापरखेडा,
ता.सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांच्या उपरोक्त अपीलाचे संदर्भात माहितीने मी समाधानी असल्याने ही प्रक्रिया पुढे वाढविण्याची माझी इच्छा नसल्यामुळे मी अपील मागे घेत आहे, असे आयोगास त्यांनी लेखी निवेदन दिलेले असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर
दिनांक ३.८.२००९**

**(विलास पाटील)
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ
नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६८/२००९**

**१) श्रीमती मिराबाई किसनलाल जैस्वाल,**
**महावीर नगर, रनाळा बस स्टॅाप जवळ,**
**ता. कामठी, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रं.१,**
**नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर भूमापन क्रं.१ यांचेकडे घर नं.४०८ बजेरीया न.भू.क्रं.३५१, शीट नं.१६९ चुकीच्या पध्दतीने विभाजन करुन वेगळे न.भू.क्रं.३०५, शिट नं.१६८ कसे केले त्याची माहिती. श्रीमती लक्ष्मीबाई कमलचंद बनोदे व श्रीमती मिराबाई किसनलाल जैस्वाल यांच्या मालकीचे घर नं. ४०८ बजेरीया नागपूर न.भू.क्रं.३५१ शीट नं. १६९ गैर कायदेशीरपणे विभाजन करुन काही भागावर श्री कन्हैयालाल प्यारेलाल शाहू यांचे नांवाने वेगळा न.भू.क्रं.३०५, शीट नं.१६८ घर मालकांना सूचना न देता कसा देण्यात आला याची सविस्तर माहिती व संबंधीत कागदपत्रांच्या प्रमाणित प्रती देण्याबध्दल माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. माहितीचा कालावधी वर्ष २००३ असा दिलेला आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना आपल्या अर्जाची माहिती घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तरी आपण विचारलेली माहिती प्राप्त होताच कळविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक २१.३.२००९ रोजी आपण मागितलेली माहिती इकडील कार्यालयात उपलब्ध आहे. आपण या कार्यालयात हजर राहून आवश्यक ती नकल फी भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी. तुर्तास आपला दिनांक ६.१.२००९ चा अर्ज निकाली काढण्यात आला आहे असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपील मान्य करण्यात आली आहे. नगर भूमापन अधिकारी क्रं.१ यांनी दिनांक २५.३.२००९ पर्यंत अर्जदार यांना नियमानुसार धारिकेतील माहिती पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक २९.५.२००९ रोजी सदरचे पत्र मिळताच आवश्यक असलेली माहिती कार्यालयात येवून खात्री करुन उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय

( पान २ वर ..)

अपील दाखल केलेले दिसून येते.

४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे परंतु वर्ष २००३ ची माहिती उपलब्ध झाली नाही. सन २००३ मध्ये कन्हैयालाल प्यारेलाल शाहू यांच्या नांवाने घर मालकांना सूचना न देता फेरफार कोणत्या आधारावर करण्यात आले त्या कागदपत्रांची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २.१.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत श्री कन्हैयालाल प्यारेलाल शाहू यांचे नांवावर फेर फार झाल्याच्या संदर्भात आधारभूत कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलबध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.८.२००९**
**(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २६९/२००९**

**१) श्री मुश्ताक अहमद व. अब्दुल जब्बार,**
**रा.मोमीनपुरा, पोलीस चौकी जवळ, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रं.१,**
**नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, अधीक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयात दिनांक ११.३.२००५ रोजी नकाशा व क्षेत्र दुरुस्ती करीता केलेल्या अर्जावर आजपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली. आदेश झाला असल्यास त्याची सत्य प्रत देण्यात यावी. आपले कार्यालयात अर्ज केल्यानंतर निकालाकरीता किती कालावधी लागतो अशी माहिती मागितलेली दिसून येते. मौजा भानखेडा ख.न.८९, न.भू.क्रं.१४०१. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १३.४.२००९ रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयात पुन्हा प्रकरण सध्या नगर भूमापन अधिकारी क्रं.२ नागपूर यांचेकडे तुटी पुर्ततेकरीता पाठविण्यात आले आहे. अर्जावर कुठलीही कार्यवाही शिल्लक नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात आले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या दुरुस्ती अर्जाचे संदर्भात त्यांना निर्णय अपेक्षित आहे व त्याकरीता त्यांनी माहितीच्या अधिकारात माहिती मागितलेली दिसून येते. जन माहिती अधिकारी

( पान २ वर ..)

यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, तृटीची पुर्तता करुन दिनांक २.६.२००९ रोजी अहवाल पाठविला आहे. तसेच दिनांक २०.७.२००९ रोजी अधीक्षक भूमी अभिलेख यांनी मोका चौकशी केली असून आदेश प्रलंबीत आहे. व आदेश झाल्याबरोबर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे सांगितले. त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेली माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २७९/२००९**

**१) श्री मनोहर चिरकुट हूड,**
**मु. टेकडी, पो.गोडेगांव, ता.पारशिवनी, जि.नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती पारशिवनी, ता.पारशिवनी, जि.नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा ग्राम विस्तार अधिकारी,**
**पंचायत समिती पारशिवनी, ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी ग्राम विस्तार अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी यांचेकडे दिनांक १३.८.२००८ ला जिल्हा परिषद नागपूर यांनी अहवाल दिला. तो अहवाल कोणत्या माहितीच्या आधारावर सादर केला व गैरअर्जदारानी कोणती कागदपत्रे दिली याचा तपशिल देण्यात यावा. माहिती व्यक्तीशः घेणार . अतिक्रमण चौकशी अहवाल द्यावा. अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१.२००९ रोजी अतिरिक्त माहितीकरीता रुपये ८०/- चा भरना करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये ८०/- चा भरणा केलेला दिसून येतो. व अपीलकर्ता यांना माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना ग्राम पंचायत ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांची असे सांगितले की, जी माहिती ग्राम पंचायत कडून त्यांना उपलब्ध झाली ती उपलब्ध करुन दिली आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, ग्राम पंचायत ठरावाची प्रत त्यांच्याकडे ग्राम पंचायतने उपलब्ध करुन दिली होती परंतु ती त्यांना पुरविली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांना सर्व माहिती

( पान २ वर ..)

उपलब्ध करुन दिलेली आहे व त्याबाबतची पोच आहे. पोच घेताना त्यांनी कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतला नाही. तरी सुध्दा त्यांनी ग्राम पंचायतच्या ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिली नाही असे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना ग्रामपंचायतच्या ठरावाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील ग्राम पंचायतीच्या ठरावाची प्रत विना मुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २९०/२००९**

**१) श्री जावेद अली जुल्फेकार अली,**
**नातीक चौक, सर्कल नं.१, नातीक चौक,**
**भालदारपुरा, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संचालक(शिक्षण),**
**समाज कल्याण संचालनालय, पुणे-१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपसंचालक(शिक्षण)**
**समाज कल्याण संचालनालय, पुणे-१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१.२००९ रोजी माहिती अधिकारी मा.संचालक (शिक्षण) समाज कल्याण संचालनालय यांचेकडे कामावरुन कमी करुन झालेल्या अन्यायाबाबत न्याय मिळण्यासाठी. १९९३ पासून मागितलेली माहिती खालीलप्रमाणे. पत्र क्रमांक २०६३ दिनांक २४.७.९७, पत्र क्रं.दिनांक ११.७.२००६,पत्र क्रं.दिनांक १०.४.२००८, पत्र क्रं.दिनांक १.९.२००८ संपूर्ण कार्यवाही आणि चौकशी झालेले कागदपत्र, कॅापी ऑफ डिड ऑफ ट्रान्सफर, कॅापीज ऑफ अॅव्हेन्यू रिपोर्ट ऑफ गणपतराव थोटे सेवा संस्था, नागपूर फॉर दी इयर्स १९९३-९४, १९९४-९५, १९९५-९६, ऑन्स्टिटयूशन ऑफ द गणपतराव थोटे सेवा संस्था, नागपूर अशी एकुण १४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ७.२.२००९ रोजी प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. सदर बाबींची माहिती त्यांचे दस्तऐवज आपणांस खालील कार्यालयात उपलब्ध होऊ शकते.

१.मुददा क्रं.१२ याबाबत माहिती विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर कार्यालयात उपलब्ध होऊ शकेल. तेव्हा आपण त्यांचेकडे संपर्क साधावा. २. मुददा क्रं.१ ते ११ व १३,१४ बाबत माहिती प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांचेकडे उपलब्ध होऊ शकेल. तरी आपला अर्ज संबंधीत महाविद्यालयाकडे पाठविण्यात येत असून संबंधीत समाजकार्य महाविद्यालयाचे प्रायार्य हे माहिती अधिकारी म्हणून काम पाहत असल्याने याबाबत त्यांचेकडे संपर्क साधावा, असा निर्णय दिवून सदरच्या पत्राची प्रतिलीपी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर, प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांना दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००९ रोजी अपीलीय अधिकारी तथा संचालक(शिक्षण), समाज कल्याण संचालनालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्याचे दिसून येते.

३. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.५.२००९ रोजी देण्यात आला असून मुद्या क्रमांक

( पान २ वर ..)

१२ बाबतची सन २००५-०६, २००६-०९ पर्यंतची संचालनालयामध्ये उपलब्ध असलेली माहिती माहिती अधिकारी यांनी अर्जदार यांना कोणतेही शुल्क न आकारता उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व इतर मुद्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी संस्थेकडे माहिती मागितलेली होती परंतु दिली नाही. व त्यामुळे त्यांनी संचालक, समाज कल्याण संचालनालय यांचेकडे ही माहिती मागितली आहे. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तीवाद केला की, सदरची माहिती ही संचालनालयाकडे असणे शक्य नाही व ही माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे तसे कळविण्यात आले होते. तरी सुध्दा त्यांनी प्रथम अपील संचालनालयाचे माहिती अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द दाखल केले आहे. त्यामुळे त्यांना संस्थेकडून जर माहिती उपलब्ध झाली नसेल तर संस्था या अपीलामध्ये पक्षकार नसल्यामुळे कोणत्याही प्रकारचे आदेश हे संस्थेला देता आले नाही व संचालनालयाकडे माहिती उपलब्ध नाही, असा दोन वेळा निर्णय दिलेला असल्यामुळे सदरचे द्वितीय अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २८८/२००९**

**१) डॉ. कल्पना पांडे,**
**६, अंबिका कॅाम्लेक्स, हनुमाननगर, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथ.),**
**जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**सेन्ट विसेन्ट उच्च प्राथमिक शाळा, मेडीकल चौक, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१२.२००८ रोजी मुख्याध्यापिका तथा माहिती अधिकारी, सेन्ट विसेन्ट उच्च प्राथमिक शाळा, नागपूर यांचेकडे Certified copy of teachers documents of S.T.Vincent School. १.११.२००७ to १८.१२.२००८ School leaving Certificate S.S.C. marklist, D.Ed. marklist and diploma affidavit of the change in name (list enclosed). सहपत्रामध्ये एकुण ५ शिक्षकांची नांवे दिलेली असून त्यांची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.१.२००९ रोजी सदरची कागदपत्रे ही इग्नेशिस ॲन्थोनी बॅस्टीयन, कनिष्ठ लिपिक यांचेकडे असल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही. त्यांना तसे कळविलेले आहे. परंतु त्यांनी तसे न केल्यास त्यांचे विरुध्द सिव्हील व क्रिमीनल ॲक्शन घेण्यात येईल व त्यांचेकडून माहिती मिळाल्यावर उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २३.१.२००९ रोजी मुख्याध्यापक यांनी बॅस्टीयन यांना दिलेल्या पत्राची प्रत सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर दिनांक ३०.१.२००९ रोजी श्री बॅस्टीयन यांनी त्यांचा खुलासा सादर केला आहे. तसेच अपीलकर्ता यांनी त्यांचे लेखी म्हणणे आयोगापुढे दिलेले आहे. तसेच उत्तरवादी यांनी सुध्दा प्राथमिक आक्षेप घेतलेले दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील हे शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. शिक्षणाधिकारी यांनी सुध्दा दिनांक २६.२.२००९ रोजी खुलासा दाखल केला आहे. त्याचप्रमाणे सेन्ट विन्सेन्ट सोसायटी यांनी श्री बॅस्टीयन यांचे विरुध्द दाखल केलेल्या आरोप पत्रांची प्रत दाखल केलेली आहे. तसेच प्रा. निलीमा देशमुख यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत सुध्दा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचेकडे दाखल केलेली आहे. मुख्याध्यापिका यांनी पोलीस निरीक्षक, इमामवाडा यांचेकडे श्री इग्नेशिस ॲन्थोनी बॅस्टीयन, कनिष्ठ लिपिक यांचे विरुध्द तक्रार दाखल केलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.९.२००९ रोजी देण्यात आला असून अपील मान्य करुन संबंधीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांना आदेशित करण्यात

( पान २ वर ...)

येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती १५ दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखपल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री ए.डब्यू. नागदेव यांनी युक्तीवाद केला व उत्तरवादी तर्फे ॲड.श्री व्ही.डी. बेस्टीया यांनी युक्तीवाद केलेला आहे. अपीलकर्ता यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहे. संपूर्ण शाळा ही एकच सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे कनिष्ठ लिपिक हे माहिती उपलब्ध करुन देत नाही, असे कारण देणे संयुक्तिक नाही. उत्तरवादी यांनी असे सांगितले की, कनिष्ठ लिपिक श्री बॅस्टीयन व अर्जदार हे एकत्र आहे व त्यांनी सर्व कागदपत्रे गायब केलेली आहे. परंतु उत्तरवादी यांनी असे सांगितले की, श्री बॅस्टीयन यांना निलंबीत करण्यात आले असून त्यांचे विरुध्द फौजदारी केस दाखल केलेली आहे. तसेच त्यांचेकडे असलेली सर्व कपाटे शाळेतील सर्व स्टॅाफच्या समोर उघडले असता मागितलेली कागदपत्रे दिसून आली नाही. व यावरुन संपूर्ण माहितीच्या संबंधात श्री बॅस्टीयन हे जबाबदार आहे व त्यामुळे त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्यात आलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना श्री बॅस्टीयन यांचेविरुध्द झालेल्या सर्व कार्यवाहीची कागदपत्रे हा निर्णय मिळाल्यावर उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्यानंतर मागितलेल्या माहितीच्या प्रती उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना श्री इग्नेशीस ॲन्थोनी बॅस्टीयन, कनिष्ठ लिपिक यांचे विरुध्द केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची कागदपत्रे छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. चौकशीमध्ये सर्व कागदपत्रे सापडल्यानंतर अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती ही संबंधीत शिक्षकांकडून अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे विचारणा करुन निर्णय घेवून उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २८२/२००९**

**१) श्री सुधीर सितारामजी सोनटक्के,**
**मु.पो.ता.हिंगणा (पंचायत समिती क्वार्टर),**
**जिल्हा नागपूरर्४४१११०.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**कार्यालय, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहे.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी तथा माहिती अधिकारी, नागपूर यांचेकडे बाबुरावजी काळे, शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांच्या इन्स्टीटयूट ऑफ सोशल वर्क-२८, अहॅाब कॅालनी नागपूर यांच्या तर्फे जा.क्रं.lswn/८५/९६, दिनांक ३०.७.९६ च्या पत्रावरील कार्यवाहीबाबतची माहिती व्यक्तीशः मागितलेली आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३०.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी दिनांक ५.२.२००९ रोजी बाबुरावजी काळे, शिक्षण प्रसारक मंडळ, नागपूर यांच्या इस्टीटयूट ऑफ सोशल वर्क यांचे माहिती अधिकारी या नात्याने गैर अर्जदार प्राचार्य, पुरुषोत्तम समाजकार्य महाविद्यालय, नागपूर यांनी आदेश दिनांकापासून ७ दिवसांत अपीलार्थी यांना माहिती पुरवावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी संस्थेकडील माहिती मागितली नाही तर संस्थेनी दिनांक ३०.७.२००६ ला समाज कल्याण विभागाकडे केलेल्या पत्रावरील कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे व त्यामुळे सदरची माहिती ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे उपलब्ध असणे शक्य आहे. त्यावर समाज कल्याण अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जातील मागणी करण्यात आलेल्या माहितीच्या संदर्भात प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय, नागपूर या महाविद्यालयाशी संबंधीत असल्याने या कार्यालयाचे पत्र क्रं.५१, दिनांक १२.१.२००९ अन्वये संबंधीत अर्जाच्या छायाप्रतीसह संबंधीत महाविद्यालयाकडे अर्ज पाठविण्यात आलेले होते व त्याची प्रत संबंधीत अर्जदारास देवून

(पान २ वर ..)

त्यानुषंगाने कळविण्यात आले. तसेच या कार्यालयाचे पत्र क्रं.८५३, दिनांक ३०.३.२००९ अन्वये सदर रेकॉर्डचा शोध घेतला असता तो उपलब्ध नसल्याचे श्री जावेद अली जुल्फेकार अली यांना कळविण्यात आलेले होते.

४. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १९.१.२००९ रोजी देण्यात आला असून पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३०.३.२००९ रोजी पत्र पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांना विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांनी दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या पत्रावरील कार्यवाही ही समाज कल्याण विभागाकडून केलेल्या कार्यवाहीची माहिती असल्यामुळे पुरुषोत्तम थोटे महाविद्यालयाकडे अपीलकर्ता यांचा अर्ज पाठविण्याची आवश्यकता नव्हती व त्याच कार्यालयाने झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. व त्याबाबतचा सुध्दा त्यांच्या कार्यालयात शोध घेतला असून माहिती उपलब्ध नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. परंतु पुन्हा एकदा संबंधीत पत्रावर समाज कल्याण विभागाकडून केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २६.१२.२००९ च्या अर्जात मागितलेली माहितीचा शोध पुन्हा एकदा घेवून झालेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २९९/२००९**

**१) श्री सुधाकर जयराम बदकी,**
**प्लॉट नं.११, भारतीय गृह समस्या निवारण संस्था,**
**सेमलवाडा, रेल्वे क्रॅासिंग, नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, यवतमाळ. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.निबंधक, सहकारी संस्था,**
**मारेगांव रोड, ता. मारेगांव, जिल्हा यवतमाळ. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी-१, सहकारी संस्था यांचेकडे भाडे मिळण्याबाबत, भाडे प्रमाणपत्र व ग्रामपंचायत कर आपले स्तरावर केलेली कार्यवाही पत्राच्या प्रती. कालावधी सन १९९५ ते सप्टेंबर, २००८ वगैरे .. एकुण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.११.२००८ रोजी माहितीच्या करीता आपल्या कागदपत्रांच्या प्रतीसाठी रुपये १२०/- व नोंदणीकृत टपालखर्च रुपये ३०/- असे एकुण १५०/- रुपयाचा भरणा करणे आवश्यक आहे. माहिती स्वत: हजर राहून घेणार असाल तर टपाल खर्च वगळण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२०८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १.१.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती परिपुर्ण व सत्य स्वरुपात विहित कालावधीत पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्या स्वत:च्या घरामध्ये सहकार कार्यालय भाडयाने आहे व ते आजपर्यंत भाडे देत नाही. त्यामुळे माहिती मागितलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, ज्या घरामध्ये शासकिय कार्यालय आहे ते घर अपीलार्थीचे भावाचे नांवावर आहे. व यांचे भावाचे नांवाने सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणपत्र दिलेले असल्यामुळे भाडे त्यांचे नांवाने काढण्यात येत आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी कायदेशिर कागदपत्रे दिली असताना सुध्दा त्यांना कोणत्याही प्रकारचा न्याय मिळत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे सार्वजनिक बांधकाम विभागात नोकरीस होते व त्याच संबंधीत टेबलवर असून त्यांनी कागदपत्रे गायब केलेली आहे. परंतु जोपर्यंत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून त्यांच्या नांवाचे प्रमाणपत्र येत

( पान २ वर ..)

नाही तोपर्यंत त्यांना भाडे उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या खर्चाचा भरणा करण्यास कळवून सुध्दा तो केलेला नसल्यामुळे त्यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. खर्चाचा भरणा केल्यास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. अपीलकर्ता यांचे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०२/२००९**

**१) डॉ. रामेश्वर कचरु राखडे,**
**मु.पो. देलनवाडी वार्ड (ओमनगर),**
**ब्रम्हपूरी, ता. ब्रम्हपूरी, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमुर ता.चिमुर जि.चंद्रपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी ,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमुर ता.चिमुर जि.चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चिमूर यांचेकडे संस्थेचा कुठलाही ठराव नसतांना व पदवीधारक म्हणून प्रस्ताव नसतांना श्री संगत रामाजी धावडे यांना सरळ पदवीधर म्हणून मान्यता देवून पदवीधर वेतन ग्रेड तर कु. वर्षा राजाराम डाहाके अप्रशिक्षित प्रा.शिक्षण सेविका म्हणून नियमित मान्यता असतांना विनावेतन काम करुन घेतल्या जात आहे व अजूनही नियमित कां केले जात नाही, अशी माहिती व्यक्तीशः मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. संबंधीत माहिती ही अनुदानित आश्रम शाळा रुई यांचे संबंधात असल्यामुळे तेथील माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेशी संपर्क साधून माहिती घेण्याबाबत दिनांक २०.१०.२००८ चे पत्रान्वये अपीलार्थीस व माहिती अधिकारी यांना कळविले असल्याचे शासकिय माहिती अधिकारी यांनी सुनावणीचे दरम्यान सांगितले. व त्यामुळे सुनावणीचा आदेश पारित झाल्यानंतर १५ दिवसांचे आंत माहिती प्राप्त करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे हजर झाले व त्यांनी असे सांगितले की, अर्जदार स्वतः संस्थेचे उपाध्यक्ष आहेत. त्यावर अपीलार्थी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अध्यक्ष त्यांना माहिती देत नाही. यावरुन अध्यक्ष/उपाध्यक्ष व संस्थेचे सदस्य यांच्या भांडणामधून शासकिय अधिका-यांना वेठीस धरण्याचा प्रकार दिसून येतो. शासकिय जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरच्या पदांना मान्यता अपर आयुक्त कार्यालयातून देण्यात येते. त्यांचे कार्यालयातून दिल्या जात नाही. त्यामुळे त्यांचे कार्यालयात माहिती उपलब्ध

( पान २ वर )

नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी असे सांगितले की, अपीलार्थी यांचेकडे आदेशाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, कोणत्या नियमाप्रमाणे ते आदेश पारित केले याची माहिती उपलब्ध करुन द्यावी. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०४/२००९**

**१) श्री ताराचंद अंताराम मुलमुले,**
**समता कॅालनी, नागभिड पो.ता.नागडीड,**
**जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, नागभिड, ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत नागभिड, ता.नागभिड, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी राज्य जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत, नागभिड यांचेकडे बांधकामाचे दराने गृहकर आकारणी केल्याचे वर्ष (२) अर्जदाराचे अपूर्ण बांधकामावर गृहकर आकारण्यात आला होता काय (३) किती क्षेत्रफळाचे बांधकामावर आकारणी करण्यात आली होती. (४) ग्रां.पं. कर व फी नियम १९६० चे नियम क्रं.९(२) नुसार कर कमी केला होता काय (५) मा.संवर्ग विकास अधिकारी पं.स.नागभिड यांचे दिनांक ९.४.२००७ चे वरील पत्रानुसार कर कपात केल्याबाबत खुलासा विवरण (६) सदर पत्राचे अनुषंगाने कार्यवाही करतांना ग्रा.पं.कर व फी नियम १९६० चे नियम क्रं.९(२) आणि १५(३) चे अधिन राहून आकारणी केले काय. अशी माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

३. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १४.१.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. व सदरच्या पत्राची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना सुध्दा दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १६.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. परंतु विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी युपीसी ने माहिती पाठविली आहे. व त्याबध्दलचा जावकची छायाप्रत व पोस्टाचा शिक्का असलेली प्रत त्यांनी दाखल केली आहे.

(पान २ वर ..)

यावरुन अपीलकर्ता यांना युपीसीने माहिती पाठविली आहे, असा निष्कर्ष काढावा लागतो. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली नसल्यास ती पुन्हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना पुन्हा दिनांक १६.१.२००९ रोजी पाठविलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०३/२००९**

**१) श्री ज्ञानेश अंबादास आत्राम,**
**नवेगांव पो. विरुर (स्टेशन), ता.राजूरा (मा.)**
**जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,**
**भारतीय शिक्षण संस्था, नवरगांव,**
**द्वारा भारत प्राथ.विद्यालय नवरगांव, ता.सिंदेवाही, जि.चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**भारत प्राथमिक विद्यालय, नवरगांव, पो.नवरगांव**
**ता. सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१२.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी, भारत प्राथमिक विद्यालय, नवरगांव यांचेकडे अर्जदाराशी संबंधीत आपल्या शाळेतील/संस्थेतील कागदपत्रे पुरविणे. दिनांक २४.१२.२००४ ला मुलाखती घेण्यात आल्या होत्या त्या मुलाखतीसाठी पेपर मध्ये दिलेल्या जाहिरातीचे कात्रण.(२) दिनांक २४.१२.२००४ ला मुलाखती घेताना एका कागदावर उमेदवारांच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या होत्या त्या कागदाची एक झेरॉक्स प्रत. (३) दिनांक ८.१.२००५ ला माझी स्वतंत्र मुलाखत घेवून स्वाक्षरी घेण्यात आली होती त्या कागदाची एक झे.प्र. (४) मला नियुक्त करतेवेळेस संस्थने एक ठराव घेतलेला होता त्या ठरावाची एक झे.प्र. व माझ्या नावाने संस्थेने एक आदेश दिला होता त्या आदेशाची एक झे.प्र. (५) मी रुजू होतांना दिलेल्या रुजू प्रतिवेदनची एक झे.प्र. (६) मी दिलेल्या माझ्या शैक्षणिक कागद पत्राच्या एक एक झेरॉक्स प्रती (७) मा.शिक्षणाधिकारी, जि.प.चंद्रपूर यांनी माझ्या नांवाने जो आदेश दिला दिनांक १९ ऑक्टोबर, २००५ त्या आदेशाची एक झेरॉक्स यासह एकुण १४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने देण्यात यावी असे नमुद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.२.२००९ रोजी मुख्याध्यापक भारत प्राथमिक विद्यालय यांनी माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीश: याबाबत अर्जामध्ये उल्लेख केला नाही, याबाबत स्पष्ट करावे म्हणजे त्याप्रमाणे माहिती पुरविण्यात येईल. त्याप्रमाणे दिनांक २.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना पुन्हा माहितीच्या संदर्भात तपशिल दिलेला आहे. परंतु त्यानंतर दिनांक १६.३.२००९ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिले आहे. मात्र दिनांक २५.३.२००९ रोजी माहिती जूनी व अनेक अभिलेख्यावरुन तयार करावयाची असल्यामुळे माहिती पुरविण्यासाठी विलंब होऊ शकतो. एक महिन्याची मुद देण्यात यावी वगैरे.. कळविलेले दिसून येते. मात्र माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.३.००९ रोजी प्रथम अपील संस्थेकडे दाखल केलेले दिसून येते. व

( पान २ वर ..)

प्रथम अपील हे फेटाळण्यात आलेले दिसून येते. दिनांक २.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहितीचा खर्च रुपये ८/- व पोस्टाचा खच्र रुपये ७१ असे एकुण ७९रुपये मनीऑर्डरने पाठवावे असे कळविलेले दिसून येतात. तरी सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी सुरुवातीला दिनांक २७.१२.२००८ रोजी अर्ज ज्या माहिती अधिकारी, भारत प्राथमिक विद्यालय, नवरगाव यांचेकडे दाखल केला होता त्यांनी तो स्विकारला नाही व त्यामुळे त्यांना पोस्टाने नंतर अर्ज पाठवावा लागला. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जामध्ये दोन पदाधिकारी दिलेले असल्यामुळे तो कोणी स्विकारावा म्हणून तो स्विकारला नाही. परंतु अर्जात अशा प्रकारे कोणीही दोन पदाधिकारी यांची नांवे नाहीत. त्याचप्रमाणे माहिती नोंदणीकृत टपालाने घेण्यात येईल असे दिलेले असून सुध्दा पत्राद्वारे अपीलकर्ता यांना असे नमुद केले नाही म्हणून कळविले आहे व त्यानंतरही माहिती उपलब्ध करुन घेण्यास मुदतवाढ देण्यात यावी असे पत्र दिले व त्यानंतर खर्च कळविलेला आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करणे असाच होतो व त्यास जन माहिती अधिकारी तसेच पदाधिकारी जबाबदार आहेत असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्या बरोबर ३ दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. अन्यथा जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची नोद घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०५/२००९**

**१) श्री शामराव आडकुजी बांगडकर,**
**मु.पो. मासळ (बुज.) ता. चिमुर, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी,**
**पंचायत समिती, चिमूर, ता. चिमुर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत मासळ (बुज.), ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२००८ रोजी सरपंच/सचिव, ग्राम पंचायत मासळ (बु.) यांचेकडे ग्राम पंचायत रस्त्याबाबत कमिटीने घेतलेल्या ठरावाची प्रत मिळण्याबाबत. (अर्जदार यांच्या घरासमोरील पांधनचा आठ महिण्यापासून घेतलेला ठराव) खुल्या जागेमध्ये ग्रा.पं.ने केलेले अतिक्रमण कोणत्या नियमानुसार करण्यात आले. जुनी असलेली पांधन ही किती फुटाची हाती व आता ती किती फुटाची आहे. त्यामध्ये माझी किती जागा अतिक्रमणामध्ये घेण्यात आली व बाजूक डील घरवाल्याकडून किती जागा घेण्यात आली याविषयी माहिती मिळण्यात यावी व त्यामध्ये ग्रा.पं.ची पांधन किती होती याची माहिती देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली असून माहिती रजिस्टर टपालाने घेणार असे नमुद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.८.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.११.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांची अपेक्षा अतिक्रमणाच्या संदर्भात चौकशी करुन मोजमाप करुन त्यांची जागा किती आहे हे मिळावे अशी आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ग्राम पंचायतचा ठराव उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यांच्या घरासमोरील पांदन आहे. परंतु त्यामध्ये सर्वांनी अतिक्रमण केलेले होते व त्यामुळे ग्राम पंचायतीने ठराव करुन सर्व बाजूचे अतिक्रमण काढून पांदन मोठी करण्यात आली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना असे वाटते की, त्यांची जागा ग्रामपंचायतीने घेतली व त्याप्रमाणे त्यांची तक्रार आहे. गट विकास अधिकारी यांनी मोका चौकशी करण्याकरीता आदेश दिले होते. त्याप्रमाणे १०-१२ सदस्य गेले असता अपीलकर्ता यांनी मोका चौकशी किंवा मोजणी करु देण्यास मनाई केली. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे त्यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे

( पान २ वर ।)

अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांना न्याय मिळवून घ्यावयाचा असल्यास ग्राम पंचायत अधिनियम १९५८ च्या तरतुदी प्रमाणे गट विकास अधिकारी यांचेकडे तकार दाखल करावी व न्याय मिळवून घ्यावा.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०७/२००९**

**१) श्री हगरु राघोजी कापगते,**
**रा.पो.सेंदुरवाफा, ता.साकोली, जि. भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**ता. साकोली, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**साकोली, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दिनांक ३०.७.२००७ रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती हवी आहे. यासोबत दिनांक ३०.७.२००७ चे अर्ज जोडलेले आहे. मातीचे तेलाकरीता कृष्णा गोपाळा क-हाडे केरोसीन विक्रेत्याकडून दिनू प्रेमराज पालीवाल रा. सेंदूरवाफा केरोसीन विक्रेत्याकडे राशन कार्ड जोडण्यात येवून केरोसीन मिळणेबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १३.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.२.२००९ रोजी देण्यात आला असून गैर अपीलार्थी यांचेकडील मुळ रेकॉर्ड पाहिला असता अपीलार्थीने दिनांक १६.१२.२००८ च्या अर्जानुसार उत्तर दिलेले आहे. उत्तराची प्रत गैरअपीलार्थीचे नातेवाईक यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी स्विकारली आहे. व माहिती मुदतीचे आंत दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना दिनांक १३.१.२००९ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या पत्रावर नातेवाईकाकडून प्राप्त दिनांक २९/०९ ला सकाळी १०.०० वाजता असे अपीलकर्ता यांनी स्वतः नमुद केलेले दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता त्यांचे कार्यालयातील कर्मचारी ब-याच वेळा अपीलकर्ता यांचेकडे गेले होते. परंतु अपीलकर्ता उपलब्ध होत नसल्यामुळे शेवटी नातेवाईकाला माहिती दिलेली आहे व ती पोच दिलेली आहे. तसा शेरा सचिन कोटवार यांनी दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती विलंबाने उपलब्ध झाली. परंतु अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी ३०

( पान २ वर )

दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते. व तशी माहिती मिळाली नाही तर आक्षेप घेणारे पत्र द्यावयाचे असते. परंतु तसे अपीलकर्ता यांनी पत्र दिलेले नाही. तसेच जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्याबध्दल त्यांचे समाधान नाही परंतु उपलब्ध झालेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३०८/२००९**

**१) श्री विष्णुदास बाबुराव लोणारे,**
**भगतसिंग वार्ड, नवीन टाकळी भंडारा, ता.जि.भंडारा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,भंडारा. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल केली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी तहसिलदार यांचेकडे दिनांक ६.५.२००५ रोजी उपविभागीय अधिकारी यांच्या नांवाने दिलेल्या अर्जाच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक १३.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना तपशिलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. उपलब्ध करुन दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३११/२००९**

**१) श्री हरेशकुमार बळवंतराव ढोणे,**
**गोकुळनगर, वार्ड नं.२३, गडचिरोली. ता.जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप मुख्या कार्यकारी अधिकारी,**
**(पंचायत विभाग) जिल्हा परिषद, भंडारा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, (पंचायत विभाग), जि.प.भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता दिनांक ९.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, पंचायत विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सन २००८ मध्ये भरती केलेल्या कंत्राटी ग्रामसेवक भरती बध्दल परीक्षेमधील त्यांच्या स्वतःची उत्तर पत्रिका व इतर पाच जणांच्या उत्तरपत्रिका व मौखिक मुलाखतीची माहिती टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यासाठी अर्ज सादर केलेला दिसून येतो. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मौखिक परीक्षेच्या सत्यप्रतीचे प्रति पृष्ठ रुपये २/- प्रमाणे १३ प्रतीचे २६ रुपये व टपाल खर्च रुपये ३५/- असे एकुण ६१/- जमा करुन चालनची प्रत या कार्यालयास सादर करावी असे अधीक्षक तथा माहिती अधिकारी यांना कळविलेले दिसून येते. तसेच सन २००८ मध्ये दिनांक २३.११.२००८ ला झालेल्या कंत्राटी ग्रामसेवक भरती परीक्षेची उत्तर पत्रिका विहित मुदतीत १० दिवसांचे आंत अर्ज प्राप्त न झाल्यामुळे शासन परिपत्रक दिनांक १६.९.२००५ अन्वये आपणास पुरवता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे उत्तर पत्रिकेची माहिती संदर्भात उल्लेखित शासन परिपत्रकाची प्रत द्यावी. अपील करण्यापुर्वी जन माहिती अधिकारी यांचेकडे रक्कम न भरता अपील दाखल केल्यामुळे सशुल्क माहिती उपलब्ध करुन घ्यावी, असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, शासनाचे परिपत्रक २००५ चे आहे व त्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा अंमलात आलेला असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेले उत्तर हे स्वयंस्पष्ट आहे व त्यामध्ये परीक्षेचा निकाल जाहिर झाल्यानंतर १० दिवसांचे आंत रुपये २००/- भरणा करुन स्वतःची उत्तरपत्रिका उमेदवारास घेता येते. परंतु तशी अपीलकर्ता यांनी घेतली नाही. तसेच अपीलकर्ता हे इतरही उमेदवारांच्या उत्तरपत्रिका मागणी करीत आहे. त्या त्यांना टॅली करण्याकरीता पाहिजे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु ती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे

(पान २ वर ..)

ती उपलब्ध करुन देता येणार नाही. तसेच त्यांची स्वतःची उत्तर पत्रिका सुध्दा त्यांना नियमाप्रमाणे रुपये २००/- चा भरणा १० दिवसांचे आंत करुन उपलब्ध करुन घेणे आवश्यक होते. परीक्षेच्या संदर्भात जे नियम केलेले असतात ते परीक्षेच्या संदर्भातील शिस्त पाळण्याकरीता केले असतात. व ते उमेदवाराने पाळले नाही तर गोंधळ सदृष्य परिस्थिती निर्माण होऊ शकते व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या उत्तरपत्रिका हवी असल्यास त्यांनी सदरच्या उत्तरपत्रिकेसाठीचा खर्च दिनांक १६.९.२००५ चे पत्राप्रमाणे भरणे आवश्यक राहील. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २००५ चे नियम ४ मध्ये तशी तरतुद आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी नियमाप्रमाणे खर्च भरल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या उत्तर पत्रिकाची प्रत ही त्यांनी दिनांक १६.९.२००५ च्या पत्राप्रमाणे रुपये २००/- व मौखिक परीक्षेच्या माहिती करीताचा खर्च भरल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिीयम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३१४/२००९**
**अपील क्रमांक ३१५/२००९**

**१) श्री शरद यादव सोनकुसळे,**
**१९ न्यू जागृती कॅालनी (फ्रेंडस कॅालनी जवळ),**
**काटोल रोड, नागपूर-४४००१३.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११००१.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**
**२८-क्वीन्स गार्डन, पुणे-१.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.३.२००९ व ३०.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. **अपील क्रमांक ३१४/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी शासकिय माहिती अधिकारी यांचेकडे (१) अनु.जमातीच्या दाव्यांना पुरावा अधिनियम लागू होतो/होत नाही. याबाबतीतील माहिती पुरावा प्रत (२) अनु. जमातीचे आप्तभाव, तपासणीबाबतची मार्गदर्शक तत्वे, विहित कुणी व कुठे केली व ती कशी तपासावयाची याबाबत माहिती (३) वैद्यता प्रमाणपत्र देतांना सारखेच मापदंड(सर्व अनु.जमातींना) लावण्यात येतात किंवा जमातीनिहाय वेगवेगळे मापदंड लावण्याचे धोरण आहे. याबाबत परिपत्रक/निर्णय प्रत अशी माहिती मागितली असून सदरची माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक ३.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली या कारणास्तव अपील खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद केला की, माहिती उपलब्ध झाली आहे परंतु त्याबाबतचा आधार वगैरे दिलेला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे सदरची माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक ३१५/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००८ रोजी फरेरा कमेटी अहवालात कोष्टी या जातीच्या साडेबारा जाती नमूद केलेल्या आहेत. सदर जातीचे अस्तीत्वाबाबत सन १९६२ पूर्वीच्या पूराव्याची प्रत पूरविणे. (२) हलबा कोष्टी ही कोष्टीची

( पान २ वर ..)

उपजात असल्याबाबत १९६२ पूर्वीच्या पुराव्याची प्रत पुरविणे, अशी माहिती शिघ्र टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ६.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.२.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय यांचे अवलोकन केले असता त्यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रं.३१४/२००९ व अपील क्रमांक ३१५/२००९ यामध्ये जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३२०/२००९**

**१) सौ.नंदा देविदास जोनमवार,**
**मु.पो.ता.गडचिरोली, वार्ड नं.११, नेरकर हाऊस,**
**चामोर्शी रोड, गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांचेकडे यांचे तरतुद वाटप आदेश क्रं.अर्थस-१२०७/प्र.क्र./का-२/७००६, दिनांक ६.११.२००७ व आदेश क्रमांक .अर्थस-१२०७/प्र.क्र./का-२/७२८१, दिनांक १९.११.२००७ चे अनुदान वाटप आदेशानुसार वसतीगृहास एकदा अनुदान देणे व लगेच अनुदान काढणे. वसतीगृहातील अनुदान वाटपात दूजाभाव, केलेला आर्थिक गैरव्यवहार, भ्रष्टाचार, मेस कंत्राटदाराशी संगनमत करुन अनुदान अभावी देयके प्रलंबित राहील्यामुळे वसतीगृहात समस्या वाढल्याबाबत श्री ह.मा.मडावी, प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्रत्येक बाबीवर स्वयंस्पष्ट अहवाल माहितीच्या अधिकारात प्रमाणित प्रत मिळावी. तसेच माझ्या पतीचे निलंबनासंबंधाने माहिती जाणून घेण्यासाठी. अशी माहिती मागितली असून सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयाचे अनुषंगाने दिनांक २६.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु त्यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन

( पान २ वर ..)

दिलेली माहिती तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रथम अपीलाचा निर्णय योग्य आहे व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३१८/२००९**

**१) श्री सुकेन संतोष मुजूमदार,**
**मु.नागेपल्ली वार्ड नं.२, संत फ्रान्सीस कॅान्हेंन्ट समोर,**
**नागेपल्ली, पो. आलापल्ली, ता.अहेरी, जि.गडचिरोली. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी, शिक्षण विभाग,**
**पंचायत समिती, अहेरी, ता.अहेरी, जि.गडचिरोली. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी , शिक्षण विभाग,**
**पंचायत समिती, अहेरी, ता.अहेरी, जि.गडचिरोली. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, शिक्षण विभाग, पंचायत समिती यांचेकडे (१) शिक्षकांचे समायोजन करताना शाळेतील कार्यरत शिक्षकापैकी शाळेतील कोणत्या शिक्षकाला अतिरिक्त ठरवावयाचा याबाबतचा शासन निर्णय. (२) शिक्षकांचा समायोजन करतांना सध्या कार्यरत स्थळापासून किती कि.मी.च्या आत समायोजन करता येतो याबाबतचा शासन निर्णय (३) आपण समायोजनेत केलेल्या मुख्यालयापासूनचे अंतर किमीमध्ये दर्शवावे, अशी माहिती मागितली असून सदरची माहिती व्यक्तीश: घेणार असे नमुद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना अतिरिक्त माहिती करीता रुपये ८/- चा भरणा कळविला व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती

( पान २ वर ..)

आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.१२.२००८७ च्या अर्जाप्रमाणे सर्व माहिती उपलब्ध झालेली आहे असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ३१९/२००९

**१) श्री विष्णु राजाराम वैरागडे,**
**विष्णु पॅथ.लॅब, देसाईगंज, जिल्हा गडचिरोली.** — **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली.** — **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी ,**
**एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली.** — **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अंतर्गत दारिद्रय रेषेखालील आदिवासी लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदान वाटप करण्यात येणा-या गाय, म्हैस व शेळया(बक-या) बाबत,या विषयावर एकुण २२ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०.१.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, दिनांक ८.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती व्यापक प्रमाणात व संकलीत करुन तयार करुन द्यावयाची असल्यामुळे विलंब झालेला आहे. परंतु माहिती संपूर्ण दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३१६/२००९**

**१) श्री बळीराम अंतारामजी उईके,**
**राजगोपालाचारी वार्ड, प्लॅाट क्रं.७,**
**एम.एस.ई.बी.कॅालनी, भंडारा, ता.जि.भंडारा-४४१९०४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**नगर परिषद, भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद भंडारा यांचेकडे राजगोपालाचारी वार्डातील नाल्या बांधकामाबध्दलची माहिती (२) प्रशासकिय मान्यता मिळाल्याची प्रत (३) वित्तीय व्यवस्थे संबंधी अहवाल (४) नाली योग्य प्रकारे बांधली किंवा नाही तीचे निरीक्षण करुन निरीक्षण अहवालाची प्रत देणे. माहितीचा कालावधी एप्रिल २००८ ते माहे सप्टेंबर २००८ अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे.

३. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.१२.२००८ रोजी कनिष्ठ अभियंता तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कार्यालयीन कागदपत्राची तपासणी केली असता आपण उल्लेख केलेली नाली(श्री भोंगाडे ते देशकर) असे दिसून येत नाही. सबब अद्यापही आपण प्रस्तावित केलेल्या नाली बांधकामाचे निरीक्षणाकरीता तसेच आपण उल्लेखित केलेल्या प्रस्तावासंबंधाने आपण दिनांक ३०.१२.२००८ ला मौका निरीक्षणाकरीता तसेच उल्लेखित नामनिर्देशनाकरीता या कार्यालयात उपस्थित राहावे जेणेकरुन नाली संबंधाने आवश्यक माहिती देता येणे शक्य होईल, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ६.३.२००८ रोजी देण्यात आला असून सदरचे अपील मान्य करण्यात येवून अपीलकर्ता यांना ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे विवेचनात दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ६.३.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती चुकीची दिलेली आहे. त्यावर अपीलकर्ता यांना चुकीच्या संदर्भात स्पष्टीकरण करण्यास सांगितले असता त्यांनी असे सांगितले की, नगर परिषदेने ठराव केला नाही अशी चुकीची माहिती दिलेली आहे. परंतु माहितीच्या

( पान २ वर .. )

अधिकारात जशी माहिती असेल तशी उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत चौकशी करता येत नाही. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३१७/२००९**

**१) श्री ज्ञानेश्वर मुखरुजी मस्के,**
**जवाहर वार्ड, मु.पो.ता.देसाईगंज(वडसा)**
**जिल्हा गडचिरोली.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**ब्रम्हपूरी.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दिनांक १९.१२.२००८ रोजी मौजा रत्नापूर रिठ येथील भू.क्रं.२८ आराजी २.१५ हे.आर. जमा १३.४० हक्क १ अश्या प्रकारच्या ७/१२ मध्ये अर्जदाराचे ट्ठ हिस्याची नोंद होऊन रेकार्ड दुरुस्त करण्यासाठी अर्ज पाठविलेला होता परंतु संबंधी तलाठी यांनी रेकार्ड दुरुस्त केला दिसत नाही त्याची मला माहिती देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ९.३.०९ रोजी देण्यात आला असून आदेशाप्रमाणे ७ दिवसांत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेशत देण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २९.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहिती अपूर्ण व विलंबाने मिळालेली आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही तलाठयाकडून मागविण्यात आली होती. अपीलकर्ता यांनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे अर्ज केला होता. त्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना आदेशीत करण्यात आले

(पान २ वर )

होते. परंतु त्यानंतर दिवानी दावा दाखल झाला व त्यांच्या विरुध्द मा. उच्च न्यायालयामध्ये अपीलकर्ता यांचे अपील प्रलंबित आहे. यावरुन मा.उच्च न्यायालयाचा जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यात जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे ७/१२ वर दुरुस्ती करता येत नाही, असे सांगितले. व ही बाब अपीलकर्ता यांनी सुध्दा मान्य केली. त्यामुळे माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिीयिम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १६०/२००९**

**१) श्री  रत्नाकर स. तिरपुडे,**
**प्लॅाट नं.१३८, सप्तगीरी ले आऊट,भिलगांव,**
**पो.खैरी, ता.कामठी, जिल्हा नागपूर.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**इंदुमती मेमोरीयल कनिष्ठ महाविद्यालय,**
**कुंभारे नगर तुमसर, जिल्हा भंडारा.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ६.८.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक ६.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ६.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहे.

२. सदरची तक्रार ही तक्रारदार यांचे आयोगाकडील अपील क्रं.४७३/०८मधील निर्णय दिनांक २३.४.२००९ चे आदेशाची अंमलबजावणीचे संदर्भात दिसून येते. अपील क्रं.४७३/०८ हे अंशत: मंजूर करुन त्यात आदेश क्रं.१ अन्वये अर्जदारास मुळ सेवा पुस्तक देण्याबाबत आदेशित केले होते.

३. आता, तक्रारदार यांनी त्यांचे निवेदन दिनांक ६.८.२००९ हे आयोगास सादर केले असून त्यात, "मला जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य इंदुताई मेमोरियल कनिष्ठ महाविद्यालय, तुमसर यांचेकडून आवश्यक असलेली मुळे सेवा पुस्तिका प्राप्त झालेली आहे," असे नमुद केलेले असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास प्राप्त आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर**
**दिनांक ६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २३६/२००९**

**१) श्रीमती वर्षा घनश्याम गौरकर,**
**द्वारा-हेमंत गौरकर, एफ-२, बालाजी अपार्टमेंट**
**अमरनाथ अपार्टमेंटच्या मागे, के.डी.के.कॅालेज रोड,**
**नंदनवन, नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,**
**नागपूर ग्रामीण, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उप अधीक्षक(मुख्यालय)**
**नागपूर ग्रामीण, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.७.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.७.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर ग्रामीण, नागपूर यांचेकडे डॅा. राजन खोब्रागडे, सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा प्रकल्प संचालक, जलस्वराज प्रकल्प, मुंबई यांनी दिलेल्या पत्रानुसार पोलीस विभागाकडून झालेल्या चौकशीच्या संदर्भामध्ये एकुण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.२.२००९ रोजी मागितलेल्या माहितीचे शुल्क रुपये २/- घेवून जाण्याकरीता टपालाद्वारे पत्र पाठविलेले आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु तत्पुर्वी दिनांक ९.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले होते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २४.२.२००९ रोजी माहितीचा खर्च व टपाल खर्च एकुण रुपये १०३/- चा भरणा करावा असे अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा, ग्रामीण नागपूर व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही, तसेच माहिती अपूर्ण दिलेले आहे व त्यामुळे ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.३.२००९ रोजी पुन्हा अपर पोलीस अधीक्षक यांनी रुपये १०३/- जमा करावे व माहिती घेवून जावी याकरीता आपणास मुदतीच कळविलेले असल्यामुळ आपल्या प्रकरणात कालमर्यादेचे पालन झालेले असल्यामुळे माहिती मोफत देण्यात यावी, शक्य नाही व त्यामुळे अधिनियमाचे कलम ७(६) लागू होत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी त्यास आक्षेप घेतलेला आहे व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगापुढे युक्तीवाद करतांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच अतिरिक्त माहितीचा खर्च हा ३० दिवसाच्या नंतर कळविलेला आहे. त्याबाबत अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. त्यावरुन ३० दिवसांची मुदत २.२.२००९ रोजी संपते. व अतिरिक्त खर्चाचे पत्र दिनांक

( पान २ वर ..)

३.२.२००९ रोजी कळविण्यात आलेले आहेत. यावरुन मुदतीत माहितीच्या खर्चाचे पत्र व त्यानंतर अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करुन माहिती ही ३० दिवसांचे आंत उपलब्ध करुन दिली पाहिजे अशी तरतुद आहे. तीसाव्या दिवशी जर अतिरिक्त खर्चाचा भरणा कळविलेला असेल तर अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा मुदतीत करता येत नाही व माहिती सुध्दा मुदतीत उपलब्ध होत नाही. व त्यामुळे मुदतीत कळविलेले आहे व अधिनियमाचे कलम ७(६) लागू होत नाही हे अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती विना मुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. माहिती त्रयस्थ पक्षाशी निगडीत आहे असे म्हटलेले असल्यास त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील कलम ११ ची प्रक्रिया केलेली दिसून येंत नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील उत्तर सुध्दा गैर आहे असे दिसून येते.

अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यांचे भाऊ घनश्याम गौरकर यांनी सदरची माहिती उपलब्ध करुन घेतलेली आहे असे दिसून येते. परंतु उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगास सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्रं. ४ च्या संदर्भामध्ये कोणत्या अधिका-याची परवानगी घेतली ते त्यांना कळविणे आवश्यक होते ते कळविलेले दिसून येत नाही. तसेच मुद्या क्रमांक ५ मधील माहिती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना माहितीचा अतिरिक्त खर्चाचा भरणा केला असल्यास तो त्यांना परत करणे आवश्यक राहील व त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ३.१.२००९ च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्या क्रमांक ४ व ५ ची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी. अपीलकर्ता यांनी अतिरिक्त माहिती करीता खर्चाचा भरणा केला असल्यास ते आदेश मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत परत करण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.७.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६२१/२००८ व अपील क्रमांक ६२२/२००८**

**१) श्री सुनिलकुमार गयाप्रसाद मिश्रा,**
**सेंट्रल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ मास कम्युनिकेशन,**
**व्ही.आय.पी. रोड, धरमपेठ, नागपूर-४४००१०. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपायुक्त,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा निगम सचिव,**
**महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ६.५.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.८.२००८ व १२.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ६.५.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक ६२१/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा मनपा आयुक्त कार्यालय यांचेकडे दिनांक १३.१.२००८ ला आपणास अतुल पाटणे अति. उपआयुक्त नागपूर महानगर पालिका सिव्हील लाईन्स नागपूर २. अजय रामटेके उप आयुक्त नागपूर महानगर पालिका सिव्हील लाईन्स नागपूर, ३. केदारनाथ मिश्रा स्थावर अधिकारी नागपूर महानगर पालिका सिव्हील लाईन्स नागपूर या केंद्रिय व राज्य सेवेतील अधिका-यांद्वारे अपराधिक कट रचून अवैधरित्या खाजगी मालमत्तेवर कब्जा करणे, खोट दस्ताऐवज बनवुन फसवणुक करणे, अवैधरित्या ताब्यात असलेल्या मालमत्ते मध्ये फेर फार करणे व संपत्तीची विल्हेवाट लावणे, शासकिय दस्ताऐवजां मधुन कागदपत्रांना हेतुपुरस्परपणे गहाळ करणे या गुन्हयाखाली पोलीस स्टेशन सिताबर्डी नागपूर येथे् गुन्हा नोंदविण्याकरीता ना हरकत पत्र मागितले होते ते अदयाप प्राप्त झाले नाही. करीता ना हरकत पत्राची प्रत देण्यात यावी.

२. वरील पत्र मला केव्हा पाठविण्यात आले.

३. ना हरकत पत्र देण्याकरीता आपण कोणती कार्यवाही केली याची माहिती द्यावी. माहिती टपालाने घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २६.४.२००८ ला (दिनांक ६.५.२००८ रोजी व त्यानंतर दिनांक १६.५.२००८ रोजी) अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अपीलातील विषय सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत असल्यामुळे दिनांक ५.६.२००८ रोजी अपील हे सामान्य प्रशासन विभागाकडे हस्तांतर करण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेली कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे त्यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही व त्यामुळे अपील खारीज करण्यात आले असे दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००८ रोजी अतिरिक्त उपआयुक्त तथा अपीलीय अधिकारी, महानगरपालिका यांचेकडे दिनांक ८.५.२००८ रोजी सादर केलेल्या अपील प्रकरणातील सहपत्रातील माहितीचे

( पान २ वर )

अधिकार अंतर्गत दिनांक २५.३.२००८ चे पत्र तसेच त्यापुर्वी आपणाद्वारे डाकेने पाठविलेले दिनांक १३.१.२००८ चे पत्र या विभागास प्राप्त झाले नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच गुन्हा नोंदविण्यासंदर्भात ना हरकत प्रमाणपत्र देणे ही बाब सामान्य प्रशासन विभाग, म.न.पा. यांचेशी संबंधीत आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसार आपण विस्तृत माहिती व खुलाश्यानिशी सामान्य प्रशासन विभाग, महानगरपालिका नागपूर यांचेशी संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरचे पत्राचे संदर्भात (दिनांक १३.१.२००८ च्या पत्राचे संदर्भात) आयुक्त यांचे निजी सहाय्यक यांना सुध्दा पत्र उपलब्ध असल्यास शोध घेवून पत्र उपलब्ध करुन द्यावे जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे मा. आयुक्तांचे स्विय सहाय्यक यांनी श्री सुनिल मिश्रा यांनी स्पीड पोस्टद्वारे पाठविलेल्या पत्राची पोच पावतीचे व त्यावर असलेल्या शिक्याचे जो पर्यंत निरीक्षण करता येत नाही तोपर्यंत संबंधित पत्र कोणाद्वारे स्विकारल्या गेले हे निश्चित सांगता येत नाही. तसेच आयुक्तांचे बंगल्यावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनी उपरोक्त पत्र घेतले नसल्याचे कळले व बंगल्यावरील कर्मचारी हे नेहमी बदलत असतात त्यामुळे निश्चित कोणाद्वारे स्विकारल्या गेहे हे सांगता येत नाही. तसेच आयुक्त कार्यालयातील रेकार्ड सुध्दा तपासले असता संबंधित पत्र प्राप्त झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे दिनांक २४.६.२००८ रोजी प्रथम अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाच्या विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. अपीलकर्ता आज गैरहजर आहे. व त्यामुळे अधिक खुलासा त्यात करण्यात आलेला नाही. मात्र त्यांचे दिनांक १३.१.२००८ चे पत्राचा शोध घेण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही व त्यावरुन सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक ६२२/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१२.२००७ रोजी श्री मोरोणे निगम सचिव व जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग मा. निगम आयुक्त यांचे कार्यालयासोबत संबंधित नागपूर महानगर पालिका नागपूर यांचेकडे दिनांक २६.११.२००७ ला अतिरिक्त निगम आयुक्त यांना अर्ज दिला होता त्यावर झालेल्या कार्यवाहीची प्रत. दिनांक १२.७.२००७ ला मा.निगम आयुक्त यांना फॅक्स पाठविले होते, त्यावर झालेल्या कार्यवाहीची प्रत. दिनांक ५.१२.२००७ ला मा. निगम आयुक्त यांना ५ पानांचे फॅक्स पाठविले होते त्यावर काय आदेश झाले याची प्रत. दिनांक ११.१०.२००७ ला मा.अति.निगम आयुक्त यांना पाठविलेले त्यावर झालेल्या कार्यवाहीची प्रत. दिनांक १६.११.२००७ ला मा.निगम आयुक्त यांना अर्ज दिला होता त्यावर झालेल्या कार्यवाहीची प्रत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००७ रोजी तक्रार अर्ज सुध्दा दाखल केला होता. परंतु सदरच्या अर्जाची प्रत त्यांनी अपीलासोबत जोडलेली दिसून येते. त्यात निगम सचिव श्री मोरेणे यांनी अर्ज घेण्यास नकार दिल्यामुळे स्पिड पोस्टाने पाठविला अशी तक्रार करण्यात आलेली दिसून येते. दिनांक २.१.२००८ रोजी निगम सचिव तथा माहिती अधिकारी यांनी आपण मागितलेली माहिती स्थावर विभागाशी संबंधीत असल्यामुळे व यासंबंधी त्यांचे माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली असल्यामुळे आपला अर्ज पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत आहे. व त्याबाबत पुढील संपूर्ण पत्रव्यवहार त्यांचेकडे करझ्विा असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २.२.२००८ रोजी

( पान ३ वर ..)

स्थावर अधिकारी यांनी एकुण ५ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यात अर्ज स्थावर विभागास प्राप्त झाला नाही याबाबतची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक १२.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.६.२००८ रोजी देण्यात आला असून उपरोक्त तारखेचे अर्ज प्रकरणात कोणतीही कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाकडून झाली नसल्याने व त्यामुळे कोणतीही माहिती कार्यालयात कागदोपत्री उपलब्ध नसल्याने अपीलार्थीनी मागणी केलेली माहिती त्यांना पुरविणे कार्यालयाला माहिती अधिका-याला शक्य नाही, असा निर्णय देवून अपील खारीज केलेले दिसून येते. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

७. अपीलकर्ता हे गैरहजर असले तरी त्यांनी खुलासा दाखल केला आहे. खुलाशात त्यांनी मागितलेली माहिती ही सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत असून सुध्दा अर्ज हा स्थावर मिळकत विभागाकडे पाठविण्यात आला. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केली असे त्यांचे म्हणणे आहे. तसेच दिनांक २.२.२००८ च्या स्थावर अधिकारी, म.न.पा. यांचे उत्तरावरुन सुध्दा अपीलकर्ता यांनी दाखल केलेला अर्ज हा सामान्य प्रशासन विभागाशी संबंधीत आहे असे दिसून येते. व त्यावरुन अपीलर्ता यांचे म्हणणे योग्य आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सामान्य प्रशासन विभागाने संपूर्ण माहिती १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६२१/२००८ खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ६२२/२००८ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून सदरचा निर्णय प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती सामान्य प्रशासन विभागानी १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा जन माहिती अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ६.५.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ९१०/२००९**

**१) श्री धनंजय म. चित्रीव,**
**१२, प्रोसेस कॅालोनी, स्वावलंबीनगर,**
**नागपूर-२२. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त(मुख्यालय),**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त(प्रशासन),**
**पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर शहर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे (१) पुरुषोत्तम गवई अे.सी.पी. सदर नागपूर (२) अनिल बोबडे, अे.सी.पी. पाचपावली नागपूर यांचे अचल-चल संपती विषयी माहिती. माहिती संबंधी कालावधी नोकरीवर लागले पासून. (१) उपरोक्त नमुद दोनही अधिका-यांना कोणते साली नोकरी लागली. (२) नोकरी लागतांना अगोदर त्यांचे नांवे असलैल्या चल अचल संपतीची सविस्तर माहिती (३) नोकरी लागल्यानंतर त्यांचे स्वत:चे, आईवडील, भाउ, बहीण, पत्नी, मुले इ.ची नांवे असलेल्या चल अचल संपतीचे सविस्तर वर्णन माहिती. माहिती साध्या टपालाने द्यावी असे नमुद केले आहे.

३. सदरचे अर्जाचे अनुषंगाने पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडून श्री पी.डी. गवई, सहाय्यक पोलीस आयुक्त यांना दिनांक २.८.२००८ रोजी माहिती ७ दिवसांचे आंत कार्यालयात सादर करावी म्हणून पत्र दिलेले दिसून येते. आपल्या संबंधीत माहिती गोपनिय असल्यास माहिती देण्यात येवू नये असे आपणास वाटत असल्यास या कार्यालयास कळवावे असे कळविलेले दिसून येते. श्री अनिल बोबडे, सहाय्यक पोलीस आयुक्त याां सुध्दा त्याच दिवशी पत्र दिलेले दिसून येते. त्यावर दिनांक १८.८.२००९ रोजी श्री अनिल बोबडे, अे.सी.पी. यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अधिनियमाचे कलम ८ मध्ये उघड करण्यापासून सूट (त्र) अन्वये जी माहिती उघउ करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी माहिती उघउ केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तीक माहितीशी संबंधीत असलेली माहिती, व्यापक लोकहिताच्या दृष्टीने उघड करणे समर्थनीय आहे. अशी केन्द्रीय शासकिय माहिती अधिका-याची किंवा राज्य शासकिय माहिती अधिका-याची खात्री पटली असल्याखेरीज देणे बंधनकारक असणार नाही, अशी माहिती त्रयस्थास देणे योग्य नाही.

सबब वर नमुद कलमातील तरतुदी प्रमाणे माहिती पुरविणे शक्य नसल्याने अर्जदारास

( पान २ वर ..)

समज देण्यास सविनय सादर.

४. श्री पी.डी. गवई, स.पो.आ. यांनी दिनांक १४.८.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना कशाकरीता पाहिजे हे त्यांनी कळविले नसल्याने सदर माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(१)(j) प्रमाणे नाकारीत आहे, असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त(प्रशासन) यांनी अधिनियमाचे कलम ११(२) अन्वये संबंधीतांचे अभिवेदन मागविण्यात आले. त्यानुसार त्यांनी वैयक्तिक माहिती पुरविण्यात येवू नये असा आक्षेप घेतलेला असल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे देता येणार नाही असा निर्णय दिलेला दिसून येतो. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २७.२.२००९ रोजी देण्यात आला असून तो स्वयंस्पष्ट आहे व अपीलकर्ता यांन जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे असे दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५. द्वितीय अपीलाच्या सुनावणीचे वेळेस अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना नाकारण्यात आलेले माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देणे अधिनियमाच्या उद्येशाशी सुसंगत आहे असे सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी संबंधीत अधिका-यांना अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती म्हणून विचारणा केली होती असे सांगितले. व त्यांनी माहिती उपलब्ध करुन देवू नये अशी हरकत घेतलेली असल्यामुळे त्यांची वैयक्तिक माहिती ही उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कलम ८ (ध) (त्र) प्रमाणे ती नाकारण्यात आलेली आहे. असे असले तरी अधिनियमाचे कलम १९(४) प्रमाणे राज्य माहिती आयोगानी संबंधीत त्रयस्थ पक्षास योग्य ती संधी देवून व त्यांचे म्हणणे ऐकुण निर्णय देणे आवश्यक असल्यामुळे संबंधीत दोनही त्रयस्थ पक्षांना दिनांक १९.६.२००९ च्या अंतरिम आदेशाप्रमाणे अपीलाची सुनावणीस हजर राहावे व त्यांचे म्हणणे सादर करावे असे कळविलेले होते. त्याप्रमाणे सहा. पोलीस आयुक्त श्री अनिल बोबडे व श्री पी.डी. गवई, उप पोलीस अधीक्षक, भंडारा यांनी आयोगापूढे त्यांचे म्हणणे सादर केले आहे.

"शासकिय सेवक दर पाच वर्षांनी त्यांच्या संपत्तीबाबत माहिती सिलबंद करुन गोपनिय शासनास कळवित असतो. ही माहिती गोपनिय असल्यामुळे आम दस्तऐवज म्हणता येणार नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीचा उद्येश स्पष्ट नाही व ते उघड करण्याचा कोणताही सार्वजनिक कामाशी किंवा हितसंबंधाशी संबंध नाही. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम चे कलम ८(झ)(त्र) अन्वये ही माहिती त्रयस्थास देय नाही. तसेच आम्ही सन १९९८ ते २००३ या काळात ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर येथे नेमणुकीस होतो. या काळात अपीलकर्ता हे नेहमी अँ.क.ब्युरो नागपूर कार्यालयास भेटी देत होते. लोकसेवकां विरुध्द तक्रारी करण्याचा यांचा छंद आहे. पूर्वी त्यांनी केलेल्या काही तक्रारीच्या घटना सत्य आढळल्या नसाव्यात. परंतु आमचे समक्ष व श्री पी.डी. गवई तत्कालीन अति. पोलीस अधीक्षक, ॲ.क.ब्युरो नागपूर यांचे समक्ष केलेल्या तक्रारीरुन तासनतास सापळा रचूनही त्या तक्रारीत सत्यता आढळली नव्हती. त्यावेळी त्यांनी आमचेही विरुध्द तक्रार केल्याचे कळले होते. हे सर्व चिडून जावून हे अशा

(पान ३ वर ..)

छंदाचे व हेतुपुरस्पर तक्रारी नोंदविणारे व नेहमीच्या सवईचे (habitual) आहेत. त्यावेळी त्यांनी रास्त व अचुक तक्रारी कराव्यात याबध्दल ब्युरो द्वारे आम्ही व वरिष्ठांनी तोंडी समज त्यांना दिली होती.

त्यामुळे चिडून हेतुपुरस्पर तसेच आमच्याच विभागातील काही स्नेही जे अपीलकर्त्यांचे छंदास खतपाणी घालतात. त्यांचे मदतीने आम्हास मानसिक त्रास व्हावा हा हेतु बुध्दीपुर्वक साध्य करु इच्छितात. सबबस वरील कारणास्तव माझी वैयक्तिक माहिती या अपीलकर्त्यास/त्रयस्थास देण्यात येवू नये. त्यांनी वरील प्रमाणे घातक हेतूने ही खाजगी माहिती मागितली असल्याने त्यांची अपील खारीज व्हावी ही नम्र विनंती. असे लेखी बयाण श्री अनिल बोबडे यांनी दिनांक १३.७.२००९ रोजी दिलेले आहे. तसेच श्री पी.डी. गवई यांनी सुध्दा दिनांक १३.७.२००९ रोजी अपीलकर्ता श्री धनंजय चित्रीव यांनी नागपूर येथे कार्यरत असताना शासनाकडे तक्रारी केल्या होत्या. त्यावेळी त्यावेळी त्यांच्या रिपोर्ट अन्वये सापळा लावण्यात आला. बहुतांश तक्रारी हया निरर्थक असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे सदरची बाब त्यांचे निदर्शनास आणून देवून वरिष्ठ अधिका-यांना सूचित करण्यात आले होते. अपीलकर्ता यांनी आमचे विरुध्द वरिष्ठांकडे तक्रारी केल्या होत्या. व व आमच्या समवेत कार्यरत असलेले ॲन्टी करप्शन ब्यूरोचे काही अधिका-यांविरुध्द, ज्यांनी त्यांच्या सूचने नुसार काम केले नाही, अशांच्या विरुध्द सुध्दा चिडून तक्रारी केल्या होत्या. अपीलकर्ता हा त्यांच्या म्हणण्यानुसार काम न केल्यास शासकिय अधिका-यांच्या विरुध्द द्वेषबुध्दीने तक्रारी करण्याच्या सवयीचा आहे. ही बाब नम्रपणे आपल्या निदर्शनास आणु इच्छितो. त्यामुळे अपील खारीज करण्यात यावी असे नमुद केलेले आहे."

६. शासकिय अधिकारी किंवा कर्मचारी हे लोकसेवक असल्यामुळे त्यांच्या सेवा शर्ती नियमाप्रमाणे प्रत्येक लोकसेवकास सेवेत दाखल झाल्यापासून सेवानिवृत्त होईपर्यंत त्यांचेकडे असलेल्या चल अचल संपतीचे विवरण शासनाकडे गोपनियरित्या दाखल करावे लागते. त्याचप्रमाणे नियमात दिल्याप्रमाणे ठराविक कालावधी नंतर सुध्दा सदरची चल अचल संपतीचे विवरण हे गोपनिय लिफाप्यामध्ये दाखल करावे लागते, जेणेकरुन शासकिय सेवाकाळात लोकसेवकानी त्यांच्या मिळत असलेल्या वेतनाच्या प्रमाणातच त्याची चल व अचल संपती असणे गृहित धरण्यात येते व ती त्याच्या उत्पन्नाचे साधनापेक्षा जास्त प्रमाणात असेल तर त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे अपेक्षित आहे. उद्येश हा की, शासकिय लोकसेवकांनी भ्रष्टाचार करता कामा नये. यावरुन सेवाशर्तीच्या नियमाच्या पुर्तीकरीता जी माहिती सादर केली असते ती माहिती ही सार्वजनिक अभिलेख्याचा भाग होतो व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (i) प्रमाणे अभिलेख्याच्या व्याख्येत समावेश होतो व त्यामुळे सदरची माहिती ही उपलब्ध करुन देण्यास ती वैयक्तिक माहिती आहे, तसेच ती विश्वासाने दिलेली आहे किंवा गोपनीय ठेवावी अशी ही अट घालता येत नसल्याने प्रकट करता येणार नाही, असे म्हणता येणार नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणतेही कारण देण्याची आवश्यकता नसेल तरी दोनही सहाय्यक पोलीस आयुक्त यांची जी माहिती मागितलेली आहे व त्यांनी अपीलकर्ता यांचे संदर्भातील जो खुलासा केलेला आहे तो विचारात घेणे आवश्यक आहे. खुलाशामध्ये अपीलकर्ता व दोनही सहाय्यक पोलीस आयुक्त हे पुर्वी ॲन्टी करप्शन ब्यूरो मध्ये सेवेत असताना संबंध असलेला दिसून येतो व त्यावेळी अपीलकर्ता यांनी इतर शासकिय अधिका-यांविरुध्द वारंवार तक्रारी करुन सुध्दा त्यात

( पान ४ वर )

कोणतेही तथ्य न आढळल्यामुळे अपीलकर्ता यांना समज दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता हे त्यांच्या तक्रारीप्रमाणे कारवाई केली नाही किंवा झाली नाही म्हणून माहिती मागत आहे असे दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता यांचा हेतू हा स्वच्छ दिसून येत नाही. तसेच दोनही अधिका-यांच्या विरुध्द संशयास्पद तक्रारी आहेत असाही दावा त्यांनी केलेला नाही. तसेच माहिती मागवून त्यानंतर त्यांत गैर आहे काय असे शोधणे हे अधिनियमाचा गैरवापर आहे. व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया कोणत्याही प्रकारे जन माहिती अधिकारी किंवा शासकिय अधिकारी यांच्या विरुध्द स्वत: बदला घेण्याच्या दृष्टीने किंवा मानसिक त्रास देण्याच्या दृष्टीने वापर करणे गैर आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता दिसून येत नाही. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांची अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १९.६.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २८७/२००९**

**१) श्री रमेशकुमार बाली S/O मनोहर बाली**
**Q/२३८,फुटाना ओली, कामठी, ता.कामठी, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी,**
**गुरु नानक भेषजी महाविद्यालय, कामठी रोड, नागपूर-४४००२६. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,**
**गुरुनानक भेषजी महाविद्यालय, कामठी रोड,नागपूर-४४००२६. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.८.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१०.२००८ व २२.१०.२००८रोजी प्राचार्य तथा माहिती अधिकारी, गुरुनानक महाविद्यालय,कामठी यांचेकडे चालु वर्ष २००८-०९ मे. बी.फॅार्मसी प्रथम वर्ष तथा द्वितीय वर्ष कक्षा में पढने वाले विद्यार्थीयों की यादी देने की कृपा करेंगे, अशी माहिती शिघ्र टपालाने मागितलेली आहे. तसेच अर्ज दिनांक ३.१०.२००८ अन्वये प्रथमेश प्रशांत प्रधान, प्रथमेश प्रशांत चव्हाण इन दोनों के दाखला लेते वक्त जो कर्म लिस्ट स्कुल सर्टिफिकेट की प्रमाणित नकल मिलने बाबत. उपरोक्त नामो में किसी एक ने आपके कॅालेज में दाखला बी फार्म में लिया था. जिनका यह अंतिम वर्ष है. इन्होने जो दस्ताऐवज मार्क लिस्ट इत्यादी देकर ॲडमिशन करवाया था उस दस्ताऐवजोंकी प्रमाणित दि जावे, अशी माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाचे अनुषंगाने श्री प्रथमेश प्रधान व श्री चव्हाण हे दोनही विद्यार्थी बी.फॅार्म अंतिम वर्षाला प्रविष्ठ नाही. तरी आपणास माहिती करीता सादर. उपरोक्त माहितीचा नियमाप्रमाणे टपाल खर्च लवकरात लवकर कार्यालयात पाठवावा, असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २२००९ रोजी माहितीचा खर्च, टपाल खर्च एकुण रुपये ३५/- भरना करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु, प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"अपीलकर्ता अर्जदार श्री रमेशकुमार बाली व श्री मनोहर बाली, फुटाना ओळी कामठी यांनी प्रथम माहितीच्या अधिकारा अंतर्गत दिनांक ३.१०.२००८ ला आमचे कडे टपाला द्वारे पाठविला. अर्ज आमच्याकडे दिनांक १५.१०.२००८ ला मिळाला. त्यामध्ये जी माहिती मागितली ती अशी की प्रथमेश प्रशांत प्रधान आणि प्रथमेश प्रशांत चव्हान ईन दोनो के दाखला लेते वक्त जो मार्कलीस्ट, स्कुल सर्टीफिकेट की प्रमाणित नकल मिलणे बाबत अर्जामध्ये खाली एक नोट देण्यात आली होती की दो नामो से किसी एक के नाम से दाखीला लीया था यह उसका

( पान २ वर .. )

फाईनल वर्ष है. B फॅार्मा का या वरुन असे निदर्शनास येते की, अर्जदाराने माहितीचा तपशिल व्यवस्थीत दिला नव्हता दुसरे असे की त्यांनी ज्या दोन वि.ार्थ्यांचा उल्लेख केला त्यामध्ये त्यांनी आडनाव बदलवुन टाकेले आहे. प्रथमेश प्रशांत प्रधान हा विद्यार्थी २००७-०८ ला प्रथम वर्षात प्रवेश घेतला होता. त्याला अर्जदाराने अंतीम वर्षाचा विद्यार्थी म्हणुन अर्जामध्ये उल्लेख केला. दुसरे असे की दुस-या नावाचा उल्लेख करतानी प्रधानचे जागी आडनांव चव्हान म्हणुन टाकले. याचा अर्थ असा होतो की अर्जदार हा सुनियोजीतरित्या प्रथमेश प्रशांत प्रधान या विद्यार्थ्याला त्रास देत आहे असा होतो. प्रथमेश प्रशांत प्रधान ला ज्यावेळी हे माहित झाले तेव्हापासून तो फार घाबरलेला आहे. त्याने एकदा विचारना केली की कार नी आलो तर मला परवानगी मिळेल का. मी त्याला त्याबध्दल कारण विचारले असता त्याने सांगितले की माझ्या जिवाला धोका आहे असे वाटते. या कारणाने त्याचे अभ्यासावर सुध्दा परिणाम झालेला आहे. तो प्रथम वर्षाला पास झाला होता परंतु या सर्व बाबी मुळे त्याचे द्वितीय वर्षात अभ्यासामध्ये लक्ष लागत नसल्याकारणाने नापास झाला. एकंदरीत या वरुन असा निष्कर्ष निघतो की अर्जदार श्री रमेशकुमार बाली व श्री मनोहरलाल बाली प्रथमेश प्रशांत प्रधान या विद्यार्थ्याला मानसिक त्रास देत आहे. यामुळे त्या विद्यार्थ्याचे पालक सुध्दा चिंतेत आहे. त्यांना सुध्दा मनस्ताप होतो आहे. अपीलकर्ता श्री रमेशकुमार बाली व श्री मनोहरला बाली माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा दुरुपयोग करुन विद्यार्थी व पालक यांना त्रास देत आहे.

तसेच श्री रमेशकुमार बाली व श्री मनोहर बाली अपीलकर्ता यांनी आकसापोटी उत्तरवादी, विद्यार्थी व त्यांचे पालक हयांना मनस्ताप व्हावा व मानसिक त्रास दयावा हया एकमेव उददेशाने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा दुरुपयोग केला आहे तसेच उत्तरवादी व मा.राज्य माहिती आयोगाच्या वेळेचा अपव्यय केला आहे. त्यामुळे अपीलकर्तावर दंडात्मक कार्यवाही करुन उत्तरवादीस अपीलकर्त्यांना नुकसान भरपाई दयावयास लावावी ही माननीय आयोगास विनंती." तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे तोंडी युक्तीवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्या मुलाच्या माहितीच्या संदर्भात दिनांक १५/१०/२००८, २२/१०/२००८, ३/१२/२००८ व ९.४.२००९ रोजी अर्ज दाखल केले आहेत. यावरुन अपीलकर्ता यांचा त्रास देण्याचा उद्येश दिसून येतो व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३५९/२००९**

**१) श्री सुखदेव महागाजी तरोणे,**
**मु.मुरमाडी/सावरी, पश्चिम समर्थ नगर, लाखनी,**
**पो.ता.लाखनी, जिल्हा भंडारा.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.अभियंता,**
**म.रा.विज वितरण कं.उपविभाग, लाखनी,**
**ता. लाखनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता,**
**म.रा.विज वितरण कं.मर्या.लाखनी, शहर विभाग,**
**ता.लाखनी, जिल्हा भंडारा.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.९.२००८ रोजी कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य वितरण कंपनी मर्यादित, वितरण केंद्र लाखनी यांचेकडे श्री भाष्कर गोविंदराव देशपांडे यांचे नावे असलेले विद्युत मिटर बाबतची माहिती एकुण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी कनिष्ठ अभियंता यांचेकडे माहितीचा अर्ज सादर केला होता. प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी हे सहाय्यक अभियंता आहे. व त्यामुळे त्यांना माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे उत्तर देण्यात आलेले दिसून येत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या संदर्भामध्ये दिनांक २०.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, भाष्कर गोविंदा देशपांडे यांचे नांवावरील मिटर हे बदलवून त्यांनी घर

( पान २ वर ..)

विकत घेतलेले असल्यामुळे त्याकरीता त्यांनी अनेक अर्ज आतापर्यंत केलेले होते. परंतु सदरचे मिटर बदलवून मिळाले नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्याकरीता विशिष्ट नमुन्यात अर्ज असतो व त्यानंतर डिपॅाझिट भरावे लागते वगैरे.. त्याशिवाय नांवात बदल होत नाही. त्यानंतरही अपीलकर्ता यांची तक्रार मिटरच्या कार्यक्षमतेबाबत होती. त्याबाबतही कार्यवाही केलेली आहे. परंतु जे देयक आलेले आहे ते अतिशय जास्त असल्यामुळे सदरच्या देयाकाच्या संदर्भात त्यांनी तपासणी मागितली होती. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या सर्व तक्रारी सोडविण्यात येईल परंतु त्यांनी त्यासाठी योग्य त्या नमुन्यात अर्ज करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांचे कार्यालयात उपस्थित होऊन त्यांना हवी असलेली माहिती योग्य ती पुर्ती करुन उपलब्ध करुन घेण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३६४/२००९**

**१) श्री रत्नाकर वामनराव वाहाने,**
**ह.मु.राधाकृष्ण गृह संस्था भूखंड क्रं.१८,**
**महाजन हार्डवेअरच्या मागे, बेसा रोड, पो.नरेंद्र नगर,**
**नागपूर-१५ — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**सावनेर, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, सावनेर,**
**ता.सावनेर, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कार्यालय, सावनेर यांचेकडे त्यांचे खैरी ढालगांव येथे आबादीमध्ये असलेल्या घराबध्दल एकुण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १२.३.२००९ रोजी सदर प्रकरणाचा शोध घेणे सुरु आहे. प्रकरण प्राप्त होताच आपणास सदर प्रकरणाची नक्कल पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.५.२००९ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २.५.२००९ रोजी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे निश्चित असे वर्णन सुध्दा केलेले नाही. मुद्या क्रमांक ८ मध्ये ३:LEN/३७/८२/८३च्या नकला मिळतील काय असे विचारले आहे. परंतु प्रकरण उपलब्ध झाले नाही असे कळविले असल्यामुळे सदरच्या नकला उपलब्ध होऊ शकत नाही असे

( पान २ वर ..)

सांगितले. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिलेली केस LEN याचा अर्थ अपीलकर्ता यांचे घर हे अतिक्रमणात असावे व अतिक्रमण काढून सदरचे घर घेण्यात आले असावे. मात्र त्याबध्दलची नस्ती ही जिल्हाधिकारी कार्यालयात उपलब्ध असल्यास त्याचा पुन्हा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीचा जिल्हाधिकारी कार्यालयात शोध घेवून नस्ती उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३६५/२००९**

**१) श्री मो.आरिफ मो. शब्बि्र,**
**द्वारा अब्दुल कुददूस पहिला माला, खान कॅाम्प्लेक्स,**
**सिध्दार्थ नगर, टेका, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**महानगर पालिका, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा झोनल अधिकारी,**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर झोन क्रं.१०,**
**छावणी, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००९रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.९.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, एन.एम.सी. मंगळवारी झोन, छावणी नागपूर यांचेकडे टॅक्स नामांतरणाचे संदर्भात ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१०.२००८ रोजी अभिलेख्याचे निरीक्षण करावे व शुल्क भरुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे उत्तर दिलेले दिसून येते. परंतु दिनांक ६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दिनांक २.४.२००९ रोजी आपण उपरोक्त अपीलाबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त उपआयुक्त श्री रामटेके यांचेशी संपर्क साधवा. नंतरच आपल्या अर्जाचा विचार करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतरही दिनांक १७.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना कर निरीक्षक तथा माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकाराअंतर्गत प्रश्नावली येत नाही. आपणास या संदर्भातील अभिलेख्यांचे निरीक्षण करुन आवश्यक असलेली माहिती योग्य ते शुल्क भरुन प्राप्त करुन घेता येईल, असे कळविलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना कोणतेही पत्र आतापर्यंत मिळालेले नाही. कर निरीक्षक यांनी आयोगाकडे खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

"अर्जदार श्री मो.आरिफ मो.शब्बीर यांनी दिनांक १७.९.२००८ अन्वये माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नियम ३ अंतर्गत मंगळवारी झोन क्रं.१० येथे अर्ज सादर करुन नामांतरण बाबत तसेच कर आकारणी बाबत माहितीची विचारणा केली असता त्यांना पत्र क्रं.७० दिनांक १७.१०.२००९ अनुसार अभिलेख्याचे निरीक्षण करुन पाहिजे असलेली माहिती प्राप्त करण्यास पत्र देण्यात आले होते. परंतु त्यांनी पत्राच्या अनुषंगाने निरीक्षण न करता किंवा तिस दिवसांच्या आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर न करता त्यांनी दिनांक २७.२.२००९ ला

(पान २ वर ..)

मा.आयुक्त, म.न.पा.यांचेकडे अपील सादर केले. त्यांना कार्यालयीन पत्र क्रं.१०/अेडी दिनांक २.४.२००९ नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील करण्यास कळविण्यात आले. परंतु त्यांी अपील सादर केलेली दिसून येत नाही.

सबब असे नमुद करण्यात येते की, अपीलकर्ता यांना अभिलेख्याचे निरीक्षण घेण्याची आवश्यकता भासली नाही किंवा त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त उत्तरावर प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील करण्याची गरज भासली नाही.

करीता आपणास अशी विनंती आहे की, अर्जदाराला पाहिजे असलेल्या माहितीची आवश्यकता नसल्याने त्यांनी नस्तीचे निरीक्षण सुध्दा केलेले नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे योग्य चाकोरीतून अर्ज सादर न केल्यामुळे त्यांचा अपील अर्ज खारीज करण्यात यावा ही विनंती."

४. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अभिलेख्यांचे निरीक्षण करुन उपलब्ध करुन घेता येईल असे दिसून येते. व त्यास जन माहिती अधिकारी तथा कर निरीक्षक हे माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून अभिलेख्याचे निरीक्षण करुन उपलब्ध करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ३२१/२००९

**१) श्री वल्लभदास बंसीराम देशमुख,**
**मु.पो.कटंगीटोला, ता.जि. गोंदिया.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी,**
**(सर्व शिक्षा अभियान), जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी,**
**(सर्व शिक्षा अभियान), जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे त्यांचा अर्ज दिनांक ३०.६.२००८ अन्वये माहिती मागितली असून सदरच्या अर्जातील मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांचे यापूर्वी आयोगाकडील अपील क्रं.८२७/२००८, निर्णय दिनांक ११.६.२००९ मध्ये मागीतलेली माहिती सारखीच दिसून येते. एकाच माहितीचे अर्जाचे अनुषंगाने दोन वेळा आयोगाने निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९(३) (४) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ३६८/२००९
अपील क्रमांक ३६९/२००९

<u>अपील क्रमांक ३६८/२००९</u>

१) श्री विजय उमराव डोंगरे ऊर्फ डोंगरवार,
वार्ड क्रं.३, पंचशील झेंडा चौक,
कटंगी कला, ता.जि. गोंदिया. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया, जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कटंगी कला, ता. जि. गोंदिया. — उत्तरवादी

<u>अपील क्रमांक ३६८/२००९</u>

१) श्री के.एस. सेंदुरकर, जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत कार्यालय कटंगीकला,
ता.जिल्हा गोंदिया. — अपीलकर्ता

वि रु ध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया, जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

३) श्री विजय उमराव डोंगरे ऊर्फ डोंगरवार,
वार्ड क्रं.३, पंचशिल झेंडा चौक, कटंगीकला,
ता.जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.५.२००९ व १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

अपील क्रमांक ३६८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास विनंती करतो की, सन २००६-०७ आणि सन २००७-०८ चे प्रपत्र क्रमांक-१, चे लेखे व लेख्यांची वार्षिक विवरणे, घेतलेल्या कामाचे प्रस्तावित केलेल्या कामाचे ठराव, नियोजनाच्या प्रती, नोंदवहया, बँकेच्या पास बुका, मोजमाप वही मुल्यांकन दाखविणारे, कामावर प्रत्यक्ष खर्च दाखविणारे रजिस्टर/नमूना/वही

( पान २ वर ..)

अनुदानाचे व प्रत्येक कामाचे (बील) देयक यांचे चेक किंवा डी.डी.ड्राफटचे नंबर इत्यादि आवश्यक कागद पत्र आपण मला ३० दिवसांमध्ये व्यक्त्‍िशः पुरविण्याची कृपा करावी, ही विनंती.

२. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.१२.२००९ रोजी ग्राम विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ग्राम पंचायत कार्यालयात येवून व्यक्तीशः पाहाणी करण्याकरीता उपलब्ध करुन देण्यात येत आहे. करीता आपण सत्य माहिती व्यक्त्‍िशः पाहाणी करावी करीता सदर माहितीस्तव पत्र दिलेले आहे असे दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.२.२००९ रोजी देण्यात आला असून उपरोक्त क्रमांक १ ते ५ ची माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत कटंगी कला यांनी एक महिन्यात देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही सदरची माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयाविरुध्द जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ३६९/२००९ दाखल केले असून सदरच्या अपीलाचे कारण अर्जदारास संपूर्ण माहितीच्या छायांकित प्रती करुन देण्याकरीता रुपये १५,०००/- खर्च अपेक्षित आहे. एवढी रक्कम खर्च करण्याची ग्राम पंचायतीची कुवत नसल्यामुळे अर्जदारास माहिती दाखविण्याची ग्राम पंचायतीची तयारी आहे. तथापि माहिती झेरॉक्स करुन देण्याबाबत आदेश दिलेले आहेत ते आदेश ग्राम पंचायतीची आर्थिक कुवत नसल्यामुळे रद्द करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे.

४. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरच्या मागितलेल्या माहितीचा खर्च हा रुपये १५०००/- होऊ शकत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सागितले की, दोन वर्षातील सर्व माहितीची कागदपत्रे प्रती पृष्ठ रुपये २/- प्रमाणे जरी रुपये १५०००/- पेक्षा कमी झाले तरी सुध्दा सदरची माहिती विनामुल्य द्यावयाची असल्यामुळे ती ग्राम पंचायत मध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये दिनांक १६.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यात अपीलकर्ता व जन माहिती

(पान ३ वर ..)

अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी हे उपस्थित होते असे नमुद केले आहे. असे असताना ग्राम विकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये याबध्दल माहिती दिली नाही असे दिसून येते किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारची विचारणा केलेली दिसून येत नाही. निर्णय दिनांक १७.२.२००९ रोजी देण्यात आला आहे. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीचे कोणत्याही प्रकारे अवलोकन न करताच निर्णय दिलेला दिसून येतो व त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन द्यावयाची झाल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्याबध्दलचा खर्च स्वत: करावा. किंवा अपीलकर्ता यांनी सदरच्या अभिलेख्याची पाहाणी करुन त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. परंतु त्याकरीता सुध्दा खर्च हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: करणे आवश्यक राहील. व त्यामुळे दोनही अपीले अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३६८/२००९ व अपील क्रमांक ३६९/२००९ अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होऊन सदरच्या संबंधीत अभिलेख्यांची पाहाणी करावी व पाहणीतून त्यांना आवश्यक वाटतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावात. सदरच्या छायांकित प्रतीसाठी येणार खर्च प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वत: करावयाचा आहे.

२) अपीलकर्ता यांनी छायांकित प्रती तपासून घेतल्यावर त्या संबंधातील देयक हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे भूगतान करण्याकरीता पाठविण्यात यावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३७९/२००९**

**१) श्री जनार्दन गुलाबराव मुन**
**केंद्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,**
**७९१, नागसेन वन, नागपूर-१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, कार्यालय,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी मुख्य कार्यपालन अधिकारी तथा माहिती अधिकारी यांचेकडे जि.प.समाज कल्याण अधिकारी नागपूर अनुदानासाठी केलेली बोगस शिफारसी संबधी अधिका-यांवर कार्यवाही करुन निलंबन करण्याबाबत. इ.स.२००६-२००७. समाज कल्याण संचालनालय, म.रा.पुणे-१, दिनांक १६.१.२००९ कार्यवाहीबाबत अहवाल मिळण्याबाबत. माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व समाज कल्याण अधिकारी यांनी कागदपत्रे सुध्दा दाखल केलेली नाही. यावरुन अपीलकर्ता यांच्या दिनांक २.२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची माहिती दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारे प्रथम अपीलाची दखल घेतलेली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात. परंतु जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज व प्रथम अपील हे मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे दाखल केलेले होते. संबंधीत विषयाचे जन माहिती अधिकारी हे समाज कल्याण अधिकारी आहेत. असे असल्यामुळे या अपीलाच्या सुनावणीची नोटीस मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर तसेच जन माहिती अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना काढण्यात आली होती व त्यामुळे या संबंधातील कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली दिसून येत नाही.

३. वास्तविक अपीलकर्ता यांनी निश्चित असे जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज दाखल करणे आवश्यक असते. सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखांकडे अर्ज दाखल केल्यास त्यांना माहिती उपलब्ध होईलच असे नाही. ज्याप्रमाणे शासकिय अधिकारी/कर्मचारी यांना अधिनियमाच्या तरतुदी लागू आहेत तशाच त्या अर्जदारासही लागू आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी सुध्दा अर्ज करताना अधिनियमाच्या तरतुदींचे पालन करणे आवश्यक आहे. व सदरच्या

(पान २ वर ..)

प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज व अपील हे मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे दाखल केलेले असल्यामुळे फेटाळणे संयुक्तिक राहील. परंतु, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हा उद्येश असल्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तीक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या संदर्भात माहिती उपलब्ध असल्यास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १२.८.२००९**

**(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३६६/२००९**

**१) श्री मिलकीराम दादु डोबनउके,**
**मु.पो.चिखली, ता.तिरोडा, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय जिल्हा पोलीस अधिकारी,**
**पोलीस कार्यालय, गोंदिया. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**तिरोडा, ता.तिरोडा, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे दिनांक २५.१०.२००८ ला ताब्यात घेतलेल्या अभिलेख्यांच्या मुळ प्रति अनुक्रमे (१) दि. ३०.४.२००७ करारनामा (२) दिनांक ८.५.२००७ चा ५० रुपयाचा स्टॅाम्प (३) दिनांक २३.१०.२००८ चा ९१२१ क्रमांकाचा १०० रुपयाचा स्टॅाम्प, ही अभिलेखे सुरक्षित वा असुरक्षित, ताब्यात घेण्याचे उद्येश व आजपर्यंत झालेली कार्यवाही कळविणे. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५.१२.२००८ रोजी माहिती घेवून जावी असे पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २५.१२.२००८ रोजी स्मरणपत्र दिलेले दिसून येते. तसेच दिनांक २९.१२.२००८ रोजी टपालाने माहिती पाठविलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक ६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी भा.द.वि.कलम ४२० प्रमाणे पोलीस स्टेशन तिरोडा येथे तक्रार दाखल केली होती व त्यासोबत वर्णन केलेली कागदपत्रे सुध्दा दाखल केली होती. परंतु त्या तक्रारीच्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरची कागदपत्रे त्यांनी परत पाहिजे आहे व त्यामुळे त्यांनी माहिती मागितली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती पोलीस स्टेशन तिरोडा यांचेकडून एसडीपीओ कार्यालय तिरोडा येथून प्राप्त होईल करीता सदरचे पत्र प्राप्त होताच एसडीपीओ तिरोडा येथे येवून माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता माहिती घेवून गेले नाही असे त्यांनी आयोगास सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर केले नाही असा खुलासा पोलीस अधीक्षक यांनी केला आहे. पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या तक्रारीप्रमाणे अपराध क्रमांक १९८/०८, भा.द.वी.४२० चा गुन्हा गैरअर्जदारावर दाखल करण्यात आला आहे.

(पान २ वर )

अर्जदाराचे अर्जात मागणी केलेली अभिलेखे गुन्हयात पुराव्या कामी जप्त केल्याने हस्ताक्षर तज्ञाकडे अभिप्राय मिळण्यास पाळविण्यात आले असल्याने व सध्या उपलब्ध नसल्याने अर्जदारास समक्ष सूचना देण्यात आली आहे. अर्जदारानी न्यायालयाची परवानगी घेवून मुळ अभिलेख मिळविता येईल. अशा प्रकारे अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येत नाही. मात्र आयोगाकडे खुलासा दाखल केला आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना न्यायालयात गुन्हा दाखल करण्याबाबत काहीही कळविले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संपूर्ण तपशिलात कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील व त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत त्यांच्या २८.११.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३६७/२००९**

**१) कु.शिला राम ऊर्फ दादासाहेब तिवारी,**
**श्रीराम भवन, मेन रोड, रामनगर, गोंदिया-४४१६१४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्य.),**
**जिल्हा परिषद, गोंदिया.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
**श्रीराम विद्यालय, खमारी, जिल्हा गोंदिया.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीराम विद्यालय, खमारी यांचेकडे सेवा पुस्तकाची प्रत पुरविण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जदाराची दिनांक ७.१२.१९९९ रोजी नियुक्ती करण्यात आली. अर्जदाराला खोटे कारण दाखवून दिनांक ५.१२.२००९ ला सेवा मुक्त केले. तेव्हा अर्जदाराने मा. शाळा न्यायाधिकरण, चंद्रपूर येथे अपील दाखल केली. मा.शाळा न्यायाधिकरण कोर्टाकडून सेवा मुक्तीचा आदेश फेटाळून लावला. दिनांक २१.१२.२००५ चा निकाल आपल्या कार्यालयाला दिलेला आहे . मा. कोर्टाने स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे की, अर्जदाराला पुर्ननियुक्ती Reinstate with continuity in her original post तसेच मा. उच्च न्यायालय नागपूरनी दिनांक २१.१२.२००५ चा निकाल कायम ठेवला. दिनांक १६.४.२००८ च्या अन्वये मी दिनांक २३.४.२००८ ला कामावर रुजू झाले. माहिती व्यक्तीशः हवी असे नमुद केले आहे. त्यानुसार विहिती मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले.

३. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दिनांक ९.६.२००९ रोजी अपीलावर कार्यवाही करण्यासाठी या कार्यालयात दिनांक ८.५.२००९ रोजी सुनावणी घेतली. मुख्याध्यापक यांनी सुनावणी दरम्यान आपले सेवा पुस्तक संस्था सचिवांकडे आहे असे सांगितले. त्याची प्रत माहितीच्या अधिकारा अंतर्गत आपणास पुरविण्यात आली आहे. मुख्याध्यापक श्रीराम विद्यालय खमारी यांचे संदर्भिय पत्र क्रं.२ अन्वये आपली मुळ सेवा पुस्तीका अपीलीय अधिकारी यांचेकडून उपलब्ध होईल असे लेखी कळविल्याचे दिसते. परंतु आपण मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे आपले अर्ज माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे पाठविण्यांत येत आहे. माहिती त्यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी. त्याचप्रमाणे दिनांक १९.५.२००९ रोजी मुख्याध्यापक यांनी सेवापुस्तिका या कार्यालयात नसल्यामुळे आपणास उपलब्ध करुन देता आली नाही. मा.अपीलीय अधिकारी यांचेकडून सेवापुस्तीका उपलब्ध झाल्यावर आपणास आपली मुळे सेवापुस्तिका व दुय्यम सेवापुस्तीका उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते.

( पान २ वर ..)

दिनांक १२.५.२००९ रोजी पुन्हा अपीलीय अधिकारी यांनी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांना कु. शीला तिवारी यांची दुय्यम सेवापुस्तक त्वरीत पुरविण्यात यावी असे आदेश देण्यात आले आहे. व त्यावरुन पुढील पत्रव्यवहार झालेला दिसून येतो.

४. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. कु.सुजाता तिवारी हजर आहेत. तसेच उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. श्री गोव्हबानी हे हजर आहेत. त्यांनी युक्तीवाद केला. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या सेवा पुस्तीकेची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व मुळे सेवा पुस्तक आयोगाचे निदर्शनास आणले. त्यावर अपीलकर्ता यांची प्रत मिळाल्याची सही आहे. त्यावर अपीलकर्ता यांना विचारले असता त्यांनी असे साँगितले की, सन २००१ मध्ये प्रत उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यानंतर रुजू झाल्यावर सर्व सेवा पुस्तक अद्यावत करुन त्याबध्दलची प्रत मागितलेली आहे. मी सेवेत असताना सुध्दा सेवा पुस्तक अद्यावत करुन देत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे वकीलानी सांगितले की, अपीलकर्त्यास शाळा न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयाचे विरुन उच्च न्यायालयात अपील प्रलंबीत आहे व त्या अपीलाचा निर्णय झाल्यानंतर त्यांचे सेवा पुस्तक अद्यावत करण्यात येईल व त्यामुळे त्यांनर आता सेवापुस्तक अद्यावत करुन देता येणार नाी. परंतु अपील प्रलंबीत असल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची मनाई केलेली नाही असे आयोगास सांगितले व त्यामुळे अपीलकर्ता यांना ते सध्या सेवेत असल्यामुळे सेवापुस्तक अद्यावत करुन देणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांचे सेवा पुस्तक ते सध्या सेवेत असल्यामुळे अद्यावत करुन विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १२.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १८ अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १३४/२००९**

**१) श्री डॉ.विजयकुमार नामदेवराव इंगळे,**
**बुराडे ले आऊट, देशमुख वाडी जवळ, शिवसेना चौक,**
**अलोटी, पो.मानसमंदीर, ता.जिल्हा वर्धा.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी ,**
**३) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष,**
**शिव वैभव संस्था, शिव वैभव शिक्षण महाविद्यालय,**
**बॅचलर रोड, कुमारप्पा मार्ग, आर्वी नाक्याजवळ, वर्धा.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक १४.८.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक २५.३.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक १४.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार व गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांनी त्यांचे अपील क्रमांक २५६५/२००७ चा निर्णय हा दिनांक ५.२.२००९ रोजी देण्यात आला असून सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यात आले असून त्यांच्या दिनांक ३.५.२००७ च्या अर्जात मागितलेली माहिती उपलब्ध असल्यास निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तक्रारकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेले आहे असे त्यांनी मान्य केले परंतु अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तक्रारकर्ता यांच्या तक्रारीमध्ये निश्चित अशी माहिती त्यांना आहे असे दिसून येत नाही. प्रवेशार्थीचे अर्ज तीन ते चार हजार असावे असे शब्द वापरलेले आहे.व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिलेली आहे, ही बाब खरी आहे असे गृहित धरता येते. असे असले तरी मुद्या क्रं.२ व ३ ची माहिती दिलेली नाही असे तक्रारकर्ता यांचे म्हणणे आहे. त्याकरीता तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपलब्ध असलेल्या अभिलेख्याचे निरीक्षण करणे व त्यातून माहिती उपलब करुन घेणे संयुक्तिक राहील. परंतु त्यावर तक्रारदार यांचे म्हणणे असे आहे की, संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली जाईल किंवा नाही याबध्दल त्यांना शंका आहे. त्याकरीता चौकशी करीता विद्यापीठातील स्वतंत्र अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहील. विद्यापीठातील अधिका-यांनी संबंधीत महाविद्यालयातील अभिलेख्यांचे अपीलकर्ता यांचे उपस्थिती पाहाणी करुन घ्यावी व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्याकरीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे प्र-कुलगुरु यांनी संबंधीत महाविद्यालयातील कागदात्राच्या चौकशी करीता एक अधिकारी नियुक्त करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे

( पान २ वर .. )

आंत वैभव कॅालेज ऑफ एज्युकेशन या महाविद्यालयातील अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अभिलेख्याची तपासणी अपीलकर्ता यांचे उपस्थितीत करावी व अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याप्रमाणे संबंधीत चौकशी अधिकारी यांनी कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ अपीलकर्ता व महाविद्यालयाचे माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांना कळवून त्याप्रमाणे चौकशी करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे प्र-कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठवावी. सोबत अपील क्रमांक २५६४/२००७ व २५६५/२००७, निर्णय दिनांक ५.२.२००९ च्या निर्णयाची प्रत सुध्दा पाठविण्यात यावी.

३) तक्रारदार व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४०१/२००९**

**१) श्री प्रविण गुलाबराव देसाई,**
**दिवानी व फौजदारी न्यायालय, वरोरा,**
**ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर.** **उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा भेषज अधिकारी,**
**प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, घुग्गुस, ता.जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, घुग्गुस यांचेकडे सोबत जोडलेल्या मागणीपत्रानुसार मागणी क्रं.१ ते मागणी क्रं.४ पर्यंत नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली आहे. माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक २८.३.२००९ रोजी कनिष्ठ सहाय्यक दिनांक २७.२.२००९ पासून रजेवर आहे व त्यांच्या स्वेच्छा निवृत्तीचा अर्ज मुख्य कार्यपालन अधिकारी कार्यालयात मंजूर झालेला आहे. प्राथमिक स्वास्थ्य केंद्र, घुग्गुस येथे कोणत्याही कनिष्ठ सहाय्यकाची नेमणुक झालेली नाही. व मार्च असल्यामुळे कनिष्ठ सहाय्यकाची सर्व कामे श्री झोडे, श्री नंदुरकर, श्री पराते हे दूस-या कनिष्ठ सहाय्यकांना विचारुन करण्याचा प्रयत्न करीत आहे. तेव्हा आपण मागितलेल्या माहितीची मुदत वाढवून देण्यात यावी, ही विनंती. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

३. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी वैद्यकिय अधिकारी यांना मागणी केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन देवून त्यांच्या मयत आईचे जिल्हा परिषदेकडे प्रलंबीत असलेले देयक तात्काळ अदा करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे दिनांक १७.४.२००९ रोजी कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या सुनावणीमध्ये माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे कबुल केल्याने व प्रलंबीत देयक देण्याचे मान्य केल्याने अपचारी यांचे समाधान झाले व त्यानुसार मागणी केलेली माहिती व देयक अधिकारी यांनी द्यावे असे ठरले. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.५.२००९ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांना रक्कम मिळाली याबध्दलची पोच दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली सर्व देयकांची रक्कम मिळालेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना विहित

(पान २ वर ..)

मुदतीत जी माहिती मागितली ती देण्यात आली नाही. त्यामुळे संबंधीत जन माहिती अधिकारी यांना शास्ती करण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ५.३.२००९ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती ज्या कर्मचा-यांनी उपलब्ध करुन दिली नसेल त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४०४/२००९**

**१) श्री हरिदास महादेव झाडे,**
**प्लॅाट नं. ६ ब, खंतेनगर, बिनाकी,**
**नागपूर-१७. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(नियमितीकरण),**
**नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, नागपूर सुधार प्रन्यास यांचेकडे खंते नगर विकास समिती ख.नं.६/१मौजा बिनाकी प्लॅाट नं. ६ ब, अशोक खुशाल काळबांडे आणि हरिदास महादेव झाडे यांना ६ ब या प्लॅाट नियमितीकरण पत्र कसे काय मिळाले याबध्दल माहिती देण्यात यावी. अशोक काळबांडे याची प्लॅाट नंबरची आर.एल.आणि मंजूर नकाशा देण्यात यावी, माहिती पोस्टानी पाठवावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १०.४.२००८ रोजी दस्तऐवजाच्या प्रतीसाठी रुपये १५/- रोख विभागात जमा करावे व दस्तऐवज घेवून जावे. तसेच पत्रात विचारलेली बहुतांश माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून माहितीचा अधिकार अधिनियमातील "माहिती" या व्याख्येत येत नाही. अभिलेखाचे स्वरुपातील आपण मागितलेले दस्ताऐवज इमारत अभियंता(उत्तर) यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत. या दस्ताऐवजांच्या प्रतीसाठी रुपये १५/- रोख विभागत जमा करावे व देय केलेल्या रकमेची पावती सादर करुन दस्ताऐवज घेऊन जावेत, असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १४.७.२००८ रोजी विषयांकित भूखंड क ६ ब, खंते नगर ख.क्रं.६/१ मौजा बिनाकी व भूखंडाच्या पूर्वेस असलेल्या जागेबाबत मागितलेल्या माहिती संबंधाने अहवाल अपूर्ण असल्याने विभागीय कार्यालय (उत्तर) यांचेकडून मागविण्यात आला आहे. त्यामुळे त्या प्रकरणावर अंतिम निर्णय व्हावयाचा आहे, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २५.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.८.२००८ रोजी देण्यात आला असून अर्जदारास अपेक्षित कार्यवाही माहितीच्या अधिकारात अभिप्रेत नसल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. त्यात प्रथम अपीलाचा निर्णय देताना सदर भू.क्रं. ६ ब या ची विक्री दोन व्यक्तीस भूखंडाचे दोन भाग असून

( पान २ वर ..)

दोन व्यक्त्ीस विक्री केलेली असावी असा खुलासा केलेला आहे. परंतु भु.क्रं.६ ब माझा आहे व माझ्याच प्लॉटचे नियमितीकरण पत्र त्रयस्थ व्यक्त्ीच्या नांवाने दिले आहे. मी दोन वर्षा पासून नियमितीकरण पत्र रद्य करणास विनंती करीत आहे. तरी नियमितीकरण पत्र रद्य करण्यात आले नाही. एकाच भूखंडाचे दोन व्यक्तींच्या घराचे बांधकामाचे नकाशे ना.सु.प्र.कडून मंजूर करण्यात आले. त्रयस्थ व्यक्तीला ना.सु.प्र.कडुन पंजीबध्द दुरुस्ती पत्र सादर करण्याची सूचना क्रमांक ५६ दिनांक २०.२.२००६ ला दिली. दुय्यम निबंधक नागपूर शहर क्रमांक १ दस्त क्रं.२५३७/२००६, दिनांक ६.५.२००६ ला त्रयस्थांनी चुकीचा व खोटा घोषणा पत्राचा लेख पंजीबध्द करुन ना.सु.प्र.मध्ये सादर केला. भु.क्रं.६ ब खसरा सिमेवर असल्यानी तो शेवटचा व तिरकस आहे त्यामुळे याचे दोन भाग नसून तो एकच भुखंड आहे. पंजीबध्द घोषणा पत्रा मध्ये चतु: सिमेची हेराफेरी करुन त्यामध्ये बदलाव करण्यात आला. ना.सु.प्र.नी त्रयस्थाला ६०० चौ.फुट जागा वाढवून त्याचे नियमितीकरण करुन देण्यात आले. लेआऊट नकाशा मध्ये एकास त्रिकोण व त्याच भुखंडाला घोषणा पत्रा मुळे चौकोण बनवुन देण्यात आले. नगर भूमापन क्रं.२ येथील आखिव पत्रीकेवर भु.क्रं.६ ब मध्ये दोन नावांची नोंद करण्यात आली. हा सर्व घोळ चुकीच्या पंजीबध्द घोषणा पत्रा मुळे झाला आहे. तरी चुकीच्या घोषणा पत्राच्या लेख आधारे ना.सु.प्र.ने दिलेले नियमितीकरण पत्र रद्य करण्यात यावे व मला न्या मिळवून देण्यात यावा अशी विनंती आयोगाकडे केली आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्रे जशी आहे त्या स्वरुपात छायांकित प्रतीमध्ये उपलब्ध करुन देण्यात येतात. कोणत्याही प्रकरणामध्ये चौकशी करुन देण्याची तरतुद अधिनियमात नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे घोषणापत्र रद्य करुन न्याय मिळवून देण्याची विनंती मान्य करता येत नाही. प्रथम अपीलाचा निर्णय स्वयंस्पष्ट आहे. तरी सुध्दा सदरच्या प्रकरणात अहवाल उपलब्ध झालेला असल्यास अपीलकता्र यांना सुधारित अहवाल हा उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३१.३.२००८ च्या अर्जात मागितल्याप्रमाणे माहिती, तसेच दिनांक १४.७.२००८ रोजी दिलेल्या उत्तराप्रमाणे सुधारित अहवालाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४०५/२००९**

**१) श्री ॲड.राहुल गजानन पुराणिक,**
**यशोदा निवास, खरे टाऊन पोस्ट ऑफिस जवळ,**
**नागपूर-४४००१०. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विशेष भूअर्जन अधिकारी,**
**लघु सिंचन कामे, जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष भूअर्जन अधिकारी, एमआयडब्ल्यू, जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे "Decision on the proposal of the MINOR IRRIGATION DEPARTMENT DIVISIONAL OFFICE, Nagpur in regard to TURAGONDI TALAB PRAKALP TURAGONDI, Tah.Hingna, Distt.Nagpur" शी संबंधीत मुद्या क्रं. A ते H पर्यंत नमूद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २५.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २७.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपील खारीज केलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता हे स्वत: वकील आहे. त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अवार्ड हे अजून झालेले नसल्यामुळे उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले असल्यामुळे माहिती उपलब्ध झाली असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती

( पान २ वर ..)

अधिकारी यांना असे आदेश करण्यात आले आहे की, अंतिम अवार्ड झाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १८.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४०६/२००९**

**१) श्री श्रीकांत पांडुरंग राजुरवार,**
**क्वार्टर नं.३५ बी/टाईप-४/सेक्टर-५,**
**ऑर्डनन्स फॅक्टरी, चांदा इस्टेट, भद्रावती, चंद्रपूर-४४२५०१. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,**
**नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसुल),**
**जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे who is the competent Authority to sanction regularization of plots under Gunthewari Act २००१ in unauthorized layout in Kh.No.१७, १८/१ and १८/२ Mouza Besa(Beltarodi), Tahasil Nagpur, District Nagpur. Please provide Name and address of the concerned authority to whom application is to be made. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांना १५ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश केलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक ६.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे खुलासा दाखल करताना त्यात माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्यामुळे दंड करण्यात यावा. तसेच जिल्हाधिकारी, नागपूर यांनी वृत्तपत्रात जाहिरात देवून गुंठेवारी कायदा २००१ मंजूर असल्याचे प्रसिध्द केले असल्याचे कुठल्याही एका वृत्तपत्राचे कात्रणाची प्रत देण्यात यावी वगैरे.. एकुण ७ मुद्यांमध्ये उत्तर मिळावे अशी विनंती केली आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे स्पष्ट दिसून येते व त्यामुळेही संबंधीत अर्ज ज्या कर्मचा-याकडे प्रलंबित राहीला असेल त्या कर्मचा-यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलाच्या नंतर अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती ही उपलब्ध करुन दिलेली आहे. राज्य माहिती आयोगाकडे खुलासा करताना अपीलकर्ता यांनी जे नवीन मुद्ये उपस्थित केले आहे ते नवीन मुद्ये अपीलात उपस्थित करता येत नाही व नवीन माहिती मागता येत नाही. तसेच जिल्हाधिकारी यांनी सदरचा कायदा वर्तमान

( पान २ वर .. )

पत्रामध्ये प्रसिध्द केला आहे काय याची माहिती मागितली आहे. राज्य विधान मंडळाचा कायदा शासन राज पत्रात प्रसिध्द करण्यात येतो. व त्यात प्रसिध्द झाल्यानंतर संपूर्ण माहिती नागरिकांना आहे असे गृहित धरले जाते. त्यामुळे अशी माहिती मागणे हे मुळात योग्य नाही. योग्य ती माहिती मागणे अपेक्षित आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलानंतर जी माहिती उपलब्ध करुन दिली ती योग्य आहे. तरी सुध्दा त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २०.१०.२००८ रोजीचा अर्ज ज्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडे प्रलंबित राहीला असेल त्या अधिका-यांच्या विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे विभागीय चौकशीची कार्यवाही करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १८.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३४३/२००९**

**१) श्री ताराचंद सागरमल चौबे,**
**सराफा लाईन, मारवाडी मोहल्ला,**
**वर्धा, ता.जि. वर्धा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी,**
**वर्धा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
**जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे Permission given of the breach of condition in matter of Nazul land or lease. माहितीचा कालावधी १.७.२००७ ते ३०.११.२००८ असा दिलेला असून एकुण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध आहे, घेवून जावी असे पत्र दिलेले दिसून येते. तसेच दिनांक २०.१.२००९ रोजी रुपये ६६/- भरावे असे कळविले व माहिती घेवून जावी असे कळविले. व त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.३.२००९ रोजी देण्यात आला असून त्याप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून १० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २६.३.२०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दिनांक २९.४.२००९ रोजी

( पान २ वर .. )

सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच अपीलकर्ता यांच्या कडून अतिरिक्त खर्चाचा भरणा करुन घेतल्यानंतर सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती करण्यात यावी व विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आहे. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे तसेच हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी भरलेले रुपये ६६/- त्यांना परत करण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक १७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३३९/२००९**

**१) सौ. प्रमिला राजेश मेश्राम,**
**द्वारा श्री दामोधर खोब्रागडे, ५६, उंटखाना,**
**नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त,**
**अजनी विभाग, परिमंडळ क्रं.४, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.पोलीस आयुक्त,**
**अजनी विभाग, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२००८ रोजी सहा.पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी यांचेकडे अर्जाचे सोबत संलग्नीत केलेल्या अर्जामध्ये माहितीचा विषय दिलेला आहे. दिनांक १९.८.२००८, ५.९.२००८ व २७.९.२००८ ला केलेल्या अर्जाच्या सत्य माहितीच्या सत्यप्रती. तसेच दिनांक २३.६.२००७ रोजी रजि.पोस्टाने पाठविले(राजेश मेश्राम) ही माहिती स्टेशन डायरीमध्ये postal proof of complaint copy घेतली याविषयाच्या माहितीच्या सत्यप्रत मिळणेबाबत. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. सोबतच्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १९.८.२००८ रोजी केलेला अर्ज व इतरही केलेल्या अर्जाच्या आवक जावक संबंधात तफावत आहे व ही माहिती खोटी आहे, असे त्यांचे म्हणणे आहे व त्यामुळे सत्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे त्यांचे म्हणणे आहे. त्याप्रमाणे दिनांक १८.११.२००८ रोजी म्हणजे विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली म्हणून त्यांनी दिनांक १८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलात त्यांनी १० मुद्यांमध्ये माहितीचे विश्लेषण मागितलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक १३.१.२००९ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे व त्यात अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ३० दिवसांत पुरविण्यात आलेली आहे या कारणास्तव अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना असे सांगितले की, त्यांना माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात उपलब्ध झालेली आहे. परंतु सदरच्या कागदपत्रांच्या मध्ये तारीखेच्या बाबत आवक जावकच्या संबंधात चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांनी आयोगापुढे असेही दाखविले की, दिनांक २५.६.२००८ ला रजिस्टर केलेला अर्ज पोलीस स्टेशनला प्राप्त नाही. दिनांक २५.६.२००७ रोजी जो अर्ज केलेला आहे तो अर्थातच त्याच

( पान २ वर .. )

दिवशी पोलीस स्टेशन मध्ये रजिस्टर पोस्टाने प्राप्त होणे शक्य नाही. व त्यांच्या अर्जावर दिनांक २३.६.२००७ ही तारीख टाकलेली आहे व त्या अर्जाची प्रत अपीलकर्ता यांचे जवळ आहे. याचा अर्थ श्री मेश्राम यांनी दिनांक २३.६.२००७ चा अर्ज दिनांक २५.६.२००७ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविला व तो दिनांक २६.६.२००७ रोजी प्राप्त झाला असे पोलीस निरीक्षक, इमाववाडा यांनी कळविले आहे ते विश्वासार्ह वाटते. व त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु अपीलकर्ता यांना त्यांच्या स्वतःच्या लग्नाच्या वैवाहिक जिवनाच्या संदर्भामध्ये प्रश्न निर्माण झालेला असल्याने त्याबाबतची गुंतागुंत ते माहितीच्या अधिकारात पोलीसांना माहिती मागवून अधिक गुंतागुंत करीत आहे असे दिसून येते.

वास्तविक, ही कौटुंबिक बाब आहे व त्यामध्ये पुन्हा पोलीसांनी चौकशी केली आहे व बयाण घेतले आहे. व त्याबाबतची सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यावर सुध्दा अशा प्रकारे चुकीची व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हे म्हणणे योग्य नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३३७/२००९**

**१) श्री महेंद्र रामकृष्णराव शेंडे(पंचरचे दुकान)**
**दयाल नगर, चंदन एस.टी.डी.जवळ, मेन देवळी रोड,**
**पोस्ट वर्धा गंज, ता.जि.वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मा.मुख्य न्यायाधिश,**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा, जि. वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,**
**जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी प्रबंधक, जिल्हा न्यायालय यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून श्री रामकृष्ण मारोती शेंडे विरुध्द सौ.मैनाबाई रामकृष्ण शेंडे केस नं.HMP No. २१/९६ निरीक्षण संबंधी दस्तऐवज मिळण्याबाबत. अशी माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात आले आहे. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी व्यक्त्तीशः माहिती मागितली होती म्हणून ते व्यक्तीशः आल्यानंतर त्यांना तोंडी समजावून सांगितले. परंतु त्यांनी व्यक्तीशः माहिती घेण्यास इंकार केला आहे. वास्तविक अपीलकर्ता यांना जी माहिती पाहिजे आहे ती केस नंबर HMP No.२१/९६ ही त्यांचीच केस असल्यामुळे त्यांना सर्व माहिती आहे. त्यांना नियम समजावून सांगितले होते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, माहितीच्या अधिकारात त्यांना न्यायालयाने माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे या अर्जाच्या संदर्भात ती उपलब्ध करुन देता येत नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी त्यांचा पुर्वीचा माहितीचा अर्ज आयोगाचे निदर्शनास आणला. त्या माहितीच्या अर्जामध्ये न्यायालयातील प्रशासनिक कामकाजाच्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यामुळे न्यायालयाचा प्रशासनिक विभाग माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येते. परंतु न्यायालयात प्रलंबित असलेल्या किंवा निर्णय झालेल्या दाव्याच्या संदर्भात किंवा अपील किंवा याचिकेच्या संदर्भात संपूर्ण नस्तीची माहिती पाहिजे असल्यास त्याकरीता न्यायालयाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे वेगळे नियम केले आहे व त्यामुळे तशा प्रकारच्या माहिती करीता न्यायालयाचे जे पुर्वीचे नियम आहे

( पान २ वर ..)

त्याप्रमाणे माहिती मिळू शकते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे ती उपलब्ध होऊ शकत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक १७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४२१/२००९**

**१) श्री राजू किसनराव वानखेडे,**
**श्रीराम वार्ड, बल्लारपूर, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, ५ वा माळा, उद्योग भवन,**
**सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी,**
**महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, गाळा क्रं.१३ व १४,**
**तळ मजला, नवीन प्रशासकिय भवन, मुल रोड, चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, जिल्हा चंद्रपूर यांचेकडे बल्लारपूर तालुक्यात चालू असलेल्या उद्योगधंदयाबाबत पर्यावरण संतुलन व नियंत्रणाखाली त्यांनी केलेल्या उपाययोजनांचा आढावा अहवाल. कालावधी १ जानेवारी, २००८ ते ३१ डिसेंबर, २००८. अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १९.४.२००८ रोजी झाली असून निर्णय दिनांक १७.६.२००९ रोजी दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

२. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्या क्रं. १ व २ ची माहिती मिळाली. परंतु मुद्या क्रं.३ ची माहिती उपलब्ध झाली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, मुद्या क्रं.३ची निश्चित अशी कोणती माहिती अपीलकर्ता यांना अभिप्रत आहे त्याबध्दल त्यांनी जन माहिती अधिकारी यांना अवगत केल्यास त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध

( पान २ वर .. )

करुन देता येईल. प्रदुषण नियंत्रण कायदा १९८६ या खालील आढावा याचा अर्थ निश्चित अशी माहिती मागितली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांना त्याबाबतची निश्चित माहिती दिलेली नाही हे स्पष्ट होते. तरीही अपीलकर्ता यांनी त्याबध्दलची स्पष्ट माहिती विचारावी जेणेकरुन जन माहिती अधिकारी यांना ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४२०/२००९**

**१) श्री सतिश शंकर सिडाम,**
**तर्फे श्री राजेंद्र प्रभाकर वंजारी,**
**ह.मु.लोणारा, पो.नांद, ता.भिवापूर, जि.नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपवनसंरक्षक,**
**वन विभाग, चंद्रपूर. ता.जि. चंद्रपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, शिवनी,**
**ता. सिंदेवाही, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.११.२००८ रोजी श्री जे.एस.कराड, वन परिक्षेत्राधिकारी कार्यालय, शिवनी यांचेकडे सन २००६ ते २००८ या कालावधीतील शिवणी, शिरसाळा, वासेरा, बिंगडझरी या गावातील वन व्यवस्थापन समितीने केलेल्या कामाचा अहवाल. त्यावर झालेला खर्च, खर्चाचे प्रमाणके, कामाचे अंदाजत्रक. (२) वन परिक्षेत्र शिवनी अंतर्गत केलेल्या कामाचे अंदाजपत्रक, केलेल्या कामाचा अहवाल, दिलेल्या मजुरीचे खर्चाचे अहवाल, खर्चाचे प्रमाणके (३) पांगळी गांवात बांबुचे पकडलेल्या ट्रकवर झालेल्या कार्यालयीन कार्यवाहीचा अहवाल. संपूर्ण माहिती सत्यप्रतीत मिळणेबाबत. अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्त्तीश: घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दिनांक १३.४.२००९ ला वनपरिक्षेत्राधिकारी, शिवनी कडून २१९ पानांची संपर्ण माहिती मुदतीत उपलब्ध करुन देण्यात आली. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना २१९ पानाची माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिली व पोच दिलेली आहे ती आयोगाचे निदर्शनास आणली. तसेच जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.

**खुलासा**

"(१) वनपरिक्षेत्र अधिकारी शिवणी वनपरिक्षेत्र हे सहायक राज्य जन माहिती अधिकारी म्हणून नामनिर्देशित आहेत. (२) अर्जदार श्री सतिश शंकर सिडाम व इतर यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक २६.११.२००८ ला माहितीकरीता संयुक्त अर्ज श्री जे.एस.कराड वनपरिक्षेत्र अधिकारी, शिवणी असे नांव नमुद करुन वनपरिक्षेत्र अधिकारी शिवणी यांचे कार्यालयात कार्यरत लेखापाल कु.एस.के.पाकडे यांचेकडे दिला. सदर माहितीचा अर्ज श्री जे.एस.कराड यांचे नांवाने असल्यामुळे परिक्षेत्र कार्यालयाचे पत्र क्रं.२९० दिनांक ८.१२.२००८

( पान २ वर .. )

ला श्री जे.एस.कराड क्षेत्र सहायक शिवणी यांचेकडे पाठविण्यात आला. श्री जे.एस.कराड, क्षेत्र सहायक शिवणी यांनी सदरचा अर्ज त्यांचे पत्र क्रमांक १७९ दिनांक १५.१२.२००८ नुसार वनपरिक्षेत्र अधिकारी शिवणी यांचेकडे परत केला. (३) अर्जदारानी माहितीचे अर्जानुसार मागितलेली माहिती शिवणी वनपरिक्षेत्रात उपलब्ध माहितीनुसार तयार केली. माहितीचे अर्जात माहिती व्यक्तीशः(प्रत्यक्ष) नेणार असल्याने नमुद केलेले असल्याने माहिती पोस्ट व इतर माध्यमाद्वारे न पाठविता अर्जदाराची वाट पाहण्यात आली.(४) श्री सतिश शंकर सिडाम व इतर यांनी दिनांक १४.१.२००९ ला प्रथम अपीलीय अधिकारी (उपवनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर) यांचेकडे अपील दाखल केल्याने उपवनसंरकक्षक, चंद्रपूर वनविभाग यांनी त्यांचे पत्र क्रं.६१२४ B दिनांक १९.१.२००९ चे माहितीचे अर्जावर काय कार्यवाही केली, याबाबत अहवाल सादर करण्यास कळविल्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी शिवणी यांचे पत्र क्रं.१७१ दिनांक २७.१.२००९ चे पत्रानुसार माहिती तयार असल्याचे रजिस्टर पत्राद्वारे अर्जदारास कळविण्यात आले व त्याची प्रतिलीपी उपवनसंरक्षक चंद्रपूर वनविभाग यांना सादर करण्यात आली. (५) वनपरिक्षेत्र अधिकारी, शिवणी यांचे पत्र क्रमांक १७१ दिंक २७.१.२००९ नुसार अर्जदार श्री सतिश सिडाम व श्री सारंग दाभेकर दिनांक १३.४.२००९ ला वनपरिक्षेत्र कार्यालय शिवणी येथे व्यक्तीशः (प्रत्यक्ष) आले असता त्यांना २१९ पृष्ठांची माहिती हस्तांतरित करण्यात आली आहे व पोच प्राप्त करण्यात आली आहे.

विलंबाची कारणे:

(१) अर्जदारानी माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत केलेला संयुक्त अर्ज चुकीच्या नांवाने (श्री जे.एस.कराड वनपरिक्षेत्र अधिकारी, शिवणी) वनपरिक्षेत्र कार्यालय शिवणी येथे दिनांक २६.११.२००९ ला सादर केला आहे. अर्जामध्ये अर्जदारानी माहिती व्यक्तीश(प्रत्यक्ष) पाहिजे असे नमूद करुनही अर्जदार अर्ज दिल्यानंतर वनपरिक्षेत्र कार्यालय यिशवणी येथे आले नाहीत. त्यामुळे माहिती हस्तांतरित करण्यात विलंब झाला आहे. (२) अर्जदारांनी त्यांचे संयुक्त अर्जात श्री जे.एस.कराड (एस.जे.कराड) या चुकीच्या नांवाने अर्ज केला. श्री एस.जे.कराड हे शिवणी वनपरिक्षेत्रात क्षेत्र सहायक या पदावर कार्यरत आहेत. त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत सहा.माहिती अधिकारी किंवा माहिती अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेले नाही. (३) अर्जदाराने अर्जात चुकीचे नांव नमुद केल्याने तसेच व्यक्तीशः (प्रत्यक्ष) माहिती देण्याचे नमुद केल्याने माहिती हस्तांतरित करण्यास विलंब झाला आहे व याकरीता अर्जदार जबाबदार आहेत. (४) दिनांक २६.११.२००८ चे माहितीकरीताचे अर्जात (१) श्री सतिश सिडाम व (२) सारंग दाभेकर यांची सही आहे. श्री रा.प्र.वंजारी यांची सही नाही. त्यामुळे श्री रा.प्र.वंजारी हे माहितीकरीताचे अजा्रत अर्जदार ठरत नाहीत. (५) माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचेकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जात कोणतीही माहिती दिली नाही असे नमुद केले आहे. वस्तुतः अर्जदारांना दिनांक १३.४.२००९ ला २१९ पृष्ठांची माहिती हस्तांतरीत केली आहे.

वरील वस्तुस्थितीचा विचार करण्यास विनंती आहे. वरील वस्तुस्थितीवरुन अर्जदारांना माहिती दिलेली आहे हे स्पष्ट होते. करीता सदरचे द्वितीय अपील अर्ज फेटाळयास विनंती आहे."

यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व

( पान ३ वर .. )

त्यामुळे अपीलकर्ता आज गैरहजर आहे असे दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४७७/२००९**

**१) श्री रविंद्र सदाशिव बागडे,**
**प्लॉट नं.८४७, आहुजा नगर (भेल कालोनी जवळ)**
**नारा रोड, जरिपटका, नागपूर-१४. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**रामटेक, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**रामटेक, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.३.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, रामटेक यांचेकडे मौजा नगरधन ता.रामटेक प.ह.नं.३९ येथील ख.नं.५२८ आराजी ०.८५. सन १९८१ च्या सात बारा (नमुना ७ अ व १२) नुसार स्व. सदाशिव राघो बागडे यांचे नावे आहे. आता ही आराजी दुस-याच्या नांवानी दर्शविलेली आहे. तरी सदर शेतीच्या फेर फार हस्तांतरणाबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. माहिती रजिस्टर पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.३.२००७ रोजी जूना चेकबंदी स.नं.५२८ क्षेत्र ०.८५ हे.आर हा आपले वडील सदाशिव राधो बागडे यांचे नांवे होता. पुर्नमोजनीमध्ये त्याचा नवीन स.नं.११२४ क्षेत्र ०.८५ हे आर हा भगवान श्रावण नागमोते व पंचफुला भगवान नागमोते यांचे नांवे झाला. पुर्नमोजनीचे वेळी भूमी अभिलेख खात्याकडून नव्याने मोजणी करुन सन १९९२-९३ मध्ये मौजा नगरधनचा अधिकार अभिलेख व नकाशा तयार करण्यात आला. त्यावेळी नवीन स.नं.११२४ वर वरील दोन नावे दर्ज करण्यात आली. सदर हस्तांतरणाबाबत फेर फार नोंद संबंधीत तलाठी दप्तरला नसल्याने याबाबत निश्चित माहिती भूमी अभिलेख खात्याकडूनच प्राप्त होऊ शकेल. फेर फार क्रं.५४८ दिनांक ८.८.२००३ नुसार वरील दोन्ही खातेदारांनी सदर जमीन जिवन रुपचंद मेश्राम रा. कळमना नागपूर यांना विकली. सबब सविस्तर माहितीसाठी आपण कृपया तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, रामटेक यांचेशी संपर्क साधावा, असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख यांचेकडे शेतीकडील जमीनीचे फेर फार इकडील कार्यालयाकडे होत नाही. फेर फार हे तहसिलदार रामटेक यांचे कार्यालयामार्फत संबंधी प.ह.तलाठी कार्यालयात होते. तरी आपण संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२००८ रोजी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी, रामटेक यांचेकडे दाखल केलेले दिसून येते.

३. सदरच्या अपीलाच्या संदर्भात पुन्हा अपीलकर्ता यांनी मागणी केलेला गट ५२८ चे

( पान २ वर .. )

एकत्रिकरण योजनेची माहिती नियमानुसार नकल फी घेवून पुरविण्यात यावी असे अधीक्षक भूमी अभिलेख यांनी कळविले व त्याप्रमाणे माहिती अपीलकर्ता यांनी उपलब्ध करुन घेतलेली दिसून येते. अधीक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी माहिती अधिकार अपील क्रं.२५/०८, आदेश पारित दिनांक ६.४.२००८ या आदेशात मौजा नगरधन येथील जूना ख.क्रं.५२८ संबंधी फेर फाराची माहिती तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख रामटेक देऊ शकत नाही. एकत्रिकरण योजनेनुसार अर्जदारास आवश्यक असलेली माहिती पुरविण्यात येईल असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार एकत्रिकरण नकाशाची छायांकित प्रत जोडण्यात येत आहे. त्यामुळे तहसिलदार व उपविभागीय अधिकारी यांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. नकाशाची प्रत आयोगाचे निदर्शनास आणली. त्यावरुन एकत्रिकरणाच्या वेळेस कोणत्याही प्रकारचे फेर फार झालेले दिसून येत नाही व आतापर्यंत तशाच प्रकारचे अभिलेखे कायम आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती आता तहसिलदार व तलाठी यांचे स्तरावर उपलब्ध होऊ शकते व ती त्यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता सदरचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ७.३.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने अधीक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या नकाशावर एकत्रिकरण दर्शविणा-या पत्रकाच्या नंतर झालेले फेर फार हे कशाच्या आधारावर घेण्यात आले याची माहीती, हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत तलाठी, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी यांचे स्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात यावी. व उपलब्ध नसल्यास तसे लेखी स्पष्टपणे अपीलकर्ता यांना कळवावे. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे रुपये २५,०००/- शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक २५७/२००९**
**अपील क्रमांक २५८/२००९**
**अपील क्रमांक २६२/२००९**
**अपील क्रमांक २६३/२००९**
**अपील क्रमांक २६४/२००९**

**१) श्री सुनिल पंडीतराव जगताप,**
**टाईप एफ/५३/१२, औष्णिक विज केंद्र वसाहत, कोराडी**
**पो.वसाहत कोराडी, ता.कामठी, जिल्हा नागपूर-४४११११.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(नि.),**
**औष्णिक विज केंद्र, कोराडी, पो.वसाहत कोराडी,**
**ता.कामठी, जिल्हा नागपूर-४४११११.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक अभियंता(नि.),**
**औष्णिक विज केंद्र, उर्जा भवन, कोराडी,**
**पो.वसाहत कोराडी, ता.कामठी, जिल्हा नागपूर-४४११११.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २८.३.२००९, २६.३.२००९, २.४.२००९, ३.४.२००९ व १६.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये एकुण पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. **अपील क्रमांक २५७/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ८.८.२००८ व दिनांक ३०.९.२००८ रोजी त्यांचे सन १९९१ ते २१.३.२००१ पर्यंतचे वार्षिक गोपनिय अहवालासंबंधी प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.९.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ३०.९.२००८ रोजी माहितीचा अर्ज दाखल करुन प्राप्त झालेल्या माहिती मधून एकुण ३३ प्रती प्राप्त झाल्या. परंतु १७ पृष्ठये दिलेली आहेत असे त्यांचे म्हणणे आहे. व अशाच पध्दतीने त्यांनी पुन्हा ज्या छायांकित प्रती उपलब्ध झालेल्या आहेत त्या सत्यापन करुन दिलेल्या नाही असे दिलेले आहे. तसेच माहितीकरीता लागणारा खर्च रुपये ११०/- मनी ऑर्डरने पाठविला होता, परंतु तो स्विकारला नाही असेही त्यांनी अर्जात म्हटलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक ३.११.२००८ रोजी सदरच्या प्रती हया कंपनीतील वेतन गट १ मधील जबाबदार अधिकारी म्हणजेच आस्थापना अधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या असल्यामुळे त्या वैद्य आहेत. त्यामुळे सदर माहिती पुन्हा देण्याची गरज वाटत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळेही समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु पुन्हा अपीलकर्ता यांना दिनांक २२.१.२००९ रोजी ३३ प्रती दिलेल्या दिसून येतात. व त्यामुळेही समाधान न

( पान २ वर ..)

झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी प्रतीच्या संदर्भामध्ये युक्तीवाद केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना १७ पृष्ठये पाठ-पोट ३४ अशाप्रकारे उपलब्ध करुन दिल्यामुळे ३३ म्हटलेले आहे. त्यामुळे त्यांना कमी माहिती दिलेली नाही. साक्षांकित प्रतीच्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे छायांकित प्रती उपलब्ध करुन द्यावयाच्या असल्यास ती माहितीच्या अधिकारात दिली अशा प्रकारे सांक्षाकित करुन देणे संयुक्तिक असते. प्रत्येक शब्द तपासणी करुन प्रमाणित करुन देणे अपेक्षित नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, ती योग्य आहे व त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.

४. **अपील क्रमांक २५८/२००९** मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २२.९.२००८ रोजी मी औष्णिक विज मंडळात रुजू झाल्याचा दिनांक १८.६.१९९० पासून ते दिनांक २१.३.२००१ पर्यंतचे हजेरी रजिस्टर मध्ये ज्या पानांवर माझी हजेरी लावल्या जात होती त्या पानांच्या सत्यापन केलेल्या सत्यप्रती पाठथ्वण्यात याव्या, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.१०.२००८ रोजी सदरची माहिती निरनिराळया विभागाशी संबंधीत असून ती प्राप्त झाल्यानंतर पुरविण्यात येईल याची नोंद घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २८.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.१२.२००८ रोजी देण्यात आला असून त्यात एकुण १९ पानांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर सुध्दा दिनांक २.२.२००९ रोजी ८ पानांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

५. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मागितलेल्या कालावधीतील माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांच्या संदर्भातील नस्तीमध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. व त्यांना आणखी माहिती हवी असेल तर ती उपलब्ध करुन देता येईल असेही सांगितले. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना ते विज मंडळात रुजू झाल्यापासून म्हणजे १९८९ पासून त्यांना माहिती कागदपत्रांच्या स्वरुपात हवी आहे असे दिसून येते.

६. अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २६२/२००९, अपील क्रमांक २६३/२००९ व अपील क्रमांक २६४/२००९ असून त्यामध्ये त्यांनी अनुक्रमे दिनांक .२९.९.२००८ चे अर्जामध्ये वार्षिक गोपनिय अहवालासंबंधी, दिनांक १.१०.२००८ चे अर्जामध्ये दिनांक १.४.२००० ते २१.३.२००१ पर्यंतच्या कालावधीत माझ्याप्रति आपले कार्यालयात पाठविलेल्या माहितीच्या व गोपनिय माहितीच्या सत्यप्रती अशी माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दिनांक २३.९.२००८ च्या अर्जामध्ये औष्णिक विज केंद्र कोराडी येथील ज्या कामगारांवर जानेवारी १९८८ पासून ते डिसेंबर, २००१ पर्यंत मंडळाचे कर्मचारी सेवानियमाप्रमाणे मंडळाच्या सेवेतून बडतर्फ करण्यात आले व यांचेवर केलेल्या बडतर्फीचे कार्यवाहीवर बडतर्फी पुर्वी औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत संबंधीत विभागाद्वारे मंडळाने घेतलेल्या पूर्व परवानगीच्या अहवालांची सत्यापित केलेल्या सत्यप्रती क्रमवार यादीसह पाठविण्यात याव्या, अशी माहिती मागितलेली दिसून येते. आज सुनावणीच्या वेळेस अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली किंवा उपलब्ध झाली नाही ती

( पान ३ वर .. )

प्रत्येक शब्द तपासणे शक्य नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांना त्यांच्या सेवेच्या कालावधीतील सर्व माहिती जी हवी आहे ती, त्यांच्या संबंधातील सर्व नस्त्यांची पाहाणी करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. मात्र अपील क्रमांक २६४/२००९ मध्ये दिनांक २३.९.२००८ रोजी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात असून त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित दिसून येत नसल्यामुळे व तशी माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असे दिसून येते व त्यामुळे अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही. त्याकरीता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २५७/२००९ व अपील क्रमांक २६४/२००९ खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २५८/२००९, २६२/२००९, व अपील क्रमांक २६३/२००९ च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात उपलब्ध असलेल्या सर्व नस्त्यांची पाहाणी करण्याकरीता अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामाच्या दिवशी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत तारीख व वेळ जन माहिती अधिकारी यांना कळवावी व जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित व्हावे. उपस्थित झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना संबंधीत सर्व नस्त्या कर्मचा-यांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्याव्यात व अपीलकर्ता यांना ज्या ज्या कागदपत्रांची आवश्यकता (उपलब्ध करुन दिलेली माहिती वगळून) असेल त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४२६/२००९**

**१) श्री जनार्दन गुलाबराव मून,**
**केंद्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,**
**७९१, नागसेन वन, नागपूर-१७.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, समाज कल्याण विभाग,**
**जिल्हा परिषद, नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २५.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी समाज कल्याण अधिकारी यांचेकडे नागपूर जिल्हयातील शहर तथा ग्रामीण भागातील अपंग शळेत जून २००५ पासून नियुक्त केलेल्या व त्यांना २००९ मध्ये दिलेल्या अप्रुव्हलनुसार शिक्षक कर्मचा-यांची यादीसह त्यांना देण्यात आलेल्या एरीअर्सच्या रकमेची माहिती देणे व अनुदानासाठी ज्या संस्थेची शिफारस केलेली आहे त्यांची यादी देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने स्पिड पोस्टाने घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.४.२००९ रोजी आपले संदर्भिय दिनांक ९.३.२००९ च्या पत्रानुसार या कार्यालयात उपलब्ध असलेली अपंग संस्थेतील कर्मचारी अनुमोदन आदेश उपलब्ध आहेत. ते आपण नियमानुसार स्वत: घेवून जाण्याचे करावे.(१४३ पृष्ठये) उर्वरित कागदपत्रांची माहिती प्राप्त होताच(संकलीत होताच) पुरविण्यात येईल, असे कळविलेले दिसून येते. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ७.५.२००९ रोजी आपण एकुण पृष्ठये १४३ प्राप्त केले आहे. थकबाकी रकमेबाबतची माहिती कोणत्या व्यक्तीची व कशासाठी पाहिजे ते नमुद केलेले नाही. संबंधीत माहिती कर्मचा-यांची वैयक्तिक बाब असल्याने देता येत नाही. आपण कर्मचा-यांचे नांव व माहिती मागण्याचा उद्येश स्पष्ट केल्यास आवश्यक माहिती पुरविणे शक्य होईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ३.७.२००९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना अशाच प्रकारे माहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. दिनांक २१.८.२००९ रोजी पुन्हा अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पत्र दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, जी माहिती उपलब्ध झाली आहे ती १९९६ ची जूनी आहे व ती माहिती मागितली नव्हती. व त्यामुळे ती अनावश्यक अशी माहिती आहे. त्यांनी मागितलेली माहिती स्पष्ट आहे व ती सार्वजनिक अभिलेख्याचा भाग आहे. कोणत्याही कर्मचा-

( पान २ वर ..)

यांचे वेतन किंवा त्याबाबतची थकबाकी ही वैयक्तिक माहिती होत नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा ती वैयक्तिक बाब असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व त्यांना विचारल्याशिवाय देता येणार नाही असा युक्तीवाद केला. परंतु कोणत्याही कर्मचा-यांचे वेतन व थकबाकी ही वैयक्तिक बाब होऊ शकत नाही. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. परंतु अपीलकर्ता यांना अनावश्यक माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांनी भरलेली खर्चाची रक्कम त्यांना परत करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ९.३.२००९ च्या अर्जात मागितलेली माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच अपीलकर्ता यांनी भरलेली खर्चाची रक्कम त्यांना परत करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

अपील क्रमांक ४३३/२००९

**१) श्री  अजय गोपीनाथ कोंडेकर,**
**वार्ड १२, विहिरगांव तुकूम, मुल**
**ता.मुल, जिल्हा चंद्रपूर-४४१२२४.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**सावली. ता.सावली, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. सदर प्रकरणी अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२००८ च्या एकाच माहिती अर्जावर आयोगात दोन अपील दाखल केले आहेत. दिनांक ७.७.२००९ रोजी याच माहिती अर्जावर अपील क्रमांक ८३/२००९ मध्ये सुनावणी होऊन निर्णय झाला आहे. एकाच अर्जावर दोन वेळा निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक /२००९**

**१) श्री** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक .२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २६.८.२००९** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**

**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६२९/२००९**

**१) श्री शंकर चिंधुजी मून, कार्यालयीन प्रतिनिधी,**
"**साप्ताहिक साक्षात्कारी**", रेशीमबाग प्लॉट नं.एन-१५३,
व्हॉलीबाल मैदानासमोर, हनुमान नगर, नागपूर-४४०००९. **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सहा.मुख्य अभियंता(रस्ते),**
**मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग, सिव्हील लाईन्स,**
**नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दिनांक ६.९.२००९ रोजी ठेवण्यात आली होती. अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे मुदत देण्यात येवून आज दिनांक २६.८.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता आजही सुनावणीस गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांचे कार्यालयात आपल्या प्रादेशिक विभागा अंतर्गत येणा-या विविध विभागातील रस्त्यासंबंधीची माहिती व इतर कामासंबंधीची सन २००४ ते २००८ या कालावधीतील सविस्तर तपशिलवार माहिती तसेच उपरोक्त कालावधीत शिवा एन्टरप्रायजेस, मुंबई व एस.पी.असोसिएटस मुंबई या फर्मकडून सा.बां.मंडळ, नागपूर साहित्य खरेदी बाबत निविदा प्रक्रियेतील माहिती व दस्ताऐवज आपल्या कार्यालयासह आपल्या अधिकार कक्षेतील २ सा.बां.मंडळ तथा आपल्या अधिकार कक्षेतील सर्व विभागांमधील एकत्रित स्वरुपात माहिती पुरविण्यात यावी, ही विनंती असा माहितीचा विषय दिलेला असून माहिती एकुण ५ मुद्यांमध्ये मागितली आहे व प्रत्येक मुद्यांमध्ये ४ ते ८ उपमुद्ये आहेत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केले आहे. तसेच दारिद्रय रेषेखालील आहे काय या संदर्भात प्रपत्र जोडलेले आहे. परंतु, प्रमाणपत्र न जोडता शिधापत्रिकेची प्रत जोडलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.७.२००८ रोजी उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी दिनांक २१.७.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २३.७.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती तयार करण्यासाठी शासनास रुपये ६.२५ लक्ष खर्च अपेक्षित असल्याचे आपणास संदर्भांकित पत्र क्रं.४ अन्वये कळविले आहे. कामाचे विस्तृत स्वरुप व त्यासाठी लागणारी साधन सामुग्री या कार्यालयास प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(९) नुसार आपणास अपेक्षित असलेली माहिती आपण या कार्यालयात येवून निशुल्क पाहाणी असे आपणास कळविण्यात आले होते. तसेच आपणास रुपये ६.२५ लक्ष रुपयाची मागणी करण्यात आली नसून खर्च लागणार

(पान २ वर ..)

आहे असे आपल्या निदर्शनास आणले आहे. तथापि, पुन्हा दिनांक २७.५.२००८ रोजीचे अर्जानुसार मागितलेली माहिती या विभागाकडील सर्व मंडळ कार्यालयांकडून प्राप्त करुन घ्यावी लागत असल्यामुळे व अत्यंत विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्यास विलंब होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे कळविलेले दिसून येते. पुन्हा दिनांक २७.५.२००८ रोजी अपीलकर्ता यांना मुदतवाढीच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २७.६.२००८ रोजी आपण स्वत: आपणास आवश्यक असणारी या कार्यालयाशी संबंधीत सर्व माहिती कार्यालयीन वेळेत येवून बघावी असे कळविलेले दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अधीक्षक अभियंता यांना वेळोवेळी माहिती उपलबध करुन देण्याच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येतात. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९.८.२००८ रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक २६.८.२००८ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष आपणास या संदर्भात छायांकित प्रती घेण्यास होणार अपव्यय मनुष्यबळ टाळण्यास आपणाकडून अपेक्षा असल्यामुळे सुज्ञ नागरिक म्हणून आपणास विनंती करण्यात आली आहे. व त्यामुळे दस्तऐवजाची पाहाणीसाठी मदत करुन निधीचा अपव्यय टाळण्यास्तव शासनास सहकार्य करावे असे कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केला आहे

खुलासा

"श्री शंकर चिंधुजी मून, नागपूर यांनी दिनांक १७.५.२००८ रोजी सादर केलेला अर्ज दि. १८.५.२००८ आणि दि. १९.५.२००८ रोजी शासकिय सुटीमुळे दि.२०.५.२००८ रोजी रेकार्डसाठी प्राप्त झाला. प्रस्तुत अर्जाचे परीक्षण केले असता, अर्जदार यांनी सा.बां.प्रादेशिक विभाग नागपूर अंतगत येणा-या विभागातील रस्त्यासंबंधीची माहिती व इतर कामाबाबत सन २००४ ते २००८ कालावधीतील विविध मुद्यांबाबत सविस्तर माहिती एकत्रित पुरविण्याबाबत एकुण ८ पानी संदर्भिय अर्ज या कार्यालयांत सादर केला. त्यासोबत अर्जदार दारिद्रय रेषेखालील असल्याबाबतचे प्रपत्र जोडले आहे.

संदर्भिय अर्जात एकुण ५ मुद्दे आणि त्यांत एकुण मुद्दा क्रं.१ अंतर्गत ११ उपमुद्दे, मुद्दा क्रं. २ अंतर्गत १६ उपमुद्दे, मुद्दा क्रं. ३ अंतर्गत ७ उपमुद्दे, मुद्दा क्रं.४ अंतर्गत १ उपमुद्दा आणि मुद्दा क्रं. ५ अंतर्गत १ उपमुद्द्यांवर माहिती मागविली आहे. त्यामध्ये प्रादेशिक विभागांतर्गत मंडळ, विभाग आणि उपविभागाअंतर्गत करण्यांत आलेल्या सन २००४ ते २००८ पर्यंतच्या व्यवहारांची संकलीत माहिती मागविण्यात आली आहे(अर्जाची प्रत जोडली आहे.)

अर्जदाराने मागविलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे या कार्यालयाचे दिनांक २७.५.२००८ च्या पत्र क्रं.२२३७ अन्वये इतर विभागाकडून आणि मंडळ कार्यालयाकडून माहिती प्राप्त करण्यास्तव अधिकचा १ महिन्यांचा कालावधी/मुदतवाढ देण्याकरीता अर्जदारास विनंती केली. या कार्यालयाचे सदरचे पत्र दिनांक ३०.५.२००८ रोजी मिळाल्याचे पोस्ट खात्याकडून प्राप्त स्विकृती वरुन निदर्शनास येईल.(पत्राची प्रत तसेच स्विकृती प्राप्तीची प्रत जोडली आहे.)

तसेच या कार्यालयाचे पत्र क्रं. २२३६ दि. २७.५.२००८ अन्वये प्रादेशिक विभागांतर्गतच्या मंडळ कार्यालयाकडे अर्जदाराच्या अर्जाची प्रत पाठवून अर्जातील सर्व मुद्यांबाबत आणि पोट मुद्यांबाबत संपूर्ण खुलाशासह विस्तृत माहिती आवश्यक दस्ताऐवजासह विभागवार संकलित

(पान ३ वर ..)

करुन दिनांक १०.६.२००८ पर्यंत सादर करण्याचे निर्देश दिले. म्हणजेच अर्जदाराचे दिनांक २०.५.२००८ चे अर्जापासून विहित मुदतीत (३० दिवसांत) माहिती प्राप्त करण्यासाठी या कार्यालयाकडून प्रयत्न केल्या गेलेत हे स्पष्ट दिसून येईल. (पत्राची प्रत जोडली आहे.)

या संदर्भात या कार्यालयाकडून दिनांक ११.६.२००८ रोजीचे पत्र क्रं.२५४६ अन्वये दिनांक १९.६.२००८ रोजीचे पत्र क्रं.२६३६ अन्वये दिनांक २३.६.२००८ रोजीचे पत्र क्रं.२७२३ अन्वये विहित मुदतीत अर्जदारास माहिती सादर करणे नियमानुसार बंधनकारक असल्यामुळे माहिती त्वरीत सादर करण्यास्तव स्मरणपत्राद्वारे पाठपुरावा केल्याचे आढळून येईल. म्हणजेच अर्जदाराचे मागणीप्रमाणे माहिती पुरविण्यासाठी या कार्यालयाने आटोकाट प्रयत्न केलेले आहेत. (पत्राच्या प्रती जोडण्यात आलेल्या आहेत).

या संदर्भात कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग(विशेष प्रकल्प) नागपूर यांनी अर्जदारास त्यांनी मागविलेली माहिती ही ४ वर्षाच्या दिर्धकालावधीची असून अपूरे मनुष्यबळ आणि लागणारा शासकिय निधी अंदाजे खर्च रुपये ६.२५ लक्ष (माहिती संकलीत करणे त्यांच्या छायांप्रती काढणे दस्ताऐवजाची बांधणी) अपेक्षित असल्यामुळे प्रत्यक्ष कार्यालयांत उपस्थित राहून मागितलेल्या संपूर्ण दस्तऐवजाची पाहाणी कार्यालयीन वेळेत येऊन करण्याबाबत त्यांचे पत्र क्रं.२९८१ दि. २७.६.२००८ अन्वये कळविले.(प्रत जोडली आहे).

प्रत्यक्षात अर्जदार दारिद्र रेषेखालील असून नोंदणीकृत टपालाने ५ वर्षाचा विस्तृत दस्ताऐवजाची मागणी केलेली होती आणि प्रादेशिक विभागाअंतर्गतच्या एका विभागाचा दस्ताऐवज जमा करतांना येणार ६.२५ लक्ष खर्चाचा अंदाज बघता प्रादेशिक विभागाअंतर्गतच्या कार्यरत २१ विभागांची माहिती संकलीत करण्यांस २१X ६= १२६ लक्ष अंदाजे शासकिय रकमेचा अपव्यय होईल. तसेच वेळेचा अपव्यय दस्ताऐवज एकत्रित ठेवण्यासाठी लागणा-या जागेचा विचार लक्षांत घेता आणि अतिखर्चाची बाब विचारात घेऊन कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, नागपूर यांचे पर्यायाचा विचार लक्षात घेऊन संपूर्ण दस्ताऐवज मुख्यालय स्थित मंडळ कार्यालयात उपलब्ध करुन देण्याबाबत या कार्यालयाचे पत्र क्रमांक ३०२२ दिनांक ११.७.२००८ अन्वये कळवून त्याची प्रत अर्जदारास पाठवून त्यांनी शासकिय पैशाची आणि वेळेची बचतीची बाब विचारात घेऊन मंडळ कार्यालयांत संपर्क साधून दस्ताऐवजाची पाहाणी करण्यास्तव विनंती करण्यांत आली (पत्राची प्रत जोडण्यात आली आहे).

या कार्यालयाचे दिनांक ११.७.२००८ रोजीच्या पत्रावर अर्जदाराने दिनांक २२.७.२००८ अन्वये दिलेल्या पत्रानुसार विभागाकडून माहिती देण्यांत टाळाटाळ करण्यात येत असून माहितीच्या अधिकाराचे जाणिवपुर्वक उल्लंघन करण्यांत येत असल्याचे ही बाब संघर्षशील बहुजन पत्रकार महासंघाटद्वारे पुढील कार्यवाहीचा इशारा या कार्यालयास दिला.(प्रत जोडली आहे). तथापि, या कार्यालयाचा उद्येश मुख्यतः माहिती देण्यास टाळाटाळ करणे हा नसुन अर्जदारास माहिती पुरविण्यासाठी अधिक वेळेची मागणी करणे, त्यासाठी सतत मंडळ कार्यालयाकडे पाठपुरावा करणे, तपासले असता अर्जदारास माहिती शासन नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देणे हाच असल्याचे आढळून येईल. तसेच मागितलेल्या माहितीचे विस्तृत स्वरुप पाहाता आणि त्यामागील अडचणी शासनास लागणा-या अतोनात खर्चाची शक्यता पाहाता (अर्थातच अर्जदार हा दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे) शासनास येणारा खर्चाची बचत व्हावी यादृष्टीने अर्जदार श्री शंकर चिंधुजी मून यांनी प्रत्यक्ष विभागात मंडळ कार्यालयात जावून

(पान ४ वर ..)

दस्ताऐवजाची पाहाणी करुन आवश्यक दस्ताऐवजाच्या छायाप्रतींची मागणी करावी आणि या कार्यालयास सहकार्य करावे अशी पुनश्च विनंती. या कार्यालयाचे पत्र क्रं.३२४८ दिनांक २८.७.२०८ अन्वये केली. प्रत जोडली आहे. तसेच पोस्ट खात्याद्वारे प्राप्त स्विकृतीची प्रत जोडली आहे. तसेच कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांचे दिनांक २३.७.२००८ चे पत्रावरुन आढळून येईल.

या संदर्भात अर्जदाराने दिनांक २१.७.२००८ रोजी प्रथम अपील शासनास सादर केले. प्रत्यक्षांत मुख्य अभियंता प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे सदर अपील शासनाचे दिनांक २५.७.२००८ चे पत्रान्वये पुढील कार्यवाहीस्तव या कार्यालयास प्राप्त झाले. ( शासन पत्राची प्रत आणि अपीलाची प्रत जोडली आहे). त्याची प्रत शासनाने अर्जदारास पाठवून या कार्यालयांत संपर्क साधण्याबाबत निर्देश दिले.

उपरोक्त अपीलावर या कार्यालयाचे पत्र क्रं.३६५३ दिनांक २६.८.२००८ अन्वये या कार्यालयाद्वारे माहिती देण्यात टाळाटाळ करण्यांत येत नसल्याची भूमिका स्पष्ट करुन अर्जदारानी मागणी केलेला अर्जातील माहिती विस्तृत/सखोल तसेच तो एकत्रित करण्यांत लागणारा अपार शासकिय निधी, त्याची सुरक्षा इत्यादि अडचणी विचारांत घेऊन या कार्यालयास सहकार्य करण्याबाबत विनंती करुन आपणांस आवश्यक असणारा दस्ताऐवज संबंधीत मंडळ कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून शासन निधीचा अपव्यय आणि वेळेची बचत करण्यास्तव सहकार्य करण्याची विनंती केली. (पत्राची प्रत जोडली आहे. व नोंदवही पृष्ठांची प्रत)

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाद्वारे आणि त्याअंतर्गत कार्यालयांनी केलेल्या पत्रव्यवहाराचे अवलोकन केल्यानंतर या कार्यालयातर्फे दस्तावेज दाखविण्यास टाळाटाळ अथवा नकार देण्यांत आला नसल्याचे आढळून येईल. या उलट या कार्यालयाकडून अर्जदारास प्रत्येक पत्रातून सहकाय्रबाबत विनंती करुन देखील आणि शासनाने अर्जदारास प्रादेशिक कार्यालयांत संपर्क साधण्याचे कळवून देखील अर्जदाराने या कार्यालयात संपर्क साधण्याची तसदी न घेता विभागास सहकार्य न करता मा.आयुक्त महोदयांकडे अपील सादर केल्याचे दिसून येते.

या संदर्भात वरील प्रमाणे खुलाशासह आयोगाकडून प्राप्त विहित प्रपत्रातील माहिती सोबत सविनय सादर करण्यांत येत आहे."

जन माहिती अधिकारी यांनी दाखल केलेला खुलासा व अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती तसेच त्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी अपीलकर्ता यांना केलेला पत्रव्यवहाराचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. तसेच अपीलकर्ता हे साप्ताहिक साक्षातकारीचे कार्यालयीन प्रतिनिधी आहे व त्यामुळे ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारण करण्यास पात्र आहे किंवा नाही याबाबत शंका उपस्थित करण्यास वाव आहे. मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे व ती ४ वर्षाच्या कालावधीतील आहे. तरी सुध्दा वेळोवेळी माहितीच्या छायांकित प्रतीसाठी खर्च करण्यापेक्षा सदरच्या अभिलेख्याचे अवलोकन करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा प्रयत्न निरनिराळया पत्रामधून जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता हे फक्त पत्रव्यवहार करीत आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुध्दा ते कधीही उपस्थित झालेले दिसून येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे सुध्दा ते उपस्थित होत नाही. जन माहिती अधिकारी यांचे खुलाशाप्रमाणे २१ विभागातील माहिती ही प्रत्येक विभागातील

(पान ५ वर ..)

खर्च ६ लक्ष प्रमाणे एकुण १२६ लक्ष खर्च येईल असे दिसून येते.

४. माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २(ञ) प्रमाणे माहितीचा अधिकार या संज्ञेची व्याख्या दिलेली आहे. त्यामध्ये, (१) एखादे काम, दस्तऐवज, अभिलेखे याची पाहाणी करणे (२) दस्तऐवज किंवा अभिलेखे, टिपणी किंवा उतारे घेणे.. अशी तरतुद आहे. यावरुन माहितीच्या अधिकारामध्ये प्राधान्य हे दस्तऐवजाची पाहाणी करावी व नंतर आवश्यक असतील ती कागदपत्रे घ्यावी असे दिसून येते. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले योग्य आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असुन सुध्दा अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांचेकडे दस्तऐवज किंवा अभिलेखे पाहाणी करण्यास उपस्थित होत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकत आहे असे दिसून येत नाही. व तसाही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा उद्येश हा व्यापक सार्वजनिक जनहिताकरीता असल्यामुळे यात तसेही कोणतेही व्यापक सार्वजनिक हित दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास त्याबाबतचा निधी सुध्दा शासनाकडे उपलब्ध नाही. तसेच शासनाकडून निधीची मान्यता घ्यावी लागते याबध्दलची कल्पना प्रतिनिधीस असणे गृहीत आहे व असे असून सुध्दा सदरची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी हे त्यांची द्वितीय अपीलातील मागणी मान्य करता येत नाही. अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे शासनाची साधन सामुग्रीचा वापर मोठया प्रमाणावर होणार असेल तर अशा प्रकारची ठोक किंवा व्हाल्युमिनिअस माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६६३/२००९**

**१) श्री आत्माराम बापूराव खेडेकर,**
**रा.कोटोडी, पो.मालेगांव, ता.सावनेर, जि.नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, सावनेर, ता.सावनेर, जि.नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
**ग्राम पंचायत कार्यालय कोटोडी, ता.सावनेर, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत कोटोडी यांचेकडे प्रा.शाळा कोटोडी येथील जूनी प्रा.शा.Dismental होऊन शाळेच्या साहित्याची विल्हेवाट कशी लावण्यात आल्याबाबतची माहिती मिळणेबाबत, माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १०.५.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३.६.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ९.६.२००९ रोजी देण्यात आला असून संबंधीत अपीलीय अधिकारी यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे. सबबत आपला विषयांकित अर्ज विहित नमुन्यात व या प्राधिकरणाशी संबधीत नसल्यामुळे नस्तीबध्द करण्यात येत आहे, असे खंड विकास अधिकारी, पंचायत समिती सावनेर यांनी कळविलेले दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२००७ रोजी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती सावनेर यांनी सचिव/सरपंच, ग्राम पंचायत यांना छायांकित प्रतीची प्रत सुध्दा उपलब्ध करुन दिली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यात जूनी शाळा

( पान २ वर ..)

पाडून अफरातफर करण्यात आली आहे वगैरे माहिती विचारण्यात आली होती, ती दिलेली नसल्यामुळे द्वितीय अपील दाखल केले आहे असे त्यांनी अपीलाचे कारण दिलेले आहे. मात्र, जूनी इमारत पाडून त्याबध्दलचे सर्व मटेरिअल हे नवीन इमारतीच्या बांधकामास उपयोगात आणण्यात आले व त्याबध्दलचा कोणताही तपशिल उपलब्ध नाही असे कळविलेले आहे. त्यामुळे माहिती जशी आहे तशी ग्रामसेवक यांनी कळविले आहे. ग्राम निधीची अफरातफर केली ती ग्राम निधीत जमा करणे आवश्यक आहे असे कारण द्वितीय अपीलात दिलेले आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांनी खंड विकास अधिकारी यांचेकडे ग्राम पंचायत अधिनियमाप्रमाणे स्वतंत्रपणे तक्रार करणे आवश्यक आहे. मात्र, माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६५६/२००९/अपील क्रमांक ४३७/२००९**

**१) श्री राजू शंकरराव निकोसे,**
**मु.पो.सावरी (बिड), ता.वरोरा, जि.चंद्रपूर-४४२९०६** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी,**
**पंचायत समिती वरोरा, ता.वरोरा, जि. चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, पंचायत समिती कार्यालय, वरोरा,**
**ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००९ रोजी व १२.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी जी माहिती मागितलेली आहे तीच माहिती वेगळया स्वरुपात त्यांनी दिनांक ५.२.२००७ रोजी मागितली होती व त्याबध्दल अपील क्रमांक १७५७/२००७ हे खारीज करण्यात आले आहे व त्यामुळे पुन्हा त्याच विषयाच्या संदर्भात निर्णय देणे योग्य नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

अपीलकर्ता यांचे पुन्हा अपील क्रमांक ६५६/०९ हे दाखल केलेले आहे. त्या अपीलातील मागितलेली माहिती सुध्दा ही विहिरीच्या मंजूरीच्या आदेश पत्राचे स्वरुपात आहे व त्यावरुन अपीलकर्ता हे एकच माहिती वेगवेगळया अपीलाच्या माध्यमातून मागत आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांना संबंधीत अधिका-यांनी नियमाप्रमाणे मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना त्यांच्या विहिरीच्या संदर्भात जास्तीचे अनुदान मिळावे अशी

(पान २ वर ..)

अपेक्षा दिसून येते. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे एकाच माहिती करीता अनेक अपील अर्ज करुन कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेबाबत कोणताही निर्णय होऊ शकत नाही. हा अधिका-यांना वेठीस धरण्याचाच प्रकार आहे व त्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४३७/२००९ व अपील क्रमांक ६५६/२००९(दिनांक २४.९.२००९ रोजी सुनावणीस ठेवण्यात आलेले)खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६६४/२००९**

**१) श्री भिमसिंह रामबदनसिंह गौतम,**
**रा.बुटीबोरी, वार्ड क्रं.६, रेल्वे स्टेशन परिसर,**
**ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**नागपूर (ग्रामीण), नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, नागपूर (ग्रामीण). उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, नागपूर(ग्रामीण) यांचेकडे बुटीबोरी येथील वार्ड नं.६ मधील नागरिकांनी मा.उपविभागीय कार्यालयात भिमसिंग राजू रायबदनसिंग गौतम सागर ऊर्फ सोनु चरनसिंग तोमर, सौ.मिना चरणसिंग तोमर गौतम मोरे यांचे विरुध्द नागरिकांच्या सहयानिशी तक्रार नोंदविली आहे काय. असल्यास तक्रारीची प्रत व त्या तक्रारीवरील कार्यवाहीचे निर्देश. तक्रारकर्त्याच्या सहिचा कागद अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.८.२००९ रोजी आपणास मागितलेली माहिती पुरविली तर माहिती उघड होऊन त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. करिता अधिनियमाचे कलम ८(छ) नुसार मागितलेली माहिती पुरविता येणार नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक २७.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.८.२००९ रोजी देण्यात आला असून त्यात आपणास अपील अर्जाप्रमाणे आज दिनांक १७.८.२००९ रोजी माहिती पुरविण्यात येत आहे. तक्रार अर्ज ४ प्रती. व सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली आहे. असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता हे विलंबाने उपस्थित झाले व उपस्थित झाल्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला वेळोवेळी दिलेल्या तक्रारीच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे त्यांचे प्रतिनिधी यांनी युक्तीवाद केला व त्यांनी असे सांगितले की, ४८ तासाचे आंत माहिती पाहिजे होती. परंतु ती उपलब्ध झाली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांच्या अर्जात असे काहीही मागणी त्यांनी केलेली नाही व त्यामुळे ४८ तासाचा प्रश्न उपस्थित होत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे कळविलेली कार्यवाही मुदतीत केलेली आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दिलेले आहे त्यात माहिती उपलब्ध करुन दिली आहे व त्याबाबतचे स्पष्टीकरण हे दिलेल्या तक्रारीची चौकशी अर्ज दिला त्यावेळेस सुरु असल्यामुळे नाकारण्यात आली व आता चौकशी

( पान २ वर .. )

पुर्ण झाल्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६६२/२००९**

**१) श्री सुधीर सितारामजी सोनटक्के,**
**पंचायत समिती क्वार्टर, हिंगणा, ता.हिंगणा, जि.नागपूर-४४१११०. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय समाज कल्याण अधिकारी,**
**नागपूर विभाग, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी,**
**नागपूर,प्रशासकिय इमारत क्रं.१, सिव्हील लाईन्स, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, नागपूर यांचेकडे सुवर्णा भंडारी शासनाचे कक्ष अधिकारी यांचे पत्र क्रं.सीएसडब्ल्यू २००७ पत्र क्रं.४ सुधार सामाजिक न्याय व विशेष सहाय विाााग १५४ दि मंत्रालय मुंबई दिनांक २७ जून, २००८ तसेच त्यांनी सादर केलेले दिनांक २४.९.२००८, दिनांक २५.११.२००८ व २९.११.२००८ व दिनांक ५.१.२००९ चा अर्जावर काय कार्यवाही झाली याची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.४.२००९ रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १३.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.६.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थी यांनी उल्लेख केलेल्या पत्राची प्रत जन माहिती अधिकारी यांनी द्यावी व जन माहिती अधिकारी यांनी प्रत प्राप्त झाल्यास १५ दिवसांचे आंत माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी केलेल्या तक्रारीच्या बाबत चौकशी होत नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची संस्था ही स्वायत्त आहे व त्या संस्थेकडील अभिलेखे ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे उपलब्ध नसतात व त्यांनी कोणत्या प्रकारची कार्यपध्दती अवलंबिली ही माहिती नसते. त्या संस्थेस विचारण केल्यावर ते जी माहिती देतात ती ग्राहय धरावी लागते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी नंतर जे पुरावे सादर केले आहे, त्यावरुन संस्थेला विचारणा करण्यात आली आहे. तसेच संचालक, समाज कल्याण यांनी सुध्दा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना दिनांक २८.७.२००७ रोजी त्यांच्या स्पष्टीकरणाचे अनुषंगाने चौकशी करुन अर्जदारास कळवावे असे आदेश दिलेले दिसून येते व त्याप्रमाणे विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे चौकशी करीत आहे असे त्यांनी सांगितले.

४. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अर्ज केला त्यावेळेस जी

(पान २ वर .. )

वस्तुस्थिती असते ती कागदपत्रे उपलब्ध होतात. परंतु एखादया प्रकरणात कार्यवाही करुन माहिती मिळावी अशी अपेक्षा करता येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या पत्राप्रमाणे किंवा तक्रारीप्रमाणे चौकशी ही निश्चितच सुरु आहे व चौकशी झाल्यावर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६६१/२००९**

**१) श्री सुधाकर पांडुरंग महालकर,**
**गुरुकुल नगर, एस.टी.स्टॅंडजवळ, रिंग रोड,**
**पोस्ट के.के.नगर, रामटेक, ता.रामटेक, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक,**
**(मानव संसाधन व्यवस्थापन),प्रधान मुख्य वनसंरक्षक,**
**कार्यालय वनभवन, नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (कक्ष १०८-अ),**
**प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालयात श्री अनिल मोहन, तत्कालीन वनसंरक्षक नागपूर यांनी वि.चौ.प्र.क्रमांक ४९/९४ अंतर्गत दि. ७.१०.२००२ ला शिक्षेबाबत चुकीचे आदेश पत्र पारित केले. ते रद्यबादल होण्यास व फेरचौकशी होण्यास दि. २.११.२००२ ला अपील अर्ज सादर केला. त्यास ६.५ वर्षे प्रदिर्घ कालावधी झाला आहे. त्या अपील अर्जावर दि. २.११.२००२ ते आजतागायत दि. ९.६.२००९ पर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाही संबंधीचे पत्रव्यवहाराचे छायांकित प्रती मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.६.२००९ रोजी अधिनियमाचे कलम ८(ज) प्रमाणे माहिती प्रकट करण्यास अपवाद तरतुदीनुसार व्यक्तीगत प्रकरणात मागितलेल्या कागदपत्राची प्रत पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून यते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांना चौकशीचे संदर्भात ज्या पत्राचा संबंध नाही अशा प्रकारचे पत्र उपलब्ध करुन दिलेले आहे. परंतु दिनांक २६.११.२००७, दिनांक २५.९.२००७, दिनांक २९.४.२००८, दिनांक ८.५.२००८ व २७.२.२००८ हे पत्र उपलब्ध करुन दिले नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्याबध्दलची माहिती आयोगाचे निदर्शनास आणली त्यावर जन माहिती अधिकारी यांनी जो खुलासा दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे आहे.

खुलासा

"अर्जदार श्री सुधाकर पांडुरंग महालकर, यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत शासकिय माहिती अधिकारी कक्ष अधिकारी कक्ष १० व कक्ष १०(अ)C/O प्रधान मुख्य वनसंरक्षक

( पान २ वर .. )

महाराष्ट्र राज्य नागपूर यांना उद्येशून केलेला होता. तथापी सदर अर्जातील मागितलेली माहिती, माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष १० (अ) यांचेशीच संबंधित असल्याने अर्जदार यांचे दिनांक ९.६.२००९ मधील मागविलेल्या माहितीचे अनुशंगाने माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष १० (अ) यांचेकडील पत्र क्रं.कक्ष-१०(अ)१/आस्था/विचौ/प्र.क्रं.३०(०३-०४)१७४/०९-१० दिनांक १८.६.२००९ अन्वये त्यांना असे कळविण्यात आले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपले दिनांक ९.६.२००९ चे अर्जामध्ये नमुद मुद्यासंबंधात कार्यवाही सुरु असून अद्याप शासन आदेश पारित झालेले नाहीत. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील सेक्शन ८ (माहिती प्रकट करण्याबाबत अपवाद)(ज) अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार विषयांकित प्रकरणी मागितलेल्या कागदपत्राच्या प्रती पुरविता येणार नाही.

परंतु अर्जदार यांना माहिती न मिळाल्याने त्यांनी दिनांक २९.६.२००९ चे अपील अर्जान्वये प्रथम अपील, प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक(मानव संसाधन व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडे दाखल केलेले होते. सदर अपीलाचे अनुषंगाने दिनांक १३ जुलै २००९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर अपीलाचे सुनावणीचे अनुषंगाने या कार्यासनाची कार्यालयीन टिपणी क्रमांक कक्ष-१०(अ)१/आस्था/वि.चौ./प्र.क्र.३१०()०-०४/२५०/०९-१० दिनांक १३.७.२००९ अन्वये अपीलाचे संदर्भातील वस्तुस्थिती सविस्तर उत्तरासह प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (मानव संसाधन व्यवस्थापन)महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडे सविस्तर टिपणी सादर करण्यात आली होती.

दिनांक १३ जुलै, २००९ रोजी झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक(मानव संसाधन व्यवस्थापन) महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी त्यांचे आदेश क्रं.मुवसं/मासव्य/लले३८/०९-१० दिनांक १५.७.२००९ अन्वये खालील प्रमाणे निर्णय दिलेला आहे.

दिनांक २५.०.२००७, दिनांक २९.४.२००८ व दिनांक ८.५.२००९ ही पत्रे अपलकार यांचे विभागीय चौकशीशी संबधीत असल्याने व या पत्रावर शासनाकडून अद्याप निर्णय न झाल्याने हया तिन्ही पत्रांच्या छायांकित प्रती तसेच उर्वरित पत्रांपैकी ज्या पत्रांमध्ये विभागीय चोकशीचे संबंधात शिफारस किंवा शिक्षेचे प्रस्तावाबाबत उल्लेख आहे, अशी पत्रे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८(ज)च्या तरतुदीनुसार अपवादामध्ये मोडत असल्याने अपीलकार यांना देण्यात येणार नाही. या व्यतिरिक्त उर्वरित पत्रांच्या छायांकित प्रती माहिती अधिकारी १ आठवडयाचे आंत अतिशिघ्रतेने कोणताही शुल्क न आकारता अपीलकार यांना पुरविण्यात यावी.

प्रथम अपीलय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक(मानव संसाधन व्यवस्थापन)महाराष्ट्र राज्य नागपूर यांनी त्यांचे आदेश क्रं.मुवसं(मासव्य)लले/३८/०९-१० दिनांक १५.७.२००९ अन्वये दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष १०(अ) यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-१०(अ)१/आस्था/विचौ/प्र.क्रं.३१०(०३-०४)/२६७/०९-१०, दिनांक १६.७.२००९ अन्वये खालीलप्रमाणे दस्तऐवजाच्या छायांकित प्रती अर्जदार यांना निशुल्क पुरविण्यात आलेल्या आहेत.

१. या कार्यालयाचे पत्र क्रं.९२० दिनांक ४.१.२००३

२. अ.शा.पत्र क्रं.५२९ दिनांक १.९.२००५

( पान ३ वर ..)

३. अ.शा.पत्र क्रं.९३३ दिनांक २३.११.२००६
४. या कार्यालयाचे पत्र क्रं.३८६ दिनांक ५.८.२००८
५. मु.व.सं.(प्रा.) नागपूर यांचे पत्र क्रं.१७७७ दिनांक १९.३.२००८
६. शासन पत्र दिनांक २९.१२.२००७
७. शासन पत्र दिनांक २६ जून, २००८
८. या कार्यालयाचे पत्र क्रं.८५२ दिनांक १२ डिसेंबर, २०२
९. या कार्यालयाचे पत्र क्रं.९२९ दिनांक ६ जानेवारी, २०३
१०. या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्रं. २९५ दिनांक १७ जून, २००३

दिनांक २७.२.२००७ (२३.२.२००७) दिनांक २५.९.२००७ दिनांक २९.४.२००८ व दिनांक ८.५.२००९ (अर्जात नमुद नाही) ही पत्रे अपीलकार यांचे विभागीय चौकशीशी संबंधीत असल्याने व या पत्रांवर शासनाकडून अद्याप निर्णय न झाल्याने हया चारही पत्रांच्या छायांकित प्रती अर्जदारास पुरविण्यात आलेल्या नाहीत.

वरील नमुद केलेल्या वस्तुस्थितीवरुन या कर्यालयाचे संबंधीत कार्यासन कक्ष-१०(अ)कडून अर्जदार यांनी मागितलेल्या माहितीपैकी पुरविता येणे शक्य असलेली माहितीचे स्वरुपातील दस्तऐवज अर्जदार यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. व जे दस्तऐवज त्यांना पुरविणे शक्य नाही याबाबतची कारणमिमांसा परिच्छेद ६ मध्ये नमुद केलेली आहे.

वरील वस्तुस्थिती लक्षात घेता अर्जदार यांनी सदर अधिनियमांतर्गत त्यांचे दिनांक ९.६.२००९ चे अर्जान्वये मागणी केलेली दस्तऐवजापैकी त्यांना पुरविता येणे शक्य असलेले दस्तऐवज अर्जदार यांना उपलब्ध करुन देण्यात आलेले असल्याने अर्जदार यांचे दिनांक ३१.७.२००९ चे मा.राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे केलेले दुसरे अपील नस्तीबध्द करावे, अशी विनंती आहे."

४. सदर खुलाशावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. आजही अपीलकर्ता यांच्या विरुध्द जो शिक्षेचा सुधारित प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे त्याबाबत शासनाचा निर्णय झालेला नसल्यामुळे विषयांकित दिनांक ८.५.२००८ चे पत्र त्यांना उपलब्ध करुन देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र, अपीलकर्ता यांच्या अर्जात त्यांनी चुकीचे आदेश पारित केले त्याबध्दल काय कार्यवाही झाली याची त्यांचे २.११.२००२ चे अर्जाचे संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपील अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक ९.६.२००९ च्या अर्जामध्ये माहितीच्या विषयामध्ये दिनांक २.११.२००२ ला जे अपील सादर केले आहे त्या अपील अर्जाच्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे

( पान ४ वर ..)

आंत छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४४६/२००९**

**१) श्री लिलाधर काशिनाथ गजभिये,**
**मु.करंभाड, पो.ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,**
**पारशिवनी, ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी,**
**तालुका कृषि अधिकारी कार्यालय, पारशिवनी,**
**ता.पारशिवनी, जिल्हा नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, पारशिवनी यांचेकडे राष्ट्रीय कृषी योजना अंतर्गत शेत तळे २००२ ते २००९ लाभार्थ्यांची यादी व तयार केलेल्या शेत तळयाचे आकारमान निहाय यादी देण्यात यावी. तसेच संबंधीत शेतक-यांकडे कोणत्या आकारमानात (एम.बी.प्रमाणे) एम.बी.च्या सत्यप्रती देण्यात याव्यात. (२) फळ भाज्या विकास केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत लाभ देण्यात आलेल्या अनुदान नगदी स्वरुपात व साहित्याच्या लाभार्थ्यांची यादी, निकष व निवड सविस्तर माहिती लाभार्थ्यांचे संपूर्ण पत्यासहित यादी देण्यात यावी, अशी माहिती मागितलेली दिसून यते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयामधून सुध्दा माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अत्यल्प कर्मचारी वृंदामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही. तसेच अपीलकर्ता यांनी मागितलेली

( पान २ वर ..)



माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे व ती संकलीत करणे शक्य नाही व त्यामुळे माहिती तयार करुन देणे शक्य झाले नाही. असे असले तरी, अर्जाची कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांच्या कोणत्याही अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४४९/२००९**

**१) श्री सुभान अफझुल रहीम,**
**आय.बी.एम.रोड, मस्जीद जवळ,**
**गिटटीखदान, नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार,**
**नागपूर (शहर), नागपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी, तहसिल कार्यालय,**
**नागपूर (शहर), नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार (शहर) यांचेकडे सन १९३८ सालच्या जमाबंदी पत्रिकेत श्री अजीज हे नांव होते. परंतु मिर्झा बेग हे नांव कसे दर्ज झाले, कोणत्या आधारावर दर्ज झाले याबध्दलची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२००८ रोजी त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. व तरी सुध्दा त्यांनी माहितीचा अर्ज हा नंतर केलेला आहे. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १९.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यातही त्यांना माहिती उपलब्ध नाही हे पुर्वीचेच उत्तर कायम केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सन १९११-१२ व जमा बंदोबस्त १९५४-५५ अधिकार अभिलेख या दोनही कालावधीच्या दरम्यानचा कालावधी म्हणजे १९११-१२ ते १९५४-५५ या मधील रेकार्ड तलाठी दप्तरात नसल्याचे तलाठी सांगतात. तसेच फेर फार पंजी दप्तराला नाही. त्यावर चौकशी अंती १९५४-५५ या कालावधीपूर्वी फेर फार पंजी नसल्याचे

(पान २ वर..)



दिसून येते वगैरे.. कळविलेले दिसून येते.

असे असले तरी अपीलकर्ता यांना सर्व कागदपत्रांचा योग्य तो शोध घेवून तालुका अभिलेख, जिल्हा अभिलेख, भूमी अभिलेख यांचेकडे शोध घेवून अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१.२००९ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात तालुका अभिलेखात, जिल्हा अभिलेखात तसेच भूमी अभिलेख कार्यालयामधून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ३४२/२००९**

**१) श्री प्रमोदसिंह विठठलसिंह राणा,**
**फुलचूर नाका, फुलचूर पेठ, गोंदिया, ता.जि.गोंदिया. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधीक्षक,**
**गोंदिया. जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,**
**गोंदिया, जिल्हा गोंदिया. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचे कार्यालयात जन माहिती अधिकारी यांना दिनांक २८.९.२००८ ला रोशन जयस्वाल आणि सोबती दो मुले १ पोलीस यांनी केलेल्या गुन्हयाची जाच करुन कायदेशिर कारवाई करण्याबाबत रिपोर्ट केली आहे. कारवाहीची कॉपी अहवाल लवकर पाहिजे, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना व त्यांचे वडील यांना त्यांच्या अर्जाचे संदर्भात दिनांक २५.१२.२००८ रोजी अर्जानुसार मागितलेली माहिती सहा.माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन गोंदिया(ग्रामीण) यांचेकडे मागविण्यात आलेली असून सदरची माहिती याद्वारे पुरविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे चौकशी अहवाल अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच बयाणाची प्रत सुध्दा दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयाच्या बाबत खुलाशामध्ये अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील सादर केले नाही असे देण्यात आले आहे. अपीलकर्ता यांनी जे अपील सादर केले आहे ते रेंज यांचेकडे सादर केले आहे. व यावरुन अपीलकर्ता यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे पालन केले आहे असे दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दिनांक १८.७.२००९ रोजी ऐकुण घेण्यात आले होते व आज अपीलकर्ता यांचे म्हणणे एकुण घेण्यात आले. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मागितलेल्या माहितीचा अहवाल मिळालेला होता तो चुकीचा आहे. तसेच त्यांना स्वतंत्रपणे अहवाल प्राप्त करुन दिलेला नाही. त्यांच्या वडीलांचा अर्ज आहे त्यामध्ये सुध्दा सदरच्या अहवालाची माहिती मागितलेली असल्यामुळे त्यांच्या वडीलांचे व अपीलकर्ता यांचे स्वत:चे अर्जाचे अनुषंगाने त्यांना एकत्रित माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे

( पान २ वर .....)

त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दिलेला आहे.

**खुलासा**

"उपरोक्त विषयांकित संदर्भिय पत्राचे अनुषंगाने अहवाल खालील प्रमाणे सादर आहे. यातील अपीलकर्ता प्रमोदसिंह व. विठ्ठलसिंह राणा रा.फुलचूर नाका न्यू आर.टी.ओ.ऑफिस जवळ फुलचूर टोला (पेठ) ता.जि.गोंदिया यांनी दिनांक २८.९.२००८ रोजी रोशन जयस्वाल आणि सोबती व पोलीस यांचे विरुध्द रिपोर्ट दिली होती. त्या रिपोर्टवर काय कारवाई करण्यात आली या माहितीची मागणी करीता दिनांक २५.११.२००८ ला पोलीस अधीक्षक कार्यालय, गोंदिया येथे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज सादर केला. ते अर्ज या कार्यालयास दिनांक २८.११.२००८ रोजी प्राप्त झाले. माहिती सहाय्यक जनमाहिती अधिकारी पो.स्टे.गोंदिया ग्रामीण कडून प्राप्त करण्यास दिनांक २८.११.२००८ ला पत्र देण्यात आले. तसेच अर्जदाराने मागणी केलेली माहिती प्राप्त करुन पुरविण्यात येईल, या कार्यालयाचे संपर्कात राहावे अशी लेखी सूचना या कार्यालयाचे पत्र क्रं.३९१६ दिनांक २८.११.२००८ अन्वये देण्यात आली आहे. त्या पत्राची प्रत संलग्न आहे.

सहाय्यक जनमाहिती अधिकारी पो.स्टे. गोंदिया ग्रामीण यांचेकडून दिनांक २५.१२.२००८ ला माहिती प्राप्त झाल्याने या कार्यालयाचे जा.क्रं.४२८७/०८ दिनांक २५.१२.२००८ अन्वये पोलीस निरीक्षक, गोंदिया ग्रामीण मार्फत लेखी सूचना पत्र पाठविण्यात आले असता अर्जदार हे हजर मिळून आले नाही. अर्जदाराला मुदतीत माहिती मिळावी म्हणून दिनांक २६.१२.२००८ ला अपीलकर्ता यास त्यांचे भ्रमणध्वनीवर या कार्यालयीन दुरध्वनीवरुन बोलणी करुन कळविण्यात आले आहे. त्यावेळी अपीलकर्ता यांनी एक महिण्याचा कालावधी झाल्याने वरिष्ठांना आपील अर्ज करीत असून माहिती घेवून जात नाही, अपील नंतर माहिती घेवून जाईल असे सांगितले.

अर्जदारांनी प्राफार्म प्रमाणे अपील अधिकारी यांचेकडे अपील न करता विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचेकडे अपील अर्ज सादर केला. नियमाप्रमाणे अपील अर्ज दाखल केले नाही.

अपीलकर्ता व अर्जदार अर्पणसिंह व प्रमोदसिंह राणा यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी नियमानुसार शुल्क भरणा केल्याने त्यांना त्याच वेळी मागणी केलेली कागदपत्रे पुरविण्यात आले आहे. त्याने कागदपत्र मिळाल्याची स्वाक्षरी केल्याने त्या रजिस्टरचे झेरॉक्स प्रत संलग्न आहे.

एकंदरीत वर नमुद केल्याप्रमाणे अर्जदार यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी मा.पोलीस अधीक्षक गोंदिया यांचेकडे अर्ज दिले असून ते अर्ज आमचेकडे दिनांक २८.११.२००८ ला प्राप्त झाले आहे. जन माहिती अधिकारी आम्ही असल्याने अर्जदार यास आमचे कडे अर्ज प्राप्त झालेल्या तारखेपासून एक महिन्याचे आंत दिनांक २५.१२.२००८ रोजी माहिती घेवून जाण्यास सूचनापत्र दिले. परंतु ते हजर मिळाले नाही. म्हणून दिनांक २६.१२.२००८ रोजी पुन्हा आमचे कडे उपलब्ध असलेले अर्जदाराचे भ्रमणध्वनीवर संपर्क साधला तेव्हा त्यांना दिनांक २४.१२.२००८ पर्यंत माहिती पुरवावयास पाहिजे असा गैरसमज होऊन त्यांनी माहिती घेवून जाण्यास नकार देवून अपील नंतर माहिती घेवून जाईल, असे कळविले व दिनांक २१.१.२००९ रोजी दोन्ही अर्जदार (वडील व मुलगा) (१) प्रमोदसिंह व.विठ्ठलसिंह राणा (२) अर्पणसिंह व. प्रमोदसिंह राणा दोन्ही रा. फुलचूर नाका न्यू आर.टी.ओ.ऑफिस जवळ फुलचूर टोला(पेठ)

(पान ३ वर ..)

ता.जि.गोंदिया कार्यालयात येवून एकत्रित माहिती घेतलेली आहे. अर्जदार यांना माहिती पुरविण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली असून त्यांनी स्वतःच माहिती घेवून जाण्यास विलंब लावलेला आहे.

अर्जदार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ प्रमाणे मागणी केलेले कागदपत्र, उपलब्ध असलेले त्यास पुरविण्यात आलेले आहेत. म्हणून अर्जदारानी केलेला अपील अर्ज नाकारण्यास पात्र आहे. करीता अर्जदार यांनी दिलेला अर्ज खारीज करण्यास विनंती."

सदरच्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच अहवाल चुकीचा असल्यास अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम अधिका-यांकडे तक्रार करावी. त्याकरीता सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४४१/२००९**

**१) श्री डि.एच. हिरेखान(तक्रार विभाग अधिकारी)**
**मानव अधिकार सुरक्षा परिषद खापरखेडा वार्ड क्रं.१,**
**ता. सावनेर, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**सावनेर, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**
**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,**
**सावनेर, ता. सावनेर, जिल्हा नागपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.१.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयात जन माहिती अधिकारी यांना (१) तहसिल विभागत एकुण किती केरोसिन परवानाधारक/वितरक आहेत. (२) त्यांची एका कुपन वर किती केरोसिन घ्यायला पाहिजे. याबाबत नियमाची आदेशाची प्रत. (३) आपल्या विभागातील माहे ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर, २००८ मध्ये एकुण किती कुपन धारकांना किती केरोसीन वाटप करण्यात आले. ते केरोसिन वितरकांच्या रजिस्टर नोंदीची प्रत. अशी माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १०.२.२००९ रोजी (१०.१.२००९ रोजी) खर्चाचा भरना रुपये १२,९२०/- प्रती पृष्ठ रुपये ४/- प्रमाणे अशी एकुण ३२३० पृष्ठांकरीता मागितलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक २१.८.२००९ रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना रक्कम जमा करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी अजूनपर्यंत रक्कम जमा केलेली नाही. व तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. व त्यानंतर द्वितीय

( पान २ वर ..)

अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये एकुण २ मुद्यांमध्ये माहिती मागितली आहे. तीस-या मुद्याची माहिती मागितलेली दिसून येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. मुद्या क्रं.१ व २ ची माहिती उपलब्ध आहे व त्यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल असेही जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या द्वितीय अपील मेमो मध्ये मुद्या क्रमांक १ व २ मध्ये मागितलेली माहिती १० दिवसांचे आंत विना मुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १७२/२००९**

**१) श्री सत्तारखान अब्बास खान,**
**पांडे महाल समोर, भंडारा, ता.जि.भंडारा. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा.धर्मदाय आयुक्त,**
**भंडारा. ता.जि. भंडारा. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धर्मदाय आयुक्त कार्यालय,**
**भंडारा. जिल्हा भंडारा. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी यांनी दिनांक ३१.८.२००९ रोजी आयोगाकडे खालीलप्रमाणे पुरसिस दिलेले आहे. "The appellant wants to withdraw the present appeal, as the matter has already been referred to the Director of Anti Corruption Bureau, Maharashtra State, Bombay, The appellant therefore at present, does not press this appeal and wants to withdraw the same."

अपीलकर्ता यांनी वरीलप्रमाणे पुरसिस दिलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४४०/२००९**

**१) श्री दिनेश रामदयाल तांबेकर,**
**एकता बहुउद्येशिय सेवा सह.संस्था उमरेड,**
**ता.उमरेड, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,**
**म.रा.परिवहन महामंडळ, नागपूर. — उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा डेपो मॅनेजर,**
**म.रा.परिवहन महामंडळ, उमरेड, ता.उमरेड, जि.नागपूर. — उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा डेपो मॅनेजर, रा.प.महामंडळ यांचेकडे एकता बहुउद्येशीय सेवा सह.संस्था उमरेडने कुही बस स्थानकचा ठेका घेतलेला होता. तेव्हा जून, २००८ मध्ये १० दिवसाचा पगार १८२/- रुपये कसा काय काढला याबाबत डेपो मॅनेजर उमरेड यांना माहितीच्या अधिकारात माहिती विचारली असता त्यांनी उत्तर दिले नाही. तेव्हा आपण कृपया माहिती द्यावी, अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.५.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यांनी द्वितीय अपीलात त्याबध्दलचे कोणतेही कारण दिलेले नाही. अपीलकर्ता यांना देयक उपलब्ध करुन दिलेले आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच कोणत्याही प्रकारच्या त्रुटी असल्यास त्याबाबत विचारले असता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, लेखा आक्षेप आलेला

(पान २ वर ..)

असल्यामुळे त्याबाबत तशा प्रकारचा पगार काढण्यात आलेला आहे. ही बाब त्यांना समजावून सांगीतली आहे. परंतु तरीही त्रुटी असल्यास त्याबध्दल त्यांना न्याय मिळवून देता येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी आश्वासन दिले आहे. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत योग्य तो न्या देणे संयुक्तिक राहील. अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४५६/२००९**

**१) सौ. सरला नवरतनजी मोदी,**
**मित्र चौक, देशसेवा रोड, वरोरा-४४२९०७,**
**ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त,**
**नगर पालिका प्रशासन, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वरोरा, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद वरोरा यांचेकडे फेर फारबाबत सन २००७ ते फेब्रुवारी पासून आजपावेतो या कालावधीतील आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन यामध्ये नमुद केल्याप्रमाणे एकुण १ ते ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अर्जदार स्वत: येवून कागदपत्रे घेवून जाण्यास तयार आहे असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२००७ रोजी माहिती उपलब्ध आहे व रुपये २८/- नगर परिषद फंडात भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर दिनांक ७.५.२००९ रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना सुधारित माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. दिनांक २५.५.२००९ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असले तरी ३० दिवसाची मुदत संपण्यापुर्वीच दिनांक २०.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनाक १२.५.२००९ रोजी देण्यात आला असून त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे अचुक माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या निर्णयानंतर माहिती उपलब्ध झाल्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२००९ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. श्री वरधन यांनी युक्तीवाद केला. व त्यांनी सुरुवातीला योग्य माहिती पुरविली नाही. तसेच खरी माहिती न देता खोटी माहिती दिली याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा निष्कर्ष काढलेला आहे व जाणूनबुजून खोटी माहिती दिली त्याकरीता शास्ती लादण्यात यावी अशी विनंती आयोगाकडे करण्यात आली आहे. द्वितीय अपील मेमो मध्ये तीच माहिती मागितलेली दिसून येते व त्याबध्दलची कागदपत्रे मात्र त्यांना पुर्वीच मिळाली आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांना माहिती पुर्वीच उपलब्ध झाली होती. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा ही गुणवत्तेबाबत निर्णय मिळण्याची दिसून येते. मात्र तशा प्रकारचा निर्णय अधिनियमाच्या

( पान २ वर ..)

तरतुदीप्रमाणे देता येत नाही. मात्र माहिती खोटी व अपूर्ण दिलेली असल्यास संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे सहाय्य करुन चुकीची व अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४५५/२००९**

**१) श्री वसंता लहरुजी रुयारकर,**
**रा.आझाद वार्ड वरोरा, ता.वरोरा, जि. चंद्रपूर. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर परिषद, वरोरा, ता.वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ लिपिक,**
**नगर परिषद वरोरा, ता. वरोरा, जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.६.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद वरोरा यांचेकडे माधव धोंडू रुयारकर यांची पत्नी गोदाबाई श्रावण रुयारकर (२) गोदाबाई श्रावण रुयारकर यांचे फेर फार गंगाराम श्रावण रुयारकर व रामभाऊ श्रावण रुयारकर हया नांवानी कसे काय झाले त्याची मुळ कागदपत्रे मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.४.२००९ ला अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व ती अर्जदाराने घेतलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ८.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १४.५.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीला ३ दिवसांचे आंत आवश्यक व त्रुटी पुर्ण करुन माहिती देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याच दिवशी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे व पोच दिली आहे. त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. वरघने यांनी युक्तीवाद केला . त्यामध्ये त्यांनी माहिती योग्य रितीने मिळाली नाही असे आयोगास सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, नोंदणीबाबत मालमत्ता रेकार्डला फेर फार केल्याची नोंद दिसून येत नाही. व सर्व्हेक्षणात मालमत्ता रेकार्डला या नोंदी असाव्या अशी धारणा आहे असे कळविले आहे. परंतु युक्तीवाद असा केला की, त्यांना माहितीची कागदपत्रे उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ज्याअर्थी सर्व्हेक्षणात मालमत्ता रेकार्डला या नोंदी आलेल्या असाव्या अशी धारणा कळविली आहे त्याअर्थी ही कागदपत्रे उपलब्ध नाही असे गृहीत धरण्यात आले आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांना तसे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहील.

( पान २ वर ..)

त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना फेर फार नोंद कशाच्या आधारावर घेतली याबध्दलची कागदपत्रे उपलब्ध असल्यास/नसल्यास तसे कळविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४५४/२००९**

**१) श्री मधुकर पांडुरंग ब्राम्हणकर,**
**संजय नगर, वार्ड क्रं.१, चिचगड रोड, देवरी,**
**ता. देवरी, जिल्हा गोंदिया. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा**
**३) जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक,**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, भंडारा,**
**ता. भंडारा, जिल्हा भंडारा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालयात दुर्गा शिक्षण संस्था कुंभारटोलो(आमगांव) रं.नं.२३/ एफ १८७९ या संस्थेनी दिनांक ६.५.२००७ रविवारच्या, दिनांक १८.७.२००४ व कार्यकारीणीच्या सभेत घेतलेल्या ठरावाच्या इतिवृत्ताची साक्षांकित प्रत. तसेच संस्थेचे सत्र २००४-०५ २००४ ते मार्च २००५ या आर्थिक वर्षाचे अंकेक्षण अहवालाची साक्षांकित प्रत अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती नोंदणीकृत शिघ्र टपालाद्वारे पाठविण्यात यावी, असे नमुद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.५.२००९ रोजी अध्यक्ष/सचिव, दुर्गा शिक्षण संस्था, कुंभारटोलो यांना अधीक्षक तथा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. त्यावर दिनांक २५.१२.२००७ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. प्रथम अपील दाखल केले असते तर प्रथम अपीलीय अधिकारी

( पान २ वर ..)

तथा सहाय्यक धर्मदय आयुक्त यांनी सदरच्या संस्थेस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले असते व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असती. अपीलकर्ता हे गोंदिया येथील आहे व संस्था ही गोंदिया जिल्हयात आहे. दिनांक १५.८.२००९ रोजी भंडारा जिल्हयामधून गोंदिया जिल्हा सहाय्यक धर्मदाय आयुक्त यांचे कार्यालय झाल्यामुळे व कागदपत्रे त्या कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचा अर्ज सुध्दा त्यांच्याकडे पाठविण्यात येत आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अर्ज सुध्दा त्यांचेकडे दाखल करणे आवश्यक राहील, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी पथम अपीली दाखल केल्यानंतर त्या निर्णयाच्या विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करणे आवश्यक राहील. त्याकरीता अपील फेटाळण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४५३/२००९**

**१) श्री अशोक विठठलराव द्रव्येकार,**
**अम्बीका सॅामीलचे मागे, हनुमानगड, पिपरी(मेघे),**
**ता.जिल्हा वर्धा. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी(ग्रा.पं.)**
**जिल्हा परिषद, वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
**पंचायत समिती, कारंजा (घाडगे), ता.कारंजा, जिल्हा वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती कारंजा (घा.) यांचेकडे ग्राम पंचायतींच्या संदर्भात एकुण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.५.२००७ रोजी अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते. परंतु तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले होते. व त्यानंतर लगेच दिनांक १६.५.२००८ रोजी द्वितीय अपील सुध्दा दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मुदत पाळलेली दिसून येत नाही. त्यामुळे त्यांच्या अपीलाचा विचार करण्याची आवश्यकता नाही असे वाटते. तरी सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ८६३/२००८ मध्ये सदरची माहिती मागितलेली होती व सदरच्या अपीलाचा निर्णय दिनांक १५.७.२००९ रोजी देण्यात आला आहे. व या अपीलामध्ये सुध्दा तीच माहिती मागीतली आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ४५१/२००९**

**१) श्री प्रकाश रुपरावजी देशमुख,**
**श्रीराम वार्ड, द्वारा श्री राम प्रा.शाळा,**
**मु.पो.ता.आर्वी, जिल्हा वर्धा-४४२२०१. अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,**
**आर्वी ता.आर्वी. जिल्हा वर्धा. उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार, आर्वी,**
**ता. आर्वी, जिल्हा वर्धा. उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ १३(३) अन्वये जन्माची नोंद उशिरा घेण्याबाबत मी आपणाकडे दिनांक २९.६.५५ च्या जन्मनोंदीच्या आदेश मिळण्यसाठी अर्ज केला असता आपण मला तोंडी सांगितले, मी आदेश देऊ शकत नाही. करीता आपण कोणत्या नियमाअंतर्ग आदेश देऊ शकत नाही याची संपूर्ण नियमासहित द्यावी. १९५५ च्या नंतरचे जन्म नोंद अधिनियमाप्रमाणे पुर्ण माहिती. अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमुद केले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१.२००९ रोजी सन १९५५ च्या नोंदी घेण्याबाबतच्या परिपत्रकाचा शोध घेणे सुरु आहे. सापडल्यावर देण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १४.५.२००९ रोजी देण्यात आला असून मागितलेल्या परिपत्रकाची प्रत त्वरीत देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिनांक २०.७.२००९ रोजी आदेश तयार केलेले दिसतात व त्याची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यावरुन अपीलकर्ता

( पान २ वर ..)

यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक ६२८/२००९**

**१) श्री शंकर चिंधुजी मून,**
**कार्यालयीन प्रतिनीधी, साप्ताहिक साक्षात्कारी,**
**रेशिमबाग प्लॅाट नं.एन-१५३, व्हॅालीबाल मैदानसमोर,**
**हनुमान नगर, नागपूर-४४०००९.** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,**
**भूमी अभिलेख, नागपूर.** **उत्तरवादी**

**३) जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रं.१,**
**नागपूर.** **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २६.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २६.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२००८ रोजी एकुण १४ पानांमध्ये ३९ मुद्यांच्या माध्यमातून अधीक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांना नगर भूमापन अधिकारी क्रं.१, नागपूर यांचेकडे दिनांक ३१.३.२००८ च्या आदेशावरील उपस्थित होणा-या मुद्यांविरुध्द माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.६.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती नगर भूमापन अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधीत आहे. सबब आपण दिलेला माहितीच्या अधिकारा अंतर्गतचा अर्ज नगर भूमापन अधिकारी क्रं.१ यांचेकडे पाठविला आहे. आपण त्यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे अपीलकर्त्यास कळविलेले दिसून येते व पत्राची प्रतिलीपी नगर भूमापन अधिकारी यांना दिलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रं.१ नागपूर यांनी, आपण मागितलेली माहिती एकडील कार्यालयात तयार आहे. नियमानुसार फी भरुन ७ दिवसांचे आंत माहिती प्राप्त करुन घ्यावी अन्यथा अर्ज निकाली ठेवण्यात येईल याची नोंद घ्यावी, असे कळविले आहे. परंतु, अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येत नाही. व अपील मात्र दिनांक १०.७.२००८ रोजी दाखल केलेले दिसून येते. व त्यात भूमापन अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे प्रथम अपील दाखल केले आहे असे नमूद केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २२.८.२००८ रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक भूमी अभिलेख, नागपूर यांनी नगर भूमापन अधिकारी, नागपूर यांचेकडे अपील पाठविण्यात येत असून ते निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व त्याची प्रतीलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या अपीलाचा निर्णय न दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता गैरहजर आहे. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक ६.५.२००८ रोजी ठेवण्यात आली. अपीलकर्ता यांनी मुदत मागितल्यामुळे दिनांक २६.८.२००९ रोजी सुनावणीस

( पान २ वर .)

ठेवण्यात आले. व त्यानंतरही दिनांक २६.८.२००९ रोजी अपीलकर्ता वेळेवर हजर झाले नाही व उशिराने हजर झाले. यावरुन अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीची कोणत्याही प्रकारची आवश्यकता आहे असे दिसून येत नाही. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक ११.७.२००८ रोजी माहितीच्या नकलाकरीताचा खर्च भरना करावा व माहिती घेवून जावी असे कळविलेले आहे.

अपीलकर्ता यांनी नगर भूमापन अधिकारी क्रं.१ यांचेकडे माहिती असताना त्यांनी अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे माहितीची मागणी करणे याचा अर्थ अपीलकर्ता यांना सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींची माहिती दिसून येत नाही. वास्तविक अपीलकर्ता हे साप्ताहिक साक्षात्कारीचे कार्यालयीन प्रतिनिधी आहे. त्यामुळे त्यांना अधिनियमाच्या तरतुदी माहिती असणे आवश्यक आहे.

अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, ३९ मुद्यांत त्यांनी कागदपत्रांची मागणी न करता निर्णयाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केलेले दिसून येते. व माहितीच्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे ते अपेक्षित नाही. माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही प्रकरणात जन माहिती अधिकारी किंवा अपीलीय अधिकारी यांचे अभिप्राय हे अपेक्षित नाही व त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक २६.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १०१/२००९**

**१) श्री मनोहर गोलपेवार,**
**इंडीयन इन्स्टिटयूट ऑफ युथ वेलफेअर,**
**१३४, शिवाजी नगर, नागपूर-४४००१० — तक्रारदार**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**महाराष्ट्र राज्य महिला आयोग,**
**गृहनिर्माण भवन(म्हाडा बिल्डींग)पोटमाळा, बांद्रे, मुंबई-४०००५१. — गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक १०.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. सदरच्या तक्रारीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी, राज्य महिला आयोग यांचेकडून खुलासा मागविण्यात आला होता. राज्य महिला आयोगाचे माहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल करताना दिनांक १८.४.२००९ रोजी अर्जदारास आयोगामार्फत उत्तर दिलेले आहे, असे खुलाशात नमुद केलेले आहे. मुद्दा क्रं.१ हा जिल्हा परिषद नागपूर यांचेशी निगडीत आहे. मुद्दा क्रं.३, जिल्हा परिषद नागपूर कडून प्राप्त शिफारसीनुसार वसंतराव एज्युकेशन व वेलफेअर या संस्थेला समुपदेश केंद्र सुरु करण्यास आयोगामार्फत परवानगी दिलेली आहे. मुद्दा क्रं. ४ व ५ जिल्हा परिषदेशी निगडीत आहे, असा खुलासा केलेला आहे. त्या संदर्भातील सर्व माहिती तक्रारदार यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्याबध्दलचा पत्रव्यवहार आयोगाकडे दाखल केलेला आहे. तक्रारदार यांनी सुध्दा माहिती उपलब्ध झाली हे मान्य केले असल्यामुळे सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १५४/२००९**

**१) श्री अतुल रत्नाकर बुरांडे,**
**द्वारा श्री शिवाजीराव रनवरे, ५५८ चिटणवीस नगर,**
**पंचवटी आश्रम मागे, उमरेड रोड, नागपूर.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,**
**श्री उच्च प्राथमिक शाळा, राजेंद्रनगर, झोपडपटटी,**
**के.डी.के.कॅालेज रोड, नागपूर.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार गैरहजर आहेत.

२. तक्रारदार यांनी तक्रार क्रमांक २९/०८ च्या संदर्भात दिनांक ७.१०.०८ ला आदेश पारित करण्यात आले होते. त्याप्रमाणे तक्रारदार यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. मात्र जी माहती उपलब्ध करुन दिली ती खोटी आहे, असे तक्रारीत म्हटले आहे. गैरतक्रारदार यांचा खुलासा मागविण्यात आला होता. परंतु गैरतक्रारदार हजर झालेले नाही व खुलासाही सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५,०००/-(रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादणे आवश्यक झाले आहे. त्याकरीता तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१)तक्रारदार यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, उच्च प्राथमिक शाळा नागपूर यांचे विरुध्द रुपये ५,०००/-(रुपये पाच हजार फक्त) शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम संबधीत जन माहिती अधिकारी यांचे दरमहीन्याचे पगारातून वसुल करुन ती "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".या लेखाशिर्षात जमा करावी.

२)सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी.

३)तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९** **(विलास पाटील)**

**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिायिम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार** क्रमांक १०४/२००९

**१) श्री मुजाहिदल हक अंसारी, इस्माईल पुरा कामठी, जिल्हा नागपूर. तक्रारदार**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार,.कामठी, जिल्हा नागपूर. गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक २१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार नंतर हजर झाले.

२. तक्रारदार यांची अपील क्रमांक २५३६/०७ चा निर्णय दिनांक २८.१.०९ रोजी देण्यात आला असून त्यांच्या दिनांक २.७.०७ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत विना मुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहे. परंतु दिशाभूल करणारी माहिती दिली, अशा प्रकारची तक्रार आयोगाकडे केलेली आहे.

३. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, कामठी यांचा खुलासा मागविण्यात आलेला होता. परंतु खुलासा न आल्यामुळे सदरची तक्रार ही सुनावणीस लावण्यात आली होती. त्यावेळेस अपीलकर्ता हजर होते. जन माहिती अधिकारी हे नंतर हजर झाले व त्यांनी खुलासा दाखल केला आहे. खुलाशामध्ये दिनांक २८.१.०९ अन्वये तक्रारदार यांना माहिती देण्यात आलेली आहे व त्याची पोच पत्रासह सादर करण्यात येत आहे. उर्वरित दिनांक १.४.०७ ते २.७.०७ च्या कालावधीतील माहितीचा शोध घेवून अपीलकर्त्यास माहिती सादर करण्यात येईल, असा खुलासा सादर केला आहे. उर्वरित माहिती तक्रारदार यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना दिनांक १.४.०७ ते २.७.०७ या कालावधीतील प्रकरणाचा शोध घेवून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जन माहिती अधिकारी यांनी, छायांकित प्रतीचे स्वरुपात विना मुल्य, रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १४२/२००९**

**१) श्री प्रभाकर नानासाहेब रोहनकर,**
**मु.सुकळी(गुख)पो.कांजना (राजना)**
**ता.नांदगांव खंडेश्वर, जिल्हा अमरावती.** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**२) जन माहिती अधिकारी तथा**
**विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था, अमरावती**
**कांता नगर, जूना बायपास रोड, सहकार संकुल, अमरावती.** **गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक २०.५.०९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२. तक्रारदार यांच्या अपील क्रमांक २२६/०८ चा निर्णय दिनांक १७.२.०९ च्या अनुषंगाने अद्यापपर्यंत माहिती न मिळाल्यामुळे सदरची तक्रार सादर केलेली दिसून येते. सदरच्या तक्रारीमध्ये माहिती जी पुरविलेली आहे ती अर्जासोबत जोडलेली आहे परंतु महत्वाची माहिती म्हणजे निकालाची प्रत २३.३.०९ पर्यंतची मिळालेली नाही. त्यामुळे माझे सावकारी शेत खरेदीसाठी दावा टाकण्यास विलंब होत आहे. तरी मला मागितलेली माहिती मिळवून देण्याची कृपा करावी अशी तक्रार दाखल केलेली दिसून येते.

३. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १३.८.०९ रोजी खुलासा मागविण्यात आला होता. खुलाशाप्रमाणे शासकिय माहिती अधिकारी तथा विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी, दिनांक १७.२.०९ च्या आदेशात दिल्याप्रमाणे श्री प्र.ना. रोहनकर यांना या कार्यालयाचे पत्र दिनांक ३०.३.०९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच उक्त माहिती रजिस्टर पोस्टाने पाठविली आहे. रजिस्टर पोस्टाची पावती, जावक रजिस्टरला लावलेली असून सदर पावती जावक रजिस्टरच्या छायांकित प्रतीसह जोडलेली आहे. त्याचप्रमाणे रुपये ५००/- चा मनीऑर्डर श्री रोहनकर यांना पाठविला आहे. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पूणे यांनी श्री बी.आर.ठाकूर, तत्कालीन सहाय्यक

(पान २ वर ..)

निबंधक, सहकारी संस्था, नांदगांव खंडेश्वर यांचे विरुध्द विभागीय चौकशी, त्यांचे कार्यालयीन आदेश दिनांक १४.८.०९ नुसार प्रस्तावित केलेली असून त्याची प्रत या कार्यालयास दिनांक १९.८.०९ रोजी प्राप्त झालेली आहे. त्याची छायांकित प्रत श्री रोहनकर यांना दिनांक २१.८.०९ अन्वये पाठविली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिति उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिति आयुक्त,**
**राज्य माहिति आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १०१/२००९**

**१) श्री मनोहर गोलपेवार,**
**इंडीयन इन्स्टिटयूट ऑफ युथ वेलफेअर,**
**१३४, शिवाजी नगर, नागपूर-४४००१०** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.

२.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक ३१.८.२००९** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिियम, २००५ च्या कलम १८ (१) अंतर्गत तक्रार -**

**तक्रार क्रमांक १०१/२००९**

**१) श्री मनोहर गोलपेवार,**
**इंडीयन इन्स्टिटयूट ऑफ युथ वेलफेअर,**
**१३४, शिवाजी नगर, नागपूर-४४००१०** **तक्रारदार**

**वि रु ध्द**

**३) जन माहिती अधिकारी तथा**
**गैरतक्रारदार**

**(आदेश पारित दिनांक ३१.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

तक्रारदार यांनी दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ (१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज दिनांक ३१.८.२००९ रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. गैरतक्रारदार हजर आहेत.
२.

**आदेश**

१) तक्रारदार यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

२) तक्रारदार व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**
**दिनांक ३१.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग नागपूर, खंडपीठ**
**नागपूर**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 266/2009.**

सौ. संगिता दिलीप भांदककर
प्लॉट नं. 48/के 303 गोकुलहरी अपार्टमेंट
आझमशाह लेआऊट गणेशनगर
नंदनवन नागपूर 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दि. तु. गेडाम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण अजनी
वैनगंगा नगर नागपूर
2) श्री बी. एन. शेळके
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
पाटबंधारे विभाग वैनगंगा नगर
अजनी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग अजनी नागपूर यांचेकडे

1. मे. संगिता कन्सट्रक्शनची प्रलंबीत असलेली देयके व अनामत रक्कम व्याजासहीत देणार आहात काय?

2. प्रलंबीत देयके व अनामत रक्कमा कव्हा पर्यंत मिळू शकतात यावर खुलासा करुन तसे कळवावे.

माहितीचा कालावधी सन 1998 ते 2003 असा आहे. माहिती रजिष्टर पोष्टने उपलब्ध करुन द्यावी असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.5.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून दिसून येत नाही. परंतु दि.23.1.2009 रोजी शासकीय

माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांना अधिक्षक यांनी दिलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळेच समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहितीच्या स्वरुपातून त्यांच्या कंपनीच्या प्रलंबीत देयकाच्या संदर्भामध्ये रक्कम मिळण्यास अपेक्षित आहे असे दिसून येते. मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 5.7.2008 रोजी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी संपूर्ण प्रकरणाबद्यल वस्तुस्थिती कळविण्यात आलेली आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा दि. 23.1.2009 रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध झाली आहे. तसेच अपीलकर्ता यांनी असेही सांगितले की प्रथम अपीलीय अधिकारी यांनी एकत्रित सुनावणी घेवून त्या संदर्भात कार्यवाही करुन भुगतान करावे व त्याबद्यलच अपीलकर्ता यांना कार्यवाहीची अपेक्षा दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या खुलाशावरुन अपीलकर्ता यांची माहिती ही जुनी असल्यामुळे त्याबाबतचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माहिती देण्याची टाळाटाळ केलेली नाही अशी आयोगाची खात्री झालेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना अंतिमतः माहिती ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.4.2008 च्या 30 दिवसाचे आंत अंतिम माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 267 / 2009.**

श्री वामन निळकंठ देशपांडे
एम आय जी 24 / 4, हाऊसिंग बोर्ड कॉलनी
त्रिमुर्ती नगर रिंग रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता (जमीन शाखा)
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.12.2008 रोजी उप अभियंता (जमीन शाखा) यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 1.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतू अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2009 रोजी मुद्या क्र. 3,4,5 हे प्रश्न स्वरुपात असल्यामुळे माहिती मागितलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2009 रोजी मुख्य अधिकारी यांचेकडे आक्षेप घेणारे पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही दोन विभागाची माहिती आहे. नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचे विभागाला स्वतंत्र जन माहिती अधिकारी आहे व तसे सार्वजनिक प्राधिकरणाच्या दर्शनी भागामध्ये फलकावर नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी दोन विभागातील माहिती मागितलेली

आहे. परंतु निश्चित कोणत्या जन माहिती अधिका–याकडे माहिती मागितली त्याबाबत नमूद केलेले नाही. व त्यामुळेच मुख्य अधिकारी यांना स्वतः अर्जाचे संबंधात शाखेकडे पाठवावे लागलेले आहे. असे असून सुध्दा त्यांना मुद्या क्र. 1 व 2 ची माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु मुद्या क्र. 3,4,5 च्या संदर्भामध्ये संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज प्राप्त झालेला नाही असे त्यांनी सांगितले. परंतु मुख्य अधिकारी यांनी अर्ज हा संबंधीत शाखेकडे पाठविलेले असल्यामुळे अर्ज प्राप्त झाला नाही हे कारण संयुक्तिक नाही. तो अंतर्गत प्रशासनाचा विषय आहे. व त्यामुळे ज्या कर्मचा–याकडे सदरचा अर्ज प्रलंबित राहिलेला होता त्या कर्मचा–याला जबाबदार धरणे आवश्यक आहे. वास्तविक आयोगाची नाटिस प्राप्त झाल्यानंतर मुख्य अधिकारी यांनी संबंधित कर्मचा–याविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक असते. तरी सुध्दा संबंधित कर्मचारी यांचेकडून अर्ज सादर झालेला नसला तरी अधिनियमाच्या कलम 5 (4) व (5) प्रमाणे त्यास जन माहिती अधिकारी समजणे संयुक्तीक राहिल. व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे.

4. अपीलकर्ता यांनी पुन्हा वेगळा अर्ज करुन मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती ही मुंबई येथील कार्यालयास मागितलेली होती व त्यामुळे त्यांना राज्य माहिती आयोगाचे मुंबई येथील कार्यालयातील आदेशाप्रमाणे ती धोरणात्मक माहिती असल्यामुळे मिळालेली आहे ही बाब अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणल्यानंतर मान्य केलेली आहे. यावरुन त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मात्र त्यांच्या दि. 4.12.2008 च्या अर्जाच्या संदर्भात मुद्या क्र. 3,4,5 ची माहिती दाखलच करुन घेतली नसल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 4.12.2008 च्या अर्जातील मुद्या क्र. 3,4,5 च्या संदर्भात ज्या शाखेतील कर्मचा–यानी जन माहिती अधिकारी यांचेकडे सदर अर्ज सादर केलेला नसल्यामुळे त्या कर्मचा–यास अधिनियमाचे कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजुन त्यांचे विरुध्द रु. 5000/– ची शास्ती अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही मुख्य अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांनी करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 272/2009 व अपील कमांक 273/2009.**

**<u>अपील कमांक 272/2009</u>**

श्री जावेद अली जुल्फेकार अली
नातीक चौक, सर्कल नं. 1
भालदारपूरा नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण विभाग
नागपूर विभाग नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव
बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळ
एच बी टी कॉलेज आर्टस ॲन्ड कॉमर्स
न्यु सुभेदार लेआऊट हुसेनबाबा दर्गा समोन
नगपूर ..... **उत्तरवादी**

**<u>अपील कमांक 273/2009</u>**

1) श्री संजय गाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय समाज कल्याण अधिकारी
नागपूर विभाग नागपूर
2) श्री सुनिल वारे
जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा समाज कल्याण अधिकारी
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली



आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता

हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळ हे हजर नाहीत.

2. अपील क्र. 272/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 3.12.2008 रोजी आर. एम. खान नायडू यांचेकडे 1993 ते 1998 या कालावधीतील कॉलेज इन्स्टीटयूट ऑफ सोशल वर्क विषयी कॉलेज ट्रन्स्फर डीड, हाजरी रजीस्टर, पगार रजीस्टर, एल ई सी रिपोर्ट, टी सी बुक हे व्यक्तिशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील अपीलकर्ता यांनी समाज कल्याण अधिकारी नागपूर विभाग नागपूर यांचेकडे दाखल केलेले आहे. व त्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी हजर नाहीत. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की कॉलेज इन्स्टीटयूट ऑफ सोशल वर्क हे बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळाकडून हस्तांतर झालेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये ते स्वतः प्रथम अपीलीय अधिकारी नाहीत व त्यामुळे सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नाही. असे असले तरी माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की माहिती ही महाविद्यालयाच्या अखत्यारीतील आहे व त्यामुळे बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळाकडे माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी हे आदेश करु शकत नाही. तरीसुध्दा सदरची माहिती ही सन 1993 ते 1998 या कालावधीतील असल्यामुळे व त्यावेळेस संबंधित महाविद्यालय हे बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळाकडेच असल्यामुळे जन माहिती अधिकारी हे त्या संस्थेचे सचिव आहे व प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा समाज कल्याण अधिकारी आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे ते दोषी आढळुन येतात. जन माहिती अधिकारी आज हजर नाहीत. व आर. एम. खान नायडू हे सुध्दा संस्थेत आज नाहीत असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 273/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2008 रोजी समाज कल्याण अधिकारी तथा माहिती अधिकारी यांचेकडे कामावरुन कमी झालेल्या अन्यायाबाबत न्याय मिळणेबाबत. 1993 पासून पुढील संपुर्ण रेकॉर्ड मिळणेबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.1.2009 रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी नागपूर यांनी प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय नागपूर यांचेकडे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठीचा अर्ज हस्तांतर केलेला दिसून येतो. तसेच अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे माहिती मागावी असेही कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी संबंधित संस्थेकडे माहिती मागितली होती परंतु मिळाली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांना दि. 20.1.2009 रोजी दोन पत्रे दिली व त्यानंतरही कार्यवाही झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2009 रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे पुन्हा पत्र दिलेले दिसून येते. व त्यापुर्वी दि. 27.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल

केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.3.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी अर्जदाराने मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांचे कार्यालयातील उपलब्ध सर्व रेकॉर्ड अपीलार्थीस पाहणी करणे संबंधाने उपलब्ध करुन द्यावा व अपीलार्थी यांनी उपलब्ध असलेल्या रेकॉर्ड वरुन मागणी केलेली माहिती तात्काळ उपलब्ध करुन द्यावी तसेच अपीलार्थी यांनी त्यांचे कार्यालयात जावून माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 4.4.2009 रोजी कागदपत्रे तपासणीसाठी कार्यालयात हजर होतो मात्र रेकॉर्ड उपलब्ध होत नाही व उपलब्ध झाल्यावर बोलावून घेण्यात येईल असे आक्षेप घतेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

5. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहितीच मुळात संस्थेकडील असल्यामुळे सदरची माहिती ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नाही. तरी सुध्दा सदरचे कार्यालयातून कागदपत्रे तपासून माहिती उपलब्ध करुन घेण्याबद्यल आदेश दिलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी सुध्दा प्राचार्य पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबद्यल पत्र दिलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कार्यवाही करण्यात आलेली आहे व उपलब्ध असलेली कागदपत्रे सुध्दा उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 272/2009 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून सचिव बाबुरावजी काळे शिक्षण प्रसारक मंडळ यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून अर्ज केलेला असल्यामुळे व त्या अर्जाची कोणतीही दखल घेतली गेली नसल्यामुळे व आयोगापुढे सुध्दा जन माहिती अधिकारी तथा सचिव हे हजर झाले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा व तसे न केल्यास त्यांचेविरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरची शास्तीची वसुली ही विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी करावयाची आहे.

2) अपील क्र. 272/2009 मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 270/2009.

श्री वसंता वामनराव डोये
प्लॉट नं. 2 चिटणीस नगर
एच पी गॅस गोडावून जवळ
ताजबाग नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. धर्मदाय आयुक्त
धर्मदाय आयुक्त कार्यालय
नागपूर विभाग नागपूर
2) श्री आनंदराव रघुनाथ धेटे
जन माहिती अधिकारी तथा
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी धर्मदाय आयुक्त कार्यालय यांचेकडे सन 2.9.1997 ते 2008 पर्यंत श्री विठठल मंदीर देवस्थान धापली (डाये) रजि.नं.483 एन डब्लू पी नं. 1314/97 या केस मध्ये दिलेल्या स्थगिती आदेश 2.9.1997 नुसार. एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 22.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 26.2.2009 रोजी देण्यात आलेला असून 30 दिवसाचे आंत माहिती अधिकारी यांनी निरीक्षक श्री धांडे यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी असा आदेश देवून अपील निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 26.3.2009 रोजी निरीक्षक यांनी दिलेली माहिती अपीलकर्ता यांना यांना देवून अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे आदेश दिलेले दिसून येते. व त्यामुळेच राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. सदरच्या प्रकरणातील दाखल केलेली कागदपत्रे व त्यावरील आदेश व त्यावरील झालेली कार्यवाहीचे अवलोकन केले असता सहा. धर्मदाय आयुक्त धर्मदाय आयुक्त कार्यालय नागपूर हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीच्या बाबत गंभीर आहेत असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झाली ती अपुर्ण आहे. व त्यांचे माहितीच्या अर्जाची दखलच सुध्दा घेतली नव्हती. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जो आदेश केलेला आहे तो सहज जाता जाता केलेला दिसून येतो. व तो खरोखरच अपीलीय अधिकारी यांनी केलेला आहे याबाबत शंका घेण्यास जागा आहे. त्यात कोणत्याही प्रकारे अधिनियमाच्या तरतुदीचे पालन केलेले नाही व यावरुन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास गंभीर नाही असाच निष्कर्ष काढावा लागतो. सुरुवातीला जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती ही संस्थेतील माहिती आहे व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. मात्र त्यानंतर सदरच्या संस्थेबाबत प्रशासक होता. याचा अर्थ संपूर्ण माहिती ही जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते असा त्याचा अर्थ होतो. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावरुन उलट सुलट उत्तरे आयोगापुढे दिली जातात हे निष्पन्न होते. व त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा संबंधित निरीक्षक किंवा प्रशासक हे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करीता होते असा निष्कर्ष काढण्यात येवून ते दोषी आहेत असे दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 18.12.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांच्या एकुण 9 मुद्यांवरील संपूर्ण माहिती हा निर्णय मिळाल्यापासून छायांकीत प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी किंवा प्रशासक किंवा निरीक्षक यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा प्रशासक असुन सुध्दा संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे दोषी आढळुन येतात. त्यामुळे त्यांचेविरुध्द विभागीय चौकशीची शिफारस करण्यात येते. सदरची विभागीय चौकशी ही **उपधर्मदाय आयुक्त धर्मदाय आयुक्त कार्यालय नागपूर विभाग नागपूर** यांनी करावयाची आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **धर्मदाय आयुक्त महाराष्ट्र राज्य धर्मदाय आयुक्त भवन वरळी मुंबई** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 283/2009.**

श्री यु. एस. नामदेव
7 कमल केशव प्लाझा सेंट्रल बाजार रोड
रामदास पेठ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद नागपूर
3) श्रीमती प्रिया चव्हाण
मुख्याध्यापिका
गार्डीनर हायस्कूल
सिव्हील लाईन नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे गार्डीनर हायस्कूल सिव्हील लाईन या शाळेच्या संदर्भात एकुण 11 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 11.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी कार्यालय शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी तीन मुद्याच्या संदर्भामध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. व मुद्या क्र. 1,2,3,4,9,10,11 ही शाळे संदर्भातील असल्यामुळे अर्ज मुख्याध्यापकास पाठविण्यात येत आहे तसेच मंजुर केलेल्या संच मान्यतेच्या प्रती प्राप्त करण्याकरीता रु. 8 चा भरणा करावा. क्रमांक 7 व 8 अन्वये आपण मागविलेली माहिती अचूक व निश्चित स्वरुपाची नाही असे कळविलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रतिलिपी मुख्याध्यापिका गार्डीनर हायस्कूल सिव्हील लाईन नागपूर यांना अग्रेषित

केलेली दिसून येते. पुन्हा दि. 12.3.2009 रोजी अपीलकर्ता यांना अतिरिक्त खर्चाचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र शाळेच्या प्राचार्य यांच्या कडून माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 13.3.2009 रोजी प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.3.2009 रोजी झालेला असून मुख्याध्यापिका यांना पत्र दिलेले असून सुनावणीच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी मुख्याध्यापकास संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. ते अपीलकर्ता यांनी मान्य केले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन न देता कागदपत्राचा संचा हा दिलेला आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांच्या एकुण 11 मुद्यांपैकी बहुतांश मुद्ये हे सार्वजनिक व्यापक हिताच्या संबंधात नाही व मोघम आहे. अपीलकर्ता हे एका वर्तमान पत्राचे संपादक आहे व त्यामुळे निश्चित अशी त्यांनी माहिती मागितलेली नसून मोघम माहिती मागितलेली आहे. तसेच माहिती ही संस्थेकडे उपलब्ध असतांना ती शिक्षणाधिकारी यांचेकडे मागणे हे सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदीचे पालन करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना सुध्दा अधिनियमाच्या तरतुदी लागू आहेत व त्यामुळे त्यांनी कशाही प्रकारे अर्ज केला तर चालू शकते असा त्यांचा समज असल्यास तो त्यांनी काढून टाकावा. माहिती अचून व निश्चित वर्णन करुन करणे हे अर्जदाराचे कर्तव्य आहे व त्याचे पालन हे अपीलकर्ता यांनी केलेले नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती ही पत्रासोबत मुद्येनिहाय उपलब्ध करुन आवश्यक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली माहितीची कागदपत्रे त्यांनी प्राचार्य यांचेकडून घेवून जावून त्याबाबत प्राचार्य यांनी मुद्येनिहाय पत्राच्या स्वरुपात कागदपत्रे सहपत्र म्हणून द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 286 / 2009.**

श्री विकास गणपतराव शेंडे
नागरी बॅक कॉलनी राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या मागे
हिंदनगर वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. व्ही. ठाकरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
नोंदणी उपनिरीक्षक व मुद्रांक उपनिबंधक
नागपूर विभाग नागपूर
जुनघरे निवास प्लॉट नं. 90
शिवाजी नगर शंकरनगर चौक नागपूर
2) श्री अ. रा. अठारी
जन माहिती अधिकारी तथा
सह. जिल्हा निबंधक वर्ग 1 (उच्च श्रेणी)
नागपूर विभाग नागपूर
जुनघरे निवास प्लॉट नं. 90
शिवाजी नगर शंकरनगर चौक नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी (जिल्हाधिकारी) (मुद्रांक) दुय्यम निबंधक यांचेकडे म्हाडाचे स्कीमबद्यल पूर्नविक्री, मुद्रांक कायदा नियम याबद्यल एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि.11.12.2008 रोजी त्या कार्यालयाशी संबंधित मुद्या क्र. 1,2, व 9 ची माहिती अर्जदारास पुरविण्यात आलेली आहे. उर्वरीत मुद्या क्र. 3,4,5, व 8 ची माहिती म्हाडा कार्यालयाशी संबंधित असल्याने त्यांचेकडून प्राप्त करण्यात कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 15.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.1.2009 रोजी होवून दिनांक

5.2.2009 रोजी मुद्या क्र. 3 ते 8 जरी दुस–या विभागाशी संबंधित असला तरी राज्य जन माहिती अधिकारी यांनी संबंधित विभागाकडून सदरची माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. तसेच मुद्या क्र. 9 हा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे माहिती देणे क्रमप्राप्त नाही व त्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात आलेले असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दि. 4.7.2009 रोजी मुख्य अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे माहिती प्राप्त करण्याकरीता स्मरणपत्र दिलेले दिसून येते. त्याबाबतचे पत्र दि. 18.3.2009 रोजी सुध्दा देण्यात आलेले होते. त्याआधी दिनांक 24.2.2009 रोजी सुध्दा पत्र दिलेले आहे व त्याआधी दि. 11.2.2009 रोजी पत्र दिलेले आहे व तरी सुध्दा म्हाडा कार्यालयाने जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु पुन्हा त्यांनी म्हाडा अधिकारी यांचेशी प्रत्यक्ष चर्चा केलेली आहे व ती उपलब्ध करुन देण्यास म्हाडा अधिकारी यांनी मान्य केलेले आहे असे त्यांनी आयोगास सांगितले. यावरुन एक बाब स्पष्ट होते की अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाशी संबंधित नसलेली माहिती सुध्दा एका अर्जात मागितलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होत आहे असे दिसून येते. व तसे जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पुर्वी सुध्दा कळविलेले होते. तरीही अपीलकर्ता यांनी प्रथम अपील व द्वितीय अपीलात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी असा आग्रह केलेला असल्यामुळे म्हाडा कार्यालयातून माहिती उपलब्ध झाल्यावर त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी म्हाडा कार्यालयातून माहिती उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 285/2009.**

श्री प्रभाकर निळकंठराव घाटे
एस.टी.डेपोजवळ वार्ड नं. 30
रामनगर वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. पी. गीते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह. जिल्हा निबंधक वर्ग 1 (उच्च श्रेणी)
नागपूर विभाग नागपूर
2) श्री व्ही. टी. शिंगाणे
जन माहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक श्रेणी 1
दुय्यम निबंधक कार्यालय उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी दुय्यम निबंधक श्रेणी 1 यांचेकडे श्री अजाबरा बाबुराव कोल्हे व रामभाऊ बाबुराव कोल्हे रा. सावंगी ता. उमरेड जि. नागपूर सर्व्हे क्र. 33 ची जमीन विक्री बाबत संपूर्ण माहिती मिळण्याबाबत. विक्रीच्या कालावधीपासून क्षेत्र हे.आर.चौ.मि. 1,20.00 व त्याबाबत एकुण 13 मुद्यांवर मुद्ये उपस्थित करुन माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.9.2008 रोजी अपीलकर्ता यांना सर्व्हे क्र. 33 ची विक्री बाबतची माहिती मागितली असता आपण त्या दस्ताचा अनुक्रमांक वर्ष लिहिलेला नाही. तरी त्याकरीता शोध घेण्याची प्रोव्हीजन असल्यामुळे शोध घ्यावे व त्या नंतर अपणाला दस्त क्रमांक मिळाल्यानंतर त्याची सत्यप्रती ची फी भरल्यानंतर आपणाला सत्यप्रत देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना यु पी सी ने पाठविलेले होते परंतु पत्र परत आलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि.

10.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दि. 20.10.2009 रोजी उपविभागीय उमरेड यांनी सह. जिल्हा निबंधक मुद्रांक जिल्हा कार्यालय नागपूर यांचेकडे सदरचे अपील हस्तांतर केलेले आहे. त्याप्रमाणे दि. 10.12.2008 रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दि. 16.12.2008 रोजी देण्यात आलेला असून त्यामध्ये अर्जदारानी मागितलेल्या माहितीबाबत योग्य उत्तर न दिल्यामुळे त्यांनी अपीलामध्ये येणे भाग पडले. अपील कर्त्यानी दस्त नोंदणीचा संदर्भ माहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक उमरेड यांना उपलब्ध करुन देण्यात यावा. अपीलकर्ता यांनी दिलेल्या दस्त नोंदणीच्या संदर्भानुसार दस्ताचा शोध दुय्यम निबंधक उमरेड यांनी घ्यावा व दस्त व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्राचे आधारे अपीलकर्त्यास नोंदणी नियमाच्या तरतुदीनुसार माहिती द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दि. 29.12.2008 रोजी अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या 13 मुद्यांवरील माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु दस्ताच्या प्रती देण्यासाठी नोंदणी अधिनियम 1908 चे नोंदणी फी तक्त्यानुसार विहित फी रु. 20 प्रती पृष्ठ भरण्याची विनंती केली. सदर पत्र त्यांना रजिस्टर पोस्टाने पाठविले व दि. 5.1.2009 रोजी त्यांना ते प्राप्त झाले. त्याबद्यलची पोच दाखल केलेली आहे. मात्र फी चा भरणा न करता मा. राज्य माहिती आयोगाकडे अर्जदाराने दुसरे अपील दाखल केलेले आहे. त्यामध्ये माहिती न देता 13 पानी दस्तऐवजाबद्यल 20 रु. प्रमाणे 260/— रु. भरल्यास दस्ताची प्रत देण्यात येईल असे कळविले. माहितीच्या अधिकार कायद्या अंतर्गत प्रत्येक पानास रु. 2 प्रमाणे मागणी करावयास हवी परंतु त्यांनी अकायदेशीर रकमेची मागणी केली. माहिती अधिका—याने परिशिष्ट 1 ते 13 मुद्याची कोणतीच माहिती दिलेली नाही असे नमूद केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 1.9.2008 रोजी त्यांनी अर्जात दिलेल्या पत्त्यावरच पत्र पाठविलेले होते. परंतू सदरचे पत्र परत आलेले आहे. व त्याची झेरॉक्स प्रत सादर केलेली आहे. मात्र हा मुद्या प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये घेतलेला दिसून येत नाही. राज्य माहिती आयोगाकडे खुलासा करतांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 1.9.2008 च्या पत्राचा उल्लेख केलेला आहे. तसेच दि. 2.12.2008 रोजी दुय्यम निबंधक यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना दि. 1.9.2008 रोजी पत्र पाठविले आहे. परंतु ते परत आले असे कळविले होते. त्याही बाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णयामध्ये उल्लेख केलेला नाही. व जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही अशा प्रकारचा निष्कर्ष काढलेला आहे तो सर्वस्वी चुकीचा आहे. अपीलकर्ता यांना दि. 29.12.2008 रोजी एकुण 13 मुद्यांवर उत्तर दिलेले आहे. परंतु दस्तऐवजाच्या संदर्भामध्ये नियमानुसार फी भरावी असा प्रथम अपीलाचा निर्णय कळविलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेले आहे. परंतु महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम 2005 चा नियम 4 प्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या फी च्या संदर्भात दोन प्रकार दिलेले आहेत. ते खालील प्रमाणे —

"(A) (a) When the concerned Department has already fixed the price of some documents, maps etc. The price so fixed plus postal charges.

(b) When the information is readily available either by way of photocopying or by other way rupees two for each page" अशी तरतुद आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी दस्ताच्या संदर्भामध्ये फी भरण्यास कळविलेले आहे ते नियमानुसार आहे. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 29.12.2008 रोजी दस्ताच्या संदर्भामध्ये मागितलेली फी ही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.8.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 281 / 2009.**

श्री प्रफुल्ल विनोदराव गुडधे
मु. पो. जयताळा
नागपूर 440016 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति.जिल्हाधिकारी नागपूर
2) श्री प्रकाश पाटील
जन माहिती अधिकारी तथा
अपर विशेष भूअर्जन अधिकारी
पेच प्रकल्प नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अपर विशेष भूअर्जन अधिकारी पेच प्रकल्प यांचेकडे मा. भूअर्जन अधिकारी यांनी तयार केले प्रारुप निवाडयाची प्रत. 2. मा. आयुक्त नागपूर विभाग यांनी सदर प्रारुप निवाडयात काय काय फेरबदल केले 3. सदर प्रारुप निवाडयात शासन स्तरावर काय काय फेरबदल करण्यात आले. 4. निवाडा मंजूरीची नस्ती. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.12.2008 रोजी एकुण 4 मुद्यांवर उत्तर देण्यात आलेली दिसून येते. मिळालेल्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 12.2.2009 रोजी देण्यात आलेला असून अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून मुद्या क्र. 1 ची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी व मुद्या क्र. 2,3,4 बाबत ची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत वरीष्ठ स्तरावर विचारणा करण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना प्रारुप निवाडयाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व उर्वरीत मुद्याची माहिती दि.

17.2.2009 रोजी मा. आयुक्त नागपूर विभाग व मा. प्रधान सचिव महसुल व वन विभाग यांना विचारणा करण्यात आलेली दिसून येते. त्यानंतर दि. 29.9.2009 रोजी वरीष्ठांनी स्मरणपत्रे दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि. 30.3.2009 रोजी आयुक्त नागपूर विभाग यांनी जिल्हाधिकारी नागपूर यांना पुन्हा मुद्या क्र. 2,3,4 च्या संदर्भामध्ये मुद्दे उपस्थित केलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दि. 8.4.2009 रोजी सहा. संचालक नगर रचना तथा अवर सचिव महसुल व वन विभाग यांनी अपर विशेष भूअर्जन अधिकारी यांना विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेवून कळविलेले दिसून येतात. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 25.5.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व आज अपीलकर्ता हे हजर नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना दि. 27.5.2009 रोजी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 284/2009.**

श्री निशिकांत दत्तात्रय धोंडसे
प्लॉट नं. 130 रतननगर गाडगे बाबा लेआऊट
दिघोरी, कळमना रिंग रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुर्यकांत आंबाडेकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ नागपूर
विभागीय कार्यालय रेल्वे स्टेशन जवळ नागपूर

2) श्री अरुण बसोले
जन माहिती अधिकारी तथा कर्मचारी वर्ग अधिकारी
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ नागपूर
विभागीय कार्यालय रेल्वे स्टेशन जवळ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी कर्मचारी वर्ग 1 (आस्थापनाा) यांचेकडे वाहतुक नियंत्रक परीक्षेच्या निकालाबाबत इतर माहिती सहपत्रावर मागत आहे. सहपत्रामध्ये एकुण सहा मुद्दे उपस्थित केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.2.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 9.3.2009 रोजी देण्यात आलेला असून दिसून येतो. त्यात 6 मुद्यापैकी मुद्या क्र. 1 ते 4 बाबत अपीलकाराचे समाधान झालेले आहे. मुद्या क्र. 5 बाबत माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती योग्य आहे. मुद्या क्र.6 चे संदर्भात सुस्पष्ट तपशिल अर्जदार सांगू शकत नसल्याने मुद्याचे योग्य स्पष्टीकरण होत नाही. तरीही त्याबाबतची आदेशाची प्रत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलात माहिती दिशाभूल करणारी चुकीची असतांना माहिती अधिकारी कर्मचारी वर्ग 1 यांची बाजू घेवून अपील खारीज केले असे कारण दिलेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या संदर्भात त्यांनी अपील मेमोमध्ये कारण दिलेले आहे. व त्यामध्ये वाहतुक नियंत्रक परिक्षेमध्ये एन टी बी या प्रवर्गातील जागा रिक्त नसतांना 8 वाहकांना नियमबाहय परीक्षेस बसविले हे खरे आहे किंवा नाही त्याबाबतची माहिती. तसेच जी यादी दिली आहे त्या यादी मध्ये कोणकोणत्या प्रवर्गात आहे याची माहिती नमुद नव्हती. एन टी बी चे जे वाहक बढती परीक्षेला बसविले होते त्या प्रमाणे 3 वाहक पास झाले तेव्हा त्याला पोस्टींग कोणत्या प्रवर्गात देणार कारण त्या प्रवर्गात आधीच वाहतुक नियंत्रक जास्त आहे अशा प्रकारे प्रकरणातून गुणवत्तेच्या बाबत प्रश्न उपस्थित केले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता हे परीक्षेच्या निकालाच्या संदर्भामध्ये गुणवत्तेच्या संदर्भात माहिती मागत आहे. परंतु तशी माहिती आज उपलब्ध करुन देता येणार नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही जशी आहे तशी कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देता येते. कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय अपेक्षित नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिलेली माहिती ही परीपुर्ण आहे व जशी आहे तशी दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली. अपीलकर्ता यांनी केलेला युक्तीवाद व जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती याबाबतचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 296 / 2009.**

श्री दिलीप विनायक दोडके स.शि.
किसान विद्यालय आष्टा
ता. भद्रावती जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्रीमती एम. व्ही. कुमरे
जन माहिती अधिकारी तथा
माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे त्यांच्या दि.15.11.2008 च्या अर्जा संदर्भात झालेली कार्यवाही तसेच सहपत्रामध्ये दि. 3.7.2000 ते 24.8.2000 पर्यंतच्या परावर्तीत रजा मंजूर करुन वेतन काढण्याबाबत. 2. जादा कपात केलेले वेतन अदा करण्याबाबत. 3. वरिष्ठ वेतन श्रेणी मंजुर करण्याबाबत 4. दि. 14.12.2002 ला कामावर हजर असतांना एल डब्लू पी करुन कपात केलेले वेतन काढण्याबाबत. 5. मुख्याध्यापक पगाराच्या अडीच टक्के रक्कम सक्तीने वसुल करतात याबाबत चौकशी करण्याबाबत. तसेच आडीट रिपोर्ट वगैरेची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 5.1.2009 रोजी मुख्याध्यापक किसान विद्यालय आष्टा या पत्राची प्रतिलिपी दिलेली आहे त्यामध्ये मागितलेली माहिती त्यांच्या विद्यालयाच्या संबंधात आहे असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे मुख्याध्यापक किसान विद्यालय आष्टा यांनी दि. 3.2.2009 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांना उत्तर दिलेले आहे. त्या उत्तराची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. तसेच गट शिक्षणाधिकारी पं. स. भद्रावती यांना मुख्याध्यापक हे विद्यालयातील कर्मचा—याकडून बळजबरीने पैसे वसुल करीत असल्याबाबतच्या तक्रारी नुसार आपण चौकशी करुन चौकशी अहवाल या

कार्यालयास तात्काळ सादर करावे. त्याबद्यलची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरच सर्व चौकशी सुरु झालेली आहे असे दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना सर्व माहिती उपलब्ध झालेली होती तरीसुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी केलेल्या तक्रारीबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही परंतु जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की सदरची चौकशी सुरु आहे. त्यावरुन अपीलकर्ता यांनी असे सांगितले की आतापर्यंत चौकशी संपलेली नाही व त्याबाबत त्यांना माहिती हवी आहे. तसेच अपीलकर्ता यांनी तक्रार अर्ज हा शिक्षणाधिकारी यांचेकडे दिला तसेच शाळा स्तरावरील माहिती मागितलेली असल्यामुळे सदरचा अर्ज हा शाळेकडे पाठविण्यात आलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना ऑडिट रिपोर्टची प्रत मिळालेली नाही परंतु त्यांना शाळेकडून ऑडिट रिपोर्ट उपलब्ध नाही असे कळविण्यात आलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती मिळालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु अपीलकर्ता यांची कार्यवाही करण्याची अपेक्षा दिसून येते ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे करता येत नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 292/2009.**

श्री सुधाकर रामचंद्र मोकदम
प्लॉट नं. 3 जीवनसाफल्य सोसायटी
श्रामनगर चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आगवणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक
भूमी अभिलेख नागपूर
2) श्री राहुल पाटील
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख नागपूर (ग्रामीण)
धरमपेठ एक्स्टेन्शन गोकुलपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता उशिरा हजर झाले. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख नागपूर (ग्रामीण) यांचेकडे गाव नमुना नकाशा, वहिवाट नकाशा. 1/1 ते 1 आणि क प्रत मिळण्यासाठी. सन 1998 ते 2008. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 24.11.2008 रोजी आपण सादर केलेल्या अर्जात मोजणी विषयी काहीच माहिती सादर केलेली नाही. मोजणी करीता कुणी अर्ज सादर केला व मोजणी कोणत्या वर्षात व दिनांकास झाली याचा उल्लेख केलेला नसल्याने आपणास सदरची माहिती पुरविण्यास अडचण निर्माण झालेली आहे. करीता आपण या कार्यालयाशी संपर्क साधावा जेणेकरुन आपणास योग्य माहिती पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे दि. 29.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल

केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.2.2009 रोजी देण्यात आलेला असून अपील अंशतः मान्य करण्यात आलेले आहे. गाव नकाशाची प्रत दि. 24.2.2009 रोजी देण्यात आलेली आहे. स.नं. 1 ची 1 ते 7 हिश्शांची मोजणी किंवा सुनावणी वेळी दाखविलेल्या अनधिकृत अभिन्यासाची मोजणी फी न भरल्याने झाली नाही. त्यामुळे 'क' प्रत देता येणार नाही. व निर्णय संबंधितास कळवावे असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना निर्णय न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी आयोगास असे सांगितले की त्यांना प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत मिळालेली नाही परंतु ते प्रथम अपीलाच्या सुनावणी हजर होते. त्यामुळे त्यांना संपूर्ण सुनावणीमध्ये वस्तुस्थितीची जाणीव करुन देण्यात आलेली आहे तसेच त्यांना नकाशाची प्रत सुध्दा देण्यात आलेली आहे. मात्र 'क' प्रत त्यांना मिळणे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय स्वयंस्पष्ट असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाची प्रत ही अपीलकर्ता यांना पुन्हा त्यांच्या पत्त्यावर पोष्टाने पाठविण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 291/2009.

श्री प्रफुल्ल केवळरामजी मस्के
के.ऑफ ठोंबरे विश्वकर्मा नगर गल्ली नं. 11
नागपूर 440027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय
उमरेड रोड नरसाळा नागपूर 34
2) डॉ. पी. वाय थोटे
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय
उमरेड रोड नरसाळा नागपूर 34 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.12.2008 रोजी संचालक प्राचार्य माहिती अधिकारी पुरुषोत्तम थोटे समाजकार्य महाविद्यालय यांचेकडे सदर संस्थेमध्ये शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत व नवनियुक्त कर्मचा–यांची यादी सन 21.8.2007 ते 2008. सन 21.8.97 ते 2008 पासुन मि संस्थेमध्ये कार्यरत असेपर्यंत मस्टर बुक हजेरी बुक सत्यप्रत. सदर भेटीचे वेळी कमिटीने केलेले रिमार्क नुसार सदर संस्थेने मला दिलेले कारणे दाखवा पत्र तसेच आपले कार्यालयात सादर केलेले वरील प्रमाणे सत्र 21.8.97 ते 2008 कामावरुन कमी करुन झालेल्या अन्यायाबाबत न्याय मिळणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः तसेच रजिस्टर पोष्टाने घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 23.6.2009 रोजी कोणतीही माहिती महाविद्यालयात उपलब्ध नाही तसेच आपले सोबत महाविद्यालयाने कधिही कोणताही कार्यालयीन पत्रव्यवहार केलेला नाही. आपला मुद्या क्र. 1 सदर संस्थेमध्ये शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत व नवनियुक्त कर्मचा–यांची यादी खुलासा सोबत मागणी प्रमाण यादी जोडली आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नव्हती म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले होते.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे त्यामध्ये त्यांचे नाव नाही. परंतु ते संस्थेमध्ये कार्यरत होते त्याबद्यल त्यांना कारणे दाखवा नोटिस दिली आहे परंतु नोटिसीची प्रत दाखविली. परंतु सदरच्या नोटिसीवर प्राचार्य थोटे यांची सही मराठीत आहे. व प्राचार्य थोटे यांनी अपीलकर्ता यांना दिलेल्या पत्रावर इंग्रजीत सही केलेली आहे. तसेच प्राचार्याची सही व शिक्का अतिशय खाली दिलेला आहे. त्यावर प्राचार्य यांनी असे सांगितले की अशा प्रकारची नोटिस त्यांना देण्यात आलेली नव्हती कारण ते कार्यरत नाही. असे असल्यास अपीलकर्ता यांनी न्यायालयात जावून न्याय करवून घेणे हे संयुक्तिक राहिल. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 293 / 2009.**

श्री नामदेव दशरथ कोंगरे
ह. मु. पो. गडचांदूर वार्ड नं. 5
मंद्रे लेआऊट श्री मेश्राम गुरुजी यांचे घरी
ता. कोरपना जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. अंबेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
निरीक्षक भूमी अभिलेख अमरावती
प्रदेश अमरावती
2) श्री आर. ए. परकर
जन माहिती अधिकारी तथा
कार्यालय अधिक्षक
उपसंचालक भूमी अभिलेख कार्यालय
अमरावती प्रदेश अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक यांचेकडे भू एकत्रिकरणाच्या शासन निर्णयाची प्रत इत्यादी सन 1980 ते 1984 ची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.1.2009 रोजी नमुन्याची पुस्तिका तयार असून त्याचे प्रकाशन झालेले आहे. आपण मागणी केलेली माहिती आपणास पुरविण्यास उक्त कायद्यातील तरतूदीनुसार प्रकाशन संस्थांना बाधा पोहचत असल्याने सदरची माहिती आपणास पुरविणे शक्य नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 12.2.2009 रोजी दिलेला असून सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीमध्ये जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जे खुलासो दाखल केलेले आहे ते स्वयंस्पष्ट आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दि. 12.2.2009 रोजीचा प्रथम अपीलाचा निर्णयसुध्दा स्वयंस्पष्ट आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 298/2009.**

श्री राजु किसन वानखेडे
श्रीराम वार्ड बल्लारपूर
ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. डी. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री डेकाटे
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक
प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे कु. किशोरी दिवाकर पुराणिक मुध्याध्यापिका यांच्या दि. 16.11.2007 च्या पत्रावर कार्यवाही मागितलेला दिसून येतो. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 5.2.2009 रोजी मागितलेल्या माहितीबाबत कार्यालयीन दस्तऐवजाची तपासणी केली असता संबंधित पत्रावर कार्यालयाने कोणती कार्यवाही केली याबाबतचा दस्तऐवज आढळुन आलेला नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर दि. 21.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. त्यावर दि. 26.6.2009 रोजी दि. 5.2.2009 अन्वये पुरविलेली माहिती पुरेशी आहे असे कळविलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झालेली नाही अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 310/2009.**

श्रीमती वनिता विश्वानाथजी वरकडे
मु. पो. पालडोंगरी
ता. मोहाडी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा परिषद भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.10.2008 रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे दि. 9.7.2008 ला झालेल्या कनिष्ठ सहा. (लिपीक) पदाची मुलाखत. मुलाखतीला 3 महिने 5 दि. कालावधी झालेला असून पराते सुनंदा दिवारु यांच्या जातीचे जात पडताळणी केलेले वैधता प्रमाणपत्र अजुनपर्यंत प्राप्त झाले नाही देण्यात यावे. अन्यथा वरकडे वनिता विश्वानाथजी यास मेरिट लिस्ट प्रमाणे नियुक्ती आदेश देण्यात यावे. सदरची माहिती व्यक्तिशः पाहिजे आहे असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.11.2008 रोजी जिल्हा निवड समिती मार्फत कनिष्ठ सहा. पदाकरीता 4 उमेदवाराची निवड केलेली आहे. त्यात आपले नावाचा समावेश नाही. आपली निवड जिल्हा निवड समितीकडून झालेली नसल्याने नियुक्ती आदेशाबाबत मत व्यक्त करणे माहितीच्या अधिकारात अभिप्रत नसल्याने सदर माहिती आपणास देता येत नाही अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.12.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात आलेले असून अपीलकर्ता यांना कनिष्ठ सहा. पदाची निवड यादी

4 उमेदवाराची कार्यवृत्त प्रत पाठविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. व यावरुनही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांना नियुक्ती मिळावी असे स्पष्ट अर्जात दिलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांची निवड झालेली असली तरी मेरिट लिस्टमध्ये त्या असल्यामुळे जर उमेदवार हजर झाला नाही तर त्यांना नियुक्ती द्यावी या करीता त्यांनी अर्ज केला आहे. परंतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की कोणत्याही प्रकारची प्रतिक्षा यादी तयार केलेली नाही व त्यांची निवड झालेली नसल्यामुळे तशा प्रकारची नियुक्ती देता येणार नाही. तसेच प्रतिक्षा यादी सुध्दा नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारे नियुक्ती मागता येत नाही. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 306/2009.**

सौ. हंसकला लंकेश्वर जनबंधू
मु. चकारा पो. अडयाळ
ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी
भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
उप प्रादेशिक परिवहन कार्यालय
भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन कार्यालय भंडारा यांचेकडे वाहन क्र. एम एच 34 एल 248 प्रकरणी दि. 11.2.2008 च्या संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियमात आपले पत्र दि.26.2.2008 च्या पत्रानुसार सदर वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र रद्य झाली काय. सामोर चौकशी अंती कोणती प्रक्रिया करण्यात आली. सदर वाहन प्रशिक यांच्या नावाने कोणत्या तारखेस झाली. तसेच याबाबत एम एच 34 एल 248 वाहना संबंधी टी टी ओ फॉर्मची झेरॉक्स प्रत शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 18.9.2008 रोजी सहा. माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल करतांना असे सांगितले की अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीकरीता चार पत्रे दिलेली होती. अपीलकर्ता सुनावणीस हजर झालेले नसल्यामुळे सदरचे अपील प्रलंबित आहे. तसेच अपीलकर्त्याने दि. 14.2.2008 च्या अर्जान्वये हया अगोरसुध्दा माहितीची मागणी केली त्याअनुषंगाने मागणीतील माहिती अपीलार्थीचे संपुर्ण समाधान होईपर्यंत पुरविलेली आहे. इतकेच नव्हेतर कार्यालयात अभिलेखाची तपासणी केलेली आहे. हयामुळे अपीलार्थ्याचे संपुर्ण समाधान कबुलीसुध्दा त्यांनी लेखी दि. 20.6.2008 रोजी दिलेली आहे. असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी तीच मागणी पुन्हा नव्याने मागितलेली आहे. व त्याबाबत सुध्दा दिनांक 18.9.2008 रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा त्यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर राहिले नाहीत. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना टी टी ओ फॉर्मची माहिती मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की टी टी ओ फॉर्म हा प्रत्यक्षात उपलब्ध नसतो. तसेच टी टी ओ फॉर्म तीन वर्षे ठेवण्यात येतो व त्यानंतर नष्ठ करण्यात येतो व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 312/2009 व अपील क्रमांक 313/2009 .**

श्री प्रसन्न मोहनलाल गुप्ता
पाणीच्या टाकीजवळ लाखांदूर रोड
सिव्हील वार्ड, साकोली
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) डॉ. नदीम खान
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 312/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 13.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान शी संबंधीत सन 2008–सन 2009 या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. मा. अभियान संचालक यांचे पत्र क्र. राग्राआअ/पासुविक/क्र.22/पुनर्नियुक्ती 8000–03/08 दि. 29.11.2008 चे पाठविलेले उत्तर पुराव्यासह पाहिजे.

2. राग्राआअ अंतर्गत भरती संबंधाने जाहिरात दि. 28.11.08 नुसार उपअभियंता व कनिष्ठ अभियंता करीता प्राप्त आवेदन अर्जापासुन नियुक्ती आदेशापर्यंत सर्व माहिती पुराव्यासह पाहिजे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दि. 12.2.2009 रोजी दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना योग्य माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येत आहेत व त्यांचेविरुध्द रु. 5000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 313/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 28.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे राष्ट्रीय ग्रामिण आरोग्य अभियान विषयी माहिती सन 2005 ते 2008 या कालावधीतील एकुण 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.1.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 12.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.

5. द्वितीय अपील मेमोमध्ये माहिती अपुर्ण प्राप्त झालेली आहे असे कारण दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना अपुर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे खुलाशावरुन दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद भंडारा हे अकार्यक्षम दिसून येतात जन माहिती अधिकारी यांना माहिती अपुर्ण उपलब्ध करुन देण्याबाबत विचारले असता ते समाधानकारक उत्तर देवू शकले नाही व तसेच शास्ती लादण्याच्या बाबत सुध्दा समाधानकारक उत्तर देवू शकले नाही व त्यामुळे त्यांना सदरच्या अपीलामध्ये अपुर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कारणास्तव रु. 5000/– ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 312/2009 व 313/2009 मध्ये अपीलकर्ता यांचे अनुक्रमे दि. 13.1.2009, दि. 28.11.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मुद्येनिहाय माहिती कागदपत्राच्या स्वरुपात रजिस्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. अपीलकर्ता यांच्या दि. 13.1.2009, दि. 28.11.2008 च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे योग्य ती पुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना प्रत्येक अपीलात रु. 5000/– ची शास्ती अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे लादण्यात येत आहे.

2) सदरच्या शास्तीची वसुली ही **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा** यांनी जन माहिती अधिकारी यांचे दरमहिन्याचे वेतनातून वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद भंडारा** यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 309/2009.**

श्री श्रीधर गजानन रानडे
रा. पो. प्रगती कॉलनी
ता. साकोली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद भंडारा
2) श्री बी. एस. म्हस्के
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
नंदलाल पाटील कापगते विद्यालय
साकोली ता. साकोली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे श्रीमती स्मिता श्रीधर रानडे सह शिक्षीका यांनी गट वर्ष 2001–2004 व गट वर्ष 2005–2008 चे रजा प्रवास सवलत देयकाबद्यल खुलासा प्रस्ताव हवी अशी माहिती दोन मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 22.1.2009 रोजी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी श्रीमती स्मिता श्रीधर रानडे सह शिक्षीका यांचे सन 2001–2004 रजा प्रवास सवलत देयक मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद भंडारा यांनी त्यांचे पत्र क्र. 493 दि. 14.3.2005 आक्षेपासह परत केले. त्याची छायाप्रत श्रीमती रानडे यांच्या मागणी नुसार विद्यालयाचे पत्र क्र. 405/05 दिनांक 14.12.2005 अन्वये देण्यात आली आहे. त्यातच देयक नामंजूरीचे कारण नमूद केले आहे. श्रीमती रानडे सह शिक्षीका यांनी सन 2005–2008 ची रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठीचे पूर्वपरवानगीचे अर्ज माझे कडे निर्धारीत मुदतीपूर्वी देवून परवानगी प्राप्त करुन घेतली नसल्याने देयकावर विचार करता येणार नाही अशी माहिती उपलब्ध

करुन दिली आहे. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.3.2009 रोजी देण्यात आलेला असून प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद भंडाराच्या वतीने तक्रारकर्ता सदर तारखेला गैरहजर असल्यामुळे सदर प्रकरण फाईल करुन निर्णय एकतर्फी देण्यात येत आहे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना मुख्याध्यापक यांनी वेळोवेळी त्यांच्या रजा प्रवास सवलत देयकाच्या संदर्भामध्ये पत्रव्यवहार करण्यात आलेला दिसून येतो व तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात स्पष्टीकरण मागितलेले आहे ती ही माहिती त्यांना योग्यरित्या विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा त्यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना त्या प्रकरणातील संपूर्ण माहिती असुन सुध्दा त्यांनी माहितीच्या अधिकाराचा वापर केलेला आहे. त्यातही अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देवूनही प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले. यावरुन अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवार केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती अगोदरच होती व नंतर सुध्दा उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 325 / 2009.**

श्री आशिष छितरका
तिरुपती ट्रेडर्स, स्टेडियम समोर
गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद गोंदिया
2) श्री सी. एस. झाडे
जन माहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार
नगर परिषद गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया यांचेकडे 2004 आणि 2008 या काळातील बिल्डींग प्लॅनची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.2.2009 रोजी माहितीच्या छायांकित प्रत आपणास रु. 460 / — चा भरणा न. प. फंडात केल्यानंतर देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेला आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे असे अधिनियमाच्या कलम 7 (6) कडे लक्ष वेधून कळविण्यात आलेले आहे. त्यानंतर दि. 2.3.2009 रोजी प्रथम अपील हे दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व अपीलकर्ता यांचेकडून रु. 460 / — चा भरणा चा भरणा करुन घेतलेला असून माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिनियमाच्या कलम 18 (1) प्रमाणे तक्रार दाखल करण्यात आली होती परंतु त्या तक्रारीवर आलेल्या खुलाशावरुन तक्रार खारीज करण्यात आली होती. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी 30

दिवसाचे आंत खर्चाचा भरणा न केल्यामुळे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे रु. 460/- हे परत करणे आवश्यक आहे व माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असल्यामुळे शास्ती लादणे आवश्यक आहे अन्यथा त्यांना प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. वर नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना 30 दिवसाचे आंत खर्चाचा भरणा करण्याचे कळविले नाही हे निश्चित व त्यानंतरही माहिती माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांनी केलेला खर्चाचा भरणा रु. 460/- हा परत करणे आवश्यक राहिल. तसेच जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 1000/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याबद्यल त्यांना विचारणा केली होती. त्यावर त्यांनी असे सांगितले की ते दि. 27.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी आज रुजू झाले व अपीलकर्ता यांचा अर्ज दि. 30.12.2008 ला आलेला आहे व त्यांचेकडू कर्मचारी कमी असल्यामुळे त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द रु. 1000/- ची शास्ती अधिनियमाच्या कलम 20 (1) अन्वये लादण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 323/2009.**

श्री जोगीराम इस्तारी गहाने
मु. ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शक्करवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार अर्जुनी मोर.
जि. गोंदिया
2) जन माहिती अधिकारी तथा
प्रस्तूतकार
तहसिल कार्यालय अर्जुनी मोर.
जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार कार्यालय उपविभागीय अधिकारी गोंदिया यांचेकडे उपविभागीय अधिकारी यांचे मा.क्र. 4/एलएनए22/76.77 मौजा अर्जूनी मोर. या केस मध्ये मधुकर सदाशिव खुने यांना दिलेल्या लिज संबंधी. ही केस रेकॉर्ड रुम गोंदिया येथे दाखल केली आहे असे नमुद करुन एकुण 10 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 3.1.2009 रोजी सहा. जन माहिती अधिकारी उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया यांनी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे सदरचे प्रकरण जिल्हा अभिलेखागारात जमा असल्यामुळे अर्ज त्यांचेकडे हस्तांतर केले व माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविले. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 9.3.2009 रोजी प्रथम अपील हे तहसिलदार अर्जुनी मोर. यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.3.2009 रोजी सदर प्रकरणाची तपासणी केली असती तर आपण मागितलेली माहिती सदर प्रकरणात

उपलब्ध नाही करीता सदर प्रकरणातील माहिती आपणास पुरविता येत नाही. तरी आपण स्वतः प्रकरण पाहुन उपलब्ध असलेली माहिती आपण घेवू शकता असे नमूद केलेले आहे. त्यानंतर पुन्हा दि. 31.3.2009 रोजी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 31.3.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की भाडे करारनामा असून त्या कारणास्तव करार कसा दिला अशी त्यांची विचारणा आहे. परंतु याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे चौकशी करता येत नाही. माहिती जशी कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध आहे तशीच उपलब्ध करुन देता येते. त्याबाबतची कागदपत्रे उपलब्ध नसेल तर त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी योग्य त्या सक्षम अधिका–याकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. परंतु माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व अपीलकर्ता यांना सदरच्या नस्तीची पाहणी करावी असेही कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 246/2009.**

सौ. कुसुम मधुकरराव केचे
मु. अंबिकापुर पो. देलवाही
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद वर्धा
2) श्री प्रभूदास दे. साबळे
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
जवाहर स्मुती विद्यालय देलवाही
ता. आष्टी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक जवाहर स्मुती विद्यालय यांचेकडे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती जेव्हापासून आपल्या विद्यालयात सुरु झाली तेव्हापासून ती शिष्यवृत्ती मिळालेल्या मुलींची नावाची झेरॉक्स प्रत. बॅकेच्या कर्जावर जो कॉम्पूटर खरेदी केला त्या कॉम्पूटरच्या बिलाची प्रत.
सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. तसेच अपीलकर्ता यांनी दि. 3.1.2009 रोजी सुध्दा मुख्याध्यापक यांनीच संस्थेची माहिती मागण्याचा अर्ज केलेला होता. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा करतांना अपीलकर्ता यांचा अर्ज क्र.1 स्वीकारण्यात येवून अर्ज क्र. 2 हा त्यामधील माहिती मुख्याध्यापकाच्या कक्षेत येत असल्यामुळे व संस्थेकडील माहिती असल्यामुळे तसेच अर्जदार हे स्वतः संस्थेचे संस्थापक सदस्य असल्यामुळे त्यांनाच याविषयी माहिती आहे हे गृहीत धरुन परत

करण्यात आले. परंतु परत केलेला अर्ज क्र. 2 पुन्हा रजिष्टर पोष्टाद्वारे दि. 7.2.2009 रोजी प्राप्त झाला या मध्ये आपण संस्थेच्या ज्या पदाधिका–याचे आदेश पाळता, वेतनवाढी ज्यांचे सहीने उचलता त्या संस्थाचालकांची पदासह माहिती हवी आहे ही माहिती नमूद होती. तसेच जवाहर स्मुती विद्यालय देलवाही हे विद्यालय श्री रविंद्र शिक्षण प्रसारक मंडळ देलवाडी या संस्थेअंतर्गत चालविल्या जाते. अर्जदार श्री ना.स. जाने व सौ. कु.म.केचे हे या संस्थेचे संस्थापक सदस्य आहेत. संस्थेमध्ये वाद असून अनेक प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. संस्थेला अधिकृत अध्यक्ष नाही. सचिव म्हणून श्री प्र.आ.केचे कार्यरत आहेत. परंतू श्री ना.स.जाने व सौ. कु.म.केचे हे स्वतः अध्यक्ष व सचिव समजून तुम्ही आमच्या आदेशाप्रमाणे वागा असे दडपण आणतात. त्यांचे आदेशा प्रमाणे काम करणे शक्य नसल्यामुळे त्याचा राग म्हणून त्यांनी माझ्याविषयी अनेक तक्रारी मा. गट शिक्षणाधिकारी, मा. शिक्षणाधिकारी (माध्य.), मा. समाज कल्याण अधिकारी, मा. मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे केल्या आहेत. अर्जदार श्री ना.स.जाने व सौ. कु.म.केचे हे या संस्थेचे संस्थापक सदस्य असतांना व संस्थे विषयी त्यांना पुर्ण माहिती असतांना त्यांनी मला अर्ज करुन संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष कोण आहेत तुम्ही कुणाचे आदेश पाळतात. वगैरे माहिती मागण्याचा उद्येश काय. श्री ना.स.जाने व सौ. कु. म.केचे यांनी आतापर्यंत साध्या कागदावर पत्र देवून अर्ज करुन अनेकदा माहिती मागितली आहे व ती माहिती त्यांना वेळोवेळी विनाविलंब दिली आहे. मग आताच माहितीच्या अधिकारातील अर्ज देण्याची गरज का भासली. माहितीच्या अधिकारातील अर्ज श्री सजय जाने यांचेकडुन प्राप्त झाल्यानंतर व 15 दिवसांनी माहिती घेवून जा असे सांगितल्यानंतर माहिती घेण्याकरीता त्यांनी पाठविले नाही. प्रथम अपील व द्वितीय अपील हे दाखल करतात. परंतु गावातच शाळा असतांना ते माहिती स्वीकारण्याकरीता किंवा साधी चौकशी करण्याकरीता येत नाही. यावरुन अपीलकर्ता अर्जदार हे त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागत आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. यावरुन अपीलकर्ता संस्थापक सदस्य असल्यामुळे त्यांनी जी शाळेतून माहिती मागितलेली आहे ती सुध्दा त्यांना अवगत असणे हे गृहीत धरणे आवश्यक आहे. संस्थेची माहिती ही मुख्याध्यापक यांना मागणे हे त्रास देण्याचा उद्येश आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. मुख्याध्यापक हे जन माहिती अधिकारी म्हणून शाळेच्या माहिती संदर्भात असतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती हे फेटाळणेच आवश्यक होते. तरीसुध्दा जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी माहिती घेवून जा असेच त्यांना सांगितले. माहिती व्यक्तीशः मागितल्यावर 30 दिवसाचे आंत माहिती घेण्यास जाणे आवश्यक असते व न दिल्यास आक्षेप घेणारे पत्र देणे आवश्यक असते. तसा कोणताही पुरावा अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केला नाही व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 247/2009.**

श्री मधुकरराव आत्मारामजी केचे
मु. अंबिकापुर पो. देलवाही
ता. आष्टी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी गट अ
जिल्हा परिषद वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
समाज कल्याण अधिकारी गट क्र.1
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी गैरहजर आहे. परंतु समाज कल्याण अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.6.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे जवाहर स्मुती विद्यालय येथील मुख्याध्यापकानी जि.प.कडून मुलींना मिळणारी रक्कम पूर्ण न वाटल्याबद्यल दि.9.10.2007 ला केलेला रिपोर्ट त्यावर आपल्या कार्यालयाने केलेली कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 6.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीला नंतर माहिती उपलब्ध झाली नाही दि. 30.3.2009 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 27.6.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 2.7.2008 रोजी समाज कल्याण अधिकारी गट अ कार्यालय आणि आष्टी पंचायत समिती यांचेकडून सदर प्रकरणाची चौकशी करुन मागितलेली आहे. सदर अहवाल कार्यालयात प्राप्त होताच आपण मागितलेली शिष्यवृत्ती बाबतची माहिती आपणास देण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. परंतु सदरच्या प्रकरणाची चौकशी सुरु असल्यामुळे व चौकशी झाल्या

नंतर अहवाल प्राप्त करुन देण्यात येईल असे कळविलेले असल्यामुळे सदरच्या चौकशीचा अहवाल अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेला आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीत कोणत्याही प्रकारचे तथ्य नाही. याबाबतचा संपूर्ण अहवाल कागदपत्राच्या बयाणासहीत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. व त्याबाबत अपीलकर्ता यांनी दि. 15.6.2009 रोजी माहिती मिळाली म्हणून पोच सुध्दा दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहितीचा अर्ज ज्या तारखेस केला जातो त्या तारखेस किंवा त्या 30 दिवसामध्ये मागितलेल्या माहितीची जी परिस्थिती असेल ती उपलब्ध करुन दिली जाते. कोणत्याही प्रकरणात कार्यवाही करुन माहिती दिली जात नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी दि. 2.7.2008 रोजी विहित मुदतीत कळविण्यात आले होते. तसेच चौकशी करुन चौकशी अहवाल सुध्दा त्यांना नंतर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 241/2009.**

श्री मनोहर मारोतराव धकाते
अंचलेश्वर वार्ड गोंडपूरा चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी चंद्रपूर
2) श्री आर. के. रावते
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय चंद्रपूर यांचेकडे जातीच्या प्रमाणपत्रासाठी सादर केलेल्या दस्तऐवज प्रमाणपत्राच्या झेरॉक्स प्रती मिळणेबाबत. श्री सुनिल दुधीराम तलांडे, श्री प्रमोद पांडुरंग येरमे, श्री भारत गुलाम सिडाम, श्री श्रीपत दागो नैताम, श्री भारत जनार्धन पेंदोर, श्री बाळकृष्ण मारोती मडावी यांची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. नोटशीट वर अपील मान्य 15 दिवसाचे आत अर्जदारास माहिती द्यावी अशी टिपणी केलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे लेखी बयाण दाखल केलेले आहे. व त्यामध्ये त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून असे दिलेले आहे. परंतु तहसिलदार चंद्रपूर यांनी दाखल केलेल्या कागदपत्रामध्ये अभिलेखागार यांनी संपूर्ण बस्त्याची छाननी केली व त्यात कोणत्याही प्रकारे माहिती उपलब्ध आढळुन आलेली नाही असा अहवाल तहसिदार यांनी दिलेला आहे. व त्याप्रमाणे तहसिलदार चंद्रपूर यांनी दि. 15.11.2008 रोजी उपविभागीय चंद्रपूर यांना सुध्दा 6 जातीच्या प्रमाणपत्राच्या प्रकरणाचा अभिलेखागार कक्षात एकूण 47 बस्त्यात शोध घेतला असता उपलब्ध झालेले नाही. तसेच रजिष्टर व यादीमध्ये नोंद आढळून आलेली नाही तरी प्रकरणाचा शोध घेणे सुरु असून प्रकरणे मिळताच

अर्जदाराला कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच तहसिलदार चंद्रपूर यांनी अभिलेखागार यांना दिलेली पत्रे दाखल केलेली आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. तसेच अभिलेखागार कनिष्ठ लिपीक श्री चौधरी यांना कारणे दाखवा नोटिस देण्यात आलेली आहे. परंतु माहिती उपलब्ध नाही असाच त्यांचा अहवाल आलेला आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की प्रत्यक्षामध्ये अपीलकर्ता यांनी दिलेले नंबर या आधारे माहिती शोधता येत नाही. व त्यामुळेच माहिती शोधण्यास अडचण होत आहे. असे असले तरी सदरची माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे व ज्या ज्या वेळेस त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली जाते त्या वेळेस जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्यल अधिनियमाचे कलम 11 प्रमाणे त्रयस्थ पक्षाना विचारणा करणे आवश्यक असते व ती प्रक्रिया सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. अशा परिस्थिती मध्ये अपीलकर्ता यांनी माहिती मागतांना त्रयस्थ पक्षास संपूर्ण तपशिल उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु तशी ती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अभिलेखागारातील सर्व नस्त्याचा शोध घेण्यात आलेला आहे असा अहवाल सादर झालेला असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्याबाबतची तपशिलात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेल्या माहितीच्या पुन्हा तपशिलात योग्य त्या क्रमांकासहीत माहिती उपलब्ध करुन दणे आवश्यक आहे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 237/2009.**

देना बॅंक एम्प्लॉईज युनियन
विदर्भ युनिट नागपूर
1157 सेंट्रल एव्हेन्यू रोड
इतवारी नागपूर वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दहीकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक
नागपूर ग्रामीण नागपूर

2) श्री एस. के. अभोरे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.7.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक तथा माहिती अधिकारी म्हणून दि. 5.11.2008 रोजी एकुण 18 मुद्यांवर पोलीस स्टेशन खापरखेडा अप. क्र. 124/08 ची एफ.आय.आर.ची प्रमाणित प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 1.12.2008 रोजी अप. क्र. 124/08 ची संपूर्ण मुद्यासहीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2008 रोजी पुन्हा तीच माहिती वेगळया स्वरुपात मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.12.2008 रोजी विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 22.1.2009 रोजी पुन्हा दान्ही अर्जाच्या निर्णया विरुध्द प्रथम अपील पोलीस अधिक्षक यांचेकडे

दाखल केलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 16.2.2009 रोजी तात्काळ घेवून जावे असे कळविलेले दिसून येते. व दि. 20.2.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. पुन्हा दि. 7.3.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यावरुन अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती दि. 8.3.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. परंतु प्रतिज्ञापत्रामध्ये माहिती उपलब्ध झालेली नाही व चुकीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यावर जे आक्षेप घेण्यात आलेले आहे ते तपास कामाच्या संदर्भातील आक्षेप घेण्यात आलेले आहे. यावरुन अपीलकर्ता हे सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भातील चौकशी करण्याची अपेक्षा आयोगाकडून करीता आहे असे दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कागदपत्राच्या स्वरुपात जशी माहिती उपलब्ध असते तशीच माहिती ही अधिनियमाच्या कलम 2 (च) प्रमाणे उपलब्ध करुन देता येते. व तशी ती उपलब्ध करुन दिलेली आहे. कार्यपध्दतीच्या बद्यल अपेक्षा असल्यास सदरचे आक्षेप हे न्यायालयात उपस्थित करणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांनी सुध्दा अधिनियमच्या तरतुदीच्या नियमांचे पालन केलेले नाही. अधिनियमाच्या कलम 6 प्रमाणे अर्ज दाखल केल्यानंतर कलम 19 (1) प्रमाणे प्रथम अपील व त्या प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द एकच द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्या कारणास्तव ते फेटाळण्यास पात्र आहे. तसेच अपीलकर्ता यांनी उपलब्ध झालेल्या माहिती मधून गुणवत्तेच्या बाबत निरनिराळे प्रश्न उपस्थित करुन प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल केलेले आहे जे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.7.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 360/2009.**

श्री खेळचंद तुकाराम वैरागडे
के.ऑफ श्री गोमाजी गुरनुले यांचे घरी
जुन्या भगवंतराव शाळेच्या इमारतीजवळ
इंदिरा वार्ड एटापल्ली 442704
ता. एटापल्ली जि. गडचिरोली ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. के. हलदर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती एटापल्ली
ता. एटापल्ली जि. गडचिरोली
2) श्री पी. डी. वनकर
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक
रा.रा.कन्या हायस्कुल तथा कनिष्ठ महाविद्यालय एटापल्ली
ता. एटापल्ली जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.9.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.1.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक रा.रा.कन्या हायस्कुल तथा कनिष्ठ महाविद्यालय एटापल्ली इयत्ता 8वीमध्ये शिकणा–या विद्यार्थ्यांची यादी सन 2008–09 माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 21.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने सदर माहिती संबंधितांना पत्र प्राप्तीपासून सात दिवसाचं आंत पुरविण्यात यावी असे मुख्याध्यापक यांना कळवून अपीलकर्ता यांना प्रतिलिपी दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मुख्याध्यापक यांना अर्ज देण्याचा प्रयत्न केला परंतु मुख्याध्यापक उपलब्ध झाले नाही व त्यांच्या कार्यालयातील शिपायानी अर्ज घेतलेला नाही. व त्यानंतर रजिष्टर पत्राने अर्ज पाठविला. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.1.2009 रोजी अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात दिलेल्या पत्त्यावर शाळेच्या शिपाया मार्फत त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पाठविली होती परंतु खेळचंद वैरागडे उपस्थित न मिळाल्यामुळे माहिती परत आणण्यात आले अशी नोंद शिपायाने केलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती देण्याचा प्रयत्न झालेला आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. अपीलकर्ता यांनी त्यांच्या अर्जात एक पत्ता दिलेला आहे व राज्य माहिती आयोगाकडे दुसरा पत्ता दिलेला आहे. मात्र खेळचंद वैरागडे इंदिरा वार्ड एटापल्ली याच पत्त्यावर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांचे शिकवणी वर्ग आहे व त्यामुळे त्यांचा पत्ता मिळाला नाही असे होणार नाही. यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ते त्यांच्या शिकवणी वर्गाकरीता मागितलेली आहे असे दिसून येते. वास्तविक कोणत्याही विद्यार्थ्याचा पत्ता उपलब्ध करुन देणे आवश्यक नाही. ती त्यांची वैयक्तिक माहिती होते. व तशी माहिती मागणे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती करुन द्यावयाची आहे ती विद्यार्थ्याची यादी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल पत्ता नाही. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना रा. रा.कन्या हायस्कुल तथा कनिष्ठ महाविद्यालय एटापल्ली इयत्ता 8वीमध्ये शिकणा–या विद्यार्थ्यांची यादी (पत्ता वगळून) हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कार्यालयीन वेळेत जावून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 361/2009.**

श्री भाऊराव पुंडलिकराव कढव
172 श्रीराम नगर कुरखेडा
मु. पो. ता. कुरखेडा जि. गडचिरोली 441209 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. जे. मनोहर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कुरखेडा
जि. गडचिरोली
2) श्री बी. एस. आगलावे
जन माहिती अधिकारी तथा
तालुका कृषी अधिकारी कार्यालय कुरखेडा
जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.1.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत. जन माहिती अधिकारी/प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. दिसून येतात.

2. अपीलकर्ता यांनी दि. ..200 रोजी शासकीय/जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषी अधिकारी यांचेकडे तालुका कृषी विभागा मार्फत खर्च केलेल्या रकमेची विषयी सत्यप्रत व निविदाची सत्यप्रत. सन 2005–06, 2006–07, 2007–08 बिजोत्पादन कार्यक्रमांतर्गत खरेदी केलेल्या पोत्याची खरेदी बिल व निवीदा. संद्रीय शेतीमधील साहित्य खरेदी बिल व निवीदा. गांडूळ खत प्रकल्पातील खरेदी केलेल्या साहित्याची खरेदी बिल व निवीदा. इत्यादी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.1.2009 रोजी रु. 6080/– चा भरणा करावा प्रती एकुण 3040 आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दि. 18.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात निर्धारीत कालावधीत माहिती सादर न केल्यामुळे असे कारण दिलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या

निर्णया विरुध्द दि. 27.2.2009 रोजी माहिती तातडीने नियमा नुसार उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2009 व 17.3.2009 रोजी पैसे भरण्यास तयार आहे असे जन माहिती अधिकारी यांना कळविलेले दिसून येते. परंतु पैसे भरलेले नाही व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत मागितलेल्या माहितीच्या खर्चाचा भरणा करावा असे कळविले ते योग्य आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी त्यांना मागितलेल्या माहितीच्या करीता खर्चाचा भरणा करणे संयुक्तिक राहिल. व त्यानंतर 30 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा कळविलेला असल्यामुळे व विहित मुदतीत कळविलेला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 11.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 374/2009.**

श्री हंसराज चंद्रभानजी मेश्राम
96 बी मानव नगर नारी रोड
पो. उप्पलवाडी नागपूर 440026 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त
अपंग कल्याण आयुक्तालय पुणे
3 चर्च रोड पुणे 1.
2) जन माहिती अधिकारी तथा
आयुक्त
अपंग कल्याण आयुक्तालय पुणे
3 चर्च रोड पुणे 1. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना दि. 16.6.2009 रोजी राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून आजच्या सुनावणीच्या संदर्भात नोटिस काढण्यात आलेली होती. अपीलकर्ता नागपूर येथील रहिवासी असूनही गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय पुणे यांच्या कार्यालयातून कोणीही हजर नाही. जन माहिती अधिकारी हेही हजर नाहीत व त्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो.

2. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये मागितलेली माहिती मिळालेली नाही असे कारण दिलेले असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हि सिध्द करण्याची जबाबदारी अधिनियमच्या कलम 19 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची आहे. व जन माहिती अधिकारी हे हजर नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत अशी आयोगाची खात्री झालेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची

दखलच घेतलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 24.10.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द रु. 25000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा आयोगाकडे दि. 31.8.2009 रोजी करण्यात यावा. अन्यथा शास्ती कायम हाईल याबाबतची नोंद घ्यावी.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग मंत्रालय विस्तार भवन मुंबई – 32.** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 380/2009.**

श्री वसंत प्रभाकर मुदलियार
289 नाना सोनी लाईन
सिताबर्डी नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. के. चव्हाण
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव
म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
नागपूर विभागीय मंडळ नागपूर
2) श्री आर. बोरकर
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय सहा. सचिव
म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
नागपूर विभागीय मंडळ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.9.2008 रोजी माहिती अधिकारी यांचेकडे दिलेल्या पत्राची प्रत दाखल केलेली आहे. माहितीच्या अर्जाची प्रत त्यांनी दाखलच केलेली नाही. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी विभागीय सचिव म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर विभागीय मंडळ नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 16.1.2009 रोजी निविदा संबंधीची कोणतीही माहिती निविदा भरणा–या शिवाय अन्य त्रयस्थाला देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपीलाचे कारण त्यांनी 1. मंडळातील नियमाच्या आधारावर माहिती देण्यास नकार 2. निविदा संबंधात तुलनात्मक तक्त्यांची छाया प्रत देण्यास नकार असे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहितीचा अर्ज दाखल केला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 30.6.2008 रोजी माहिती अधिकारी म.रा.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचेकडे नागपूर विभागीय मंडळ कार्यालयात कोण कोणत्या मदां करीता कामाकरीता निविदा मागविल्या जातात वगैरे अशा प्रकारे एकुण 9 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.7.2008 रोजी सर्वसाधारण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु निविदांचे नक्कीकरण (Finalisation) करण्यात येणा–या तुलनात्मक तक्त्याचे मागील तीन वर्षाच्या छायाप्रति देण्यात याव्या याबाबतच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलात त्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. व प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये दि. 20.11.2008 रोजी मुद्या क्र. 3 नुसार आपण कार्यालयात प्रत्यक्ष येवून संपर्क साधून विनामुल्य प्रत्यक्षात माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. व याबाबतचा उल्लेख प्रथम अपीलाच्या निर्णयात करुन आपण प्रत्यक्ष पाहणी करण्याकरीता न येता प्रथम अपील दाखल केले आहे. त्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की आपणास निविदा संबंधीची कोणतीही माहिती निविदा भरणा–या शिवाय अन्य त्रयस्थाला देता येणार नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.12.2008 रोजी माहिती अधिकारी यांना तुलनात्मक तक्त्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिले. व त्यामुळे दि. 16.1.2009 रोजी उत्तर दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मंडळाच्या नियमाप्रमाणे ज्याला छपाईचे काम दिले जाते त्यांचे नाव हे प्रकट करता येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन दिली नाही मात्र इतर माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. व तुलनात्मक तक्ते त्यांनी स्वतः येवून प्रत्यक्ष निरीक्षण करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले असून ते उपस्थित झालेले नसल्यामुळे निविदा भरणा–या शिवाय अन्य त्रयस्थाला देता येणार नाही असे कळविले आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही नियमाचा आधार न घेता भोगळपणाने उत्तर दिलेले दिसून येते. आयोगापुढे केलेला युक्तीवाद हा योग्य आहे परंतु त्या युक्तीवादाप्रमाणे अधिनियमाशी सांगड घालून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली असती किंवा नाकारता आली असती त्यामुळे अपीलकर्ता यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागलेले दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात असल्यामुळे व तशी ती मंडळाच्या सुरक्षिततेकरीता प्रकट करणे हे योग्य नसल्यामुळे त्यांनी पाहणी करुन माहिती करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांचा व माहिती अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) प्रथम अपलाचा निर्णय व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 376 / 2009.**

श्री रामदास दशरथजी दहाट
के.ऑफ श्री जी.प्र.बन्सोड 65 विवेकानंद नगर
साई मंदीर मागे वर्धा रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उप संचालक
लातूर विभाग लातूर
गांधीचौक लातूर ता. जि. लातूर

2) श्री ए. वाय. वृटकर
जन माहिती अधिकारी तथा
शिक्षण उप संचालक कार्यालय
लातूर विभाग लातूर
गांधीचौक लातूर ता. जि. लातूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.8.2007 रोजी माहिती अधिकारी तथा शिक्षण उप संचालक यांचेकडे 1. महाराष्ट्र शासनाने दिलेल्या चौकशीच्या निर्देशाची प्रमाणित प्रत सह माहिती त्वरित देण्यात यावी. 2. श्री महेश करजगावकर शिक्षणाधिकारी नागपूर यांच्या केलेल्या संपूर्ण चौकशीच्या अहवालाची प्रमाणित प्रत सह माहिती त्वरित देण्यात यावी. 3. दि. 21.7.2007 चा दै. लोकमत व 22.7.2007 चा दै. तरुण भारत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार चौकशी अहवाल तातडीने मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी सन 2007. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 28.9.2007 रोजी श्री करजगावकर यांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारीबाबत चौकशी करुन चौकशी अहवाल या कार्या.चे पत्र क्र. शिउसं / आस्था–1 / 10451 / 2007 दि. 22.7.2007 अन्वये शासनास व संचालनालयास

सादर करण्यात आलेला आहे. त्यामुळे या कार्यालयाकडे या प्रकरणाची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाही असे उप संचालक लातूर विभाग लातूर यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.10.2007 रोजी विभागीय शिक्षण उप संचालक लातूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही. मात्र दि. 20.12.2007 रोजी माहिती अधिकारी विभागीय शिक्षण उप संचालक लातूर यांनी पुन्हा श्री करजगावकर यांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारीबाबत चौकशी करुन चौकशी अहवाल शिक्षण संचालनालयास पाठविण्याचे कळविले आहे. त्यामुळे या कार्यालयाकडे या प्रकरणाची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. त्यानंतर दि.18.12.08 रोजी पुन्हा माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. तसेच मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये शिक्षण उप संचालक श्री दि.व. सहस्त्रबुध्दे यांनी आयोगाकडे खुलासा करतांना सदहू बाबत शालेय शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई या कार्यालयाशी संबंधित आहे. केवळ चौकशी करण्याचे काम तत्कालीन विभागीय शिक्षण उप संचालक लातूर श्री ठाकरे यांना देण्यात आली होती. त्यामुळे अशी चौकशीची कागदपत्रे व अहवाल चौकशी अधिका–याकडे मागता येणार नाही असे माझे मत आहे. चौकशी अहवालाची मागणी शालेय शिक्षण विभागाकडे संबंधिताने करणे आवश्यक होते असे माझे मत होते. तरी याचा स्विकार व्हावा. तसेच सदर चौकशी बाबतची सर्व कागदपत्रे मा. शासनास व मा. शिक्षण संचालनालयास सादर केल्यामुळे या कार्यालयाकडे कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नसल्यामुळे संबंधितास माहिती देता आली नाही. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या चौकशीच्या निर्देशाप्रमाणे चौकशी अहवाल हा शासनाकडे पाठविण्यात आलेला दिसून येतो. व त्यामुळे चौकशी अहवालाची प्रत ही शासनाकडून प्राप्त करुन घ्यावी असे उप संचालक यांनी दिलेला खुलासा योग्य आहे असे दिसून येते. असले तरी अपीलकर्ता यांना आता या प्रकरणामध्ये अशा प्रकारे उत्तर देणे योग्य नाही. ते जन माहिती अधिकारी यांनी दिले असते तर योग्य झाले असते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत शासनाच्या संबंधित विभागाकडून चौकशी अहवालावर झालेल्या कार्यवाहीबाबतची माहिती शासनाकडून उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी शासनाकडून संबंधित चौकशीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन घेवून ती अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 370/2009.**

श्री भास्कर मिथुजी डोंगरे
कस्तुरबा वार्ड गोंदिया (पंचशिल झेंडयाजवळ)
पो. ता. जि. गोंदिया 441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष/सचिव
दत्तात्रय शिक्षण संस्था इर्री
के.आर्फ स्व. जमनाबाई ठकरेले हायस्कूल इर्री
पा. नवरगाव (कला) ता. जि. गोंदिया

2) श्री रुपचंद उमराव ठकरेली
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक स्व. जमनाबाई ठकरेले हायस्कूल इर्री
पा. नवरगाव (कला) ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या व्दितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे सन 1999 ते फेब्रुवारी 2008 या कालावधीतील आर. एम. चुटे सहा. शिक्षक यांचे व्यवसाय करातील पाठविलेले अहवालाची प्रत मागितलेली दिसून येते. व त्याप्रमाणे व्यवसाय कर दिल्याची पावती तसेच व्यवसाय कर अधिका–याची प्रमाणपत्राची प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.12.2008 रोजी सदरची माहिती त्रयस्थ पक्ष संबंधानी असल्याने त्रयस्थास कळविलेले असून माहिती प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 4.2.2009 रोजी संस्थेच्या सचिवाकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 26.6.2009 रोजी अपीलकर्ता यांना व्यवसाय कर अधिकारी गोंदिया यांनी सदर शाळेतील कार्यरत अनुदानित व कायम अनुदानित कर्मचा–याच्या टॅक्स भरण्यासंबंधी पावती शाळेला

पाठविली आहे अशी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच दि. 25.8.2009 रोजी सुध्दा सदरची माहिती व्यवसाय कर अधिका–याकडून मिळू शकते अशा प्रकारचे उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 13.5.2009 द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता हे दुपारी 4.00 वा. हजर झाल्यानंतर त्यांनी आयोगास असे सांगितले की त्यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपुर्ण आहे व त्यांनी चुटे यांच्या संदर्भातील शेडयूल मागितले होते. व त्यामुळे त्यांना चुटे यांनी व्यवसाय कर भरल्याच्या संदर्भातील व्यवसाय कर अधिका–याने पाठविलेल्या शेडयूलची छायांकीत प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी त्यांच्या दि. 13.12.2008 रोजीच्या अर्जामध्ये मागितलेल्या सन 1999 ते फेब्रुवारी 2008 या कालावधीतील आर. एम. चुटे सहा. शिक्षक यांचे संदर्भातील भरलेल्या व्यवसाय करा संदर्भातील शेडयूलची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 396/2009 व अपील क्रमांक 397/2009.**

**अपील क्रमांक 396/2009**

श्री मारोती रामराव साबळे
32 टेलिफोन नगर, दिघोरी,
नरसाळा रोड नागपूर 09 ..... **अपिलकर्ता**

**अपील क्रमांक 397/2009**

श्री गजानन भाऊरावजी चौधरी
23 गितानगर, झिंगाबाई टाकळी
नगपूर 30 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ
नागपूर विभाग नागपूर
2) श्री अरुण शनेश्वर बसोके
जन माहिती अधिकारी तथा
कर्मचारी वर्ग अधिकारी
म.रा.मार्ग परिवहन महामंडळ
नागपूर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अपील क्र. 396/2009 व अपील क्र. 397/2009 मध्ये दि. 12.1.2009 रोजी दोन स्वतंत्र अर्जाच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी तथा म.रा.मार्ग परिवहन महामंडळ नागपूर विभाग नागपूर यांचेकडे वा.नि. पदाच्या खातेमार्फत बढती लेखी परीक्षेचा निकाल क्र.राप/विनी/नाग/आस्था/5402 दि. 12.12.08 नुसार आसन क्र. 85 पेपरच्या उत्तर पत्रीकेचे तसेच आसन क्र. 108 पेपरच्या उत्तर पत्रीकेचे फेरमुल्यांकन तसेच उत्तरपत्रीकेची सत्यप्रत मिळणेबाबत. तसेच एकुण 14 उमेदवाराच्या उत्तरपत्रीकेची सत्यप्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दोन्ही

अपीलकर्ता यांना दि. 29.1.2009 रोजी मागितलेली माहिती देता येणार नाही सबब आपण मागितलेली माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (त्र) अन्वये नाकारण्यात येत आहे. अशा प्रकारे उत्तर दिलेले दिसून येते. दोन्ही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 12.3.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 28.3.2009 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 6 (1) प्रमाणे केलेल्या अर्जामध्ये पुर्नमुल्यांकन करण्याची मागणी केलेली आहे. परंतु अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये गुणवत्तेच्या बाबत कार्यवाही करता येत नाही. उपलब्ध असलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात पुरविणे असा ''माहितीचा अधिकार'' आहे. उत्तरपत्रीकेच्या सत्यप्रती मागण्याच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना स्वतःच्या उत्तरपत्रीकेची पाहणी करता येईल. परंतु त्याबाबतची प्रत मिळू शकणार नाही. उत्तरपत्रीका ही योग्य रितीने तपासणी झालेली आहे किंवा नाही ही जबाबदारी परीक्षकाची तसेच पर्यवेक्षकाची आहे. परंतु तरीही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे पारदर्शकता असण्याच्या दृष्टीने अर्जदारास त्यांची स्वतःची उत्तरपत्रीका पाहण्यास मिळणेबाबत अधिनियमच्या कलम 8 (त्र) चा आधार घेता येणार नाही. मात्र इतर उमेदवाराच्या उत्तरपत्रीकेची सत्यप्रत किंवा पाहणी करण्यासाठी सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देता येणार नाही. व त्याबाबत मात्र अधिनियमच्या कलम 8 (त्र) मध्ये अपवाद करता येईल. व त्यामुळे अपीलकर्ता यांना फक्त त्यांच्या उत्तरपत्रीकेची पाहणी करण्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता दोन्ही अपीलकर्त्याची दोन्ही अपीले ही अंशतः मंजुर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांची वरील दोन्ही अपीले ही अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रीकेची पाहणी करण्यास अधिका–याच्या उपस्थितीत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रीकेची पाहणी करावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 14.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 398/2009.**

श्री रामदास बालाजी कलोडे
श्री पी. सी. निनावे
सिंदी बस स्टॅन्ड जवळ, वार्ड क. 17,
मु. पो. सिंदी (रेल्वे) ता. सेलू जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद वर्धा
2) श्री निमजे
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 14.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.12.2008 रोजी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार निवृत्ती वयाचे 60 वे वर्षी होण्याचा निकाल मिळाला. त्या नुसार अंतीम दोन वर्षाचा सेवानिवृत्तीच्या लाभाची देयके दि. 18.9.08 ला आपणास सादर केली. तद्नुसार आपले कार्यालयीन कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 29.3.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये शिक्षणाधिकारी हे स्वतः प्रथम अपीलीय अधिकारी असल्यामुळे त्यांचे नावानीशी अपील सादर करावा असे शिक्षण उपसंचालक यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी दि. 3.2.2009 रोजी शिक्षणाधिकारी (माध्य.) यांचेकडे सुध्दा प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना दि. 24.7.2009 रोजी माहिती देण्यात आलेली आहे. याचा अर्थ

आयोगाची नोटिस निघाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती दिलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपुर्ण आहे. अपुर्ण याचा अर्थ महालेखाकार यांचेकडे दि. 23.6.2009 रोजी जे प्रकरण पाठविलेले आहे त्यास विलंब लागू नये त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरचे प्रकरण हे न्यायप्रविष्ट होते. त्यामुळे त्या प्रकरणाचा अभ्यास करुन मगच अपीलकर्ता यांच्या प्रकरणामध्ये कार्यवाही करण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांच्या प्रकरणामध्ये कार्यवाही करण्यात झालेली आहे परंतु त्याबद्यलची माहिती ही माहितीचा अर्ज आल्यानंतर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन आलेला नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे व शासनाच्या नियमांचे उल्लंघन केलेले दिसून येते. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 19.12.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर यांनी करावयाची आहे.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग नागपूर** यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 14.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 338/2009.**

श्री राकेश देवरावजी बारापात्रे
27 राजेन्द्रनगर, हिंगणा रोड नाका नं. 9
नागपूर 16 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्रीमती वसुधा नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
सह आयुक्त/उपाध्यक्ष
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
नागपूर
2) श्री आर. आर. गायकवाड
जन माहिती अधिकारी तथा
अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती
गिरीपेठ, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.8.2008 रोजी जन माहिती अधिकारी सहा. आयुक्त आदिवासी विकास विभाग यांचेकडे आपल्या कार्यालयाकडे हलबा, हलबी या जमातीचे लोकांनी किती अर्ज केले आहे. जात पडताळणीसाठी वर्ष मागितल 6 ते 7 वर्षापासून त्याची माहिती लेखी स्वरुपात. आपल्या कार्यालयातुन 6 ते 7 वर्षापासून जात पडताळणीचे प्रमाणपत्र देण्यात आले व किती शिल्लक आपल्या कार्यालयात आहे याची माहिती देण्यात यावी. जात पडताळणी झालेली व्यक्तीचे नाव व यादी देण्यात यावी. माहिती संबंधीचा कालावधी 2001 ते 2008 पर्यंत दिसून येतो.
सदरची माहिती शिघ्र पोष्ट नोंदणीकृत टपालाद्वारे देण्यात यावी. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 6.11.2008 रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. तत्पुर्वी

अपीलकर्ता यांनी दि. 1.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दि. 21.1.2009 रोजी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 7 (9) नुसार नाकारलेली दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी मागितलेली माहिती ही त्यांना प्रत्येक जिल्हा निहाय आणि पडताळणीच्या संदर्भातील तपासणीकरीता माहिती पाहिजे आहे व तशी माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी नाकारलेली आहे. त्यांना पुणे व मुंबई या कार्यालयाने तशीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मुंबई व पुण्याचे कार्यालयानी अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती जनगणनेनुसार जमातीची लोकसंख्या असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जात पडताळणी समिती कार्यालयात आलेल्या अर्जाची माहिती जातीनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की त्यांचेकडे जातीनिहाय सांख्यिकी विश्लेषण केलेले नसते. कोणत्याही जमातीचे अर्ज हे ज्याप्रमाणे कार्यालयात येतात त्याप्रमाणे त्यांची नोंद केली जाते जातनिहाय नोंद केली जात नाही किंवा तशा प्रकारे वेगळी नोंद ठेवली जात नाही. व त्यामुळे 6 ते 7 वर्षातील हलबा हलबी या जमातीची माहिती काढुन द्यावयाची असल्यास त्यांचेकडे कर्मचारी वर्ग नाही. त्याकरीता प्रशासनाची यंत्रणा ही प्रमाणा बाहेर वळवावी लागेल. व त्यामुळेच दि. 6.11.2008 रोजी अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे उत्तर दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता ते शासकीय कार्यालयाचे पत्र आहे त्यावरुन दिसून येत नाही असे अपीलकर्ता यांनी निदर्शनास आणले. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची काळजी घेतलेली आहे असे दिसून येत नाही. अनुसूचित जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीतील जन माहिती अधिकारी यांनी खोकडेबाज उत्तर तयार करुन ठेवले आहे. व कोणत्याही अर्जाच्या संबंधात तशा प्रकारचे उत्तर देत असतात. त्याप्रमाणे प्रत्येक अर्जाचे उत्तर देणे शक्य असते व तेही विहित मुदतीत केलेले नसते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जो निर्णय दिलेला आहे तो सुध्दा तशा प्रकारचा निर्णय आहे. उत्तर हे स्पष्टपणे, आयोगाकडे ज्याप्रमाणे खुलासा केला जातो त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना देणे आवश्यक आहे. परंतु याबाबतची काळजी घेण्यात येत नाही असे दिसून येते. याबाबत वरीष्ठ स्तरावरुन सुध्दा कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन किंवा प्रशिक्षण होत आहे असे दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी दिलेला निर्णय हा योग्य स्पष्टीकरणात्मक नसला तरी सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) प्रथम अपीलाचा निर्णय हा अधिक स्पष्टीकरण करणारा नसला तरी बरोबर असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.8.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 340/2009 व अपील क्रमांक 341/2009.**

श्री प्रमोदसिंह विठ्ठलसिंह राणा
फुलचूर नाका फुलचूर पेठ गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक गोंदिया
2) श्री दिनेश हागे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 340/2009 व अपील क्र. 341/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 25.11.2008 रोजी जी माहिती मागितलेली आहे ती दोन्ही अर्जामध्ये दि.4.2.2008 रोजी सुनील भैय्यालाल भालाधरे व अशोक लिचडे यांच्या संदर्भात केलेल्या तक्रारीच्या संदर्भात कार्यवाहीचा अहवाल मागितलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन गोंदिया ग्रामीण कडून प्राप्त करुन घेण्यास दि. 28.11.2008 पत्र देण्यात आले व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आली. त्याप्रमाणे दि. 25.12.2008 रोजी माहिती प्राप्त झाल्याने पोलीस निरीक्षक गोंदिया ग्रामीण मार्फत लेखी सुचना पत्र देण्यात आले असता अर्जदार हे आले नाहीत व त्यामुळे 1 महिन्याचा कालावधी संपत असल्यामुळे वरिष्ठांना अपील अर्ज करीत असून माहिती घेवून जात नाही, अपील नंतर माहिती घेवून जाईल असे त्यांनी सांगितले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी विशेष पोलीस निरीक्षक नागपूर क्षेत्र नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 21.1.2009 रोजी नियमानूसार शुल्क भरणा केल्याने त्यांना त्याच वेळी मागणी केलेली कागदपत्रे पुरविण्यात आलेली आहे. व त्याची पोच त्यांनी दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी चौकशी अहवाल

खोटा व साठगाठ करुन जोडून तयार केलेला आहे असे द्वितीय अपीलात कारण दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांना जी माहिती मिळालेली आहे तो चौकशी अहवाल खोटा आहे. यावरुन अपीलकर्ता यांना चौकशी अहवालाच्या गुणवत्तेच्या बाबत तक्रार करावयाची आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहितीचा अर्ज हा मुळातच पोलीस अधिक्षक गोंदिया यांचेकडे केला आहे. व त्याची माहिती मात्र जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गोंदिया यांचेकडे उपलब्ध होवू शकते. व त्यामुळे सदरचा अर्ज हा माहिती अधिकारी यांचेकडे दि. 28.11.2008 रोजी प्राप्त झालेला आहे व त्यामुळे तेव्हापासूनच 30 दिवसाची परिगणना करण्यात आली आहे. पुन्हा त्याची माहितीही पोलीस स्टेशन ग्रामीण यांचेकडे असल्यामुळे सदरचा अर्ज त्यांचेकडून माहिती मागण्याकरीता पाठविण्यात आला. यावरुन अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करावयास पाहिजे तो केलेला नाही व त्यामुळे 30 दिवसात माहिती दिली नाही हे अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदी हया जशा जन माहिती अधिकारी यांना लागू आहे तशा त्या अर्जदारांना लागू आहेत. व अर्जदारानी संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज करणे अपेक्षित आहे. अपीलकर्ता यांनी अपीले सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे न दाखल करता आय जी पी सिव्हील लाईन्स यांचेकडे दाखल केले. व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा विलंबाने लागू शकतो. अपीलकर्ता यांची तक्रार ही चौकशीच्या संदर्भात दिसून येते व ती त्यांनी स्वतंत्रपणे चौकशी अधिका–याच्या वरीष्ठ अधिका–याकडे करणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या प्रमाणे जशी माहिती उपलब्ध आहे त्याप्रमाणे ती उपलब्ध होते. त्यातून गुणवत्तेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी करता येत नाही. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 344 / 2009 व अपील क्रमांक 345 / 2009.**

श्री वामन काशिनाथजी हेंडवे
मु. पो. रसुलाबाद
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मनोज सुर्यवंशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा

2) श्री राऊत
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी आर्वी
ता. आर्वी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

3) श्री खजांजी
जन माहिती अधिकारी तथा
निवासी उप जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.2.2009 व दिनांक 7.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क. 344 / 2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे श्री डी. एस. कारंडे तहसिलदार व नायब तहसिलदार आर्वी यांनी माझ्यावर महाराष्ट्र राज्य शासन कोतवाल कायद्या विरुध्द अन्याय केला आहे. करीता त्यांचेकडून शासन नियमाप्रमाणे त.सा.क.20 विसळ येथिल दि. 21.9.01 ते 2.8.06 पर्यंतच्या कालावधीतील 80 रु. रोजाप्रमाणेचा भत्ता व 20 रु. रोजाप्रमाणे प्रवास भाडे आणि कोणत्याही सिध्दतेशिवाय द्वेषभावनेतून माझा सहा महिन्याचा न दिलेला पगार मला मिळण्याबाबत. या विषयाबाबत एकुण 4 मुद्यांमध्ये प्रश्नोत्तराच्या स्वरुपामध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल विभागीय आयुक्त नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. विभागीय आयुक्त यांनी दि. 3.5.2009 रोजी परत पाठवून जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे सादर करण्यास अर्जदारास कळविले व त्याप्रमाणे दि. 12.5.2008 रोजीच्या पत्रासह कार्यालयात सादर केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 26.11.2008 रोजी देण्यात आलेला असून अपील पुर्णतः मंजुर करण्यात आले असून उपविभागीय अधिकारी आर्वी यांनी हा आदेश मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य माहिती देण्यात यावी असा आदेश पारीत करण्यात आलेला दिसून येतो.व तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 च्या अर्जामध्ये दि. 21.9.01 ते 2.8.06 पर्यंतच्या कालावधीतील 80 रु. रोजाप्रमाणेचा भत्ता व 20 रु. रोजाप्रमाणे प्रवास भाडे रु. 100/- अनुज्ञेय असलेली रक्कम मिळण्याविषयी मागणी केलेली आहे. त्यावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे उत्तर दिलेले नाही किंवा माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. अपीलकर्ता यांचे अपील हे दि. 15.4.2008 रोजी दाखल झाले असून सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दि. 26.11.2008 रोजी दिलेला आहे. व त्याप्रमाणे दि. 31.12.2008 रोजी अपीलकर्ता यांना आपल्या अर्जावर आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा काहीही अर्थबोध होत नाही. त्याप्रमाणे त्यांनी जोडपत्र 'ब' मध्ये दि. 21.9.01 ते 2.8.06 पर्यंतच्या कालावधीतील 80 रु. रोजाप्रमाणेचा भत्ता व 20 रु. रोजाप्रमाणे प्रवास भाडे रु. 100/- अनुज्ञेय असलेली रक्कम मिळण्याबाबत असे नमूद केलेले आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये पैसे देणेबाबत कोणताही नियम नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 14.2.2009 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे सदरच्या द्वितीय अपीलामध्ये माहिती मागण्याच्या अर्जातील माहिती मागता येते, तरीही त्या अर्जाच्या संदर्भामध्ये तत्कालीन जिल्हाधिकारी कार्यालयातील माहिती अधिकारी यांनी त्या अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही. अर्ज केल्यानंतर 30 दिवसाच्या नंतर प्रथम अपील दाखल करता येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी अपील दाखल केले परंतु त्या अपीलाची दखल ती सात महिन्या नंतर घेण्यात आली व प्रथम अपीलाचा निर्णय हा अपील दाखल केल्यानंतर 30 दिवसात करणे आवश्यक असते व त्यानंतर एक महिन्यानी पुन्हा अर्जावर आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा काहीही अर्थबोध होत नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. त्यावरुन अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे अर्जदार, अपीलकर्ता पासून ते माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे नियमांचे पालन केलेले नाही. माहिती अधिकारातील अर्ज, प्रथम अपील याबाबतची प्रक्रिया कशी असू नये याबाबतचा उत्तम नमुना आहे. असे असले तरी तत्कालीन

माहिती अधिकारी यांनी सदरच्या अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सहा महिन्याच्या कालावधीमध्ये प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही याबद्यलही त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. यशदा तर्फे सर्व जिल्हयामध्ये प्रशिक्षण आयोजित करण्यात येते असे दिसून येते. परंतु आयोगापुढील दाखल झालेल्या अपीला वरुन अधिका—यांना प्रशिक्षण मिळालेले आहे असे दिसून येत नाही. बहुतांश अधिकारी यांनी अधिनियमच्या तरतुदीची पायमल्लीच केलेली दिसून येते. अपीलकर्ता अर्जदार सुध्दा माहिती मागण्यापेक्षा त्यांच्या प्रकरणातील कार्यवाही करुन मागत असतात. व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा उद्येश हा बाजूला राहून विनाकारण राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल होत असतात. आयोगाकडे सुनावणीत सुध्दा अर्जदार अपीलकर्त्याची अपेक्षा ही कागदपत्रातील माहितीच्या स्वरुपापेक्षा प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत चौकशी करुन निर्णय व्हावा अशी अपेक्षा असते. व त्यामुळेही अपीलाची संख्या वाढत असते.

4. तत्कालीन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जाची दखल घेतलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारचा निर्णय हा आयोगानी दिली तरी पुढील कार्यवाही होईलच याची श्यकता दिसून येत नाही. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. 345/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा यांचेकडे महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांनी अर्जदाराचे पगार आणि भत्ता व प्रवास भाडे याबाबत 15 दिवसाचे आंत मागितलेल्या अहवालाच्या प्रती मागितलेल्या दिसून येतात. माहिती तयार असल्याचे सुचित पत्रान्वये व्यक्तीशः हवी आहे असे नमूद केलेले दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.4.2009 रोजी विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोग यांनी मागितलेला अहवाल सादर करण्यात आला नसल्यामुळे माहिती देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.5.2009 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी अहवाल पाठविलेला नसल्यामुळे तात्काळ कळवावे. अपिल मंजूर करण्यात येते. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांचे अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती 7 दिवसात उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 344/2009 मंजुर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये विभागीय चौकशीची शास्ती लादण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांची विभागीय चौकशी करुन त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

2) अपील क्र. 344/2009 मधील प्रथम अपीलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

3) अपील क्र. 344/2009 हे खारीज करण्यात येते.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 336/2009.**

श्री पांडुरंग चिंतामन पराते
मु. पो. पालांदूर (चौ.)
ता. लाखनी जि. भंडारा 441811 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
परिक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर व उत्तरवादी गैरहजर आहेत. कोणत्याही प्रकारची मुदत अर्ज दिलेला नाही.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव यांचेकडे पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन अप्लाईड बॉटनी (PGDAB) या अभ्यासक्रमाकरीता परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची यादी त्यांच्या पत्त्यासहित पुरविण्यात यावी. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 24.12.2008 रोजी मागितलेली माहिती ही कलम 11 (1) प्रमाणे त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. व त्या पुढील कार्यवाही झाल्यानंतर आपल्याला माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असेही कळविलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 18.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतु दि. 19.3.2009 रोजी सर्व विद्यार्थ्यांची पत्ते द्यावीत असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पृथःकरण करुन माहिती देता आली असती. विद्यार्थ्यांची यादी ही सार्वजनिक अभिलेखे असतात. परंतु त्यांचे पत्ते ही वैयक्तिक माहिती होत असल्यामुळे ती आवश्यक नाही. परंतु तसा कोणत्याही प्रकारे विचार न करता तसेच प्रथम अपीलाचा विचार न करता अपीलकर्ता यांनाच पत्ते मागितलेले दिसून येते. वास्तविक विद्यार्थ्यांचे पत्ते हे विद्यापीठाकडेच उपलब्ध असतात. त्यामुळेच कलम 11 प्रमाणे प्रक्रिया सुरु करावयाची असती तर विद्यापीठाने करणे आवश्यक होते. परंतु तसे विद्यापीठाने केले नाही. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याचीच टाळाटाळ केलेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो. कलम 10 प्रमाणे माहितीचे पृथःकरण करता येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल घेतलेली नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. आयोगापुढे जन माहिती अधिकारी हे हजर झालेले नसल्यामुळे ते शास्तीस पात्र आहेत असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती अभ्यासक्रमाकरीता परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची यादी त्यांचे पत्ते वगळून उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी हे आयोगाचे नोटिसीप्रमाणे उपस्थित न राहिल्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 410/2009.**

सौ. कमलबाई रामचंद्र सोनवाने
मु. कवडसी (बरड) पो. मंगरुळ
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संजय धिवरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर

2) श्री एस. ए. मोटघरे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार भिवापूर
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार कार्यालय यांचेकडे मौजा कवडसी (बरड) हद्यीतील सुरु असलेल्या गिट्टीखदान परवाना परवानगीबाबत ना हरकत प्रमाणपत्राची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.12.2008 रोजी मागितलेली माहिती ही नव्याने तयार करुन घ्यावयाची स्वरुपाची असल्याने ती देता येत नाही असे तत्कालीन तहसिलदार तथा शासकीय माहिती अधिकारी यांनी कळविले. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 21.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.2.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली त्याप्रमाणे 3 खदानी सुरु असल्याची माहिती अपिलार्थी यांना या आदेशान्वये बिना मोबदला देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व सदरच्या निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मागितलेल्या माहितीच्या स्वरुपावरुन असे दिसून आले की माहिती तयार करुन द्यावयाची आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांना ना हरकत प्रमाणपत्राच्या संदर्भातील झालेल्या कार्यवाहीची माहिती कागदपत्राच्या स्वरुपात मागितलेली आहे असे दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुढे असेही सांगितले की अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जामध्ये कालावधी दिलेला नसल्यामुळे कोणत्या कालावधीतील माहिती त्यांनी मागितली हे ठरविता येत नव्हते. व द्वितीय अपीलाच्या सुनावणीत मात्र त्यांनी कालावधी सांगितल्याप्रमाणे त्यांना मागितलेली माहिती दिलेली आहे. त्याबद्यलची पोच त्यांनी आयोगाला दाखविली तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन त्यामध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे नमूद केलेले आहे. आज अपीलकर्ता हजर नाही व त्यामुळे त्यांना खरोखर माहिती उपलब्ध झाली किंवा नाही याबद्यल निर्णय देता येत नाही. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जरी सांगितलेले असले तरी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांनी द्वितीय अपीलामध्ये माहिती उपलब्ध झालेली नाही असे म्हटलेले असल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलकर्ता यांना ना हरकत प्रमाणपत्राच्या संदर्भात झालेल्या कार्यवाहीची टिपणीची माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 8.12.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी तहसिलदार यांनी छायांकीत कागदपत्राच्या स्वरुपात विनामुल्य रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 403/2009.**

श्रीमती वंदना बाळकृष्णा महात्मे
बी 11 श्रीवंदन चिंतामण नगर
वर्धा रोड नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्र. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
परिक्षा नियंत्रक
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत. कोणत्याही प्रकारचा मुदतीचा अर्ज दिलेला नाही.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा कुलसचिव यांचेकडे Information required regarding the meeting of Research and Recognition Committee of Board work Board under the faculty of Social Sciences held on 28-5-08.

1. Notice copy of the meeting with stated agenda.
2. Members present in the meeting with their names & designation
3. Quorum of the meeting of RRC
4. Proceedings of the meeting of RRC

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.10.2008 रोजी उपरोक्त पत्राच्या अनुषंगाने माहितीचा अधिकार अधिनियम 2005

अंतर्गत कलम 11 (1) नुसार आपण मागितलेली माहिती ही गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी तथा परिक्षा नियंत्रक यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 22.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 23.11.2008 रोजी देण्यात आलेला आहे. सदरच्या निर्णयाप्रमाणे दि. 23.12.2008 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती अत्यंत गोपनिय स्वरुपाची असल्यामुळे केंदीय माहिती अधिकारी मधील कलम 8 (छ) (त्र) या तरतुदीनुसार देणे आवश्यक नाही असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 20.7.2009 रोजी सदरच्या अपीलाच्या सुनावणीची नोटिस काढण्यात आलेली होती. परंतु जन माहिती अधिकारी हे हजर झाले नाहीत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून सुध्दा कोणत्याही प्रकारची कागदपत्रे सादर झाले नाहीत हा आयोगाचा अवमान आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच अधिनियमाच्या कलम 19 (8) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाची सुध्दा ही जबाबदारी असल्यामुळे त्यांचे विरुध्द सुध्दा (ग) प्रमाणे शास्ती लादता येते याची नोंद त्यांनी देणे आवश्यक आहे.

4. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे माहितीचे अवलोकन केले असता सदरच्या माहितीच्या संबंधाने अधिनियमाच्या कलम 11 प्रमाणे त्रयस्थ पक्षाची माहिती नाही. असे असून सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती अधिनियमाच्या कलम 11 (1) प्रमाणे पुरविता येत नाही हे जे कळविलेले आहे ती ही बाब माहिती पुरविण्यास टाळाटाळ करण्याची बाब आहे. जन माहिती अधिकारी यांना जर अधिनियमाच्या तरतुदीची माहिती नसेल तर त्यांना त्या पदावर ठेवण्यास हे योग्य नाही व याबाबतची जबाबदारी ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाची आहे. त्यांना जबाबदारी टाळून चालणार नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा जो प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे तो कोणत्याही प्रकारचा निर्णय न देण्याचा उत्तम नमुना आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना नियमांची माहिती नाही अशा प्रकारे भाष्य केलेले आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनासुध्दा अधिनियमाच्या तरतुदींच्या नियमांची माहिती नाही असेच त्या निर्णयावरुन दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) मध्ये त्याच सार्वजनिक प्राधिकरणातील वरीष्ठ अधिका—याकडे अपील दाखल करण्याचा उद्येश असा आहे की जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली नसेल तर सार्वजनिक प्राधिकरणाच्या स्तरावरचा अर्जदारास माहिती उपलब्ध करुन मिळाली पाहिजे असा आहे. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे याबाबतची कोणतीही जबाबदारी पार पाडीत नाहीत व या प्रकरणी सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वतःची जबाबदारी टाळलेली आहे.

5. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये स्वतः युक्तीवाद करतांना आयोगाचे असे निदर्शनास आणले की विद्यापीठाच्या STATUTE-48 मध्ये Procedure of Meetings of the Board of Studies च्या संदर्भात तरतुदी दिलेल्या आहेत व त्यामध्ये त्यांनी मागितलेली माहिती ही गोपनिय आहे अशी तरतुद नाही. तसेच Board of University Teaching and Research मधील नियम 36 A 5 मध्ये there shall be a Research & Recognition committee for each Board of Studies च्या संदर्भामध्ये तरतुदी दिलेल्या आहेत व त्यामध्येसुध्दा गोपनियतेच्या कोणत्याही प्रकारचा नियम नाही. व अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्या बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या (कार्यवृत्त) संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. व त्यामुळे निश्चितच अधिनियमाच्या कलम 10 प्रमाणे सदरची माहिती उपलब्ध करुन देतांना माहितीचे पृथःकरण करणे आवश्यक होते. जी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असे जन माहिती अधिकारी यांना वाटत असेल तर त्या माहितीच्या करीता अधिनियमाच्या कलम 8 (1) चा आधार घेणे संयुक्तिक आहे. परंतु जी माहिती गोपनिय नाही ती माहिती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक असते व बैठकीचा अजेंडा, उपस्थित कोण कोण होते वगैरे माहिती ही निश्चितच गोपनिय नाही व त्याप्रमाणे पृथःकरण करुन अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक होते. व तसे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय देणे आवश्यक होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांना सुध्दा अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींची माहिती असे दिसून येत नाही. व त्यामुळे त्यांनी सदरची माहिती करुन घेणे आवश्यक आहे जेणेकरुन अर्जदारास प्रथम अपीलीय अधिकारी (हे नियंत्रण अधिकारी सुध्दा असल्याने) यांचेच स्तरावर त्याच दिवशी माहिती उपलब्ध करुन देता येईल. तरी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

5. जन माहिती अधिकारी आज आयोगापुढे हजर नाहीत व त्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती लादावयाची झाल्यास त्यांचे म्हणणे परंतुकाप्रमाणे ऐकुन घेणे बंधनकारक आहे व त्यामुळे त्यांनी आयोगा पुढे खुलासा करणे आवश्यक आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 9.9.2008 च्या अर्जामध्ये मागितलेल्या माहिती प्रमाणे चारही मुद्यांच्या संदर्भामध्ये माहिती पृथःकरणाची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द रु. 5000/- ची शास्ती ही कायम होईल.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय योग्यरित्या दिलेला नसल्यामुळे तसेच त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचा निर्णय हा रद्य करण्यात येत आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 265 / 2009.**

श्री प्रदीप पी. बुराडे
बुराडे बिल्डींग सक्करदरा चौक
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी / सक्षम प्राधिकारी
नागरी जमीन कमाल धारणा नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर

2) सहा. नगर रचनाकार
जन माहिती अधिकारी तथा
नागरी जमीन कमाल धारणा नागपूर
जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांची बदली झालेली असल्यामुळे ते हजर नाहीत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केले परंतु ते हजर नाहीत. कनिष्ठ लिपी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 10.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी अर्बन लॅन्ड सिलींग डिपार्टमेंट जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे फाईल नं. SSS-NC/1088(41)/D-XV या नस्तीमधील अर्ज दि. 16.6.88 रोजी जमीन मालकानी केलेला व त्यावरील झालेली कार्यवाही याबाबत एकुण 5 मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. तसेच फाईल नं. NHS-6296/CR-33/ULC-III या नस्तीमधील अर्ज दि.28.6.95 रोजी जमीन मालकानी केलेला व त्यावरील झालेली कार्यवाही याबाबत एकुण 8 मुद्यामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.11.2008 अन्वये अर्जदारास त्यांनी नमुद केलेली मुद्येनिहाय माहिती देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक

22.12.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 27.1.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की सदरच्या मागितलेल्या माहितीमध्ये A भागातील मुद्या क्र. 1 ची माहिती व B भागातील मुद्या क्र. 6 ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यावर जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी कनिष्ठ लिपीक यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी संपूर्ण नस्तीचे अवलोकन केलेले असून त्यातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्यांनी उपलब्ध करुन घेलेली आहे. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की 4–5 वर्षापूर्वी त्यांनी नस्तीची पाहणी केली होती व त्यावेळेस सदरची कागदपत्रे त्या नस्तीमध्ये उपलब्ध होती व त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रतीसुध्दा त्यांचेकडे उपलब्ध आहे. परंतु आज त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती विद्यमान जन माहिती अधिकारी देवू शकत नाही. तसेच कोणत्याही अधिकारी व कर्मचारी यांचेवरती त्याबाबतची जबाबदारी निश्चित करता येत नाही व त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे ती पुरविण्यात आलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी सुध्दा तसे मान्य केलेले असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे व ती पुरविण्यात आलेली असल्यामुळे व तसा प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 259/2009, 260/2009, 261/2009.**

श्री कृष्णा उपासराव वाठ
684 मरारटोली रामनगर
नागपूर 33 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क. 1, सिताबर्डी विभाग
नागपूर
2) श्री व्ही. ए. बोरकर
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दि. 12.3.2009, दि. 16.3.2009, दि. 27.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क. 259/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 12.5.2003 अन्वये जावक क. 663/03 दि. 16.5.2003 (एस.बी.चव्हाण स.प./आ. सिताबडी विभागाचे बद्यल) कॉपी सलिग्न. सविस्तर चौकशी कोणी केली? कधी केली? चौकशीत घेतलेले बयान. चौकशी अहवालाची कॉपी देण्यात यावी. सुनील नायडूचे रितसर विक्री पत्राची कॉपी देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 29.10.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 24.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.12.2008 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे सुचनापत्राचे अनुषंगाने बयान चौकशी अहवाल इत्यादी अपीलकर्ता यांनी मागणी केल्याप्रमाणे माहिती पुरवावी. माहिती अभिलेखावर उपलब्ध नसल्यास त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना कळवावे तसेच अर्जातील माहिती प्रश्नार्थक असल्यामुळे माहिती शासकीय परिपत्रक दि. 16.10.2004 अन्वये पेज नं. 156 वर अनु.क्र.6 कलम 8 (क) पेज

नं. 157 वर अनु.क्र.8 कलम 7 (अ) व (ख) नुसार माहिती देता येणार नाही असे कळवून अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती व दिलेली माहिती ही वेगळी आहे. परतु जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी उल्लेख केलेल्या तारखाच्या संदर्भामध्ये त्यांना सर्व नस्तीतील कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये माहिती शासकीय परिपत्रक क्र. मा.अ.अ. 2004/प्र/क्र. व 135/04/05 मंत्रालय मुंबई 32. दि. 16.10.2004 चा जो उल्लेख केलेला आहे सदरचे परिपत्रक हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम 2002 च्या तरतुदीच्या अनुषंगाने काढलेले होते. व सदरचा अधिनियम हा निरसित झालेला असल्यामुळे सदरचे परिपत्रक सुध्दा रद्य झालेले आहे. केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा संसदेचा अधिनियम असून 2005 पूर्वी काढलेले परिपत्रक तेही महाराष्ट्र अधिनियमाप्रमाणे कसे सुसंगत आहे याचा विचार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी त्यांना हवी असलेली माहिती ही कागदपत्राची पाहणी करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच अपील क्र. 260/2009 व 261/2009 मधील त्यांना जी जी माहिती उपलब्ध झालेली नसेल ती नस्तीचे अवलोकन करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 259/2009, 260/2009 व 261/2009 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन कामकाजाच्या दिवशीची वेळ व तारीख कळवून त्या दिवशी उपस्थित राहुन संपुर्ण संबंधित अभिलेखाची पाहणी करावी व त्यातून उपलबध होणा–या आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.
2) जन माहिती अधिकारी यांना अपीलकर्ता यांनी उपस्थित राहण्याविषयी कळविलेल्या तारखेस व वेळेस त्यांना संपूर्ण नस्त्या पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्या. व सदरची माहिती त्यांना विनामुल्य छायांकीत प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 416/2009, 417/2009, व 419/2009.**

**अपील कमांक 416/2009 व 417/2009**

श्री हरिश्चंद्र सदाशिव हजारे
तर्फे राजेंद्र प्रभाकर वंजारी
हल्ली मु. लोणारा पो. नांद
ता. भिवापूर जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. आर. मारबते
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. निबंधक सहकारी संस्था
चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर

2) श्री घनश्याम रा. ढोणे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती
चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

3) श्री जी. जी. पीसे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
चिमूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.
र.नं.564 ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**अपील कमांक 419/2009**

1) श्री नितिन तायडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

( आदेश पारित दिनांक 24.8.2009 )

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 416/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती यांचेकडे शेतमाल खरेदी विक्री बाबत सन 1995 ते डिसेंबर 2008 पर्यंत या कालावधीतील एकुण 12 मुद्यांवर सर्व आलेल्या शेतमाल विक्री पासून तर झालेल्या संपूर्ण प्रक्रियेची कागदपत्राच्या स्वरुपात मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जावर ह.स.हजारे, रा.प्र.वंजारी,रमेश तेहरकुरे अशा तीन सहया केलेल्या आहेत. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.3.2009 रोजी देण्यात आला असून अपीलार्थी श्री ह.स. हजारे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये दाखल केलेल्या अर्जासंबंधाने आवश्यक असलेल्या रेकॉर्डची माहिती नियमानुसार पुरवावी व अपीलार्थीचे समाधान करुन द्यावे अशा प्रकारची निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेला आहे. त्यानंतर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांचे वकील श्रीयुत राजेंद्र बामेवार यांनी युक्तीवाद करतांना प्राथमिक शेत घेतलेला आहे व त्याप्रमाणे लेखी आक्षेप सुध्दा सादर केलेले आहे. अपीलकर्ता यांनी अपील दाखल करतांना प्रषक म्हणून हरिश्चंद्र सदाशिव हजारे यांचे नाव दिलेले आहे. अपीलकाराचे संपुर्ण नाव राजेंद्र प्रभाकर वंजारी म्हणून नमूद केलेले आहे. त्यानंतर अपीलकाराची सही म्हणून रा.प्र.वंजारी, ह.स.हजार व रमेश रा. खरे अशा प्रकारे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. ते नियमाप्रमाणे नाही. रमेश रा. खरे हे कोणत्याही माहितीचा अर्ज किंवा प्रथम अपीलाच्या बाबत अर्जदार नाहीत व त्यामुळे त्यांना अपील दाखल करता येत नाही. तसेच सदरचे अपील हे मुदतबाहय दाखल केलेले आहे. ज्या आदेशाच्या विरुध्द अपील केले तो आदेश मिळाल्याचा दि. 24.1.2009 असा दाखल केलेला आहे. व अपील दि. 17.6.2009 असा दाखल करण्याचा दिलेला आहे. परंतु याबाबत अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलाच्या निर्णया विरुध्द अपील दाखल न करता माहितीच्या अर्जाच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराच्या विरुध्द अपील दाखल केलेले आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे मुदतबाहय आहे. तसेच दाखल करुन घेता येत नाही असा आक्षेप घेण्यात आलेला आहे व त्या कारणास्तव सुध्दा सदरचे

अपील हे फेटाळण्यास कारणीभूत आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले आहे. दुसरा मुद्दा युक्तीवाद करतांना त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांच्या दि. 30.12.2008 च्या संदर्भात दि. 24.1.2009 रोजी उत्तर दिलेले आहे व अपीलकर्ता यांचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राच्या संदर्भामध्ये आक्षेप घेण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील दाखला सन 2002–2007 या वर्षाचा दाखल केला आहे. मात्र माहिती दि. 31.12.2008 रोजी मागितलेली आहे व त्यामुळे सदरच्या दाखल्याची मुदत संपल्याने तो ग्राहय धरता येत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे व कृषी उत्पन्न बाजार समितीकडे सदरची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. देण्याचा खर्चाची तरतुद नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असेही कळविलेले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये नियमानुसार माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला असल्यामुळे नियमानुसार याचा अर्थ अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा होतो. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती अतिशय व्यापक प्रमाणात असल्यामुळे अधिनियमाच्या कलम 7 (9) प्रमाणे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्या करीता सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर सुध्दा वळवावी लागेल व ते करणे शक्य नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे ही माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असाही युक्तीवाद केला. तसेच अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या मालकीच्या जमीनीचे 7/12 चे उतारे जोडलेले आहे व त्यावरुन अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली येत नाही असे आयोगाचे असे निदर्शनास आणले आहे. अपीलकर्ता यांचेकडे एकुण 4.07 हे.आर., 1.78 हे.आर. तसेच 1.55 हे.आर. एवढी शतजमीन आहे. तसेच त्यांचेकडे ग्रामपंचातीच्या क्षेत्रामध्ये खाली प्लॉट आहे. त्याचे वार्षीक मुल्य 300 रु. आहे तसेच राहाते घर आहे त्या घराच्या संदर्भात वार्षीक मुल्य 513, 270 व 96 अशा प्रकारे मकान कर दिसून येतो. व त्यावरुन अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली येत नाही असे त्यांनी सिध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. तसेच दारिद्रय रेषेखालील उत्पन्नाची मर्यादा वार्षीक रु. 20 हजार आहे व अपीलकर्ता यांचे उत्पन्नाचा विचार केल्यास ते दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र दाखल करुन माहितीच्या अधिकारात गैरप्रकाराने माहिती मागण्याचा प्रयत्न करीत आहे असाही युक्तीवाद त्यांनी केला. त्यावरुन अपीलकर्ता यांनी असे सांगितले की सन 2002 ची जी पाहणी झालेली आहे त्यानंतर नवीन पाहणी झालेली नसल्यामुळे हाच दाखला प्रमाण म्हणून धरण्यात येत आहे. परंतु असे असले तरी अपीलकर्ता यांचेकडे असलेली जी मालमत्ता आहे ती खरोखरच दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारण करण्यास पात्र आहे किंवा नाही ही बाब चौकशी करणे आवश्यक आहे. जेणेकरुन पुढील काळात सदरच्या अधिनियमाचा गैरवापर करणार नाही. व त्यामुळे संबंधित पं. स. चिमूर येथील खंड विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता श्री श्री हजारे हरिश्चंद्र सदाशिव रा. ग्रा.पं. चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर यांचा फॅमिली आय.डी.क्र.7804 असून त्यांचे गुण 29 आहे याबाबतची योग्य ती चौकशी करणे संयुक्तिक राहिल.

यावरुन अपीलकर्ता यांचे अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कोणत्याही तरतुदीचे पालन करणारे नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 417/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी सचिव चिमूर विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या. र.नं.564 यांचेकडे सन 1995 ते डिसेंबर 2008 या 13 वर्षाच्या कालावधीतील संपूर्ण झालेल्या व्यवहाराची माहिती एकुण 5 मुद्यांवर मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.3.2009 रोजी देण्यात आला असून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मध्ये दाखल केलेल्या अर्जासंबंधात आवश्यक असलेल्या संपूर्ण रेकॉर्डची माहिती नियमानुसार ठरवुन दिलेल्या फी चा भरणा करुन घेवून पुरविण्यात काहीही हरकत नाही. परंतु त्यांना महत्वाची आवश्यक ती मर्यादित माहिती विनामुल्य पुरवावी व अपीलार्थीचे समाधान करुन दयावे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलामध्ये वर नमुद केलेल्या अपील क्र. 416/2009 मध्ये जे आक्षेप घेण्यात आलेले आहे तशाच प्रकारे सदरचे अपील दाखल केले असल्यामुळे सदरचे अपील दाखल करुन घेणे सुध्दा आवश्यक नव्हते असा युक्तीवाद जन माहिती अधिकारी यांचे वकील श्रीयुत वा.म.खेळकर यांनी केला. तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थेस कोणत्याही प्रकारची शासकीय मदत नसल्यामुळे डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बॅकेच्या संदर्भामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठानी दिलेल्या निर्णयाप्रमाणे सदरचा अधिनियम संस्थेस लागू होत नाही असा युक्तीवाद केलेला आहे. व त्यामुळे सदरचे अपील फेटाळण्यास पात्र आहे अशी विनंती केली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची जबाबदारी ही पाळलेली नाही व कोणत्याही मुद्याची योग्य ती दखल घेतलेली नाही व निर्णय मात्र विसंगत असा दिलेला आहे असा युक्तीवाद त्यांनी केला. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की सदरच्या संस्थेचे आतापर्यंत लेखी परिक्षण झालेले नाही व भ्रष्टाचार झालेला आहे. याचा अर्थ अपीलकर्ता यांनी 1995 ते डिसेंबर 2008 पर्यंत भ्रष्टाचार झालेला आहे असा निष्कर्ष आधी काढलेला आहे व त्यामुळे माहिती मागितलेली आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपील क्र. 418/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी प्रभारी कृषी अधिकारी श्री जिभकाटे यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून सन 2000 ते डिसेंबर 2008 पर्यंत तालुका कृषी विभाग या अंतर्गत शासकीय योजना व लेखा परिक्षण लाभार्थी यादी तसेच एकुण 4 मुद्यांवर सर्व प्रकल्पांची माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील तालुका कृषी

अधिकारी यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

7. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना आतापर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही परंतु अपील क्र. 416/2009 मध्ये ज्या प्रकारे द्वितीय अपील दाखल केलेले आहे त्याच प्रकारे ह.स.हजारे, रा.प्र.वंजारी यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा करतांना असे सांगितले की सदरील माहिती त्वरीत काढणे फार अवघड असल्यामुळे त्याला काढावयास बराच वेळ लागू शकतो. त्यांनी विशिष्ट एखाद्या गतवर्षीची माहिती मागितले असती तर ती देता आले असते याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कार्यालयात प्रत्यक्ष बोलावून माहिती दि. 30.12.2008 ला दिली. त्यांचे समाधान झाले असावे अशी या कार्यालयाची धारणा झाली. या अर्जदाराने मर्यादित माहितीची मागणी केल्यास त्यांचे समाधान करता येईल असा खुलासा दाखल केलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता ती अतिशय व्यापक प्रमाणामध्ये व सुमारे 9 वर्षातील प्रकल्पाची माहिती आहे व त्यामुळे अधिनियमाच्या कलम 7 (9) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा ही प्रमाणाबाहेर सुध्दा वळवावी लागेल असे दिसते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती ही मर्यादित स्वरुपात असल्यास उपलब्ध करुन देता येईल असे असे दिलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की या संपूर्ण 9 वर्षामध्ये अतिशय भ्रष्टाचार झालेला आहे व त्यामुळेच ही माहिती मागितलेली आहे. यावरुनच अपीलकर्ता यांचा उद्येश दिसून येतो. आधी भ्रष्टाचार झालेला आहे असा निष्कर्ष जर काढून माहिती मागितलेली असेल तर त्यावरुन अपीलकर्ता यांचा उद्येश दिसून येतो. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

8. अपील क्र. 419/2009 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 30.12.2008 रोजी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचे माहिती अधिकारी यांचेकडे सन 2000 पासून ते डिसेंबर 2008 पर्यंत आदिवासी आश्रमशाळा 1. गोंदोज 2. पळसगाव गरडापार ता. चिमूर या आश्रमशाळेतील 1. मुख्याध्यापकाची रोजवही 2. शाळेचे लेखा परिक्षण अहवाल एकुण 16 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्षात घेणार असे नमुद करुन दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 18.3.2009 रोजी देण्यात आला असून तीन अर्जदारानी मिळुन एकत्रित अर्ज करुन चार आश्रमशाळेच्या व्यापक स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे. आदेशाच्या तारखेपासून 7 दिवसात अर्जदाराने आवश्यक असलेल्या माहितीबाबत प्रत्येक माहिती अधिका–याकडे अर्ज सादर करावा. सदर अर्जामध्ये अपीलाअंतगर्गत माहिती व्यतिरिक्त इतर माहितीचा समावेश करु नये. सदर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये असलेला अर्ज प्रत्येक माहिती अधिकारास प्राप्त झाल्यास त्यांनी माहिती अधिका–यांनी पंधरा दिवसात सुनावणीच्या वेळी वरीलप्रमाणे विश्लेषण केलेली माहिती स्वहस्ते किंवा

रजिस्टर पोष्टाने पाठविता येईल असा निर्णय दिलेला दिसतो. तसेच अर्जदाराने ब–याच मुद्यावरील मागितलेली माहिती ही ठोक किंवा Voluminous प्रकारची असल्याने माहिती अधिका–यांनी याबाबत विचार करावा किंवा अर्जदारांना निरीक्षण करण्याचा पर्याय उपलब्ध करुन द्यावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

9. राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलामध्ये वर नमुद केलेल्या अपील क्र. 416/2009 मध्ये जे आक्षेप घेण्यात आलेले आहे त्या सर्व आक्षेपाप्रमाणे द्वितीय अपील आहे. व त्यामुळे ते फेटाळण्यास पात्र आहे असा युक्तीवाद केलेला आहे. त्याचप्रमाणे दारिद्रय रेषेखालील अर्जाचा सुध्दा आक्षेप घेण्यात आलेला आहे. व तसेच सदरची महिती ही आश्रमशाळेच्या स्तरावरील असल्यामुळे अनुदानीत आश्रमशाळा स्वतंत्र एक सार्वजनिक प्राधिकरण असल्यामुळे त्या स्तरावरील माहिती ही माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचेकडे उपलब्ध होवू शकते या कारणास्तव माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांनी स्वतंत्र अर्ज सादर करावा यामुळे सदरचा अर्ज हा हस्तांतर केलेला नव्हता. प्रथम अपीलाचा निर्णय हा स्वयंस्पष्ट आहे व योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

10. अपीलकर्ता यांचे सर्व अपीलाचे संदर्भामध्ये अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता व 3 ते 4 अशा व्यक्ती हया बी.पी.एल.मध्ये आहे. याचा अर्थ त्यांचा या कृषी किंवा इतर खात्याशी कोणत्याही प्रकारचा संबंध येवू शकत नाही. तरीसुध्दा हया संपुर्ण खात्यामधील माहिती त्यांनी जवळ जवळ 10 ते 15 वर्षापर्यंतची मागितलेली दिसून येते. माहिती विस्तृत प्रमाणात व त्यामुळे सार्वजनिक हित साध्य हाईल असे दिसून येत नाही व त्याकरीताचा निधीसुध्दा खात्याकडे उपलब्ध नाही असेही जन माहिती अधिकारी यांनी सादर केले व त्यामुळे वरील अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

1) अपील क्र. 416/2009, 417/2009, 418/2009, 419/2009 ही सर्व खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 407/2009.

श्री प्रशांत शामकांत बागडदेव
भुखंड क्र. 53 दि पोस्टल ऑडीट कॉलनी
राणाप्रताप नगर नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर ... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कामात व्यस्त असल्याने द्वितीय अपीलाच्या सुनावणीस हजर राहू शकत नाही असे पत्र दिलेले दिसून येते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे सुध्दा खुलासा सादर झालेला आहे. परंतु कोणत्याही प्रकारे योग्यरित्या आयोगाकडे चौकशीच्या संदर्भामध्ये खुलासा करता येईल असे जबाबदार अधिकारी त्यांनी पाठविलेले नाही. व त्यामुळे पोलीस खात्यानी आयोगाचा अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी यांनी शासकीय कामात व्यस्त असल्याने द्वितीय अपीलाच्या सुनावणीस हजर राहू शकत नाही असे पत्र पाठविणे हा पोलीसांचा उद्यामपणाचा उत्तम नमुना आहे. प्रत्येक अधिकारी हा शासकीय कामातच व्यस्त असतो व तरीही जन माहिती अधिकारी असल्यास त्यांना आयोगापुंढे सुनावणीस उपस्थित राहणे बंधनकारक आहे. अधिनियमाच्या कलम 19 (5) प्रमाणे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही ही सिध्द करण्याची जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. तसेच त्यांचे विरुध्द शास्ती लादावयाची असल्यास अधिनियमाच्या कलम 20 (1) चे परंतुकाप्रमाणे त्यांचे म्हणणे वैयक्तिकरित्या ऐकुन घेणे बंधनकारक आहे व या दोन कारणास्तव जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे हजर राहणे आवश्यक असते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अधिनियमाच्या कलम 19 (8) (ग) प्रमाणे सुध्दा शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी स्वतः जरी उपस्थित राहिले नाही तरी माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी हे सार्वजनिक प्राधिकरणातील

वरीष्ठ अधिकारी यांचे असल्यामुळे त्यांचेवर सुध्दा आहे. व त्यांनी त्याप्रमाणे अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु खुलाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा टाळाटाळ करण्याचाच प्रयत्न झालेला दिसून येतो. अपीलकर्ता यांनी पृष्ठ क्र.8 वर discharge करावे असे लेखी दिलेले असले तरी ते कोणाला उद्येशून दिलेले आहे याबद्यलचा उल्लेख नाही व त्यामुळे ते ग्राहय धरता येणार नाही. आयोगापुंढे सुनावणीस उपस्थित राहण्यास संबंधित पोलीस अधिकारी टाळाटाळ करतात असे आयोगाचे निदर्शनास आलेले आहे. व कनिष्ठ अधिकारी त्यांना काहीही माहिती नाही अशा अधिका—यांना पाठविले जातात. याबाबतची नोंद घेणे आवश्यक आहे. व ती सार्वजनिक प्राधिकरणाचे प्रमुख म्हणून पोलीस आयुक्त किंवा अप्पर पोलीस महासंचालक यांची जबाबदारी आहे. अन्यथा ही बाब शासनाच्या निदर्शनास आणण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2009 रोजी शासकीय माहिती अधिकारी पोलीस आयुक्त कार्यालय यांचेकडे सोनेगाव पोलीस ठाणे येथे दाखल अपराध क्र. 1/2007 च्या तपासाबाबत मा. पोलीस आयुक्त नागपूर यांना अर्जदाराने सादर केलेली तक्रार त्या अनुषंगाने मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी सहा. पोलीस आयुक्त अंबाझरी यांना दिलेल्या वरील आदेशावर मागील 60 दिवसात तपासण्यात आलेली तथ्ये व तपशिल तसेच संबंधीत दोषींवर करण्यात आलेली कार्यवाही याबाबत अभिलेखाचे स्वरुपात माहिती पुरविण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 19.2.2009 रोजी कार्यवाहीचा चौकशी अहवाल तयार असून अहवालाचे शुल्क रु. 4 या कार्यालयात भरणा करुन माहिती घेवून जावी तसेच पोलीस स्टेशन सोनेगाव दाखल अपराध क्र. 1/2007 गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे या गुन्हयातील तपास सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा –2 नागपूर शहर हे करीत असल्याने या गुन्हयातील संपूर्ण कागदपत्रे त्यांचेकडे असून आपण मागणी केलेली मुद्या क्र. 3 (ब) बाबतची सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा –2 नागपूर शहर तथा माहिती अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करुन प्राप्त करुन घेवू शकतात अशा प्रकारचे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 1.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नसून सदरचे अपीलाचे सुनावणीमध्ये अपीलकर्ता यांनी अभिलेखे discharge करावे असे लेखी दिलेले आहे त्याबद्यलचा खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दाखल केलेला आहे. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व संपूर्ण संपूर्ण विवेचन वर नमूद केलेले आहे. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता यांचे पत्र दि. 22.4.2009 अन्वये दि. 2.5.2009 रोजी स. 11.00 वा. अपीलाच्या सुनावणीस पोलीस मुख्यालयात अर्जदार गेले असता प्रथम अपीलीय अधिकारी श्री के.के.इढोळे 1.5.2009 रोजीच सेवानिवृत्त झाल्याचे सांगण्यात आले. सेवानिवृत्त अधिका—यांच्या जागी रुजू झालेले श्री पठाण साहेब यांनी

अर्जदारास सहा. पोलीस आयुक्त अंबाझरी नागपूर हे पद मागील 1 वर्षापासून रिक्त असल्याचे तोंडी कळविले. सहा. पोलीस आयुक्त अंबाझरी हे पद मागील 1 वर्षापासून रिक्त असल्याची माहिती मुख्यालयास असतांना आमचा अर्ज चौकशी कामी नमूद पदनिर्देशीत कार्यालयाकडे वर्ग केल्याचे पोलीस आयुक्त कार्याल्याकडून कळविण्यात आले. एकंदरीत परिस्थितीचे अवलोकन केले असता दाखल अपराध क्र. 1/2007 हा राजकीय व आर्थिक वर्चस्व असणा—या अज्ञात इसमाच्या सांगण्यावरुन हेतुपुरस्सर नोंदविण्यात आलेला आहे. हया संदर्भात पोलीस प्रशासनाचा सहभाग निश्चित झाल्यामुळे पोलीस आयुक्त कार्यालयाकडून चौकशीचा निव्वळ फार्स करण्यात येत असल्याचे निदर्शनास येते. अशा परिस्थितीत पोलीस प्रशासनातील पथ भ्रष्ट अधिका—यांनी केलेल्या चुकांवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न निदर्शनास आल्यामुळे सदर द्वितीय अपील अर्ज आपणासमक्ष कार्यवाहीस सादर असे कारण दिलेले दिसून येते.

4. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना दि. 19.2.2009 रोजी त्यांच्या अर्जाच्या अनुषंगाने जे उत्तर दिलेले आहे ते मुळात विसंगत आहे. कार्यवाही चौकशीचा अहवाल तयार असून अहवालाचे शुल्क रु. 4 या कार्यालयात भरणा करुन माहिती घेवून जावी असेही कळवून व अपराध क्र. 1/2007 गुन्हयाचा तपास गुन्हे शाखेकडे हस्तांतरीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे या गुन्हयातील संपूर्ण कागदपत्रे सहा. पोलीस आयुक्त गुन्हे शाखा—2 नागपूर शहर यांचेकडे आहे असे विसंगत उत्तर दिलेले आहे. गुन्हे शाखे मधील माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांनी दि. 18.3.2009 मधील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये अर्ज करुन सादर करुन मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकारी सहा. पोलीस आयुक्त अंबाझरी नागपूर यांचे कार्याक्षेत्राशी संबंधित असल्याने आपला मुळ अर्ज माहिती अधिकारी सहा. पोलीस आयुक्त अंबाझरी नागपूर यांचेकडे पाठविण्यात येत आहे व आपण मागणी केलेल्या माहिती संदर्भात त्यांचेशी संपर्क साधावा आयोगाचे निदर्शनास त्यांनी आणले. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा माहिती कशी उपलब्ध करुन देता येणार नाही अशा प्रकारचा खुलासा केलेला आहे. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची दिशाभूल केलेली असल्यामुळे त्यांचेविरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारचा योग्य निर्णय दिलेला नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही अशा प्रकारे संपूर्ण खुलासा दिसून येतो. व त्यामुळे त्यांचेविरुध्द सुध्दा प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. याबद्यलची नोंद मा. पोलीस आयुक्त किंवा मा. अपर पोलीस महासंचालक यांनी घेणे आवश्यक आहे. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 29.1.2009 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती ही संबंधित शाखेकडून उपलब्ध करुन घेवून विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 19.2.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा टाळाटाळ केलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली असल्यामुळे ते दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगापुढे करावा अन्यथा त्यांचे विरुध्द रु. 5000/- ची शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

3) तसेच जन माहिती अधिकारी हे आयोगापुढे सुनावणीस हजर राहिले नाही म्हणून त्यांचे विरुध्द पोलीस आयुक्त यांनी प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

5) सदरच्या पत्राची ची एक प्रत प्रधान सचिव गृह विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे माहितीसाठी पाठविण्यात यावी.

6) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 429 / 2009.**

श्री भाऊराव चिंतामण चांदेकर
अमोल डेली निडस ॲण्ड टेलीकॉम सेंटर
चंद्रपूर वडगाव पोलीस चौकीजवळ
नागपूर रोड, चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक (मुख्यालय)
चंद्रपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक (मुख्यालय)
चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उा अधिक्षक (मुख्यालय) चंद्रपूर यांचेकडे बाजार वार्ड मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयामागील भागातील वाहनतळाबाबत एकुण तीन मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 13.3.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलकर्ता यांनी दि. 4.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 15.6.2009 रोजी उत्तर दिलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 18.5.2009 रोजी प्रथम अपीलाचा व प्रथम अपीलीय अधिकारी यांना पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. असे असून सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की वाहनतळ कोणत्या जागेत करावे याबाबतचा अधिकार हा पोलीस खात्यास नाही व अशा प्रकारचा अधिकार हा नगर परिषदेस असल्यामुळे नगर परिषदेकडून ती माहिती उपलब्ध होवू शकेल. वाहनतळ नसतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयामागील भागात वाहने पार्क केली जातात. ती बंद करण्यात यावे. परंतु माहितीच्या अधिकारात माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते व तशी ती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 430/2009.**

श्री रविंद्र जिभकाटे
आर आय एल स्टाफ कॉलनी
क्वार्टर नं. बी 1/20
रामटेक रोड रहाडी मौदा
ता. मौजा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दयाराम राठोड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती मौदा
ता. मौजा जि. नागपूर

2) श्री किशोर अलोणे
जन माहिती अधिकारी तथा
सचिव
गट ग्रामपंचायत नानादेवी
ता. मौजा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.2.2009 रोजी सचिव गट ग्रामपंचायत नानादेवी यांचेकडे सौ. बयाबाई हरिश्चंद्र बावणे मु. डहाली यांचे इंदिरा आवास मंजुरीबाबत. माहितीचा कालावधी 2007–2008/09

1. त्यांनी ज्या जागेवर बांधकाम करीत आहेत त्या जागेची टॅक्स पावतीची झेरॉक्स प्रत
2. सचिव हयांनी स्वतःची जागा असल्याचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत
3. पायवा खोदकाम झाल्याचे सचिव यांचे प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत

सदरची माहिती यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 2.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले

दिसून येते. व त्यानंतर दि. 24.4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि. 28.4.2009 रोजी खंड विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी गट ग्रामपंचायत नानादेवी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये सौ. बयाबाई हरिश्चंद्र बावणे यांना घरकुल योजनेमध्ये जागा मंजुर झालेली आहे अशा प्रकारची माहिती त्यांनी विचारलेली आहे. सौ. बयाबाई हरिश्चंद्र बावणे यांनी ज्या जागेवर बांधकाम करीत आहेत त्या जागेची टॅक्स पावतीची झेरॉक्स प्रत मागितली व त्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच गट ग्रामपंचायत नानादेवी च्या क्षेत्रात सदरचे बांधकाम येत नसल्यामुळे मुद्या क्र. 2 व 3 चा प्रश्न उदभवत नाही तसे त्यांना कळविलेले आहे. अपीलकर्ता यांनी जशी माहिती विचारलेली आहे तसे उत्तर दिलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की नानादेवी गट ग्रामपंचायतीच्या मध्ये सौ. बयाबाई हरिश्चंद्र बावणे यांना घरकुल योजनेमध्ये जागा मंजुर झाले आहे किंवा नाही याबाबत माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु तशी ती अपीलकर्ता यांनी सुध्दा विचारलेली नाही. याबद्यल अपीलकर्ता यांनी स्वतःच अर्ज वाचावा. असे असले तरी गट ग्रामपंचायत नानादेवीच्या हद्यीमध्ये सौ. बयाबाई हरिश्चंद्र बावणे यांना घरकुल मंजुर झाले असून त्याची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा सचिव गट ग्रामपंचायत नानादेवी यांनी सौ. बयाबाई हरिश्चंद्र बावणे यांना गट ग्रामपंचायत नानादेवी या ग्रामपंचायतीच्या क्षेत्रामध्ये इंदिरा आवास मंजुरीबाबतची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. व पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 436/2009.**

श्री राजु शंकरराव निकोसे
मु. पो. सावरी (बिडकर)
ता. चिमूर (वरोरा) जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. डब्लु आखाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार
तहसिल कार्यालय चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिल कार्यालय चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय चिमूर यांचेकडे भोगवटदार वर्ग–2 च्या जमिनिचा भोगवटदार वर्ग–1 मध्ये रुपांतर झाले कि नाही सौ. अंजनाबाई शंकर निकोसे रा. सावरी भूमापन क्र. 191 ज्या संदर्भात तसेच दि. 25.5.2007 रोजी दिलेल्या अर्जामधील कार्यवाही इत्यादी माहिती एकुण 4 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 13.9.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही प्रथम अपीलाचा निर्णय व त्यानंतरही प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही म्हणून दि. 1.4.2009 रोजी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. त्यांनी असे सांगितले की सदरचा अर्ज त्यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झाला नाही. प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी सुध्दा आयोगाकडे असे सांगितले की सदरचे अपील त्यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झाला नाही. परंतु अपीलकर्ता यांच्या द्वितीय अपील मेमोसोबत दि. 6.2.2009 रोजीच्या अर्जाची प्रत प्राप्त झालेली असल्यामुळे त्याप्रमाणे माहितीचा शोध घेवून उपलब्ध करुन देता येईल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत त्यांच्या दि. 6.2.2009 च्या अर्जाच्या अनुषंगाने विनामुल्य रजिस्टर पोष्टाने माहिती उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 434 / 2009.**

श्री महादेव श्रावण डोये
मु. पो. एकार्जूना
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री यु. वाय. काळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर

2) श्री रविंद्र माने
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.5.2009 रोजी शासकीय माहिती अधिकारी तहसिलदार वरोरा यांचेकडे दि. 12.4.2008 दिलेल्या अर्जाच्या संदर्भात झालेली कार्यवाही तसेच तंटामुक्ती अध्यक्षाकडून आदेशाची प्रत घेवून उपलब्ध करुन द्यावी. तसेच रस्ता व पाणी मिळण्यासाठी व्यवस्था करावी अशी माहिती टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 9.7.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 8.5.2009 रोजी द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अर्जदाराचा दि. 23.5.2008 चा अर्ज त्यांचे विनंती नुसार दि. 16.6.2008 रोजीचा अर्ज अर्ज त्यांचे विनंतीनुसार दिनांक 16.6.2008 रोजी अध्यक्ष महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती एकार्जुना यांचेकडे पाठविण्यात आला. सदर तंटामुक्त समितीने दि. 23.7.2008 रोजी सभा घेवून अर्जदाराचा

अर्ज निकाली काढला. त्याची प्रत यासोबत जोडली आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचा रस्ता व पाणी मिळण्यासाठी व्यवस्था करावी हि विनंती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये मान्य करता येत नाही. व त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 435 / 2009.**

श्री नत्थू अमृतराव मडावी
मु. पो. नवतळा
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री यु. वाय. काळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर

2) श्री डी. डब्लू आखाडे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार चिमूर
ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 31.1.2009 रोजी मौजा नवतळा येथे वाटप झालेल्या जमिनीचा ताबा लाभार्थीना देण्यासाठी निघालेल्या आदेशाप्रमाणे लाभार्थीला ताबा कोणत्या तारखेला देण्यात आला त्याबद्यलची पोच पावतीची सत्यप्रत सन 1976–77 शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 27.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.3.2009 रोजी देण्यात आला असून मुळ प्रकरणाचा शोध घेवून त्यातून अपीलार्थीस आवश्यक असलेली कागदपत्रे ताबा पावती व माहिती 7 दिवसाचे आंत देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की असतापर्यंत कोणतेही कागदपत्रे शोध घतला असून सुध्दा उपलब्ध झाली नाही. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे हे आवश्यक असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखागारात किंवा इथस्ततः जिथे अभिलेख असतील त्या अभिलेखेमधून किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात सदरचे अहवाल सादर झालेले असल्यास त्यातून माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती ही उपलब्ध करुन देण्याकरीता तहसिल कार्यालयात ज्या ज्या ठिकाणी अभिलेखे असतील त्यात शोध घ्यावा. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सुध्दा शोध घ्यावा. व शोध घेतल्यावर माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तक्रार आल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 432/2009.**

श्री अजवरखान अ. रहमान खान,
अध्यक्ष छोटी मस्जीद ट्रस्ट
कस्तुरबा रोड, स्टेट बॅक समोर
चंद्रपूर 442402 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बोरकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.2.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तहसिलदार यांचेकडे तहसिलदार चंद्रपूर यांचे आदेश दि. 21.1.1983 व उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांचे आदेश दि. 17.9.1983 सर्व्हे नं. 221 मोका वहीवाट व ताबा याबाबत सद्याचा तपशिल. आदेशाच्या प्रती देवून उक्त दोन्ही नस्ती निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणेबाबत. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 30.1.2009 रोजी देण्यात आला असून जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार चंद्रपूर यांनी उक्त प्रकरणात अपिलार्थीस माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 7 अन्वये माहिती देण्यास कसुर केला आहे. तथापी पुढे असे आदेशीत करण्यात येते की माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती 15 दिवसाचे आत अर्जदारास पुरवावी आदेश दिलेले दिसून येतात. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अर्ज प्राप्त झाल्यानंतर दि. 8.12.2008 रोजी अपीलकर्ता यांना विषयांकीत प्रकरणाचा अभिलेखागार कक्षात शोध

घेतला असता संबंधीत प्रकरण अभिलेखागार कक्षात मिळाले नाही. अजुनही सदर प्रकरणाचा शोध घेणे सुरु असुन प्रकरण प्राप्त होताच तात्काळ पुरविण्याची दक्षता घेण्यात येईल असे कळविलेले होते असे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की तसे कोणतेही पत्र त्यांना मिळालेले नाही व माहिती सुध्दा उपलब्ध झालेली नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये जन माहिती अधिकारी तहसिलदार कार्यालय यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास कसुर केलेला आहे असा निष्कर्ष काढलेला आहे. परंतु अपीलार्थीने उपरोक्त प्रकरणातील कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती मिळण्याकरीता अर्ज सादर केला असून प्रकरणाचा शोध घेण्याचे सुरु आहे असे प्रथम अपीलाच्या निर्णयात आलेले आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. मागितलेली माहिती ही 1983 या वर्षातील आहे व त्यामुळे जुनी माहिती मागितल्यावर शोध घेवून उपलब्ध करुन देण्यास विलंब लागू शकतो व त्याप्रमाणे त्यांना कळविलेले आहे. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होण्यापेक्षा शास्ती लादावी यात जास्त रस दिसून आला आहे. अपीलकर्ता यांनी स्वतः त्यांची बाजू मांडलेली नाही. परंतु त्यांची बाजू ज्या प्रतिनिधीने मांडली ते महसून खात्यातून सेवानिवृत्त झाले असल्याने त्यांना दंड करण्यात जास्त रस दिसून येतो. अपीलकर्ता यांनी एकाही शब्दाने त्यांची बाजू आयोगापुढे मांडलेली नाही. परंतु अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना उपलब्ध करुन देणे व त्याकरीता प्रयत्न करणे हे आवश्यक आहे. त्यामुळे पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण तहसिल कार्यालयातील अभिलेखाचा शोध घेवून किंवा जिल्हाधिकारी कार्यालयात शोध घेवून जन माहिती अधिकारी यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांनी दि. 6.11.2008 रोजी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत कसून शोध घेवून उपलब्ध झाल्यास व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 व्या दिवशी कामकाजाच्या दिवशी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून माहिती उपलब्ध झाल्यास उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 428/2009.**

श्री ईश्वर कृष्णाजी रागीट
पेठ वार्ड राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त
परिमंडळ औरंगाबाद
ता. जि. औरंगाबाद

2) श्री प्रकाश भगनलाल अग्रवाल
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
छावणी विभाग
ता. औरंगाबाद जि. औरंगाबाद ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन बेगमपुरा औरंगाबाद यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. अर्जदाराने महा. राज्य वक्फ बोर्ड पानचक्की औरंगाबाद येथे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री एम वाच पटेल औरंगाबाद व डेपुटी वक्फ आफिसर अब्दुल बाशिद बियाबानी रा. राजुरा जि. चंद्रपूर यांनी खोटे बनावटी दस्ताऐवज तयार केल्यामुळे खोटा पुरावा तयार करुन खोटे प्रमाणपत्र तयार करुन जुन्या तारखेत बनावटी कागदपत्र तयार करणा–यावर फौजदारी कार्यवाही करण्याबाबत व गुन्हा नोंद करण्यातबाबत दि. 25.10.2008 रोजी तक्रार दिली होती व ती तक्रार दि. 1.11.2008 ला पोस्टल रसिद नंबर 1062 नुसार रजिस्टर्ड पोस्टाने पाठविण्यात आली होती. ती तक्रार आपणास दि.

16.11.2008 रोजी मिळालेली आहे. या तक्रारीवर आपण तर्फे झालेल्या कार्यवाही सविस्तर माहीतीची प्रमाणित प्रत तसेच अर्जदाराने दिलेल्या तक्रार अर्जाची प्रमाणित प्रत.
2. महा. राज्य वक्फ बोर्ड पानचक्की औरंगाबाद यांनी वक्फ ॲक्ट 1995 चे कलम 36 व 37 नुसार रजिस्टेशनबाबत तयार केलेला बोगस बनावटी रेकॉर्ड जप्त करण्याबाबत झालेल्या कार्यवाहीच्या सविस्तर माहीतीची प्रमाणित प्रतीसह
3. चौकशी दरम्यान साक्षबयाण घेतले असल्यास त्या बयाणाच्या प्रमाणित प्रती
4. सदर तक्रार अर्जावर कार्यवाही झाली नसल्यास त्यामागील कारणे
5. वरील तक्रार अर्जातील चौकशी ज्या अधिका–याकडे सोपविण्यात आली त्या अधिका–याचे संपुर्ण नाव पत्ता व फोन अथवा मोबाईल नंबर
6. पोलीस स्टेशन अधिकारी बेगमपुरा औरंगाबाद पोलीस स्टेशन औरंगाबाद येथील मुख्य ठाना अधिकारी यांचे नाव पत्ता व फोन अथवा मोबाईल नंबर

सदरची माहिती अर्जदारास पत्त्यावर पाठविण्यात यावे असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 9.2.2009 रोजी मुद्दा क्र. 1, 5 व 6 ची माहिती दिली परंतु मुद्दा क्र. 2 ते 4 ची माहिती दिली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 4.3.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 20.3.2009 रोजी देण्यात आला असून अद्याप पावेतो माहिती प्राप्त झाली नाही सहा.जन माहिती अधिकारी वक्फ बोर्डकडून माहिती लवकरात लवकर प्राप्त करुन घ्यावी व ती अपीलार्थी यांना द्यावी अशा सुचना दिल्या आहेत. त्यावर अपीलार्थी यांचे समाधान झाल्याने सदरचा अपील अर्ज निकाली काढण्यात आला आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी जी माहिती मागितली त्याप्रमाणे त्यांना आतापर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. परंतु अपीलकर्ता यांना दि. 24.3.2009 रोजी वक्फ बोर्डकडून प्राप्त झालेली कागदपत्रे अनुक्रमे 1 ते 11 आले त्याप्रमाणे माहितीसाठी रजिस्टर्ड पोस्टाने पाठवित आहोत असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यातून त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झालेली नाही. व अपीलकर्ता यांना सदरच्या प्रकरणात गुणवत्तेच्या बाबत तक्रार दिसून येते. व त्याबाबत त्यांना तपास करुन पाहिजे आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही झालेल्या कार्यवाहीची कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये कोणत्या प्रकारची कार्यवाही झालेली आहे ती कार्यवाही त्यांना कळविलेली आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना मा. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणाची माहिती नाही. परंतु रिट पिटीशन क्र. 2245/2008 हा ईश्वर कृष्णाजी रागीट आणि इतर यांनी दाखल केलेल्या व महा. राज्य वक्फ बोर्ड पानचक्की औरंगाबाद हे Respondent नं. 1 आहे व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरच्या प्रकरणातील

त्यांना माहिती नाही असे त्यांचे म्हणणे ग्राहय धरता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी जी कार्यवाही केलेली आहे त्या कार्यवाहीची संपूर्ण कागदपत्रे पुन्हा सरकारी वकीलाचे अभिमतासहीत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 27.12.2008 च्या अजात मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये झालेल्या सर्व कार्यवाहीची टिपणी सरकारी वकीलाचे अभिप्राय व इतर कागदपत्राच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.व पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 431 / 2009.**

श्री अब्दुल रब व. हाफिज मो. सईद
ईस्माईल पुरा कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रधान
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर

2) श्री बोरकर
जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.11.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेकडे शौचालय व बाउंडरी बनाने के लिये नियम की व एम.एम.रब्बानी स्कूल / संस्था द्वारा बनाये गये शौचालय व बाउंडरी बांधकाम की माहिती तसेच दि. 16.9.2008 व 20.10.2008 ला दिलेल्या तक्रारीवरील कार्यवाही अशा प्रकारे एकुण 5 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 12.1.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता यांनी दि. 6.3.2009 रोजी एम.एम.रब्बानी स्कूल / संस्था यांनी शौचालय व बाउंडरी बांधकामा करीता नगर परिषद कामठी कडून कोणतीही परवानगी घेतलेली नाही असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी

यांचेकडे 3 मुद्यांवर माहिती दिली परंतु 2 मुद्यांवर माहिती दिली नाही असा आक्षेप घेतलेला दिसून येतो. व यावरुन अपीलकर्ता यांना निश्चित काही मुद्यांची माहिती उपलब्ध झाली व काही मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही हे निश्चित होत नसल्यावर सुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपीलामध्ये कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार झाला किंवा नाही याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना नियमाची माहिती उपलब्ध झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अंतर्गत बांधकामाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे नियम अंमलात नाही व त्यामुळे कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना अंतर्गत बांधकामाच्या संदर्भात नियम नाहीत अशा प्रकारे स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.11.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने मुद्यां क्र. 1 ची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 28.5.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 424/2009.**

श्री किसनराव मारोतराव रेवतकर
कबीर नगर प्लॉट नं. 26
उमरेड रोड एन आय टी बगिच्याजवळ
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजेंद्र दाभेराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपनिबंधक
सहकारी संस्था नागपूर शहर 1,
185 आयुर्वेदिक लेआऊट भांडे प्लॉट चौक
उमरेड रोड नागपूर.

2) जन माहिती अधिकारी तथा
सचिव
दि कबीर नगर सहकारी सहभागीदारी
गृह निर्माण संस्था मर्या.
कबीर नगर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.1.2009 रोजी अध्यक्ष/सचिव यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून दि कबीर नगर सहकारी सहभागीदारी गृह निर्माण संस्था मर्या. यांचेकडे संस्थेतील नियमबाहय कामकाजाविषयी कागदपत्रे पुरविणेबाबत. तसेच दि. 5.8.2008 रोजी सुध्दा संस्थेकडे केलेल्या अर्जातील माहिती पुरविणेबाबत. एकुण 8 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः हमदस्त घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 4.2.2009 रोजी सहकारी संस्था ''माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कायद्याच्या कलम 2 (एच–ज) च्या व्याख्येत येत नसल्याने आपला दि. 6.1.2009 चा अर्ज संस्थेच्या कार्यालयात नत्थी करण्यात आलेला आहे. कृपया नोंद

घ्यावी. आणि विनाकारणचा पत्रव्यवहार थांबविण्यात यावा असे कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा दि. 14.1.2009 रोजी सुध्दा उत्तर दिलेले दिसून येते. तसेच दि. 5.8.2008 च्या अर्जावर दि. 16.8.2008 रोजी संस्थेच्या व्यवस्थापक समिती सभेत विचारविनियमाकरीता ठेवण्यात येईल असेही कळविण्यात आलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. बामेवार हे हजर झालेले आहेत. लेखी खुलासा सुध्दा अपीलार्थी तर्फे अधिवक्ता यांनी दाखल केलेला आहे. मुद्दा क्र. 1 व 2 च्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आलेले नाही व त्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच इतर मुद्याच्या बाबत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असा युक्तीवाद त्यांनी केला. वास्तविक या संपुर्ण प्रकरणात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 427/2009.**

श्री गौतम भिकाजी वासनिक
मु. पो. बुधवारी पेठ वार्ड क्र. 3
ता. उमरेड जि. नागपूर 441203 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुनिल वारे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
नागपूर

2) श्री बळीराम कि. राऊत
जन माहिती अधिकारी तथा
प्राचार्य
ज्योतिराव फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड
सत्यम सभागृहाचे बाजुला उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.12.2008 रोजी जन माहिती अधिकारी प्राचार्य ज्योतिराव फुले समाजकार्य महाविद्यालयाच्या माध्यमातून विविध शैक्षणिक उपक्रम बी सी एस, बीसीए, बी कॉम, डीसीसी, बी.एस.डब्लू, एम.एस.डब्ल., बी बी एम, बी लिब., एम लिब. या अभ्यासक्रमाची व इतर माहिती मिळण्याबाबत. सन 2005—06, 06—07, 07—08 या कालावधीतील माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की दि. 3.12.2008 रोजी कार्यालयातील लिपीकाने अर्ज घ्यावयाचे नाकारले. तोच अर्ज प्राचार्य यांनी घ्यावयाचे नाकारले त्यामुळे सदर अर्ज दि. 5.12.2008 रोजी रजिस्टर पोष्टाने पाठविला. दि. 12.1.2009 ला अपीलकर्ता यांना पत्र दिलेले आहे. व सदरच्या पत्रामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 2.2.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भात दि. 5.2.2009 रोजी ज्योतिराव फुले

समाजकार्य महाविद्यालय उमरेड या विभागा अंतर्गत येत नसल्यामुळे आपण सादर केलेली कागदपत्रे यासोबत परत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यांनी प्राचार्य ज्योतिराव फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड यांना पत्र दिलेले दिसून येते. व त्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. तसेच दि. 17.4.2009 रोजी सुध्दा पत्र दिलेले आहे. त्याप्रमाणे दि. 13.1.2009 रोजी सुध्दा उत्तर दिलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना प्राचार्य तथा माहिती अधिकारी यांनी दि. 4.4.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानंतर सुध्दा दि. 11.8.2009 रोजी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना प्रत कार्यकारी प्राचार्य यांनी दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व जी माहिती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे बी.लिब. च्या संदर्भातील माहिती ही वेगळया महाविद्यालयातील असल्यामुळे त्यांनी त्या महाविद्यालयातून मागावी असे माहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 425/2009.**

श्री अरुण थॉमस फरेरा
(छोटी गोल बंदी क्र. 85/09)
मध्यवर्ती कारागृह नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पंकज गुप्ता
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त पोलीस महासंचालक कार्यालय
(नक्षलवादी विरोधी मोहीम) नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
अतिरिक्त पोलीस महासंचालक कार्यालय
(नक्षलवादी विरोधी मोहीम) नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. सरेंद्र गडलिंग हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी अतिरिक्त पोलीस महासंचालक (नक्षलवादी विरोधी मोहीम) नागपूर यांचेकडे Information dealing with the factual involvement of the applicant in Naxalite related crimes in Maharashtra या संदर्भामध्ये a to f या मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 29.4.2009 रोजी अपीलकर्ता हा नागपूर येथील पोलीस आयुक्त यांचे क्षेत्रात अटक झालेली असल्यामुळे त्यांनी त्यांचेकडे माहिती मागावी असे कळविलेले दिसून येते. तसेच The ADGP, ANO is concerned with co-ordination and collection of intelligence etc in the State as well as with the adjoining States and Centre and has no territorial jurisdiction regarding in the investigation of crime. Therefore it is requested that the appropriated authorities should be approach for seeking the information. परंतु सदरच्या उत्तराने

समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 23.4.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा व अर्जाचे उत्तर हे दि. 29.4.2009 रोजीच दिलेले आहे. ते वरप्रमाणे दिलेले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचेतर्फे ॲड. सरेंद्र गडलिंग हे हजर झालेले आहेत. व त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की अर्जदार हा नक्षलाईट कैदी आहे. परंतु त्यास एखाद्या न्यायालयाने मुक्त केल्यानंतर लगेच दुस–या कुठल्या तरी कारणास्तव अटक करण्यात येते व त्यामुळे अशा प्रकारे महाराष्ट्रात त्याचे विरुध्द कोणकोणत्या पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल झालेले आहेत ही माहिती त्यांनी मागितलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की ADGP, ANO हे फक्त समन्वय साधणारे अधिकारी आहेत. महाराष्ट्रातील कोणकोणत्या पोलीस ठाण्यामध्ये अर्जदार याचे विरुध्द नक्षलवादी म्हणून कोणकोणते गुन्हे दाखल झालेले आहेत याबद्यलची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नसते. कारण ज्या पोलीस ठाण्याकडे गुन्हा दाखल होतो त्याबद्यलची तपासणीची जबाबदारी त्या त्या पोलीस ठाण्याला असते. तसेच कोणत्याही आरोपीच्या विरुध्द गुन्हा जर दाखल झालेला असेल तर त्याबाबतची फिर्यादीची प्रत ही आरोपीस देण्यात येते व त्याप्रमाणे जर महाराष्ट्रातील कोणत्याही पोलीस ठाण्यामध्ये अर्जदाराचे विरुध्द गुन्हे दाखल झाले असेल तर त्यांना त्याबाबतची प्रत प्राप्त झालेली असेल. तसेच फौजदारी दंड संहिता प्रमाणे जोपर्यंत गुन्हयाचा तपास सुरु आहे तोपर्यंत व आरोपपत्र न्यायालयात सादर होत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 मध्ये सुध्दा गुन्हयाच्या तरतुदीच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. व त्यामुळे तशी माहिती एखाद्या पोलीस ठाण्याकडे जर असेल तर ती उपलब्ध करुन देता येणार नाही. व वर नमुद केल्याप्रमाणे ADGP, ANO हे कोणत्याही परीस्थितीत गुन्हेगारा विरुध्द माहिती उपलब्ध करुन देण्यास सक्षम अधिकारी आहे असे नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे उत्तर बरोबर असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे उत्तर बरोबर असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 447/2009.**

श्री उदयभान दमडुजी मालाधारी
प्लॉट क्र. 44 रोड क्र. 10
विश्वकर्मा नगर, मडीकलच्या मागे,
नागपूर 27 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वि. द. धापके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती नागपूर
2) श्री बांते
जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विस्तार अधिकारी
ग्रामपंचायत बेसा
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.3.2009 रोजी जन माहिती अधिकारी तथा ग्राम विस्तार अधिकारी ग्रामपंचायत बेसा यांचेकडे बेसा परिसरातील भूखंडधारकांनी ग्रा.पं. कराचा भरणा दि. 31.3.2009पर्यंत करावा अन्यथा ग्रा.पं.त्यांचे म्युटेशन रद्य करील अशी नोटीस ग्रा.पं.ने दि. 17.3.2009 च्या लोकमत मध्ये दिलेंली आहे. कराचा भरणा वेळेच्या आंत न केल्यास ग्रा.पं.ला म्युटेशन रद्य करण्याचा अधिकार कोणत्या अधिकारान्वये प्राप्त झालेला आहे त्या अधिकाराची अथवा परीपत्रकाची साक्षांकीत प्रत देणे बाबत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना दि. 26.3.2009 रोजी आपणाला लागणा—या कागदपत्राची फी रु. 75/— ग्रा.पं.कार्यालयामध्ये भरुन आपले कागदपत्रे ग्रा.पं.मधून जावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 15.4.2009 रोजी सुध्दा असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 6.6.2009 रोजी सुध्दा माहिती तयार आहे घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. पैशाचे पत्र दिले असता घेण्यास नकार दिला असा शेरा दिलेला दिसून येतो. दि. 26.3.2009 चे पत्र अपीलकर्ता यांना दि. 30.

4.2009 रोजी देण्याचा प्रयत्न झालेला आहे व त्यात मालाधारी माहितीचे कागदपत्र घेण्यास आले असता तयार नसल्यामुळे देवू शकले नाही असे सौ. सुनिता वानखेडे यांनी शेरा दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी दि. 11.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 29.7.2009 रोजी अपीलकर्ता यांना माहिती रजिस्टर पोष्टाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना शासन निर्णय उपलब्ध झालेला आहे असे त्यांनी मान्य केले. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना नंतर माहिती उपलब्ध झाली असली तरी त्याबाबतचा द्वितीय अपीलात कोणत्याही प्रकारचा उल्लेख दिसून येत नाही.

3. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जासोबत जी नोटीसची प्रत दाखल केलेली आहे ती नोटिस ही सरपंच यांनी काढलेली आहे. त्याबाबत खंड विकास अधिकारी यांनी खुलास करतांना असे सांगितले की मालमत्ता धारक हे ग्रा.पं.कडे टॅक्स भरत नसतात व थकबाकी वाढत जाते व त्यामुळे अशाप्रकारचे कार्यक्रम राबविले जातात. व त्याप्रमाणे सरपंच यांनी नोटिस काढलेली आहे. प्रत्यक्षात म्युटेशन रद्य होत नाही याची जाणीव सचिव व खंड विकास अधिकारी यांना आहे. परंतु त्याशिवाय कराचा भरणा होत नाही असेही सत्य आहे. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु अपीलकर्ता यांना रु. 75/— हे खर्चाचा भरणा करण्याकरीता कळविण्यात आलेले आहे. खर्चाचा भरणा कळवितांना पृष्ठ किती, पोस्टेजचा खर्च व इतरही माहिती कळवावी लागते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांनी रजिस्टर टपालाद्वारे माहिती मागितलेली आहे. व त्यामुळे रजिस्टर टपालाचा खर्च व शासन निर्णयाच्या प्रतीचा खर्च याप्रमाणे त्यांना कळविण्यात आलेले होते. असे असले तरी त्यानंतरही कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिली नाही हे त्याच कार्यालयातील लिपीकानी अपीलकर्ता यांचे अर्जावर लिहुन दिलेले असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचंकडे कोणतीही माहिती उपलब्ध नव्हती असे दिसते. असे असले तरी त्यानंतर माहिती उपलब्ध झालेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीनुसार सरपंच यांनी काढलेली नोटिस ही कायदेशीर नाही असे दिसून येते. त्याबाबत अपीलकर्ता यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे ग्रा.पं. अधिनियमाप्रमाणे तक्रार करणे आवश्यक राहिल. परंतु माहिती विनामुल्य उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती विनामुल्य उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 448 / 2009.**

सौ. साधना राजेंद्र हिवंज
रमा नगर बॅक ऑफ इंडिया कालनीच्या मागे
आलोडी ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधिक्षक
वर्धा
2) श्री बी. बी. डोंगरे
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उप अधिक्षक
पोलीस अधिक्षक कार्यालय
वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2009 रोजी राज्य जन माहिती अधिकारी महिला सुरक्षा विशेष कक्ष अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा यांचेकडे सौ. रेणु राजेश बुचे, राजेश ल. बुचे यांच्या दि. 2.3.2009 रोजी दिलेल्या बयाणाची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.3.2009 रोजी अर्जदार यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबद्यल सौ. रेणु राजेश बुचे यांना पत्र दिलेले दिसून येते. व सदरच्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्यावर दि.29.3.2009 रोजी अपीलकर्ता यांनी अर्ज दिलेला आहे. व त्यात माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा आक्षेप घेण्यात आलेला दिसून येतो. कलम 11 (2) च्या बाबत कोणत्याही प्रकारे त्रयस्थ पक्षाची माहिती होत नाही असाही आक्षेप घेतलेला आहे. दि. 4.4.2009 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सौ. रेणु राजेश बुचे हिने दि. 23.3.2009 रोजी या कार्यालयास कळविले आहे. यांच्या संबंधातील कोणतेही कागदपत्र यांच्या

जिवनाशी निगडीत असल्यामुळे व ते उघड केल्यास माझा संसार पुर्णतः उधवस्त होवू शकतो. करीता सदर माहिती उघड करता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 13.5.2009 रोजी पुन्हा सदरची माहिती उघड करणे शक्य होणार नाही असेही कळविलेले दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीच्या प्रमाणे मागितलेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. सौ. रेणु राजेश बुचे हिने तक्रार ही त्रयस्थ पक्षाची माहिती आहे असे जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय हा योग्य नाही. त्यावर जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे स्वतः हजर नाहीत परंतु त्याचे प्रतिनिधी यांनी असे सांगितले की सौ. रेणु राजेश बुचे यांनी दिलेल्या बयाणाच्या प्रतीच्या संदर्भामध्ये व तक्रारीच्या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

सौ. साधना राजेन्द्र हिवंज रा. वर्धा यांच्या विरुध्द सौ. रेणु बुचे हिने या कार्यालयातील महिला तक्रार निवारण कक्ष येथे दि. 5.2.09 ला श्री राजेश बुचे (पती) व साधना राजेन्द्र हिवंज यांचे विरुध्द तक्रार केली होती. तक्रारीचे पत्र सोबत जोडले आहे. सदर अर्जाबाबत सौ. साधना हिवंज हिने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये या कार्यालयास दि. 6.3.09 ला दोन अर्ज सादर केले. एका अर्जामध्ये रेणु बुचे हिने दिलेल्या तक्रारी वरुन रेणु बुचे व राजेश बुचे यांच्या बयानाची प्रत मागीतली आहे व दुस–या अर्जात सौ. रेणु बुचे हिने अर्जदारा विरुध्द केलेल्या तक्रारीची सत्यप्रत मागीतली आहे. सदर माहिती ही महिला तक्रार निवारण कक्षास संबंधीत असल्यामुळे सदरहु अर्ज महिला तक्रार निवारण कक्षास दि. 12.3.09 ला पाठविण्यात आला. महिला तक्रार निवारण कक्ष यांनी दि. 13.3.09 रोजी सदर बाबत माहिती दिली या आधारे पहिल्या अर्जावर दि. 1.4.09 ला या कार्यालयातून अर्जदारास माहिती देण्यात आली. सदर दोनही अर्जाचे अवलोकन केले असता माहिती त्रयस्थ व्यक्तीशी संबंधीत असल्यामुळे सौ. रेणु बुचे व राजेश बुचे यांना दि. 17.3.09 ला अभिवेदन करण्याबाबत कळविण्यात आले. त्यांची प्रत अर्जदारास सुध्दा देण्यात आली. सदर बाबत सौ. रेणु राजेश बुचे हिने या कार्यालयास दि. 23.3.09 रोजी कळविले आहे की मागीतलेले संबंधीत कागदपत्र यांच्या जिवनाशी निगडीत असल्यामुळे व ते उघड केल्यास माझा संसार पुर्णतः उधवस्त होवू शकतो. तसेच राजेश बुचे यांनी दि. 23.3.09 ला कळविले आहे की अर्जदारानी मागीतलेल्या अर्जाची व बयानाची प्रत अर्जदारास देण्यात यावी. अर्जदाराच्या दुस–या अर्जावर तसेच त्रयस्थ पक्षानी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने अर्जदार सौ. साधना राजेन्द्र हिवंज रा. वर्धा हिला या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष–20 / माअ–39 / 09 दि. 4.4.09 अन्वये कळविण्यात आले.

अर्जदाराचे उपरोक्त पत्रान्वये समाधान न झाल्यामुळे त्यांनी या कार्यालयास अपील सादर केला. सदर अर्जावर त्यांना आवश्यक असणारी माहिती बाबत दि. 8.5.09

3

रोजी 16.30 वा. अपील अधिकारी तथा पोलीस अधिक्षक वर्धा यांच्या भेटी करीता पत्र देण्यात आले. सदर पत्र त्यांना दि. 6.5.09 रोजी प्राप्त झाले. त्याप्रमाणे दि. 8.5.09 रोजी सदर प्रकरण महिला तक्रार निवारण कक्षाशी संबंधीत असल्यामुळे महिला तक्रार निवारण कक्षाच्या सदस्या श्रीमती साधना सराफ, श्रीमती जिजाताई राऊत, श्रीमती रेणु गायकवाड व श्रीमती शारदा केने तसेच महिला तक्रार निवारण कक्षाच्या कर्मचारी पोहवा/1006 सायरा पठाण व महिला तक्रार निवारण कक्षाचे वरीष्ठ लिपीक श्री अरुण वसु यांचे समक्ष अपीलार्थीस साधना हिवंज यांना प्रत्यक्ष बोलावुन सदर प्रकरणा बाबत समजावुन सांगण्यात आले.

सदरहु अर्जदार यांनी या कार्यालयातील महिला तक्रार निवारण कक्ष वर्धा येथे पती श्री राजेश बुचे व साधना राजेंद्र हिवंज यांचे विरुध्द तक्रार दिली होती. त्याप्रमाणे आम्ही त्यांचे अर्जानुसार महिला तक्रार निवारण कक्ष येथे पूर्णपणे तडजोड करण्याचा प्रयत्न केला आहे. सदर महिला तक्रार निवारण केंद्र आमच्या अधिनस्थ्स असल्याने त्यांना आम्ही पुर्णपणे सहकार्य केले आहे. परंतु सौ. रेणु बुचे यांनी तिचा पति राजेश बुचे अर्जदार साधना हिवंजचा पती राजेंद्र हिवंज यांनी संगणमत करुन तिला शारिरीक व मानसिक त्रास दिल्याबाबत पो.स्टे. वर्धा शहर येथे तक्रार केल्याने व पोलीस स्टेशनचे कार्यक्षेत्र वेगळे असल्याने अप.क्र.217/09 कलम 498 (अ) भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सौ. साधना हिवंज रा. वर्धा हिने दि. 20.5.09 रोजी या कार्यालयात अर्ज केला की त्यांनी केलेल्या अपीलावर अद्याप पावेतो कळविण्यात आले नाही. सदर अर्जावर या कार्यालयाचे समपत्र क्रमांक दि. 25.5.09 अन्वये त्यांना परत माहिती देण्यात आली.

अर्जदार हिने वेळोवेळी दिलेल्या अर्जावर या कार्यालयातुन योग्य ती कार्यवाही करण्यात आलेली आहे. त्या प्रमाणे त्यांच्याशी पत्रव्यवहार सुध्दा करण्यात आलेला आहे. सदरहु प्रकरण सौ. रेणु बुचे रा. वर्धा हिचे संसाराशी व मुलाबाळाशी संलग्न असल्यामुळे व तीचा संसार उध्वस्त होवु नये याबाबत आटोकाट प्रयत्न या कार्यालयाच्या स्तरावरुन तसेच समाजसेवी महिला कडुन करण्यात आलेले आहे. परंतु सौ. रेणु हिला अर्जदार अर्जदाराचा पती व स्वतःच्या पतीकडुन असहय शारिरीक व मानसिक त्रास झाल्यामुळे तिने त्यांच्या विरुध्द पो.स्टे. वर्धा शहर येथे नाईलाजास्तव गुन्हा नोंद केला आहे. अपीलार्थी यांनी केलेला आरोप हा. सौ. रेणु बुचे हिच्या संसाराशी खेळलेला दिसुन येतो करीता सदर प्रकरण दफतर दाखल करण्याबाबत आदेश होणेस विनंती आहे.

जन माहिती अधिकारी यांनी दिलेला खुलासा याबाबत विचार केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांना पो.स्टे. वर्धा शहर येथे तक्रार दाखल केलेल्या तक्रारीची अप.क्र.217/09 कलम 498 (अ) भादंवि अन्वयेची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मात्र दि. 2.3.2009 रोजी सौ. रेणु बुचे व राजेश बुचे यांच्या बयानाच्या प्रती आरोपपत्र दाखल केल्या नंतर पुरावा म्हणुन घेतल्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत अप.क्र.217/09 कलम 498 (अ) भादंवि अन्वये तक्रारीची सत्यप्रत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) सदर गुन्हयाच्या संदर्भामध्ये आरोपपत्र दाखल केल्या नंतर पुरावा म्हणुन बयान घेतले असल्यास बयानाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 452/2009.**

श्री अशोक गणपतराव खडसे
गिताई नगर, गोपूरी, नागपूर रोड,
वर्धा 422001 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विवेक बोंदरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद वर्धा
2) श्री बी. जी. राजुसकर
जन माहिती अधिकारी तथा
उप कार्यकारी अभियंता
बांधकाम विभाग
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.4.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.11.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे 1 ते 12 मुद्यांमध्ये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. एखाद्या कर्मचा-याने आर्थिक अपहार तसेच गैरवर्तणुक केल्यास काय कारवाई केल्या जाते. त्यासंबंधीत नियमाची प्रत देण्यात यावी.
2. आर्थिक अपहार प्रकरणी विभागीय चौकशीतूनच रक्कम अंतिम झाल्यावरच वसुली केली जाते हे खरे काय? तसेच त्याप्रमाणे संबंधीत नियमाची प्रत देण्यात यावी.
3. आर्थिक अपहार प्रकरणी विभागीय चौकशीच शिस्त विषयक प्राधिकरणाकडुन झाली नसेल तर ती चौकशी ग्राहय ठरते काय व त्या चौकशीचे स्वरुप व कारवाई करीता आधार काय?
4. अशा चौकशी प्रकरणी विभागीय चौकशी प्रलंबित किंवा प्रस्तावित नसतांना रकम वसुल करता येते काय? हे जेव्हा की रक्कम प्रस्तापित झाली नाही चौकशी आदेशीत झालेली नाही. तसे असल्यास नियमाची प्रत देण्यात यावी.
5. आपले जिल्हा परिषदेने अशा प्रकरणी सेवेत असलेल्या कर्मचा-यांकडून नियमबाहय

रकमेकरीता कोर्टात प्रतिदाव्याचे नावाखाली दावा दाखल केला त्याकरीता आपण कोणत्या नियमाचा (सेवाशर्ती व पेंशन) तसेच शासकीय आदेशाचा आधार घेतला त्याची प्रत दयावी.

6. आपले जिल्हा परिषदेने अशा किती कर्मचा—यांवर विना चौकशी शिस्त विषयक प्राधिकरणाचे चौकशी आदेशाशिवाय कोर्टात दावे/प्रतिदावे दाखल केले त्या प्रकरणाची दावा क्र. वर्ष व रक्कम तसेच दाव्या दाखल भरलेली कोर्ट फि ची माहिती दयावी. काउंटर क्लेमच्या कोर्ट फि करीता भरलेल्या रकमेच्या जिल्हा परिषदेचे नुकसानीला जबाबदार कोण? नावे दयावी.

7. श्री खडसे तत्कालीन शाखा अभियंता यांचे दावा क्र. 254ध्97 व 101/98 मध्ये आपण काउंटर क्लेम कोण्या शासकीय आदेश, सेवानियम व संबंधित नियमाचा आधार घेतला त्याची प्रत दयावी.

8. दावा क्र. 101/98 मध्ये चौकशी शिस्त विषयक प्राधिकरणाकडून आदेशित नसतांना जिल्हा परिषदेने प्रतिदावा म्हणून रु. 1,90,833 चा दावा दाखल केला, तसेच कोणतीही चौकशी हया संबंधाने प्रलंबित किंवा प्रस्तावीत नाही. हया दावा दाखल जिल्हा परिषदेने रु. 7000 चे कोर्ट फि स्टॅम्प भरले. यात असलेल्या तरतुदीची प्रत द्यावी.

9. शासकीय कर्मचारी सेवेत कार्यरत असतांना त्यांच्यावर रक्कम प्रस्तापित झाली नसतांना कोर्टात प्रतिदावा कसा दाखल करण्यात आला हया कोर्टाचे कार्यक्षेत्र ठरत नाही व ठरत असल्यास या प्रकरणी जो नियम लावण्यात आला त्याची प्रत दयावी.

10. बडतर्फ शाखा अभियंता श्री सायंकार यांचे प्रकरणातील सुरुवातीची रक्कम चौकशी अंती किती होती व किती रकमेची वसुली आदेशित करण्यात आली. त्यांचेकडून आतापावेतो किती रक्कम वसुल करण्यात आली. वसुली पूर्ण न होण्याचे कारण काय? त्या रकमेवरील व्याजाकरिता जबाबदार कोण?

11. या प्रकरणासोबतच इतर उपअभियेते, श्री मोकाशे, श्री बाकडे व श्री चंदनखेडे यांचेवर सुध्दा चौकशी सुरु करण्यात आली व त्यांचेकडुन रक्कम वसुल करणे आहे सदर प्रकरणात हे अभियेते जे गोवल्या गेले त्यासंबंधी अधिकाराची शासकीय आदेशाची प्रत दयावी, प्रस्तावित असलेल्या रक्कमा याबाबत कळवावे. हयासंबंधी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दि. 14.6.1977 पुरविण्यात यावा.

12. श्री सायंकार यांचेवर गंभीर आरोप असतांना लाखोचा अपहार असतांना पोलीस कारवाई कां करण्यात आली नाही. केल असल्या पोलीस स्टेशनचे नाव गुन्हा क्र. व लावण्यात आलेले भा.द.वि. कलम दयावे व प्रकरणाची स्थिती कळवावे,तसेच न्यायालयाचे कार्यक्षेत्र कळवावे. पोलीस कारवाई संबंधी संपूर्ण अहवाल दयावा. सदर माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी सामान्य/कार्यकारी अभियंता बांधकाम व प्रकल्प संचालक यांचे कार्यालयात उपलब्ध आहे सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 14.11.2008 रोजी सहा. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक यांनी कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांना त्यांच्या आस्थापनेशी संबंधित माहिती असल्यामुळे सदरच्या अर्जाचे हस्तांतरण करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या अर्जाची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्याप्रमाणे दि. 15. 12.2008 रोजी माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांनी मुद्या क्र. 7,8,10,11,12 बाबत

माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 9.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. तसेच दि. 10.12.2008 रोजी सुध्दा अपीलकर्ता यांना सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. तीच माहिती अपीलकर्ता यांनी दि. 11.7.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय यांचेकडे सुध्दा मागितलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 16.2.2009 रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना तो दि. 25.2.2009 रोजी कळविण्यात आलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध झालेली नाही. पुन्हा दि. 31.8.2009 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे म्हणणे नुसार त्यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की त्यांचे विरुध्द विभागीय चौकशीचे प्रकरण प्रलंबित आहे. त्या संदर्भामध्ये त्यांना नियम तसेच जन माहिती अधिकारी यांचे मत विचारलेले दिसून येते. वास्तविक अपीलकर्ता हे शासकीय सेवेत होते व त्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपीलाची माहिती असणे हे गृहीत आहे. परंतु तरी सुध्दा त्याबाबतची माहिती मागणे हे माहिती अधिका–यास वेटीस धरणे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती जन माहिती अधिकारी यांचे मत मागितलेले दिसून येते. व माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकारचे मत जन माहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित नसते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे असे दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे मुद्ये आहेत त्या संदर्भामध्ये कागदपत्रे उपलबध असल्यास कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 7.11.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत प्रत्येक मुद्याच्या संदर्भात जी कागदपत्रे उपलब्ध असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 439/2009.**

श्री आनंदराव महादेवराव घुमडे
मु. पो. बेला
ता. उमरेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या.
नागपूर
2) श्री ए. सी. कठाणे
जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता (स व सु विभाग)
महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.5.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.9.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कनिष्ठ अभियंता महा. राज्य विज वितरण कंपनी मर्या. यांचेकडे बेला परीसरातील पावसाळयापुर्वी विद्युत लाईन खांब ट्रांन्सफॉर्मर आदिच्या दुरुस्ती व देखभालीचे कामाची निविदा कोणत्या वृत्तपत्रात देण्यात आली होती. या कामाचे वरील मेंटेनन्सच्या कामाचे ठेकेदार कोण. किती रुपयाचा ठेका आहे याची सविस्तर माहिती. बेला परीसरातील किती खेडे भाग आहे याची सविस्तर माहिती. या परीसरात किती कामे झाले त्याबाबत खुलासा. बेला परीसरातील विद्युत लाईन वाकलेले खांब विद्युत तार यांचा जो नकाश अधिका—याने पाठविला आहे याची सत्यप्रत झेरॉक्स मिळण्याबाबत. अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही या

कारणास्तव अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना दि. 15.11.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दि. 20.10.2008 (3.11.2008) रोजीची किंवा दि. 15.11.2008 रोजीची माहिती उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जावक वहीतील नोंदी हया आयोगाचे निदर्शनास आणल्या व त्यावरुन अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील पत्यावर माहिती उपलब्ध करुन दिले ली आहे असे दिसून येते. असे असले तरी त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते विशेष कार्यकारी अधिकारी असून त्यांना सर्व प्रकारची पत्रे मिळतात परंतु तीन दिवसाच्या मुदतीच्या आत पाठविलेली पत्रे मिळत नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र त्यांना मिळाले नाही. याबाबत अर्थातच जावक नोंदवही ही पुराव्यास ग्राहय धरावे लागते. त्यामुळे अपीलकर्ता यांना पुन्हा तीच माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना माहिती जरी दोन वेळा पुरविण्यात आलेली असली तरी पुन्हा एक वेळ त्यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 457 / 2009, 458 / 2009, 459 / 2009, 460 / 2009.**

श्री शंकरभाई रतनभाई पटेल
श्री जलाराम सॉ मिल, नये बस स्टॅन्ड के पास,
बालाघाट रोड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. सी. गणात्रा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपवनसंरक्षक
वन विभाग गोंदिया
2) श्री ए. एस. खुणे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय वन अधिकारी
वन विभाग गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.8.2009 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.6.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये एकुण चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या चारही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांचे वर नमुद केलेल्या अपीलामध्ये अनक्रमे दि. 5.3.2009, दि. 17.2.2009, दि. 6.4.2009, दि. 4.4.2009 रोजी माहितीचे अर्ज दाखल केलेले आहेत. सर्व माहितीच्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी श्री अपर मुख्य वनसंक्षक पुणे द्वारा सॉ मिल लायसंस संबंधीत आदेश के दस्ताविज. कालावधी 81 / 83–84 अशा प्रकारचे आदेशाच्या प्रती व संबंधीत कागदपत्रे प्रत्येक अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना अर्जाच्या अनुषंगाने माहिती ही जुनी असल्यामुळे ती आता उपलब्ध नाही असे आक्षेप घेणे सुरु आहे व माहिती ही लेखपाल दक्षता शाखा विभागीय कार्यालय गोंदिया यांचेकडून मागविलेली आहे व उपलब्ध झाल्यावर कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु सर्व अपीलांमध्ये समाधान न झाल्यामुळे अनुक्रमे दि. 4.4.2009, दि. 20.3.2009, दि. 6.5.2009, व दि. 6.5.2009 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येतात. सदरची कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत असे वारंवार अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. त्याबाबतची नस्ती आढळुन येत नसल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध होवू शकत नाही असेही त्यांना कळविलेले आहे. तसेच पत्रे जन माहिती

अधिकारी यांनी लेखपाल दक्षता शाखा यांचेकडून तसेच वारंवार नस्ती उपलब्ध नाही व त्यामुळे उपलब्ध होवू शकत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. व त्यानंतर सुध्दा अर्जदारानी कार्यालयात येवून माहितीचा शोध घ्यावयाचा असेल तर सदर अर्जदारास दि. 20.4.2009 किंवा 21.4.2009 ला कार्यालयात येण्यास कळवावे. जेणेकरुन अर्जदारास शाखेत उपलब्ध असलेला रेकॉर्ड दाखविणे सोईचे होईल असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. मुळातच अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही 25 वर्षापूर्वीची आहे व ती माहिती कागदपत्रे जतन करण्याच्या नियमाप्रमाणे सुध्दा उपलब्ध आहे किंवा नाही याबाबतही निश्चित असे कागदपत्रे मिळत नाहीत. वास्तविक अपीलकर्ता यांनी सदरची कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जुनी माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे सहकार्य घेणे आवश्यक होते. माहिती उपलब्ध नाही व त्यांना शास्ती करावी अशा प्रकारची मागणी करणे हे नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार योग्य नाही. कागदपत्रे उपलब्ध नसतील तर त्याबाबतची चौकशी करावी लागते. जबाबदारी निश्चित करावी लागते. व ज्यांनी गहाळ केली असतील तर व मिळाल्यास त्यांचेविरुध्द शिक्षा प्रस्तावित करता येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी नस्तीची पाहणी करुन खात्री करुन घेणे आवश्यक राहिल व तसे त्यांना जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविले होते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते.

## आ दे श

1) जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नस्ती निरीक्षणाचे संबंधात दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये असलेल्या सर्व अभिलेख्याची तपासणी करुन आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध असल्यास घ्यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे कामकाजाच्या वेळात तारीख व वेळ कळवून उपस्थित राहावे. तशा प्रकारे कळविल्यानंतर अपीलकर्ता उपस्थित राहिल्यास कर्मचा–याच्या उपस्थित सर्व अभिलेखे त्यांच्या निरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.8.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २७७/२००९.

श्री. सुधाकर केशव मुंजे,
प्लॉट नं. २३, मधु ज्योती सहनिवास,
धरमपेठ गृहनिर्माण हाऊसिंग सोसायटी,
ले आऊट क्रमांक ५, जयप्रकाशनगर,
नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर, सिताबर्डी, नागपूर.

श्री. राजेंद्र दाभेराव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,
नागपूर शहर - १, १८५, आयुर्वेदिक ले आऊट,
भांडे प्लॉट चौक, उमरेड रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर शहर -१ यांचेकडे अमर आशा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी मर्यादित, नागपूर. या संस्थेबाबत एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.४.२००८ रोजी मुद्या क्रमांक १ व २ माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मुद्या क्रमांक ३ ते ७ चे माहितीकरिता आपल्या अर्जाची झेरॉक्स प्रत सचिव, अमर आशा हौसिंग सोसायटी, नागपूर यांचेकडे पाठविण्यात येत आहे. मुद्या क्रमांक ३ ते ७ बाबत माहिती संस्थेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. सदरच्या

... २

पत्राची प्रतिलिपी सचिव, अमर आशा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी मर्यादित, नागपूर यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.१०.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश जनमाहिती अधिकारी तथा सचिव, अमर आशा को-ऑपरेटिव्ह हाऊसिंक सोसायटी मर्यादित, नागपूर यांना दिलेला दिसून येतो. त्यानंतर पुन्हा दिनांक ६.१२.२००८ रोजी उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर शहर-१ यांनी अपीलकर्ता यांना आदेशान्वये पालन झाले नाही या तक्रारीचे संदर्भामध्ये सहकारी संस्थेतील कोणत्याही प्रकारच्या प्रथम अपीलीय अधिकारी यांना कार्यवाहीकरता येत नाही असे कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले दिसून येते.

३. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही केलेली आहे व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, मुद्या क्रमांक ३ ते ७ ची माहिती सुध्दा शासकीय माहिती अधिकारी म्हणून जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था हे त्यांचे कार्यालयाकरिता माहिती अधिकारी आहेत. सहकारी संस्थेकरिता माहिती अधिकारी नाही. सहकारी संस्था हे स्वतंत्र प्राधिकरण आहे व त्यामुळे प्रत्येक प्राधिकरणात जनमाहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे आवश्यक असते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी जी माहिती संस्थेच्या कार्यकक्षेत आहे ती त्या संस्थेस मागणे आवश्यक आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ३१.३.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**दिनांक :- ३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २७८/२००९.

श्री. प्रकाश मुकुंदराव वेखंडे,
घर नं. ऐ/३, खसरा नंबर ६०/१,
श्री सिध्दीविनायक को-ऑप.हाऊसिंग सोसायटी लिमिटेड,
अष्टविनायकनगर, जयताळा रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था,
धनवटे चेंबर, सिताबर्डी, नागपूर.

श्री. योगीराज वसंतराव सुर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा
उपनिबंधक सहकारी संस्था,
नागपूर शहर - २, सहकार सदन,
हिंदुस्थान कॉलनी, भरत नगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. जे. के. ठाकूर, विभागीय उपनिबंधक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपूर शहर -२, भरतनगर यांचेकडे श्री. सिध्दी विनायक को-ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोयायटी मर्यादित, नागपूर या संस्थेबद्यल एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम

अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना पुन्हा तीच माहिती दिनांक २५.३.२००९ रोजी देण्यात आलेली आहे व त्यामुळे पुन्हा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये सहकारी संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली नाही या कारणास्तव द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे दिसून येते. तसेच तसेच चुकीचे नांव संस्था संस्थापक असे ही दिलेले आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सर्व सहकारी संस्था हया निवडणूक झाल्यावर माहिती पाठवितात असे नाही. त्याचप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी किंवा जनमाहिती आकिारी यांना संस्थेविरुध्द कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे जी कार्यवाही केलेली आहे त्याबाबतची नोटीसची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ३.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २७४/२००९.

श्री. गिरीश मोरेश्वर खोरगडे,
६९२, श्रीनिवास, गीतानगर,
झिंगाबाई टाकळी, भारतीय कृषी विद्यालय समोर,
नागपूर - ४४० ०३०. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजय रामटेक,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपआयुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
मंगळवारी झोन क्र. १०,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २३.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचेवतीने श्री. व्ही. डब्ल्यू. गभणे, उपविभागीय अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नागपूर महानगरपालिका मंगळवारी झ ाेन छावणी, नागपूर यांचेकडे श्री. कुहिटे यांचे घरावर अनधिकृतपणे मोबाईल फोन टावरची उभारणी केल्याचे संदर्भामध्ये कोणत्या प्रकारची कार्यवाही केलेली आहे याबद्यल एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले

आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.३.२००९ रोजी देण्यात आला असून दिनांक ५.३.२००९ ला माहिती देण्यात आली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झाली आहे ती समाधानकारक नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना ज्या इमारतीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे ती इमारत ही महानगरपालिका कक्षेत येत नाही. तरीसुध्दा एम.आर.टी.पी. कायद्यांतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे व नागपूर सुधार प्रन्यासला त्याबद्यल पत्र पाठविले आहे व नगर रचना विभागाचे पत्रासह मोबाईल टावरचे उभारणीसाठी मार्गदर्शन तत्वे बाबतची प्रत सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यावरुन वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना नागपूर सुधार प्रन्यास किंवा महानगरपालिका या दोन्ही संस्थाचा संबंध नगर रचना विभागाचे संबंधित असल्यामुळे नगर रचना विभागाचे पत्र देखील या दोनही संस्थांना लागू आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना त्या संबंधी माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांना कोणत्या तक्रारीच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली नाही व त्यामुळे तक्रार केली नसतांना कार्यवाही करणे शक्य नाही. तरी सुध्दा माहितीचा अर्ज आल्यानंतर कार्यवाही केलेली आहे असे त्यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे समाधान झाले नाही. तसेच अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती प्रमाणित करुन देण्यात आलेली नाही असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही प्रमाणित करुन देण्यात येईल. तसेच अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना द्वितीय अपील दाखल करावे लागली हा त्रास त्यांना दिलेला आहे. परंतु मुद्या क्रमांक १ अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नव्हती. तसेच नागपूर सुधार प्रन्यास संबंधीत झ ाल्यावर महानगरपालिका यांचेकडे माहिती मागितली ही दुसरी बाब आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी माहिती मागतांना निश्चित अशा सार्वजनिक प्राधिकरणाकडे माहिती मागणे आवश्यक आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे परंतु प्रमाणित करुन देण्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत प्रमाणित करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून उपलब्ध झालेल्या माहितीचे कागदपत्रे सादर करुन प्रमाणित करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ३.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २७५/२००९ व अपील क्रमांक २७६/२००९.

श्रीमती उषा गिरीधर केदार,
प्लॉट नं. २०६/०७, सिव्हील लाईन,
जी.पी.ओ. चौकजवळ,
नागपूर - ४४० ००१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक १, सिताबर्डी विभाग,
नागपूर.

श्री. बाहेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
परिमंडळ क्रमांक १, सिताबर्डी विभाग,
नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक ९.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ३.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हया हजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. बहीर, वाचक हे हजर आहेत. तसेच माहिती अधिकारी यांचेवतीने श्री. टी. डब्ल्यू. इंगोले, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक २७५/२००९ मध्ये अपीलकर्ती यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी झोन, नागपूर यांचेकडे माहिती अधिकारात अनेक अर्ज त्यांनी दाखल केलेल्या दिनांक २२.२.२००७, दिनांक २३.२.२००७, दिनांक २४.२.२००७, दिनांक २८.३.२००७, दिनांक २७.३.२००७, दिनांक २४.५.२००७ या तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने माहितीचा अतिरिक्त खर्चाकरिता रुपये २/- शुल्क भरावे असे दिनांक २३.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. दिनांक २४.१२.२००८ रोजी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दिनांक १९.१.२००९ रोजी सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २३.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ती यांनी नवीन मुद्ये उपस्थित केलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले आहे असे दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे त्यांचे म्हणणे लेखी दिलेले आहे व त्यात त्यांनी मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध झाली आहे. परंतु मुद्या क्रमांक १ व ३ ची माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ती यांनी दाखल केलेल्या तक्रारी हया सर्व सारख्या आहेत. त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता वाटली नाही. परंतु अपीलकर्ती यांनी प्रत्येक अर्जाचे संदर्भामध्ये त्यांनी स्वतंत्रपणे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांची असे सांगितले की, अपीलकर्ती हे अनेक अर्ज करीत असतात व तीच माहिती अनेक अर्जाच्या पध्दतीने व एकच फारमेट वापरुन माहिती मागत असतात. त्यामुळे जनमाहिती अधिकारी व कर्मचारी व अधिकारी यांचे दिशाभूल होते व माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब होतो. अपीलकर्ती हया अनेक उच्च पदाधिकाऱ्यांकडे अर्ज करतात व माहिती मात्र तीच माहिती अधिकारी यांचेकडे मागत असतात व त्यामुळे सुध्दा सदरच्या अर्जाचे संदर्भात झालेली कार्यवाहीबद्यलची माहिती उपलब्ध करुन देणे अवघड होते व अपीलकर्ती यांना त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भात अभिलेख तपासणी करुन माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २७६/२००९ मध्ये अपीलकर्ती यांनी दिनांक २९.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे पुन्हा दिनांक २२.२.२००७, दिनांक २३.२.२००७ अशाच प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. त्याबद्यलची सर्व माहिती त्यांना दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तरी सुध्दा अपीलकर्ती यांनी दिनांक १.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. त्यातही माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न झालेला आहे. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचया संदर्भामध्ये जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) व सहाय्यक पोलीस आयुक्त यांचा कोणताही संबंध नाही व त्यामुळे सदरचा अर्ज हस्तांतर करण्यात आले होते. अपीलकर्ती हया पत्नीच्या नावाने व स्वतःचे नावाने वेगवेगळे अर्ज करीत आहेत असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ती यांनी त्यांना केलेल्या तक्रार अर्जाचे संदर्भातील झालेल्या कार्यवाहीची माहिती ही स्वतः अभिलेखाचे निरिक्षण करुन उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील क्रमांक २७५/२००९ व अपील क्रमांक २७६/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांनी मागितलेल्या माहितीचे संदर्भामध्ये हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ कळवून त्या दिवशी जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन संबंधित अभिलेखाची पाहणी करावी व त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

२) अपीलकर्ती यांनी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळविल्यावर व त्यावेळस उपस्थित झाल्यावर संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे उपस्थितीत अपीलकर्ती यांना त्यांनी मागितलेल्या माहितीची म्हणजे कार्यवाहीचे संबंधातील सर्व कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी व अपीलकर्ती यांना आवश्यक वाटतील अशा कागदपत्राच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करु देण्यात याव्यात.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ३.८.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९७/२००८, अपील क्रमांक २९८/२००८, अपील क्रमांक २९९/२००८, अपील क्रमांक ३००/२००८ व अपील क्रमांक ६९८/२००८.**

श्री. नारायण महादेवराव कावळे,
रा. इतवारी, मस्कासाथ रेल्वे पुलाजवळ,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बाबाराव पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती योगिता ढवळे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
कोलबास्वामी उच्च प्राथमिक शाळा,
प्रेमनगर, झेंडा चौक, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक २९७/२००८ ते ३००/२००८ मध्ये दिनांक ३.५.२००८ रोजी व अपील क्रमांक ६९८/२००८ मध्ये दिनांक ६.५.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये पाच द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या पाचही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. माहिती अधिकारी यांचे वतीने श्री. व्ही. ए. धाबे, वकील हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक २९७/२००८, अपील क्रमांक २९८/२००८, अपील क्रमांक २९९/२००८ व अपील क्रमांक ३००/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २१.२.२००८ रोजी माहिती अधिकारी म्हणुन मुख्याध्यापक, कोलबास्वामी उच्च प्राथमिक शाळा, नागपूर यांचेकडे १) शाळेला सन १९९२ ते १९९९ पर्यंत आणि सन २००० ते एप्रिल २००७ पर्यंत वेगळी वेगळी शिक्षकांच्या नियुक्तीची माहिती एकूण ४ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते.

२) शाळेला सर्व शिक्षा अभियानांतर्गत मिळालेल्या रकमेच्या विनियोगा संबंधीची माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. ३) शाळेतील शालेय पोषण आहार संबंधीची माहिती एकूण ५ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. ४) शाळेला मिळणाऱ्या वेतनेत्तर अनुदानाची माहिती एकूण ६ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु दिनांक ५.४.२००८ रोजी मुख्याध्यापक, कोलबास्वामी उच्च प्राथमिक शाळा, नागपूर यांनी अपीलकर्ता यांना रुपये १०४३/- ताबडतोब स्वतः किंवा कोणत्याही माध्यमाद्वारे त्वरित पाठवावे अन्यथा माहिती पुरविण्याला विलंब झाला तर मी जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी. अंदाजित खर्चा व्यतिरिक्त जास्त खर्च झाल्यास आपणास द्यावे लागेल असे कळविलेले दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२००८ रोजी चार प्रथम अपीले दाखल केली होती. प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये श्रीमती योगिता ढवळे, माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कोलबा स्वामी उच्च प्राथमिक शाळा, नागपूर यांनी अपीलकर्ता यांनी विचारलेली माहिती १५ दिवसात अधिनियमानुसार अपीलकर्तांना द्यावी व त्याची एक प्रत या कार्यालयाकडे द्यावी. असा निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक १२.४.२००८ रोजी १०४३/- रुपयांचा भरणा केला आहे. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही असेच अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो व माहिती न देता श्रीमती योगिता ढवळे यांना पत्र देऊन सुध्दा या संस्थेत कोणत्या पदावर कार्यरत आहात असे विचारलेले दिसून येते. त्यावर दिनांक २५.४.२००८ रोजी अध्यक्ष, गुरु स्फुर्तिनाथ बहुउद्येशिय शिक्षण संस्था, नागपूर यांनी मुख्याध्यापिका यांना अर्जदार श्री. कावळे यांना माहिती उपलब्ध करुन देऊ नये अशा प्रकारचे पत्र दिलेले दिसून येते व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे निर्णयाविरुध्द राज्य माहिती आयुक्तांकडे द्वितीय अपील दाखल करावी अशा प्रकारे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे मुख्याध्यापिका यांनी अपील क्रमांक ६९८/२००८ ही दाखल केलेली आहे. त्यानंतर दिनांक ६.५.२००८ रोजी मुख्याध्यापिका यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तसेच रुपये १०४३/- चा चेक क्रमांक ०५६२०२ नी परत केले आहे. हया द्वितीय अपीलाचे निर्णय होई पर्यंत मला काहीच करता येत नाही असे शिक्षणाधिकारी यांना दिनांक १५.५.२००८ रोजी कळविले आहे. त्यानंतर दिनांक ९.५.२००८ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा माहिती अधिकारी म्हणून मुख्याध्यापिका यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्देश देऊनही अपीलकर्ता यांनी रुपये १०४३/- माहिती शुल्क आपणाकडे मनिऑर्डरद्वारे भरलेले असतांनाही आपण त्यांना अद्यापही माहिती दिली नाही याबद्यलचे पत्र दिले होते. त्यामुळे या सर्व अपीलांची सुनावणी दिनांक ३०.४.२००९ रोजी एकत्रित करण्यात आली.

३.  सुनावणी मध्ये मुख्याध्यापक यांचे वकील यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, श्री. नारायण महादेव कावळे हे संस्था सचिव आहेत व श्री. कावळे व संस्था अध्यक्ष यांच्यात वाद दिसून येतो व त्यामुळे संस्थेच्या अध्यक्षांनी माहिती देऊ नये असे आदेश जनमाहिती अधिकारी यांना दिलेले आहेत व त्यामुळे द्वितीय अपील मेमोमध्ये जे आरोप करण्यात आले आहेत त्या आरोपाचे संदर्भामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ प्रमाणे चौकशी करणे उचित राहिल असे दिसून येते व त्याकरिता प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी स्वतः चौकशी करावी व अहवाल आयोगास सादर करावा असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे शिक्षणाधिकारी यांनी चौकशी करुन दिनांक ३०.६.२००९ रोजी मुख्याध्यापिका सौ. योगिता ढवळे यांनी अपील क्रमांक ६९८/२००८ मध्ये नमुद केल्याप्रमाणे माहितीचे अधिकारात माहिती मागणारे श्री. कावळे व संस्थेचे अध्यक्ष श्री. डेकाटे यांचेमध्ये वाद असून मा.धर्मदाय आयुक्त कार्यालयात तसेच न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट असून पदाधिकाऱ्यात वाद असल्याचे स्पष्ट होते. असा चौकशी अहवाल दिलेला आहे. परंतु त्यामध्ये स्पष्टपणे श्री. नारायण महादेवराव कावळे हे संस्थेचे सचिव आहेत व स्वतः सुध्दा ते मान्य करतात असा नंतर निष्कर्ष काढला नसल्यामुळे पुन्हा चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यामुळे तक्रारकर्ता श्री. नारायण महादेवराव कावळे यांनी शेडयूलवन नं. ९१/२००४ दिनांक ६.७.२००४ ची प्रत दिली. त्यानुसार संस्थेचे सचिव म्हणून श्री. नारायण महादेवराव कावळे, इतवारी, नागपूर हे असल्याचे दिसून येते. संस्थेचे अध्यक्ष, श्री. उदारामजी डेकाटे व शाळेच्या कार्यरत मुख्याध्यापिका यांनी शेडयुलवन क्र. ५५८/२००७, दिनाक २९.४.२००८ ची प्रत दिली. त्यानुसार संस्थेच्या सचिव, सौ. शिला अरविंद बाकडे, अयोध्यानगर, नागपूर हया असल्याचे दिसून येते. तक्रारकर्ते श्री. नारायणराव कावळे यांनी अपील क्र. १३/२००९ व रिव्हीजन अपप्लीकेशन नं. १३/२००९ च्या दिलेल्या झेरॉक्स प्रतीवर चेंजरिपोर्ट क्र. ५५८/२००७ दिनांक २९.४.२००८ ला स्थगिती दिल्याचे नमुद केले आहे. त्यावरुन अनु क्र. १ मध्ये असलेले पदाधिकारी कायम आहे. त्याप्रमाणे संस्थेचे सचिव हे श्री. नारायण महादेवराव कावळे असल्याचे दिसून येते असा अभिप्राय दिलेला आहे. तसेच सौ. योगिता ढवळे हया मुख्याध्यापिका असल्या तरी त्यांना माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केलेली दिसून येत नाही व त्यामुळे त्यांना माहिती देऊ नका असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यामुळे सर्व प्रथम संस्थेनी शाळेच्या कामकाजाकरिता अधिनियमाचे कलम ५(१) प्रमाणे जनमाहिती अधिकारी नियुक्त करणे आवश्यक आहे. त्यापूर्वी मात्र पुढे कोणत्याही अपीलाचे बाबत निर्णय देणे कायदेशीर होणार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांची सर्व अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २९७/२००८, अपील क्रमांक २९८/२००८, अपील क्रमांक २९९/२००८, अपील क्रमांक ३००/२००८ व अपील क्रमांक ६९८/२००९ हे सर्व अपीले खारीज करण्यात येत असून गुरु स्फुर्तीनाथ बहुउद्येशीय शिक्षण संस्था यांनी कोलबास्वामी उच्च प्राथमिक शाळा यांना हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी नियुक्त करावा.

२) संस्थेनी जनमाहिती अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर कोणत्याही अर्जदाराने माहिती मागितल्यावर जनमाहिती अधिकारी यांची माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी आहे याची नोंद घ्यावी अन्यथा संस्था ही अधिनियमाचे कलम १९(८) (ग) प्रमाणे शास्तीस पात्र राहिल यांची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

नागपूर

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ४.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २८९/२००९.

श्री. राम आखरे,
संत कृपा, ३०, साईकृपा सोसायटी,
नरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सेट परिक्षा विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे.

जनमाहिती अधिकारी तथा
सेट परिक्षा विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ४.८.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सेट परिक्षा विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे श्री. हरिदास देविदास आखरे, शेगांव, जि. बुलढाणा यांचा तक्रार अर्ज प्राप्त दिनांक २१.११.२००८ नुसार व त्यांना मिळालेले आपले जा.क्र. माअ/११२२, दिनांक १२.११.२००८ रोजीचे पत्र प्राप्त झाले नुसार मागितलेली माहिती न दिल्याबाबत. सेट परिक्षेच्या तिसऱ्या पेपरची उत्तर पत्रिकेची साक्षांकित प्रत मिळण्याबाबत. माहितीचा कालावधी फेब्रुवारी २००८. हरिदास देविदास आखरे या विद्यार्थ्यांचे दिनांक ३ फेब्रुवारी २००८ रोजी झालेल्या सेट परिक्षेत १९५३६ या आसन क्रमांकाची मराठी या विषयाची तिसऱ्या वर्णनात्मक पेपरची साक्षांकित केलेली उत्तर पत्रिकेची प्रत केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत विहित कालावधीत देण्यात यावी. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांची साक्षांकित प्रत देण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २२.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.२.२००९ रोजी देण्यात आला असून श्री. हरिदास देविदास आखरे यांच्या उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत माहितीचा

... २

अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(इ) व (जे) नुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या उत्तर पत्रिकांच्या छायांकित प्रती देता येत नाहीत. तसेच प्रशासकीय अधिकारी, सेट परीक्षा विभाग यांनी असा युक्तिवाद केला की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याबाबतची परवानगी मिळाल्यास संबंधित विद्यार्थ्यास उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्यात येतील. तसेच सदर बाबत विद्यापीठ सुकाणू समिती जो निर्णय होईल अपीलकर्ता यांना कळविण्यात येईल. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(इ) व (जे) नुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वानुसार सध्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देता येत नाहीत. अपीलकर्ता यांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडे केलेल्या पत्र व्यवहाराच्या प्रती देण्यात याव्यात. तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांची प्रतही देण्यात यावी. ज्यावेळी सुकाणु समिती सदर बाबत जो निर्णय घेईल तो निर्णय प्रशासकीय अधिकारी, सेट परिक्षा विभाग यांनी अपीलकर्ता यांना कळवावा. याप्रमाणे निर्णय देऊन सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर कार्यालयातून सदरची सुनावणीची नोटीस दिनांक १४.७.२००९ रोजी काढण्यात आली होती. परंतु जनमाहिती अधिकारी सेट परिक्षा विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे हे या सदरच्या सुनावणीस हजर नसल्यामुळे आयोगाचा त्यांनी अवमान केलेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणत्याही प्रकारची दखल आयोगाचे नोटीसची न घेता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. यावरुन पुणे विद्यापीठ, पुणे हे राज्य माहिती आयुक्त पेक्षाही वरिष्ठ दर्जाचे आहेत असा समज हा पुणे विद्यापीठातील जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचा दिसून येतो. व त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.

४. आयुक्तांकडे जी कागदपत्रे दाखल झाली आहेत ती अर्जदार अपीलकर्ता यांनी दाखल केलेली आहेत व त्यावरुन प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(इ) व (जे) नुसार माहिती देता येत नाही असा निर्णय दिलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८ (१) मधील (इ) मध्ये जी माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल त्याखेरीज एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे तिला उपलब्ध असणारी माहिती. (जे) मध्ये जी माहिती प्रकट करणे हे व्यापक लोकहिताच्या दृष्टिने आवश्यक आहे अशी यथास्थिती केंद्रीय जनमाहिती

अधिकाऱ्यांची, राज्य जनमाहिती अधिकाऱ्यांची किंवा अपील प्राधिकाऱ्यांची खात्री पटली असेल ती खेरीज करुन जी प्रकट करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी काहीही संबंध नाही किंवा जी व्यक्तींच्या खाजगी बाबीत विनाकारण हस्तक्षेप करील अशी वैयक्तिक तपशिलासंबंधातील माहिती प्रकट करता येणार नाही अशी तरतुद आहे. परंतु परीक्षक व विद्यार्थी यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचे विश्वासाचे संबंध नाही. परीक्षक यांची परीक्षक नियुक्ती विद्यापीठ करीत असते व त्यांची नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी योग्यरित्या त्यांचे कर्तव्य पार पाडले आहे किंवा नाही याबद्यलची माहिती हया संदर्भात उपलब्ध होणे आवश्यक आहे. परंतु कोणत्याही खाजगी व्यक्तीच्या बराच हस्तक्षेप होतो असा निष्कर्ष काढण्याची आवश्यकता नाही व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उत्तर पत्रिका तपासल्यानंतर माहिती ही विद्यार्थ्याला कळणे आवश्यक आहे व त्यामुळे परिक्षेमध्ये पारदर्शकता येऊ शकेल हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्येश आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद केला. अर्जदार यांनी दाखल केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या पत्रावरुन असे दिसून येते की, सदरच्या उत्तरपत्रिका हा निकाल जाहीर झाल्या बरोबर नष्ट करण्यात येतात असे दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये प्रशासन अधिकारी, सेट परीक्षा विभाग यांनी असा युक्तिवाद केलेला आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाकडून उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्याबाबतची परवानगी मिळाल्यास संबंधित विद्यार्थ्यास उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देण्यात येतील असे प्रतिपादन केलेले असल्यामुळे सदरची उत्तरपत्रिका हया नष्ट केल्या नाहीत असा निष्कर्ष काढावा लागतो. विद्यापीठ अनुदान आयोग हा अधिनियम हा संसदेचा असला तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा नंतर संसदेने पारित केलेला आहे व त्यात अधिनियमाच्या कलम २२ प्रमाणे अधिनियमाच्या तरतुदी अधिभावी परिणाम दिलेला आहे ते या अधिनियमाच्या तरतुदी या शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ (१९२३ चा १९) यामध्ये, त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये किंवा या अधिनियमाखेरीज कोणत्याही अन्य कायद्याच्या आधारे अमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये त्याच्याशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी अमलात येतील अशी तरतुद आहे. याचा अर्थ माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा पारीत झाल्यानंतर भारतातील संसदेच्या कोणत्याही कायद्यात व विधानमंडळात कोणत्याही निर्णयाची तरतुद असली तरी त्यापेक्षा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची तरतुद प्रभावी ठरेल व त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाचे नियम काहीही असले तरी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीच्या अपवादामध्ये जर एखादी बाब येत नसेल तर ती माहिती प्रकट करणे ही बंधनकारक आहे व त्यामुळे विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासल्यानंतर त्या विद्यार्थ्यास तपासलेली उत्तरपत्रिका पाहणे हा माहितीच्या अधिकारातील उत्पन्न होते व त्यामुळे श्री. हरिदास देविदास आखरे यांच्या उत्तरपत्रिका ही त्यांना स्वत: किंवा अपीलकर्ता यांना पाहण्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तसेच विद्यापीठाचे परीक्षाचे उत्तरपत्रिका

तपासल्यानंतर विद्यार्थ्यास शुल्क भरण्याची तरतुद आहे यावरुन विद्यापीठाची तपासणी झालेल्या उत्तरपत्रिका ही कोणत्या पध्दतीने गोपनीय आहेत असे म्हणता येणार नाही व त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना श्री. हरिदास देविदास आखरे यांच्या दिनांक ३.२.२००८ रोजी झालेल्या सेट परिक्षेत १९५३६ या आसन क्रमांकाची मराठी या विषयाची तिसऱ्या वर्णनात्मक पेपरची साक्षांकित केलेली उत्तरपत्रिकेची प्रत हा निर्णय मिळाल्या पासून ३० दिवसांचे आंत पाहणीस उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता अपीलकर्ता किंवा श्री. हरिदास देविदास आखरे यांनी जनमाहिती अधिकारी किंवा प्रशासकीय अधिकारी, सेट परीक्षा विभाग यांचेकडे उपस्थित होऊन अपेक्षित उत्तरपत्रिकेची पाहणी स्वतः करावी.

२) पुणे विद्यापीठातील संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे नोटीसची कोणत्याही प्रकारचा प्रतिसाद दिलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती कां लादण्यात येऊ नये या बद्यलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- ची शास्ती लादण्यात येईल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचे कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे आयोगाकडे सादर केलेले नसल्यामुळे त्याचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

३) सदरच्या निर्णयाची एक प्रत कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे यांचेकडे स्वतंत्रपणे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९७/२००९.

कु. पुष्पा पुंजारामजी चांभारे,
मु. पो. ता. गोंडपिपरी, वार्ड क्र. २,
इंदिरा वार्ड, जि. चंद्रपूर - ४४२ ७०२. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्रीमती वर्षा तडवी,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्या,
दलितमित्र वि. तु. नागपुरे अध्यापक विद्यालय,
ता. गोंडपिंपरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. निमगडे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १०.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, दलितमित्र वि. तु. नागपुरे डी.एड्. कॉलेज, गोंडपिपरी यांचेकडे नियुक्ती पत्र सन १९९३ ते १९९६ पर्यंतचे महिनावार हजेरी पट, निमंत्रण पत्रिकाची सत्यप्रत, चार्जलिस्ट, बँक खाते उघडण्याच्या ठरावाची प्रत, नोटीस रजिस्टरची सत्यप्रती, शिक्षक संख्या मान्यता प्रत असे एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली

नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.३.२००९ रोजी देण्यात आला असून निर्णयाची प्रत मात्र सादर केलेली दिसून येत नाही. मात्र प्राचार्या यांनी कार्यालय शिक्षण उपसंचालक, नागपूर यांचेकडे दिनांक २०.९.२००८ रोजी अपीलकर्ती यांचा पुर्वीच्या अर्जाप्रमाणे माहिती सादर केलेली आहे तसेच दिनांक १७.११.२००८ रोजी त्यांनी पुर्वी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पत्र दिलेले दिसून येते. दिनांक २३.३.२००९ रोजी पुन्हा प्राचार्या यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे कु. पुष्पा पुंजारामजी चांभारे हयांची संस्थे विरुध्द असलेली अपील केस कोर्टात खारीज झालेली आहे व त्यांना वेळोवेळी सर्व माहिती पुरविण्यात आलेली असून यानंतर त्यांना माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे असे सांगितले की, पूर्वी त्यांच्या अपीलामध्ये आयोगाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व या अर्जाचे संदर्भात आता पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्या यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी वारंवार माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यापेक्षा वेगळी माहिती विद्यालयाकडे उपलब्ध नाही. तसेच त्यांची न्यायालयात संस्थे विरुध्द केस खारीज झालेली आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांनी दाखल केलेल्या अर्जातील मुद्या क्रमांक ४, ६ व ७ वगळून मुद्या क्रमांक १, २ व ५ ची माहिती २० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचे आदेश दिनांक ५.३.२००९ च्या पत्राप्रमाणे देण्यात आले होते व त्यानुसार दिनांक २३.३.२००९ रोजी पोष्टाने माहिती पुरविण्यात आली अशा प्रकारे कळविण्यात आलेले आहे. तरीसुध्दा अपीलकर्ती यांना त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांनी मागितलेली माहिती मिळाली नाही. उपशिक्षणाधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, ते प्रथम अपीलीय अधिकारी नसून शिक्षण उपसंचालक, नागपूर हे प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. असे असल्यास शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी आता पर्यंत मागितलेली माहिती शाळेकडून किंवा संस्थेकडून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता सदरचे प्रथम अपीलाची सुनावणी शिक्षण उपसंचालक, नागपूर यांनी स्वतः घेऊन अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी सदरच्या प्रकरणामध्ये स्वतः प्रथम अपीलाची सुनावणी घ्यावी व अपीलकर्ती यांना आता पर्यंत जी माहिती उपलब्ध झाली नाही ती माहिती त्यास संपूर्ण संस्थेकडून उपलब्ध करुन देण्यात यावी. उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश देण्यात येऊ नये. सदरची सुनावणी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत घेण्यात यावा.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आयोगास सादर करावा.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९४/२००९.

श्री. राजू शंकरराव निकोसे,
मु. पो. सावरी (बिड), ता. वरोरा,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. दिपक देवहाते,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड,
ता. वरोरा, चंद्रपूर.

श्री. विनोद सावनेरकर
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड,
ता. वरोरा, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा एम.एस.ई.बी., वरोरा यांचेकडे विज जोडणी लवकर टाकून देण्यात यावी या विषयी सन २००४-०५ मध्ये एम.एस.ई.बी. कार्यालयात अर्ज केला होता. त्यावर निर्णय घेऊन विलंब करीत दिनाक २१.१.२००९ ला डिमांड नोट काढून देण्यात आला व त्यानुसार ६२६०/- रुपये रक्कम सन २००४ ते २००८ भरली असून टेस्ट रिपोर्ट दिला नाही. याबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसुन येंते. सदरची माहिती साधारण पोष्टाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. बी.पी.एल.चे प्रमाणपत्र जोडले होते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला दिसून

... २

येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता गैरहजर आहेत. मात्र अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वरोरा यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. श्री. शंकर यशवंत निकोसे, रा. सावरी (बिड) यांनी कृषी पंप कनेक्शनकरिता दिनांक २७.१.२००५ ला म.रा.वि.वि.कं.म., सं व सु. उपविभाग, वरोरा येथे अर्ज दिला. त्यानुसार त्यांचे कृषी पंप कनेक्शन दिनांक २९.१.२००७ ला मंजूर करुन त्यांना रुपय ६२६०/- ची डिमांडनोट दिनांक २९.१.२००७ ला दिली. त्यानंतर त्यांनी रुपये ६२६०/- दिनांक १८.५.२००७ ला भरुन टेस्ट रिपोर्ट दिनांक १६.११.२००७ ला सादर केला. म.रा.वि.वि.कं.म.चे नियमानुसार कृषिपंप कनेक्शन, टेस्ट रिपोर्ट सादर केल्यानंतर जेष्ठता यादीप्रमाणे घेण्यात येत असल्यामुळे श्री. शंकर यशवंत निकोसे यांना दिनांक २४.२.२००९ ला कनेक्शन देण्यात आले. श्री. राजु शंकरराव निकोसे यांनी माहिती अधिकार अधिनियम, २००५ नुसार माहिती मिळविण्याकरिता अर्ज माहिती अधिकारी सं. व सु. उपविभाग, वरोरा यांना दिनांक १.१२.२००८ ला दिला. परंतु माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील अर्ज दिनांक २८.१२.२००८ ला अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सं. व सु., वरोरा यांचेकडे दिनांक २८.१.२००९ ला प्राप्त झाला त्यानुसार अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ३.२.२००९ ला सुनावणी घेऊन एका आठवडयाचे आंत विज जोडणी देण्यात येईल असा निर्णय दिला. त्यानुसार शंकर यशवंत निकोसे यांना दिनांक २४.२.२००९ ला विज कनेक्शन देण्यात आले. खांब उभे करावयाच्या अगोदर लांब सर्व्हिस वायर टाकून कृषी पंपाकरिता विज जोडणी देता येत नाही. डिमांड नोट भरल्यानंतर टेस्ट रिपोर्ट सादर करुन जेष्ठता यादीप्रमाणे विज जोडणी देण्यात येते. सौ. स्नेहा सुभाष कारेकर, रा. सावरी यांचे कृषीपंप कनेक्शन दिनांक २२.११.२००६ ला मंजूर झालेले असून त्यांनी डिमांड नोट दिनांक २०.१२.२००६ ला भरली. सौ. स्नेहा सुभाष कारेकर यांना फक्त सर्व्हिस कनेक्शनच असल्यामुळे दिनांक २८.१२.२००६ ला कनेक्शन करण्यात आले. एका मिटरवरुन तीन ठिकाणी विज जोडणी देता येत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ५.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९५/२००९.

श्रीमती कुलदिप परमानंद चकनलवार,
द्वारा - प्रा. एल. एस. दुर्गे, प्लॉट नं. १०,
दिक्षित ले आऊट, लक्ष्मीनगर, वडगांव,
जि. चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. उत्तरवादी विनाअनुमती गैरहजर आहेत. उत्तरवादी यांनी अपील मागे घ्यावे. त्यांनी दुरध्वनीवरुन अपील मागे घ्यावे असे कळविले असल्यामुळे त्यांना आयोगाची नोटीस मिळाली आहे. तरी सुध्दा सुनावणी उपस्थित झाले नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा अवमान केला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १७.१०.२००८ रोजी त्यांनी दिनांक २०.२.२००८ रोजी मा. अध्यक्ष, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे अर्ज सादर केला होता. सदर अर्जावर झालेल्या आदेश प्रत्राची व त्या आदेशाला अनुसरुन केलेल्या कार्यवाहीची अशा दोन साक्षांकित झेरॉक्स प्रति पुरविण्यात याव्यात अशा प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. श्रीमती कुलदिप परमानंद चकनलवार, आरोग्य सेविका यांना त्यांच्या १२ वर्षाच्या

नियमित सेवेनंतर दिनांक १.३.१९९७ ला त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. परंतु त्यांच्या अर्जाचे अनुषंगाने त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांच्या दिनांक १७.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय हे दोषी आढळून येते व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. सदरच्या प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ती यांच्या प्रथम अपीलाची कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांना त्यांच्या दिनांक १७.१०.२००८ च्या अर्जात मागितलेली माहिती त्यांना विनामुल्य पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ती यांच्या दिनांक १७.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सादर करावा अन्यथा शास्ती कायम होईल याची नोंद घ्यावी.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुध्दा दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी प्रशासकीय कारवाई करावी.

४) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ५.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३०१/२००९.

श्री. जयदेव नामदेव थुलकर,
मु. पो. नान्होरी, ता. ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. बी. वटी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

श्री. प्रदीप डांगे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ ला जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, जिल्हा पुरवठा कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे माझे दिनांक ३१.१०ज२००८ व दिनांक ३.१२.२००८ चे अर्जावर आपले स्तरावरुन केलेल्या कार्यवाहीची माहिती मिळावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१.२००९ रोजी शासनाच्या अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती कागदपत्रांच्या प्रतीच्या स्वरुपात पुरविणे अपेक्षित आहे. तथापी आपणास याद्वारे कळविण्यात येते की, आपला अर्ज दिनांक ३.१०.२००८ व दिनांक ३.१२.२००८ नुसार कार्यवाही सुरु आहे. तसेच यापुर्वी करण्यांत आलेल्या

कार्यवाहीच्या प्रती पुरविण्यात येत आहे. सहपत्र वर प्रमाणे असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक १७.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ३.३.२००९ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांचेकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. दिनांक २.३.२००९ रोजी पुरविण्यात आलेल्या माहितीची केलेली कार्यवाही योग्य आहे. तरीही अपीलार्थीने दाखल केलेल्या अर्जावर काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती ७ दिवसांचे आंत पुरविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे पुन्हा दिनांक १९.३.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, पुर्वीची कार्यवाहीची माहिती मिळाली. परंतु त्यांनी केलेल्या अर्जाचे संदर्भामध्ये माहिती मिळाली नाही. परंतु कार्यवाही सुरु आहे ही माहिती झाली काय. कार्यवाही ही ३० दिवसांचे आंत पुर्ण होईल अशी शक्यता नसते. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी अर्ज केला व आयोगाची सुनावणी दिनांक ५.८.२००९ रोजी सुरु आहे. परंतु कार्यवाही बद्यल जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले कार्यवाही पुर्ण झाली आहे व संबंधिताची अनुज्ञपती रद्य करण्यात आली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ५.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३००/२००९.

श्री. गोसाई कचरुजी नगराळे,
नेहरुनगर वार्ड क्र. ४, द्वारा - नगराळे किराणा स्टोअर्स,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एन. बी. वटी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

श्री. प्रदीप डांगे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ५.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे संपूर्ण जिल्हयातील केरोसीन वाटपाच्या माहे मे २००८ ते माहे नोव्हेंबर २००८ पर्यंतच्या तालुका निहाय वाटपाच्या यादया, जिल्हयातील तालुक्याची एक गॅस व दोन गॅस धारकाची तालुकावाईज वेगवेगळी आकडेवारी, जिल्हयातील तालुक्यातील सफेद रेशन कार्ड, अत्योंदय, बी.पी.एल., ए.पी.एल. रेशनकार्ड धारकांची तालुकावाईज वेगवेगळया आकडेवारीची माहितीच्या प्रती. माहिती स्वतः घेऊन जाणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.११.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, चंद्रपूर सर्व तहसीलदार यांना सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी अशा

प्रकारचे आदेश दिलेले दिसून येते व त्या सदरच्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना परस्पर तहसीलदार यांनी माहिती दिलेली असून सुध्दा अपीलकर्ता हे पुन्हा शासकीय माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध व्हावी अशी अपेक्षा करीत आहेत. तसे दिनांक २२.४.२००९ रोजी चंद्रपूर जिल्हयातील केरोसीन वाटपाच्या यादया मे २००८ ते नोव्हेंबर २००८, गॅस बाबत माहिती १ गॅस, २ गॅस, रेशन कार्डाबाबत माहिती ए.पी.एल., बी.पी.एल., अंत्योंदय, शुभ्र याबाबत १८०३ पानांची माहिती यासोबत पाठविण्यांत आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असून सुध्दा त्यांनी प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.३.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीने मागणी केलेली माहिती ७ दिवसांचे आंत पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते व त्याप्रमाणेच त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असे असून सुध्दा त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना दिनांक १८.५.२००९ रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विभागाप्रमाणे असली तरी वेगवेगळया तारखांना जशी उपलब्ध झाली तशी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ५.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२४/२००९.

श्री. कुवरसिंह लालजी पटेल,
मु. सिल्ली, पो. गांगरा,
ता. तिरोडा, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. जी. बारापात्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, गोंदिया.

श्री. व्ही. बी. बैस,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
पाटबंधारे उपविभाग, तिरोडा,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, पाटबंधारे उपविभाग, तिरोडा यांचेकडे उपविभागांतर्गत झालेले माती काम व मुरुम कामाची माहिती व पेट्रोलिग व ग्रास कटींगवर झालेल्या खर्चाचे माहिती बाबत सन २००१ ते २००८ पर्यंत. सदरची माहिती अतिशिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असल्यामुळे व अपीलकर्ता यांचा खुलासा नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले नाही असे सांगितले व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

... २

३.        अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण व खर्चाची कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहिती मागितली ती उपविभागाकडे. उपविभागाकडे कामावर देखरेख करण्याचे अधिकार असतात. मात्र संपूर्ण कामाची मान्यता विभागीय कार्यालया तर्फे होते व त्यामुळे उपविभागीय अधिकारी यांचेकडे सदरची माहिती उपलब्ध नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही असे कळविण्यात आले होते. प्रथम अपीलीय अधिकार यांनी असे सांगितले की, माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांना दोन वेळेस नोटीस काढून ते गैरहजर होते व त्यामुळे त्यांना कोणत्या प्रकारची माहिती अपेक्षित आहे हा खुलासा झालेला नसल्यामुळे अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही. याप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती देण्याची प्रक्रिया पुर्ण झालेली असली तरी अपीलकर्ता यांना विभागीय कार्यालयाकडून संबंधित कामाचे संदर्भामध्ये माहिती मागवून उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१०.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने अपवाद म्हणून विभागीय कार्यालयाकडून मागितलेल्या कामाचे संदर्भातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामूल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ७.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२६/२००९ व अपील क्रमांक ३२७/२००९.

श्री. योगिराज मांगोजी मेश्राम,
मु. पो. फुलचूर पेठ, आय.टी.आय. समोर,
ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
नगर परिषद कार्यालय लेखा विभाग,
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत.

२. अपील क्रमांक ३२६/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगरपरिषद, गोंदिया यांचेकडे ५ वे वेतन आयोगानुसार थकबाकीची संपूर्ण रक्कम त्वरित देण्यात यावी. यासाठी दिनांक ३.११.२००८ ला अर्ज दिला असून दिनांक २.१२.२००८ व दिनांक २९.१.२००९ ला स्मरणपत्र दिले आहेत त्यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे त्याची माहिती द्यावी. दिनांक ३.११.२००८ ते आज पर्यंत इतर व्यक्तिंना थकबाकी राशी देण्यात आली आहे काय असल्यास त्या बाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ९.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती उपलब्ध करुन दिली नाही तसेच अर्जाची दखल सुध्दा घेतली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. आज सुनावणीचे वेळेस सुध्दा आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.७.२००९ रोजी नोटीस काढून सुध्दा जनमाहिती अधिकारी हे हजर झाले नसल्यामुळे त्यांनी आयोगाचा सुध्दा अवमान केलेला आहे व त्यामुळे अधिनियमाचे कलम २०(१) व (२) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपषिद, गोंदिया यांनी सुध्दा अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे व ती प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर यांनी करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३२७/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य अधिकारी, नगर परिषद गोंदिया यांचेकडे शासनाच्या विभिन्न विभागाकडून नगरपरिषदेला घेणे असलेल्या रक्कमेबाबत या संघटनेचे मुळ पत्र दिनाक ५.११.२००८ व त्यानंतर स्मरणपत्र दिनांक २०.११.२००८ आणि दिनांक ३०.१२.२००८ अन्वये माहिती मागविण्यात आली होती. परंतु माहिती अद्यापि पुरविण्यात आली नाही. सदर पत्रांवर काय कार्यवाही करण्यात आली त्याबाबत माहिती सविस्तर पुरविण्यात यावी. शासनाचे विभिन्न विभागाकडून रक्कमा प्राप्त करुन घेण्यासाठी नगरपरिषद कार्यालयाद्वारे कोणती कार्यवाही करण्यात आली. रक्कमा प्राप्त झाल्या नसल्यामुळे नगरपरिषदेला जे आर्थीक नुकसान झाले त्याला जबाबदार कोण आहे याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. अपीलकर्ता यांच्या दिनांक ११.२.२००९ च्या अर्जाची दखल घेतली नसल्यामुळे संबंधित जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३२६/२००९ व अपील क्रमांक ३२७/२००९ ही दोनही अपीले मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अनुक्रमे दिनांक ७.२.२००९ व दिनांक ११.२.२००९ रोजीच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांना संपूर्ण माहिती कागदपत्राचे स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.२.२००९ व दिनांक ११.२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने संबंधित जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व त्याबाबतचा खुलासा आयोगाकडे केलेला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- शास्ती कां लादण्यात येऊ नये याबद्दलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा अन्यथा रुपये २५०००/- ची शास्ती ही कायम होईल.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा दोनही प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नागपूर यांनी योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२२/२००९.

श्री. कृष्णाकुमार गोपिचंदजी कुराहे,
मु. झालिया, पो. कावराबांध,
ता. सालेकसा, जि. गोंदिया - ४४१ ९१६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी (पुनर्वसन विभाग),
गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी (पुनर्वसन विभाग),
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी तर्फे श्री. सी. एच. पराते, उपजिल्हाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय पुनर्वसन विभाग, गोंदिया यांचेकडे दिनांक ११.११.२००८ रोजी दिलेले निवेदन संबंधी माहिती देण्याबाबत. भुसंपादन अंतर्गत बोगस प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र जिल्हा पुनर्वसन अधिकारी द्वारा दिये जाने का संपूर्ण जानकारी और गैरअर्जदारो द्वारा उसका लाभ उठाये जाने संबंधी अर्ज दि गयी थी. अतः इस संबंधमे आपके द्वारा कौनसे कदम उठाया गया हे इसकी जानकारी मुझे देने की कृपा करेंगेजी. सदरची माहिती पंजीबध्द टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.१.२००९ रोजी तक्रारीत नमुद केलेल्या व्यक्ती संबंधात सदर इसम शासकीय सेवेत कोणत्या सामाजिक व समांतर आरक्षणांतर्गत केव्हा नियुक्ती झालेली आहे. तसेच प्रकल्पग्रस्ताच्या आधारे नोकरीत लागले असल्यास संबंधितांकडून दाखल

... २

दस्ताऐवजाची प्रत याबाबतची माहिती दिनांक १.१.२००९ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडून मागविण्यात आलेली आहे. संबंधिताकडून माहिती प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल. असे उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी (पुनर्वसन), गोंदिया यांनी कळविलेले आहे. सदरच्या उत्तराने अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयासंबंधी दिनांक ३०.१.२००९ रोजी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे किंवा त्यासंबंधामध्ये गोंदिया जिल्हा निर्माण झाला असून पुनर्वसन विभाग हा गोंदिया जिल्हयात नाही. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली ती भंडारा जिल्हयातील नोंद झाली असल्यामुळे व सदरची व्यक्ति ही जिल्हा परिषद मध्ये कार्यरत असल्यामुळे त्यांचेकडे माहिती मागितलेली आहे. परंतु त्यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र जिल्हापरिषद यांना मागितलेल्या माहितीच्या अधिकाराची अपीलकर्ता यांना प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. असे असले तरी ही सर्व प्रशासकीय बाब असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती ही जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडून उपलब्ध करुन घेऊन पुरविणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत पुनर्वसन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा किंवा जिल्हा परिषद कार्यालयाकडून मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेऊन विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३२८/२००९, अपील क्रमांक ३२९/२००९, अपील क्रमांक ३३०/२००९, अपील क्रमांक ३३१/२००९, अपील क्रमांक ३३२/२००९, अपील क्रमांक ३३३/२००९, अपील क्रमांक ३३४/२००९, अपील क्रमांक ३३५/२००९.**

श्री. नानाजी जैदास रामटेके,
रा. जानवा, पो. ईटखेडा,
ता. अर्जुनी मोर, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. डी. नंदवाने,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
पाटबंधारे विभाग, गोंदिया.

श्री. के. डी. दमाहे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अभियंता,
बांध इटिया डोह प्रकल्प, पाटबंधारे विभाग,
शाखा कोरंभी, ता. अर्जुनी मोर, जि. गोंदिया.

श्री. एच. जी. सुपले,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, अर्जुनी मोर,
जि. गोंदिया.

श्री. जे. एस. राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, अर्जुनी मोर,
जि. गोंदिया.

श्री. जे. एस. राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक (बांधकाम)
पंचायत समिती, अर्जुनी मोर,
जि. गोंदिया.

श्री. बी. आर. पारधी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, अर्जुनी मोर,
जि. गोंदिया.

श्री. एम. एल. नंदागवळी,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जानवा,
पो. ईटखेडा, ता. अर्जुनी मोर,
जि. गोंदिया.

श्री. एस. डी. चांदेवार
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, जानवा,
पो. ईटखेडा, ता. अर्जुनी मोर,
जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २१.३.२००९, दिनांक १५.४.२००९, दिनांक ५.४.२००९, दिनांक १४.४.२००९, दिनांक ५.४.२००९, दिनांक ५.४.२००९, दिनांक ५.४.२००९ व दिनांक १५.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये एकूण ८ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या आठही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ३२८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनाक २९.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, बांध ईटियाडोह प्रकल्प, पाटबंधारे विभाग, शाखा कोरंभी यांचेकडे दिनांक ४.११.२००८ च्या अर्जानुसार दिनांक १८.११.२००८ ला मला कार्यालयात बोलावून काय माहिती पाहिजे विचारले त्यावर मी माझ्या अतिक्रमण शेतजमीनीच्या पाणीपट्टी कर नोटीस नक्कल किंवा पाणी पुरवठा साधत

आहे व शेत असल्याचे प्रमाणपत्राची मागणी केली असता आपण माहिती पाठवून मिळेल असे सांगितले. परंतु अजुनपर्यंत मिळाली नाही. तरी मिळण्यात यावी खाजगी कामाकरिता छायांकित नक्कल. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २२.१२.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ५.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सहाय्यक अभियंता यांना माहिती विचारलेली दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २३.१.२००९ रोजी व दिनांक १६.२.२००९ रोजी शाखा अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सन १९७५-७६ पासून गट नं. ९३ मध्ये शेतीकरिता व पाटबंधारे विभागाकडून पाणीपट्टी कर घेत. परंतु त्यांचेकडे नोटीस उपलब्ध नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता ज्या गट नं. ९३ ची माहिती मागत आहेत तो गट नं. ९३ हा वनविभागाचा मालकीचा असून त्यांना पाणी देण्यात येत नाही व नोटीसही देण्यात येत नाही. परंतु आता पुरावा देण्यासाठी नोटीसची मागणी ते करीत होते. विभागाचे अभिलेखामध्ये अशा प्रकारची कोणतीही माहिती उपलब्ध नाही हे कळविले आहे व अपीलकर्ता यांनी सुध्दा हे मान्य केले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३२९/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १७.११.२००८ रोजी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी मोर यांचे मार्फत सरपंच, ग्रामपंचायत, जानवा यांचेकडे समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया मागासवर्गीयांना वैयक्तिक लाभ मिळण्याबाबत विद्युत मोटार पंप, एच.डी.पी.ई. पाईप लागणारे साहित्य मिळण्याबाबत दिनांक १०.९.२००८ ला दिलेल्या अर्जानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली त्या विषयी माहिती मिळण्याबाबत. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडले आहे. परंतु अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.११.२००८

रोजी त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सुध्दा अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २९.१२.२००८ रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, अपीलकर्ता यांचे समाज कल्याण विभागांतर्गत मागासवर्गीयांना वैयक्तिक लाभ मिळण्याबाबत अर्ज दिनांक१०.९.२००८ ला प्राप्त झाला. समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, गोंदिया यांना दिनांक ५.११.२००८ ला मंजूरीकरिता पाठविलेला आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याच अर्जाचे संदर्भात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलाचे सुनावणीमध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी ग्रामपंचायत जानवा येथील सचिवांना असे सुचित केले की, अपीलकर्ता यांचे समाज कल्याण विभाग, गोंदिया मार्फतीने लाभाचे अर्ज ग्रामसभेत ठेऊन व त्यास मंजूरी प्रदान करण्याची कार्यवाही करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. यावरुन अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचा वैयक्तिक लाभ मिळण्याचा अर्ज हा ग्रामपंचायतमध्ये ठराव होऊन पाठविण्यात येतो. परंतु अपीलकर्ता हे ग्रामपंचायत मध्ये अर्ज न देता खंड विकास अधिकारी यांचे मार्फत अर्ज देतात व त्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही व ग्रामपंचायतीने नंतर ठराव केल्याशिवाय पंचायत समिती कोणत्याही प्रकारचा लाभ मिळवून देऊ शकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

६. अपील क्रमांक ३३०/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००८ रोजी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनीमोर यांचेकडे ग्रामपंचायत कार्यालय, जानवा येथील कमेटीने एस.सी. लाभार्थींना घरकुल न दिल्यामुळे आपल्या मार्फत मला घरकुल मिळण्याबाबत दिनांक १७.११.२००८ ला दिलेल्या अर्जानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली त्याविषयी माहिती मिळण्याबाबत. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे व बी.पी.एल. प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.१२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.१२.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होऊन समाधान झाल्यामुळे अपील फेटाळण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे सुनावणी

मध्ये घरकुलाच्या प्रतिक्षा यादीत अपीलकर्ता यांचे नाव समाविष्ठ करण्यास्तव सचिव, ग्रामपंचायत, जानवा यांनी आपले स्तरावर कार्यवाही करावी असे आदेश दिलेले दिसून येतात. तरीसुध्दा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

७. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

८. अपील क्रमांक ३३१/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनाक ३.१.२००९ रोजी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जानवा येथील शाळा वर्ग खोली बांधकाम दिनांक २२.८.२००८ ला झालेल्या जमाखर्चाच्या अहवालाची ग्रामसभा घेऊन खर्च दाखविण्यात आला. त्या हजेरी पुस्तकावर ग्राम सदस्य स्वाक्षरी नोंदीची छायांकित नक्कल मिळण्याबाबत. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. बी.पी.एल. प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ९.२.२००९ अशी तारीख असलेले पत्र अपीलकर्ता यांना दिनांक १३.२.२००९ रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते व त्यात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. दिनांक २२.८.२००८ ला वर्गखोली बांधकामासंबंधी जमाखर्चाचा अहवाल सादर करण्यासाठी ग्रामसभेचे आयोजन करण्यात आलेले नव्हते. दिनांक २२.८.२००८ ला ग्रामशिक्षण समितीची मासिक सभा बोलावण्यात आलेली होती. त्यासभेची प्रोसिडींग बुकची झेरॉक्स प्रत आपल्याला देत आहे. तसेच दिनांक ७.५.२००९ रोजी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जानवा यांनी अध्यक्ष, ग्राम शिक्षण समिती, जानवा व सचिव, ग्रामपंचायत, जानवा यांना पत्र दिलेले दिसून येते व त्यावर दिनांक ३.६.२००९ ला अर्ज प्राप्त झाला. त्यामुळे पुढील ऑगष्ट महिन्याचे सभेमध्ये वाचन करण्यात येईल सौ. एम. व्ही. खोब्रागडे अशी स्वाक्षरी दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

९. सदरच्या प्रकरणाचे संदर्भात अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ६४३/२००८ आदेश दिनांक ७.५.२००९ हे सुध्दा दाखल केले होते व त्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते. तसेच अपीलकर्ता यांना जमाखर्चाचे संदर्भामध्ये दिनांक १५.८.२००९ रोजी वाचन करण्यात येईल असे सांगितले त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

१०.  अपील क्रमांक ३३२/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००८ रोजी सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, जानवा यांचेकडे दलित वस्ती रस्ता बांधकाम दिनांक १०.११.२००७ ला झालेल्या खर्चाची, मट्रेलची, बांधकाम करणार विषयी माहिती मिळण्याबाबत. सिमेंट, लोहा, रेती, गिट्टी व किरकोळ ग्रामपचांयत सदस्य रायभान खोब्रागडे यांना रस्ता बांधकाम ठेका देण्यात आला होता. त्यांच्याकडे गॅगलेबर, गवंडी कोणकोणत्या कास्टचे व गावचे होते. नांव व पत्ता वर्णन स्वरुप सहीत खरेदी बिलांच्या छायांकित नकला. सदरची माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. बी.पी.एल. प्रमाणपत्र सोबत जोडलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.१२.२००८ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३.२.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते. तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

११.  अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

१२.  अपील क्रमांक ३३३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सरपंच, ग्राम पंचायत, जानवा यांचेकडे मौजा जानवा येथील दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत रस्ताबांधकाम दिनांक १०.११.२००७ ला करण्यात आला आहे. तो रस्ता बांधकाम किती मीटर केला आहे. त्याची लांबी, रुंदी, मेजरमेंट मिळण्याबाबत छायांकित नक्कल अशी माहिती मागितलेली दिसून येते.

१३.  अपील क्रमांक ३३४/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी सरपंच, ग्रामपंचायत, जानवा यांचेकडे मौजा जानवा येथील दलित वस्ती सुधार योजनाअंतर्गत रस्ता बांधकाम दिनांक १०.११.२००७ ला झालेल्या जमा खर्चाच्या अहवालाची ग्रामसभा घेऊन खर्च दाखविण्यात आला असेल त्या हजेरी पुस्तिकावरची ग्राम सदस्य स्वाक्षरी नोंदीची छायांकित नक्कल मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. या दोन्ही माहितीच्या संदर्भात अपीलकर्ता यांनी पूर्वी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ६४२/२००८ हे दाखल केले होते व या दोन्ही अपीलाचे संदर्भात त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील क्रमांक ६४२/२००८ हे सुध्दा खारीज करण्यात आले होते व अपील क्रमांक ३३३/२००९ व अपील क्रमांक ३३४/२००९ हे सुध्दा खारीज करण्यास पात्र आहे.

१४. अपील क्रमांक ३३५/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्जुनी मोर यांचेकडे शासकीय योजनेअंतर्गत विद्युत पंचाचा लाभ मिळण्याबाबत व ग्रामपंचायत जानवा चपराशी यांनी फॉर्म न घेतल्याबाबत दिनांक १०.९.२००८ ला दिलेल्या अर्जानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली त्याची माहिती मिळण्याबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.११.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यासोबत सचिव, ग्रामपंचायत, जानवा यांचे पत्र व ग्रामपंचायत, जानवा येथील चपराशी यांचे लेखी बयान सुध्दा उपलब्ध करुन दिलेले दिसून येते. यावरुन झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली असून सुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २९.१२.२००८ रोजी देण्यात आला असून सचिव, ग्रामपंचायत, जानवा यांनी संबधित चपराश्यावर आपल्या स्तरावरुन कारवाई करावी व अपील खारीज करण्यात आलेले आहे. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

१५. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३२८/२००९ ते अपील क्रमांक ३३५/२००९ ही आठही अपीले खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- ७.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५८/२००९.

श्री. नरेश गंगारामजी नवखरे,
मु. पिंपळगांव/स.,
ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. गोधणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक संचालक,
शिक्षण उपसंचालक कार्यालय,
नागपूर विभाग, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.८.२००९ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. आपल्याकडून नमुना पत्र ब मिळल्यानंतर अर्जदार स्वतः येऊन माहितीकरिता लागणारे शुल्काचे रक्कम प्रदान करुन माहिती घेऊन जाईल यासाठी अर्जदारास लागणाऱ्या शुल्काची चालान प्रत मंजूर करुन अर्जदारास पाठवावी. अर्जदारास न्यायालयीन कामकाजासाठी आवश्यकता आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.९.२००८ रोजी आपण मागितलेली माहिती केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील (च) नुसार "माहिती" या संज्ञेत येत नसल्यामुळे सदर माहिती आपणास देता येत नाही. असे माहिती अधिकारी शिक्षण उपसंचालक कार्यालय,

नागपूर यांनी अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता हे हजर राहिले नसल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, प्रथम अपीलाचे सुनावणीची नोटीस त्यांना विलंबाने मिळाल्यामुळे ते सुनावणीस हजर राहू शकल नाही. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता दिनांक ३१.१०.२००८ रोजी सुनावणीस उपस्थित राहिले नाही. मात्र त्यांनी पुन्हा सुनावणी घेण्याकरिता दिनांक २७.४.२००९ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यास अर्ज केला तो विलंबाने केलेला आहे व त्यामुळेच प्रथम अपीलाचे संदर्भात पुन्हा निर्णय देण्यात आलेला नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा त्यांचाशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही. तसेच अपीलकर्ता यांनी महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई यांचेकडे तक्रार केलेली होती व त्याबाबतचा खुलासा दिनांक ३.४.२००६ रोजी केलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी नमुद केलेल्या कार्यालयीन पत्रावरुन झालेल्या कार्यवाही माहिती मागितलेली असल्यामुळे जर कार्यवाही झाली असेल ती त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तत्कालीन माहिती अधिकारी यांनी जे उत्तर दिले ते अत्यंत अर्थहीन आहे व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती ही मागण्याचा अधिकार आहे. त्यामुळे त्यांच्या दिनांक २५.८.२००८ च्या अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत मागितलेल्या माहितीचे संदर्भातील कार्यवाही झाली असल्यास झालेल्या कार्यवाही कागदपत्रांच्या स्वरुपात छायांकित प्रती रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारच्या अधिनियमाच्या तरतुदीची माहिती करुन घेतली नसल्यामुळे व माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाची आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५४/२००९ व अपील क्रमांक ३५५/२००९.

श्री. महेंद्र हेतराम राहांगडाले,
द्वारा - रामभाऊ खिलोटे,
मु. मुरमाडी/तुपकर,
ता. लाखनी, जि. भंडारा.

श्री. संजय रामभाऊ शिवनकर,
मु. विहिरगांव (कन्हाळया) पो. भुगांव मेंढा,
ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. वाय. ए. मांडवटकर,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
मनोहर विद्यालय, गुरढा,
ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने श्री. बारस्कर, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ६.२.२००९ रोजी व दिनांक १२.२.२००९ रोजी राज्य जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मनोहर विद्यालय, गुर्ढा यांचेकडे सन २००० ते २००९ या कालावधीतील

विद्यालयातील माहिती मिळण्याबाबत एकूण ११ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना अ.क्र. दिनांक १३.२.२००९ रोजी आपण आमचे विद्यालयातील कर्मचारी नसतांना न्यायालयीन प्रयोजनासाठी काय आवश्यकता भासली हे कळायला मागै नाही. तरी आपण मागविलेली माहिती आपणास पुरविणे गरजेचे वाटत नसल्यामुळे आपणास माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. तसेच दिनांक २१.२.२००९ रोजी आपण कसल्या प्रकारचे कार्य करीत आहात ते स्पष्ट करावे. जेणेकरुन आम्हाला माहिती पुरविण्यास अडचण भासणार नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु दोनही अपीलकर्ता यांचे वरील उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे दिनांक ९.३.२००९ रोजी दोन प्रथम अपीले ही शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.४.२००९ रोजी देण्यात आला असून मुख्याध्यापक यांचे वेतन थांबविण्यात यावे व संबंधितांना माहिती मुख्याध्यापक यांनी उपलब्ध करुन देण्यात यावी. निर्णयाच्या वेळेस मुख्याध्यापक गैरहजर होते अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना दिनांक १३.७.२००९ रोजी माहितीकरिता अतिरिक्त खर्चाचा भरणा करावा अशा प्रकारचे पत्र दिले होते. परंतु अपीलकर्ता यांनी पैशाचा भरणा केलेला नसल्यामुळे सदरची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००९ रोजी माहिती न पुरविल्याबद्दल दोन अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय जुनी व व्यापक प्रमाणात आहे. तसेच दोनही अपीलकर्ता यांचा संबंध संस्थेशी नाही व शाळेचा सुध्दा नाही. त्यामुळेच त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ता यांना विहित मुदतीत खर्चाचा भरणा कळविला असता तर अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा केल्या शिवाय माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नव्हती. परंतु अतिरिक्त खर्चाचा भरणा हा प्रथम अपील झाल्यानंतर कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, दोनही अपीलामध्ये एकच माहिती आहे त्यावर दोनही अपीलकर्ता यांनी सांगितले की, श्री. महेंद्र हेतराम

राहांगडाले यांना माहिती दिली नाही म्हणून दुसरा अर्ज करावा लागला. कारण श्री. महेंद्र हेतराम राहांगडाले यांचा अर्ज हा दिनांक ६.२.२००९ रोजीचा आहे व श्री. संजय रामभाऊ शिवणकर यांचा अर्ज हा दिनाक १२.२.२००९ रोजीचा आहे याचा अर्थ ३० दिवसांची सुध्दा माहितीची वाट पाहली नाही व त्यामुळे दोनही अपीलकर्ता हे प्रामाणिक आहेत असे दिसून येत नाही. असे असले तरी दोनही अपीलकर्ता यांनी एकच माहिती मागितलेली असल्यामुळे या दोघांनाही एकच माहिती विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे दोनही अपीले हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३५४/२००९ व अपील क्रमांक ३५५/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून दोनही अपीलकर्त्यांनी एकच माहिती मागितलेली असल्यामुळे सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी व दोघांनी एकाच माहितीकरिता पोच द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५२/२००९.

श्री. दिपक रामदास वालोदे,
मु. पो. पोहरा,
ता. लाखनी, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. झेड. शेंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. वाय. एस. हरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे आंतरजिल्हा बदली झालेल्या ४९ शिक्षकांच्या बदलीचा प्रकार तपशील मिळणेबाबत. माहिती दिलेल्या नमुन्यामधून मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी पुन्हा दिनांक ९.१.२००९ रोजी तीच माहिती जनमाहिती अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांना माहिती मागितलेली दिसून येते व त्यांना सदरची माहिती दिनांक २९.१.२००९ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. ही बाब अपीलकर्ता यांनी मान्य केलेली आहे. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२००९ रोजी सुध्दा माहिती मागितलेली होती. परंतु सदरच्या माहितीचे करिता त्यांना दिनांक ४.३.२००९ रोजी रुपये अंदाजे ३००/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना सदरचे पत्र मिळाले नाही. परंतु अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्जावर जो पत्ता दिलेला आहे त्याच पत्त्यावर पत्र दिलेले आहे व अपीलकर्ता यांनी असे सांगितले की ते बीड जिल्हयामध्ये प्राथमिक शिक्षक आहेत व मु. पो. पोहरा येथे आई वडील असुन सदरचे पत्र त्यांना मिळाले नाही अर्थात आई वडीलांकडे चौकशी करणे आवश्यक आहे. सोबत माहिती मात्र त्यांना उपलब्ध झाली आहे व इतर माहितीकरिता खर्चाचा भरणा करणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांची मुळ तक्रार अशी आहे की, ते पती पत्नी शिक्षक असले तरी त्यांची एकतर्फी बदली करण्यात आली आहे. त्यामुळेच त्यांनी ४९ शिक्षकांची माहिती मागितलेली होती. माहिती त्यांना उपलब्ध झाली आहे. त्याविरुध्द त्यांनी योग्य त्या सक्षम अधिकाऱ्याकडे तक्रार करणे आवश्यक राहिल. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५६/२००९ व अपील क्रमांक ३५७/२००९.

श्री. सुनिल मदनलाल पशिने,
प्रगती कॉलोनी, शेवटची गल्ली,
राजीव गांधी वार्ड, जि. भंडारा - ४४१ ९०५.

श्री. गंगाप्रसाद रामाधार दुबे,
विनोबा भावे नगर, ता. तुमसर,
जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. एन. वाकोडीकर,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. दोनही अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, भंडारा यांचेकडे रोल नं. ५ श्री. ए. एस. धाबर्डे, रोल नं. ९ श्री. एस. एन. पशिने व रोल नं. १६ कु. टी. एस. मोटघरे यांचे उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्रत. वरिष्ठ लिपिक परीक्षेस बसलेल्या सर्व प्ररिक्षार्थी (उमेदवार) ना प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराला किती किती गुण मिळाले याची गुणपत्रिकेची झेरॉक्स प्रत किंवा प्रत देण्यात यावी. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच रोल नं. २ श्री. जी. आर. दुबे, रोल नं. १० श्री. आर. एच. पठाण, रोल नं. १४ श्री. व्ही. के. नंदागवळी यांचे उत्तर पत्रिकेची झेरॉक्स प्रत सुध्दा मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. दोनही अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २८.२.२००९ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत खंड ८ व ९ नुसार आपण मागितलेली माहिती आपणास देता येणार नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी

... २

कळविलेले दिसून येते. त्यावर दिनांक ४.४.२००९ रोजी श्री. एस. एम. पशिने, लिपिक, आस्थापना शाखा व दिनांक ६.४.२००९ रोजी श्री. जी. आर. दुबे, तात्पु. सहाय्यक वाहन निरिक्षक यांनी खंड ८ व ९ मध्ये मी मागितलेली माहिती देण्यांत येऊ नये असे कुठेही उल्लेख नाही असे आक्षेप घेणारे पत्र दिलेले आहे. तसेच दिनांक १६.१२.२००८ रोजी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मध्यवर्ती कार्यालय, मुंबई यांचेकडे तक्रार केलेली दिसून येते. मात्र प्रथम अपील दोनही अपीलकर्ता यांनी दाखल केलेली नाही व राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, विभागीय नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, जालना/वर्धा रोजी पत्र प्राप्त झाले होते व संबंधित माहिती अधिकारी यांनी कोणती माहिती द्यावी अथवा नाकारावी याविषयी अधिनियमातील खंड ८ व ९ येथे तरतुद करण्यात आली आहे. त्याचा अभ्यास करावा. अभ्यास न करता संदर्भ करुन आपली नियमाधीन जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करु नये. परीक्षा संबंधी वैयक्तिक व त्रयस्थ व्यक्तींच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती देऊ नयेत. मात्र परीक्षेमध्ये मिळालेल्या वैयक्तिक गुणांची माहिती त्याच व्यक्तीस देण्यास हरकत नाही व त्यामुळेच सदरची माहिती दोनही अपीलकर्ता यांना नाकारली असे आयोगास सांगितले.

४. दोनही अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती वरिष्ठ लिपिक पदाची बढतीचे परिक्षेचे स्वतःचे उत्तर पत्रिका आहेत त्याची माहिती व इतर उमेदवारांच्या उत्तर पत्रिकांची छायांकित प्रती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिकेची त्यांना पाहणीसाठी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल व मात्र इतर उमेदवारांची माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे सदरची उत्तरपत्रिका पाहणीसाठी सुध्दा उपलब्ध करुन देता येणार नाही. त्याकरिता दोनही अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३५६/२००९ व अपील क्रमांक ३५७/२००९ हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना संबंधित परिक्षेचे त्यांच्या स्वतःच्या उत्तरपत्रिका हया हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता दोनही अपीलकर्ता यांनी कार्यालयीन कामकाजाचे वेळेत तारीख व वेळ कळवून जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून व तारीख व वेळेस उपस्थित राहून उत्तरपत्रिकाची पाहणी करावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५१/२००९.**

श्री. किशोर ध. कंगाले,
साई मंदीरजवळ,
डॉ. रंगारी नर्सिगहोमच्या मागे,
तकीया वार्ड, जि. भंडारा. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. के. झेड. शेंडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. वाय. एस. हरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक निरंक रोजी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे अध्यक्ष/सचिव, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन, जिल्हा शाखा भंडारा म्हणून एकूण ५ मुद्यांवर अनुसुचित जमातीच्या आरक्षण सवलतीवर सरळ सेवा भर्तीने व पदोन्नतीने नौकरी करणारे अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती बिंदुनामावलीनुसार सरळ सेवा भर्ती व पदोन्नती दिलेल्या कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांची सेवा जेष्ठता यादी सर्व संवर्गाची १९७५ पासून आतापर्यंत लागलेल्या अनुसुचित जमातीचे अधिकारी/कर्मचाऱ्यांची माहिती मागितलेली दिसून येते. परंतु दिनांक ७.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी पदनामाचा उल्लेख करुन माहिती मागितलेली आहे.

आपण पदनामाचा उल्लेख करुन माहिती न मागविता स्वतःच्या नावाने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत माहिती मागविण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे सुनावणीकरिता अपीलकर्ता यांना अनेक पत्र दिलेले दिसून येतात. परंतु दिनांक ४.७.२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचे कार्यालयास अर्ज करुन माहिती मागितली आहे. यास्तव दिनांक ५.७.२००८ ची सुनावणी आपले कार्यालयास हजर राहण्याची गरज भासत नाही. असे अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना कळविलेले दिसून येते व त्यानंतर दिनांक १४.७.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर १० महिन्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता हे सरचिटणीस, ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉईज फेडरेशन, शाखा भंडारा आहेत असे दिसून येते. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ३ प्रमाणे अर्ज नागरीकांनी करावयाचा असतो ही अर्जदार यांना माहिती दिसत नाही. तसेच अपीलकर्ता यांनी जी माहिती अर्जात, त्यानंतर प्रथम अपीलात व त्यानंतर द्वितीय अपीलात यासंबंधी कोणत्याही प्रकारची मुदतती पाळलेल्या दिसून येत नाही. तसेच माहिती ही प्रत्यक्ष माहिती अधिकारी यांना मागावयाची असते. सार्वजनिक प्राधिकरणातील प्रमुखांना मागावयाची नसते. त्याबाबत अपीलकर्ता यांना माहिती दिसून येत नाही व त्यामुळेच त्यांनी प्रथम अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही अशा प्रकारचे अज्ञानमुलक पत्र पाठविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अर्जाप्रमाणे अर्ज केला. परंतु अधिनियमाप्रमाणे उत्तर योग्य होते. त्यांच्या मनाप्रमाणे अर्ज करणे, अपील करणे, द्वितीय अपील करणे हे अधिनियमाचे उल्लंघन ठरते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे दाखल करुन घेणे सुध्दा योग्य नव्हते. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५३/२००९.

श्री. रंजित रुद्रदास चिंचखेडे,
रा. गोंडीटोला, पो. बपेरा,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. एन. घोडेस्वार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. जी. के. राव,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
लघु पाटबंधारे विभाग,
जिल्हा परिषद, भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी १६.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सन २००४ ते २००७ पर्यंत वर्ष निहाय तुमसर तालुक्यात लघु पाटबंधारे, जिल्हा परिषद विभाग मार्फत प्रस्तावित तथा केलेल्या कामाची गाव निहाय माहिती. १) तालुका प्राप्त निधी प्रत, २) खर्चित निधी प्रत, ३) नियोजनाचा निकष प्रत, ४) बांधकामाचे अंदाजपत्रक तथा मोजमाप पुस्तिकेची गाव निहाय प्रत, ५) विभागीय कामाची माहिती प्रत. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे.

... २

दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.३.२००९ रोजी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला व त्यात छायांकित प्रतीच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध करुन द्यावयाची आहे त्यास अंदाजे रुपये ६०००/- पर्यंत खर्च अपेक्षित आहे. परंतु या कार्यालयाकडे कार्यालयीन आस्थापनेमध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे संबंधित प्रती उपलब्ध करुन देता येणार नाही. तरतुद मंजूर झाल्यास निधि उपलब्धीनंतर त्वरेने सर्व दस्ताऐवजाची झेरॉक्स उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापी या कार्यालयात आपण व्यक्तिशः उपलब्ध झाल्यास माहितीची पाहणी करुन आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देता येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना दिनांक १.६.२००९ रोजी उपविभागीय अभियंता यांनी या कार्यालयात प्रत्यक्ष माहिती पहाण्याकरिता कार्यालयीन वेळात दिनांक १५.६.२००९ ला दु. ३:०० वाजता उपस्थित राहावे व आपण मागितलेली माहिती पाहून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता आज गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही अतिशय व्यापक प्रमाणात व जुनी असल्यामुळे अपीलकर्ता यांना ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे संदर्भात कार्यालयात निधी उपलब्ध नाही व त्यामुळे त्यांनी माहिती पाहणी करावी असे कळविलेले दिसून येते. सदरची माहिती ही वेगवेगळया शाखा अभियंता यांचेकडे असल्यामुळे त्यांनी जनमाहिती अधिकारी यांना सादर करावी असे पत्र दिलेले दिसून येते व त्या पत्राचे अनुषंगाने जी माहिती उपलब्ध झाली त्या माहितीच्या खर्चाकरिता माहितीची एकूण पाने १४३७० एवढे आहेत त्याची किंमत १/- रुपया प्रती झेरॉक्स प्रमाणे १४३७०/- एवढया निधीची आवश्यकता होती. हया कार्यालयाला तेवढा निधी उपलब्ध नसल्यामुळे संबंधिताना प्रत्यक्ष माहिती पाहणी करुन घेण्याबाबत पत्र दिलेले दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची पाहणी करण्याकरिता उपस्थित राहणे आवश्यक होते. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ (ञ) प्रमाणे माहितीच्या अधिकाराची जी व्याख्या केली आहे त्या व्याख्येप्रमाणे अभिलेख, दस्ताऐवज यांची पाहणी करो अशी तरतुद आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- ११.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६२/२००९ व अपील क्रमांक ३६३/२००९.

श्री. मेहबुब अली,
वार्ड क्रमांक ५,
ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. डी. अष्टपुत्रे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, आलापल्ली,
ता. अहेरी, जि. गडचिरोली.

श्री. रुषीकांत राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, आलापल्ली,
ता. अहेरी, जि. गडचिरोली.

श्री. आर. बी. खोरगडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
ता. अहेरी, जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.८.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक ११.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपील क्रमांक ३६२/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग, आलापल्ली यांचेकडे जानेवारी २००७ ते डिसेंबर २००८ या काळात शासकीय व आमदार/खासदार यांच्या स्थानिक विकास निधीतून बांधकामासंबंधात काढण्यात आलेल्या निविदांची तारीखवार व क्रमवारीने एकेक कामाची माहिती देण्यात यावी अशा प्रकारे एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.१.२००९ रोजी आपण वरील संदर्भीय अर्जाद्वारे मागितलेली माहिती अत्यंत विस्तृत असून शासकीय साधनसामुग्रीचा व वेळेचा अपव्यय करणारी असल्याने माहिती पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. सदरच्या अर्जाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १५.१.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीनी शासकीय कागदपत्रे अवलोकन करणेकरिता उपलब्ध करण्यात यावी. त्यामधील मागणी केलेली कागदपत्रे आवश्यक ते शुल्क भरुन घेऊन पुरविण्यांत यावी. याकरिता तारीख व वेळ नियोजित करुन अपीलार्थीना माहिती अधिकारी यांनी पत्राने कळवावे असा आदेश दिलेला दिसून येतो व त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती पाहण्यास हजर राहावे असे पत्र दिलेले आहे असे आयोगापुढे सांगितले. परंतु अपीलकर्ता हे माहिती उपलब्ध करुन घेण्यास उपस्थित झाले नाही असेही यापुढे सांगितले. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही विस्तृत प्रमाणात दिसून येते व ती संकलीत करुन उपलब्ध करुन देता येईल असे स्वयंस्पष्ट निर्णय दिलेला दिसून येतो. जनमाहिती अधिकारी यांनी सदरची माहिती ही अत्यंत विस्तृत असून शासकीय साधनसामुग्रीचा व वेळेचा अपव्यय करणारी असल्याने माहिती पुरविता येत नाही ते अधिनियमाचे कलम ७(९) प्रमाणे योग्य आहे. जुनी माहिती शोधून काढावयाची असेल तर कार्यालयाचा बराच वेळ जातो. त्यामुळे अधिनियमाचे कलम ७(९) मध्ये सार्वजनिक प्राधिकरणाचा वेळचा अपवेळ होत असल्यास माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही अशी तरतुद आहे व त्यामुळे जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक ३६३/२००९ मध्ये दिनांक २०.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका कृषि कार्यालय, अहेरी यांचेकडे सन २००६ ते २००८ मध्ये बोडी बांधकामाकरिता अहेरी तालुक्यात किती लाभार्थ्यांची निवड करण्यात आली होती. तसेच जेट्रोपा रोप वाटप करण्यात आले त्यासंबंधीची माहिती एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करण्याकरिता अंदाजित खर्च

... ३

रुपये १२५००/- अपेक्षित आहे असे कळविलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १६.१.२००९ रोजी सदर माहिती काढण्यासाठी २० ते २५ दिवसाचा अवधी लागू शकतो. माहिती तयार करण्यासाठी माहिती रेकॉर्ड उपलब्ध होऊ न शकल्यामुळे माहिती तयार करण्यासाठी विलंब लागणार आहे असे तालुका कृषि अधिकारी, अहेरी यांना कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्यास कळविले असे आयोगापुढे सांगितले. मात्र प्रत्यक्ष दिनांक १६.२.२००९ रोजी माहिती देण्यात आलेली दिसून येते. यावरुन सदरचे पत्र हे मुदतीच्या नंतर देण्यात आलेले आहे. त्यामुळेच अपीलकर्ता यांना दिनांक २७.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयानंतर दिनांक ७.३.२००९ रोजी सुध्दा खर्चाचा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. द्वितीय अपील मेमोमध्ये त्यांनी खर्चाचा भरणा करीता कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतला नाही. तसेच अपीलकर्ता यांना ज्यावेळेस त्यांना खर्चाचा भरणा कळविले त्यावेळेतही कोणत्याही प्रकारचा आक्षेप घेतला नाही. परंतु सदरच्या खर्चाचा भरणा हा मुदती नंतर कळविला असल्यामुळे सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपील क्रमांक ३६२/२००९ मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्रमांक ३६३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- ११.८.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७५/२००९.

श्री. ओ. प. कटयारमल,
११८/डी, पांडे ले आऊट,
खामला, नागपूर - ४४० ०२५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद.

श्री. बी. जी. कऱ्हाळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,
औरंगाबाद. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.२.२००८ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांचेकडे एकूण २१ कनिष्ठ अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी -२ यांच्या कार्यव्ययी आस्थापनेवरील/नियमित आस्थापना/मानीव दिनांक दिलेल्या आदेशांच्या प्रती मिळण्याबाबत. सदरची माहिती पोष्टाद्वारे पाठविण्यांत यावी असे नमुद केलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १८.२.२००८ रोजी जे अधिकारी या कार्यालयांतर्गत आज रोजी कार्यरत आहेत त्यांचा तपशील उपलब्ध करुन

दिलेला दिसून येतो. तसेच कोणत्याही तांत्रिक कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे मानीव दिनांकाचे प्रकरण हे शासन स्तरावरच मंजूर केल्या जाते. कारण शासन स्तरावर मानीव दिनांकाच्या प्रतीची मागणी करण्यात यावी. कारण त्यांच्या वैयक्तिक संचिका त्यावेळेस ते जेथे कार्यरत असतील तेथे असतील त्यामुळे त्यांची माहिती देता येणार नाही. त्यामुळे त्यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ४.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २८.३.२००८ रोजी देण्यात आला असून सदरची माहिती विहित कालावधीत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. तथापी सदरची माहिती ही या कार्यालयात उपलब्ध नसल्याने संबंधित कर्मचारी ज्या ज्या ठिकाणी कार्यरत आहेत अशा कार्यालयात पत्र देऊन सदरची माहिती संबंधितास उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक २०.२.२००९ रोजी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी दिनांक १०.४.२००८ रोजी अजूनपर्यंत माहिती दिलेली नाही असे कारण दिलेले आहे. सदरची यादी जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास दाखविली आहे. तसेच दिनांक २०.२.२००९ चे पत्र दिलेले आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले आहे. तसे अपीलकर्ता यांना पूर्वी दिनांक १५.३.२००७ रोजी तीच माहिती परंतु एकूण ११ कर्मचाऱ्यांचे बाबत मागितली होती व त्याबाबतची अपील क्रमांक २६६६/२००७ चा निर्णय हा दिनांक १६.९.२००९ रोजी झाली असून त्याबाबतची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता एकच माहिती दोनवेळा मागत आहे असे दिसून येते व ती माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७१/२००९.

श्री. के. बी. बावनथडे,
कामठा, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चंद्रकांत इंगळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद,
गोंदिया.

श्री. न. स. सेनवार,
जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
जलस्वराज प्रकल्प, जिल्हा परिषद,
गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर असून त्यांचे वतीने श्री. अनील ठाकरे, वकील हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे सचिव, श्री. लहरी आश्रम, कामठा, गोंदिया म्हणून दिनांक १.४.२००७ ते ३०.९.२००८ या कालावधीतील जल स्वराज प्रकल्प अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया हयांनी मौजा कामठा येथील गट क्र. ८३९/१ या ग्रामपंचायत हद्दीतील सरकारी आबादी जागा जल स्वराज प्रकल्पाला कोणत्या आदेशाद्वारे हस्तांतरीत करण्यात आली त्या आदेशाची प्रत व बांधकाम ईस्टिमेट किती रकमेचा आहे. तसेच हा खर्च कोण करणार आहे. तसेच सदहु

जागेवर जल स्वराज प्रकल्पाला पाण्याच्या टाकीचे बांधकाम करण्यासाठी वर्क ऑर्डर कोणत्या ठेकेदाराला दिलेल्या आहेत याची सविस्तर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १८.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना दोन मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सविस्तर माहिती समिती मार्फत घेण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक १०.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.२.२००९ रोजी देण्यात आला असून सदरची माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे किंवा नाकारली आहे असे दिसून येत नाही व माहिती ही ग्रामस्तरावर उपलब्ध आहे अशा पध्दतीने अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते व सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितील अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ता यांनी आयोगाकडे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे व त्यात चुकीची व अपूर्ण माहिती दिली असे नमुद केलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती ही ग्रामस्तरावर आहे व जलस्वराज समिती ही सर्व प्रकरण तयार करुन जल स्वराज प्रकल्प अधिकारी यांची मंजूरी घेतली जाते. तरीही प्रथम अपीलाचा निर्णयामध्ये पाण्याचे टाकीचे बांधकाम कोणत्या कंत्राटदारास दिले याची माहिती तारखेसह द्यावी असे निर्णयात दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी सर्व माहिती जल स्वराज प्रकल्पाकडून मागून घेऊन ठेकेदाराचे नावासहीत उपलब्ध करुन द्यावी. तशी उपलब्ध करुन न दिल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १२.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७८/२००९.

श्री. वामन चिंतामण बोरकर,
जुना बाजार चौक, ता. गोरेगांव,
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. सी. ठाकरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सह जिल्हा निबंधक, वर्ग-१ (नि.श्रे.) तथा
मुद्रांक, जिल्हाधिकारी, भंडारा.

श्री. एन. एन. किरणापूरे,
जनमाहिती अधिकारी तथा
दुय्यम निबंधक श्रेणी - १,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा दुय्यम निबंधक श्रेणी-१, गोरेगांव यांचेकडे मौजा गोरेगांव येथील प.नं. २१७/१ अ ची रजिष्ट्री कोणत्या आधारावर करण्यात आली. मी गैरहजर असतांना सुध्दा व माझी सहमती नसतांना सुध्दा करण्यात आली. सदरची माहिती व्यक्तिशः उपस्थित राहून घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.१.२००९ रोजी अपीलकर्ता यांना तपशीलात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ३०.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १८.२.२००९

... २

रोजी देण्यात आला असून नोंदणी अधिनियम, १९०८ चे कलम ५७(१) नुसार विहित नमुन्यात आवश्यक माहिती विहित नमुन्यात आवश्यक माहिती भरुन त्यावर रुपये ५/- चे कोर्ट फी तिकीट लावून या कार्यालयास अर्ज सादर करावा. विहित केलेली शोध फी चा भरणा केल्यावर आपणांस अभिलेख उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यानंतर आपण आपल्या मिळकतीचा शोध घ्यावा. मिळकतीचा शोध मिळाल्यास विहित फी भरुन त्याची नक्कल प्राप्त करुन घेता येईल. परंतु अपीलकर्ता यांना सदरचा निर्णय मान्य नसल्यामुळे व अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले असल्यामुळे त्यांना पुन्हा अपीलकर्ता यांचे दिनांक २.३.२००९ रोजी पत्र दिलेले दिसून येते. त्या पत्राचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक ९.३.२००९ रोजी प्रमाणे अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यात पुन्हा कार्यवाहीचा उल्लेख दिसून येतो. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.४.२००९ रोजी देण्यात आलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयानुसार पुन्हा दिनांक १८.५.२००९ रोजी २५/- रुपये शोध फी शासन जमा करुन अभिलेखाचे शोध घेता येईल व सन २०.२.२००२ पुर्वीचे अभिलेख नकले करिता ५/- रुपये प्रती पान व सन २१.२.२००२ नंतरचे संगणक अभिलेख नकलेकरिता प्रती पान रुपये २०/- प्रमाणे शासन फी भरुन अभिलेखाची नक्कल या कार्यालयाकडून प्राप्त करुन घेता येईल. तसेच शोध व नक्कल अर्जाला ५/- रुपयाचे कोर्ट फी लावणे अनिवार्य आहे व नक्कल अभिलेखाकरिता रुपये २०/- कोर्ट फी किवा जनरल स्टॅम्प पेपर सोबत घेउन यावे जेणे करुन प्रमाणित नकलेला प्रमाणित करुन देण्याकरिता सोईचे होईल अस कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य आहे. महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम २००५ कलम ४(१) प्रमाणे विभागांनी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याकरिता पूर्वी नियम केलेले असल्यास त्याप्रमाणे फीचा भराणा करावा व त्यामुळे अपीलकर्ता यांनी योगय ती फी भरुन कागदपत्रे उपलब्ध करुन घेता येईल हा निर्णय योग्य आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १२.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७७/२००९.

श्री. कालीदास तुलशीराम बडोले,
मु. चंद्रशेखर वार्ड, तुलस्कर कॉलोनी,
ता. जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा हिवताप अधिकारी,
कापसे भवन, सिव्हील लाईन,गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा हिवताप अधिकारी,
कापसे भवन, सिव्हील लाईन, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १२.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १२.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी व माहिती अधिकारी हे गैरहजर असून त्यांचेवतीने श्री. यु. एच. मोटघरे, सहाय्यक माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा हिवताप अधिकारी, गोंदिया यांचेकडे सेवानिवृत्तीनंतर उचल केलेल्या वेतनाचे सही पडताळणी बाबत चौकशी व माहिती मिळणेबाबत. माहितीचा कालावधी २००२ ते २००५ पर्यंत. गट विमा देयक, माहे मे २००२ चे वेतन, रुपये ७३८४/- चे पाचवे वेतनाचे फरकाचे देयक. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा देण्यात आलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. सदरच्या प्रतिनिधीने कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीची कागदपत्रे त्यांनी बरोबर आणली होती. तसेच छायांकित प्रती सुध्दा बरोबर आणल्या होत्या. त्यातून २

मुद्यांची माहिती अपीलकर्ता यांनी योग्य आहे असे सांगितले. परंतु मुद्या क्रमांक ३ ची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर प्रतिनिधीनी सांगितले की, त्यांनी ती प्रत आणली आहे त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचा कालावधी २००२ ते २००५ मधील असल्यामुळे पाचवे वेतनाचे फरक त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व ती माहिती त्यांना उपलब्ध झाली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी त्यांनी विनंती केलेली आहे. तसेच त्यांना नागपूर पर्यंत यावे लागले त्याचा खर्च त्यांनी येण्याजाण्याचा खर्च रुपये २५०/- मिळण्याबाबतचा अर्ज आयोगाकडे केलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या अर्ज दिनांक २३.३.२००९ च्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून २००२ ते २००५ या कालावधीतील माहिती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाची दखल घेतली नाही. तसेच आयोगापुढे हजर झाले नाही किंवा कोणत्याही प्रकारच्या प्रतिनिधी सोबत गैरहजर राहण्याबद्यलची विनंती केलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) विश्रांतवाडी, पोलीस स्टेशन समोर, आळंदी रोड, पुणे-६. यांनी करावयाची आहे.

३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारे प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

४) अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही आयोगाचेकडील सुनावणी पर्यंत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व आयोगाकडे येण्याजाण्याचा खर्च हा अपीलकर्ता यांना करावा लागत असल्यामुळे त्यांचा येण्याजाण्याचा खर्च रुपये २५०/- हा जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन द्यावा व पोच घ्यावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत सहसंचालक आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग) विश्रांतवाडी, पोलीस स्टेशन समोर, आळंदी रोड, पुणे-६. यांना स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १२.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९९/२००९.

श्री. ज्ञानेश अंबादास आत्राम,
नवेगांव, पो. विरुर (स्टेशन)
ता. राजूरा (मा.) जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. टेकाडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे सेवाविषयक बाब अर्जदाराशी संबंधित जिल्हा परिषद कार्यालयातील कागदपत्र मिळविणे एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी दिनांक ८.१.२००५ ते १०.१.२००९ पर्यंत. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ७.२.२००९ रोजी रुपये ७०/- अतिरिक्त खर्चाचा भरणा

... २



करण्यात यावा असे कळविण्यात आलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केला व त्यांना दिनांक २१.३.२००९ रोजी सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली आहेत. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक

१२.२.२००९ रोजी १२.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयाप्रमाणे दिनांक ४.४.२००९ अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचा अर्ज दिनांक २७.१२.२००८ चा आहे व त्यांना अतिरिक्त खर्चाचे पत्र मात्र दिनांक ७.२.२००९ रोजी पाठविण्यात आले. याबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, अपीलकर्ता यांचा दिनांक २७.१२.२००८ चा अर्ज दिनांक १५.१.२००९ रोजी प्राप्त झाला व त्यामुळे अपीलकर्ता यांना मुदतीत खर्चाचा भरणा करावा असेही कळविलेले आहे. माहिती उशिरा उपलब्ध झाली असल्यामुळे त्यांना अपूर्ण माहिती मिळाली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना सर्व मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपूर्ण काय माहिती मिळाली नाही याबद्यलचे त्यांनी पत्र दिले नाही किंवा आयोगाकडे सुध्दा खुलासा केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात यावे. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे सुध्दा खुलासा केलेला नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १४.८.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३९५/२००९.

श्री. डॉ. राजू ढोबळे,
कुलसचिव,
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ,
सेमीनरी हिल्स, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
तुली इंन्स्टीटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट
ॲन्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, तुली विद्या नगरी,
कोराडी नाक्याजवळ, बोखारा रोड, नागपूर.

श्रीमती वैशाली नशीने,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्या,
तुली इंन्स्टीटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट
ॲन्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, तुली विद्या नगरी,
कोराडी नाक्याजवळ, बोखारा रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.८.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १.७.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचेवतीने श्रीमती शिळणकर हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.७.२००८ रोजी माहिती अधिकारी म्हणून प्राचार्य तुली इंस्टीटयूट ऑफ होटल मॅनेजमेंट आणि कॅटरींग टेक्नॉलॉजी, नागपूर यांचेकडे सौ. ज्योती वडस्कर, माजी अधिक्षक, इंन्स्टीटयूट

... २

ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲंड कॅटरींग टेकनॉलॉजी यांचेबाबत सन १९९१ ते २००६ या कालावधीतील सौ. ज्योती वडस्कर यांचे प्रथम नियुक्ती आदेशाची प्रत, १९९१ ते जून २००१ पर्यंतच्या वेतनाच्या बिलाची छायांकित प्रत, अधिक्षकाचे पदावर पदोन्नतीच्या आदेशाची प्रत, अधिक्षक पदावरील पगार बिलाची छायांकित प्रत. २००१ ते २००६ पर्यंत वरील सर्व छायांकित प्रती साक्षांकित करुन पाठवाव्यात. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.८.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यानंतर सदरची प्रत ही साक्षांकित करुन मिळावी म्हणून अर्जदार यांनी प्राचार्य यांना पत्र दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे त्या साक्षांकित करुन दिलेल्या आहेत. परंतु सदरची माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे या कारणास्तव दिनांक ५.५.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले आहे.

३. उपलब्ध झालेल्या माहितीमध्ये श्रीमती ज्योती वडस्कर यांचे नियुक्तीचे आदेश उपलब्ध नाही. तसेच त्यांचे २००१ पासून अधिक्षक पदावर नियुक्तीचे प्रमाणपत्र आहे असे नमुद केले ही संपूर्ण माहिती विसंगत आढळून येते. पगार बिलात वेतन श्रेणी नमुद नाही पदनाम नाही. याकरिता सहसंचालक तंत्रशिक्षण संचालनालय, नागपूर यांचेकडून मूळ माहिती मागवण्यात आली. त्यावरुन श्रीमती वडस्कर यांचे वेतन व पदनाम यामध्ये विसंगती आढळून आली आहे. त्यामुळे त्यांचे प्रमाणपत्रातील माहिती ही खोटी असल्याचे दिसून येते. तसेच त्यांचे मुळ सेवापुस्तकाची छायांकित प्रतीची मागणी करण्यात येत आहे. अशा प्रकारे अपीलकर्ता यांनी खुलासा केला होता. तसेच द्वितीय अपीलात सुध्दा खुलासा केलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य यांनी सांगितले की, जी कागदपत्रे उपलब्ध आहेत ती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत. परंतु दोन कार्यालयामध्ये वेगवेगळया प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे त्यापैकी कोणती माहिती खरी आहे हे निश्चित करता येत नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य यांचेकडे उपलब्ध असलेल्या माहितीच्या नस्तीचे निरिक्षण करुन त्यातून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता किंवा त्यांचे प्रतिनिधी यांनी हा निर्णय मिळाल्या पासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी प्राचार्य, तुली इंन्स्टीटयूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, तुली विद्या नगरी, कोराडी नाक्याजवळ, बोखारा रोड, नागपूर यांचेशी कार्यालयीन कामकाजाचे दिवशी संपर्क साधून संबंधित अभिलेख्याची पाहणी करावी व त्यातून आवश्यक असलेल्या कागदपत्रांची छायाकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सर्व नस्त्या हया उपलब्ध करुन देण्यात याव्यात व त्यातून त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील व तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा संस्था हे सुध्दा प्रशासकीय कार्यवाहीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १४.८.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४००/२००९.

श्री. लस्मय्या राजम नागुला,
वन परिक्षेत्र कार्यालय, नागभीड,
जि. चंद्रपूर - ४४१ २०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष समाज कल्याण अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २,
नागपूर विभाग, चंद्रपूर - ४४२ ४०१.

श्री. डी. टी. बरगे,
जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती क्रमांक २,
नागपूर विभाग, चंद्रपूर - ४४२ ४०१. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.८.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, नागपूर विभाग, चंद्रपूर यांचेकडे श्री. लस्मय्या राजम नागुला यांचे जाती वैधता प्रमाणपत्र पडताळणी बाबत सादर केलेल्या प्रस्तावाच्या दस्तऐवज व पत्र इत्यादीची माहिती एकूण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः आवश्यक आहे व नोंदणी डाक टपाल पोच देय असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १३.१.२००९ रोजी संशोधन अधिकारी,

विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती-२, नागपूर विभाग, चंद्रपुर यांनी यु.पी.सी. पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१.२००९ रोजी सुध्दा माहितीचा अर्ज दाखल केलेला आहे व त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली आहे तरीही अपीलकर्ता यांनी प्रथम व द्वितीय अपील दाखल केलेले आहे व माहिती उपलब्ध झाली नाही असे नमुद केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने खालील प्रमाणे खुलासा जनमाहिती अधिकारी यांनी केलेला आहे. जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जाती प्रमाणपत्र पडताळणी करिता स्वतःची बेस्ती व वडिलांची बेस्ता शाळा सोडल्याचा दाखले जाती विषयक पुरावे सादर केलेले असून सदर जात इतर मागास प्रवर्गात येत असून त्यांच्या मूलांचे व भावाचे वैधता प्रमाणपत्राच्या आधारे जाती वैधत देण्याकरिता दबाव तंत्राचा वापराकरिता जाणीवपुर्वक खालील प्रमाणे माहिती अधिकार अन्वये माहिती मागविलेली आहे. १) दिनांक २१.३.२००९ जाती प्रमाणपत्र पडताळणी लोकप्रतिनिधी यांच्या मार्फत सबळ पुराव्या अभावी जाती प्रमाणपत्र निर्गमित करावे नसता मला न्यायनिवाडयाकरिता प्रकरण न्याय प्रविष्ठ करावे लागेल. त्याच्या प्रती विविध ठिकाणी पाठविण्यांत आल्या. २) दिनांक ६.४.२००९ अन्वये या कार्यालयाकडे उपलब्ध माहिती देण्यांत येऊनही माहिती अपूर्ण दिली असे नमुद केले. श्री. नागूला यांनीच अपूर्ण माहिती दिलेली अपुऱ्या माहितीच्या आधारे माहिती अपूरी दिली हे म्हणणे योग्य नाही. या कार्यालयाने संपूर्ण अभिलेख पडताळणी करुनच माहिती दिलेली आहे. ३) दिनांक ३०.३.२००९ अन्वये विविध शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आल्या या संदर्भात या कार्यालयाने पत्र क्र. २२६६, दिनांक २९.६.२००९ अन्वये शासनाने जनहित लक्षात घेऊन वेबसाईड तयार करुन त्यावर सर्व शासन निर्णय उपलब्ध आहेत ते संकेत स्थळावरुन प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले आहे. अर्जदार हे शासन सेवेत असून त्यांच्याकडे सर्व शासन निर्णय उपलब्ध असून न ही जाणीवपुर्वक या कार्यालयास शासन निर्णय मागणी केलेली आहे. ४) सदर समिती दिनांक ३.१०.२००७ पासून कार्यरत झालेली असून त्यांच्या मुलांची व भावाची जाती वैधता प्रमाणपत्र नागपूर व पुणे समितीने निर्गमित केलेले आहेत हे माहिती असून हि संबंधित समितीस अर्ज न करता समितीस त्रास देण्यांच्या हेतूनेच माहिती अधिकार अधिनियमाचा वापर करीत आहे. ५) दिनांक १३.५.२००९ अन्वये पुन्हा शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यात आल्या आहेत. ६) दिनांक २०.५.२००९, २९.५.२००९ व ३०.५.२००९ अन्वये पुन्हा शासन निर्णयाच्या प्रती मागविण्यांत आल्या आहेत. ७) दिनांक २८.५.२००९ अन्वये १० उमेदवारांच्या माहिती मागविण्यांत आली त्यामध्ये त्यांनी सदर

प्रकरणांचा सविस्तर माहिती दिलेली नसून या कार्यालयाने पत्र क्र. २२६६, दिनांक २९.६.२००९ अन्वये आपणांस कोणत्या स्वरुपाची माहिती हवी त्यासंबंधीचे वर्ष व प्रकरण क्रमांक देण्यांचे सुचवूनही माहिती दिलेली नाही. ८) दिनांक ४.८.२००९ अन्वये माहिती मागविण्यांत आली. ही समिती दिनांक ३.१०.२००७ पासून अस्तित्वात आली असून त्यापुर्वीचा रेकॉर्ड या समितीकडे नाही. तत्पुर्वीचे शासन निर्णयही उपलब्ध असणे शक्य नाही. सदरची माहिती शासनाच्या वेबसाईडवर उपलब्ध आहे. श्री. नागुला यांची जात इतर मागासवर्गात येत असून समितीस भोई या जातीचे वैधता प्रमाणपत्र मिळण्याकरिता जाणीवपुर्वक त्रास देत आहेत. ते माहितीचा अधिकार वापरुन दबावतंत्र निर्माण करीत आहेत. ते शासकीय कर्मचारी असून समितीस जाणीवपुर्वक त्रास देणे ही बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. करिता सदर माहिती आपणांस सविनय माहितीस्तव सादर करण्यांत येत आहे. अपीलकर्ता यांना दिनांक १३.१.२००९ रोजी पोष्टाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यांच्या पुर्वी त्यांनी अर्ज दाखल केलेले आहे. मुद्दा क्रमांक १ ते ८ ची माहिती उपलब्ध आहे ही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आज आताच उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३५०/२००९.

श्री. पुरुषोत्तम मोतीरामजी कोल्हे,
काजी वार्ड, नविन बस स्टॅन्ड समोर,
हिंगणघाट, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संजय दैने,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
हिंगणघाट, जि. वर्धा.

श्री. काळे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
समुद्रपूर, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २१.८.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे मौजा लोणार, ता. समुद्रपूर येथील झुडपी जंगल सर्व्हे १९१ वर अतिक्रमण करुन घर व कोठा बांधण्याचा खोटा अहवाल दिनांक ५.२.१९९७ ला तलाठी अशोक वाघाडे पाठविला. मौजा लोणार, ता. समुद्रपूर येथील झुडपी जंगल सर्व्हे १९१ आराजी २.८५ ही जमीन वनखात्यास दिनांक ६.१०.१९९३ हस्तांतरीत होऊन ७/१२ वनविभागाचे नावाने तयार झाला. त्या जमीनीवर अतिक्रमण करणाऱ्यावर कारवाई करण्याचे अधिकार कोणाला आहे. वनविभागास किंवा महसुल विभागास याची माहिती द्यावी. सदरची माहिती

नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १.९.२००८ रोजी जिल्हाधिकारी, वर्धा यांनी सदरचा अर्ज पुढील कार्यवाहीसाठी तहसीलदार, समुद्रपूर यांचेकडे पाठविलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक २३.९.२००८ रोजी तहसीलदार, समुद्रपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.१०.२००८ रोजी प्रथम अपील हे उपविभागीय अधिकारी (महसूल), हिंगणघाट यांचेकडे दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती परंतु लोकसभा निवडणूकीमुळे सुनावणी घेतली नाही. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातील जावक क्रमांक ५४० वरुन माहिती उपलब्ध करुन दिली असे आयोगाचाचे निदर्शनास आणले. त्यावर अपीलकर्ता यांना कोणत्या पत्त्यावर माहिती उपलब्ध करुन दिले असे विचारले. त्यावर अपीलकर्ता यांच्या मुळ माहितीच्या अर्जामध्ये मुळ पत्त्यावर व ह.मु. पत्ता दिला आहे व त्यांच्या मुळ पत्त्यावर जावक नोंद वहीमधून माहिती पाठविलेली दिसून येते व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. असे असले तरी अपीलकर्ता यांना पुन्हा ती माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल. त्याकरिता सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक २१.८.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली मुद्येनिहाय माहिती ही छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन द्यावी व पोच घ्यावी. परंतु पुर्वीच उपलब्ध करुन दिली असल्यास व पोच घेतली असल्यास पुढील कार्यवाही करु नये.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- १७.८.२००९** **खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४९/२००९.

श्री. दिवाकर केशवराव काळमेघ,
मुंदडा ले आऊट, नाचणगांव रोड,
पुलगांव, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मनोज सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
जि. वर्धा.

श्री. खजांजी,
जनमाहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे विद्या सागर चव्हाण, नायब तहसीलदार तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगांव. माहिती आयुक्त, नागपूर यांनी रुपये २५०००/- शास्तीची रक्कम पगारातून वसूल करण्याचे आदेशाची अंमलबजावणीची माहिती. वरील शास्तीची त्यांचे सेवापुस्तिकेत नोद घेतल्याची माहिती व सेवा पुस्तिकेची झेरॉक्स प्रत, वरील शास्ती बाबत श्री. चव्हाण यांचेवर होत असलेल्या विभागीय चौकशी बाबतची माहिती. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने

दिनांक २९.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, वर्धा यांनी मुख्याधिकारी, नगरपरिषद, पुलगांव यांना अपीलकर्ता यांना परस्पर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते व प्रतिलिपी श्री. दिवाकर केशवराव काळमेघ यांना दिलेली दिसून येते व त्याप्रमाणे मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगांव यांनी श्री. विद्या सागर चव्हाण, पुर्व मुख्याधिकारी, नगर परिषद, पुलगांव हे महसूल विभागाचे अस्थापनेवर असून सद्या तहसील कार्यालय, वर्धा येथे नायब तहसीलदार म्हणून कार्यरत आहे. त्यामुळे त्यांचे वेतन, सेवापुस्तिका इत्यादी या कार्यालयाशी संबंधीत नाही. त्यामुळे संदर्भीय क्रमांक २ नुसार अर्जदारास दयावयाची माहिती या कार्यालयाकडून देता येणार नाही. सबब श्री. दिवाकर केशवराव काळमेघ यांचे संदर्भीय अर्ज आपणाकडे यासोबत सादर करण्यात येत आहे. पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. पुन्हा दिनांक २४.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी, वर्धा यांनी मुध्याधिकारी, नगरपरिषद, पुलगांव यांना त्यांच्या दिनांक २२.१२.२००८ च्या पत्राचे अनुषंगाने परस्पर माहिती कळवावी असे कळविलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.२.२००९ रोजी देण्यात आला असून माहिती सदर आदेशाचे दिनांकापासून ७ दिवसांचे आंत देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु सदरची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांना कळविले व त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत पत्र व्यवहार मिळाला. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर यांनी जिल्हाधिकारी, वर्धा यांना पाठविलेले पत्र दिनांक २९.७.२००८ ची प्रत दाखल केलेली आहे व वेळोवेळी पाठविलेल्या पत्राची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे. तसेच अपीलकर्ता यांना पाठविलेल्या पत्राची प्रत सुध्दा दाखल केलेली आहे असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे त्यावर पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरचे प्रकरणी पुर्नविलोकन अर्ज सादर करण्यात आला आहे व पुर्नविलोकन अर्ज सुनावणी झाल्याशिवाय ही संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्याची विनंती करण्यात येते. अपील क्रमांक १७४८/२००७ मध्ये पुर्नविलोकन अर्ज दाखल झाला असला तरी त्या अर्जाचे निर्णयानंतर माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४८/२००९.

सौ. आशा अशोककुमार भार्गव,
सिमेंट रोड, मु. पो. ता. आष्टी,
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. मनोज सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
जि. वर्धा.

श्री. खजांजी,
जनमाहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ५.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे अर्जदाराचा दिनांक २२.२.२००८ चा अर्ज आपले कार्यालयात प्राप्त झाला त्याप्रमाणे एस.डी.ओ. धिरजकुमार यांचे विरुध्द प्रकरण सुरु करण्यात आले किंवा नाही याची माहिती. प्रकरण सुरु करण्यात आले असल्यास प्रकरणाला कोणता नोंदणी क्रमांक देण्यात आला त्याची माहिती आणि प्रकरणाचे रोजनाम्याच्या सत्य प्रमाणित नकला आजपर्यंतच्या हया पाहिजे आहेत. सदर्हु प्रकरण आता कोणत्या प्रयोजनासाठ नेमलेला आहे याची विस्तृत माहिती. प्रकरणाची नोटीस एस.डी.ओ. धिरजकुमार यांचेवर बजावण्यात आली किंवा नाही याची विस्तृत माहिती. सदरची माहिती टपालाने पाहिजे असे नमुद केलेले दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.९.२००८ रोजी श्री. अशोककुमार ओंकारनाथ भार्गव, आष्टी यांना मा. अपर जिल्हाधिकारी, वर्धा यांचे न्यायालयात अपील अर्ज सादर केला असल्यास

प्रकरण कोणत्या स्तरावर आहे इत्यादी माहिती संबंधित अपील शाखेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक ६.१०.२००८ रोजी अपर जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.११.२००८ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ती यांनी दिनांक ५.९.२००८ च्या अर्जातील मागितलेली अ, ब, क व ड या मुद्यांवरील माहिती त्यांना निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दिनांक २५.११.२००८ रोजी अपीलकर्ती यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते व त्यात दिनांक १५.५.२००८ रोजी दिनांक २२.२.२००८ रोजीचा अर्ज हा नस्तीबध्द करण्यात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यामुळेच अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपीलामध्ये अपीलकर्ती यांनी असे सांगितले की, त्यांना सांगितल्याप्रमाणे त्यांना अपर जिल्हाधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील दाखल केले होते. परंतु सदरचे अपील हे खारीज झाले आहे व त्यानंतरही विभागीय आयुक्तांकडे अपील दाखल केले होते. परंतु तेही खारीज झाले आहे. तसेच अपीलकर्ती यांना महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ प्रमाणे अपील दाखल करण्याची तरतुद असते त्यांनी तक्रार दाखल केली व त्यामुळे तक्रार खारीज केलेली आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की त्यांना ती मुदत कळविली नाही असे असले तरी अपीलकर्ती यांचे पतीचा दिनांक १२.२.२००८ रोजी संपूर्ण अपील प्रक्रिया मधील कार्यवाही कळविण्यात आलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४६/२००९.

श्रीमती सविता बंडूजी महाजन,
साई दर्शन मार्ग, साईनगर,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. मनोज सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अप्पर जिल्हाधिकारी,
जि. वर्धा.

श्री. मिलींद बंसोड,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक १३.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २९.१२.२००८ रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा यांचेकडे श्री. बंडुजी गोविंदराव महाजन हयांचे नावाचा १९८८ वर्षातील होलसेल केरोसीन परवाना प्रत. श्रीमती कुसमबाई गोविंदराव महाजन हयांचे नांवानी फेरफार केलेला परवाना प्रत सोबत आदेश केल्याबाबत टिप्पणीची प्रत १९९७-९८ वर्ष. सौ. किरण गणेश महाजन हयांचे नांवाने फेरफार केलेल्या होलसेल केरोसीन परवानाची प्रत सोबत आदेशाकरिता केलेली टिप्पणीसहीत. सदरची माहिती रजिष्टर पोष्टाने घेणार असे नमुद केलेले दिसुन येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक १२.१.२००९ रोजी प्रती पान

... २

रुपये २/- प्रमाणे एकूण रुपये १४/- व पोष्टेज खर्च रुपये ३५/- असे एकूण रुपये ४९/- एवढी रक्कम भरणा करावी अशी माहिती कळविलेली दिसून येते. त्यावर दिनांक २०.१.२००९ रोजी वर्धा नागरी सहकारी अधिकोष बँक यांचे रुपये २०/- चे चेक पाठविण्यात आला होता ते या सोबत परत पाठविण्यात येत आहे. अपीलकर्ती यांना दिनांक १७.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी पुन्हा अर्ज केला व दिनांक ६.३.२००९ रोजी त्यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिली. दिनांक २९.१.२००९ रोजी त्यांनी प्रथम अपील दाखल केले व त्यात पुन्हा माहिती यापुर्वी देण्यांत आलेली आहे. तसेच आता सुध्दा आपण मागणी केलेली परंतु कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती यासोबत देण्यांत येत आहे. आपण अर्जात नमुद केलेप्रमाणे अनुक्रमांक १ श्री. बंडुजी गोविंदराव महाजन यांचा १९८८ वर्षातील होलसेल परवाना या कार्यालयात उपलब्ध नाही. मुळ परवाना हा परवानाधारकाकडे असतो. जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे तीच माहिती जशी आहे तीशी पुरविणे माहितीच्या अधिकारात बंधनकारक आहे. त्यात टाळाटाळ करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक ४.४.२००९ रोजी अर्जात मागणी केलेली माहिती आपण स्वतः कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी हजर राहून नस्तीचे निरिक्षण करावे व त्यानुसार माहिती मागावी असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ती यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. उपलब्ध झ ालेल्या माहितीवरुन अपीलकर्ती यांनी अप्पर जिल्हाधिकारी, वर्धा यांचेकडे स्वतंत्रपणे तक्रार करावी. जेणे करुन सदरच्या प्रकरणात चौकशी होऊन त्यांना न्याय मिळू शकेल. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १७.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३४७/२००९.

श्री. राजू श्रीहरी डोंगरे,
महावीर वार्ड,
ता. आर्वी, जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. आर्वी, जि. वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
आर्वी, जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १७.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १७.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, आर्वी यांचेकडे मौजा शहापूर, ता. आर्वी तलाठी साझा क्र. ८ येथील सरकारी नाला महसुली लेखे नुसार सदर नाला बुजवून त्याचा नैसर्गिक प्रवाह बदलविल्यास आपल्या कार्यालयाकडून रामदेवबाबा डेव्हलपर्स ॲन्ड बिल्डर्स प्रा.लि. आर्वी हयांना परवानगी दिली आहे काय ? परवानगी दिली असल्यास कोणत्या नियमांच्या आधारे व कशी याची सविस्तर पुराव्यासह माहिती द्यावी. अशी एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी सन २००८ पासून ते आज तारखेपर्यंत. सदरची माहिती साध्या टपालाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २६.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी प्रश्नोत्तराचे स्वरुपात माहिती

असल्यामुळे देता येणार नाही असे उत्तर दिलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.३.२००९ रोजी देण्यात आले असून अपील नामंजूर करण्यात आलेले दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांना दिनांक १७.२.२००९ रोजी तलाठी यांना तहसीलदार यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे तसेच अपीलकर्ता यांच्या अर्जातून मुद्दा क्रमांक २ व ३ ची माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच अपीलकर्ता यांना माहिती पुन्हा उपलब्ध करुन देणे व त्यांची पोच घेणे हे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्दा क्रमांक १ व ४ ची माहिती पुन्हा दिनांक १७.२.२००९ रोजी उपलब्ध करुन देण्यात आल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १७.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०८/२००९ व अपील क्रमांक ४०९/२००९.

श्री. शशांक माणिकराव मसाळकर,
प्लॉट नं. ८३, भगवाननगर,
नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
धर्मदाय आयुक्त कार्यालय,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
धर्मदाय आयुक्त कार्यालय,
नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष,
कॅन्सर रिलिफ सोसायटी,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर हॉस्पीटल,
संत तुकडोजी चौक, मानेवाडा रोड, नागपूर.

श्री. शशीकुमार नायर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
कॅन्सर रिलिफ सोसायटी,
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज रिजनल कॅन्सर हॉस्पीटल,
संत तुकडोजी चौक, मानेवाडा रोड, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२००९)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक ११.५.२००९ रोजी व दिनांक १४.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १८.८.२००९ रोजी घेण्यात आली.

... २

अपीलकर्ता हे हजर आहेत. अपील क्रमांक ४०८/२००९ मध्ये उत्तरवादी विना अनुमती गैरहजर आहेत व कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दाखल केलेली नाही. अपील क्रमांक ४०९/२००९ मध्ये जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपील क्रमांक ४०८/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा धर्मदाय आयुक्त, नागपूर यांचेकडे अपीलकर्ता यांनी धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द पं. नं. १००/६४ कॅन्सर रिलीफ सोसायटी, तुकडोजी चौक, नागपूर या संस्थेच्या सेवाशर्ती व नियमाबाबत माहिती मिळण्याबाबत एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ ते ३ ची माहिती त्यांच्या अर्ज दिनांक ८.१०.२००८ चे अर्जानुसार दिनांक १६.१०.२००८ रोजीचे आदेशान्वये देण्यात आलेली आहे. त्यामुळे ही माहिती पुन्हा देण्याची आवश्यकता नाही. मुद्या क्रमांक ३ मधील अनुक्रमांक ४ मध्ये अर्जदाराने वरील न्यासाच्या नियमावलीची प्रत मागितलेली आहे. अर्जदाराकडून नियमाप्रमाणे शुल्क भरुन घेतल्यानंतर त्यांना संस्थेच्या नियमावलीची प्रत देण्यात यावी. अशा प्रकारचे आदेश देऊन अर्ज निकाली काढण्यात आलेले दिसून येते. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१२.२००८ रोजी मुद्या क्रमांक १ ते ३ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता प्रथम अपील माहिती अधिकारी धर्मदाय आयुक्त, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा शासनाचे जी.आर. व अध्यादेशाबाबत या कार्यालयात माहिती उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही. प्रत्येक पंजीबध्द संस्था ही कार्यरत असेल असे नाही. ज्या संस्था कार्यरत असतात त्यांचेकडे अनुसुची २ नियम ८ प्रमाणे कर्मचाऱ्यांची यादी ठेवावी लागत असते. संस्था उद्येशानुसार कार्यान्वित असतात. आपण स्पष्ट कोणत्या उद्येशासाठी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येते याबाबत स्पष्ट उल्लेख न केल्यामुळे याबाबत माहिती देता येत नाही. ज्या पंजीकृत संस्थेच्या विरुध्द तक्रारी या कार्यालयात प्राप्त होतात त्या संस्थेची चौकशी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था कायदा कलम १७ अन्वये करुन त्याप्रमाणे संस्थेच्या विरुध्द कार्यवाही करण्यात येत असते. विभागीय चौकशी बाबत या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती माहिती देणे शक्य नाही. तसेच क मुद्या प्रमाणे या कार्यालयाकडे माहिती उपलब्ध नसल्यामुळे ती माहिती आपणांस देता येत नाही. धर्मदाय संस्थांना माहितीचा कायदा लागू होतो. असा आदेश पारित केलेला दिसून येतो. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ व ३ च्या संदर्भामध्ये पूर्वीच माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे पुन्हा ती माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये आवश्यक ते शुल्क भरुन ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला आहे. परंतु सदरचा निर्णय हा अपीलकर्ता यांना दिलेला नाही असे दिसून येते. सहाय्यक धर्मदाय आयुक्त हे सर्वसाधारणपणे न्यायाधिश पदावर असलेले व्यक्ती असतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा संसदेने पारित केलेला अधिनियम आहे व अधिनियम म्हटल्यावर त्यातील सर्व तरतुदी हया बंधनकारक असतात व त्यांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे. कोणताही अधिनियम हा दुर्लक्ष करण्यासारखा नसतो व त्यामुळे प्रथम अपीलाचे विरुध्द द्वितीय अपील दाखल करण्याची तरतुद १९(३) असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय देणे अपेक्षित आहे असे सर्वसामान्य माणूस सुध्दा समजू शकतो व त्यामुळे जाताजाता करावयाचे श्राध्द उरकावे असा आदेश अपीलात करावा व तो आदेश पुन्हा अपीलकर्ता यांना उपलब्ध न करुन देणे हे अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन आहे. यावरुन अधिनियमाचे तरतुदीचे अज्ञान दिसून येते. याबद्यलची दक्षता जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

४.	अपील क्रमांक ४०९/२००८ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, कॅन्सर रिलीफ सोसायटी, नागपूर यांना प्रशासनाचे कार्यपध्दती बाबत २००७-२००८ या कालावधीतील एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या मुद्यांच्या अनुषंगाने दिनांक ३०.९.२००८ रोजी सहसचिव, रनधीर जव्हेरी यांनी सदरचा अधिनियम हा संस्थेस लागू नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२००९ रोजी प्रिाम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५.	अपीलकर्ता यांनी सुनावणी मध्ये असे सांगितले की, कॅन्सर रिलिफ सोसायटी १९७४ मध्ये स्थापन झाली असून सदरच्या संस्थेस महाराष्ट्र शासनातर्फे तसेच केंद्र शासनातर्फे अनुदान उपलब्ध होते. त्याबद्यल त्यांनी संस्थेचा २००२-२००३ चा वार्षिक अहवाल सादर केलेला आहे. सदरच्या वार्षिक अहवालामध्ये

महाराष्ट्र शासनाने १ कोटी ५ लाख रुपयांचे अनुदान दिलेले दिसून येते. सदरचे अनुदान हे यंत्रसामुग्री खरेदी व बांधकामाकरिता दिलेले आहे. तसेच केंद्र शासनाने जवळ जवळ ३ कोटीवर अनुदान यंत्रसामुग्री खरेदीकरिता दिलेले दिसून येते. यावरुन केंद्र शासनाकडून भरीव मदत मिळाली असे दिसून येते. पुन्हा महाराष्ट्र शासनाने मदत बंद केलेली आहे आता अपीलकर्ता यांनी सांगितले व त्यामुळे सदरचे अपीलात हा राज्य माहिती आयोगास निर्णय देण्याचा अधिकार नाही. अपीलकर्ता यांनी सदरचे अपील केंद्रीय माहिती आयोगाकडे दाखल करावे जेणे करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध होऊ शकेल. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४०८/२००९ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.१०.२००८ च्या अर्जाचे संदर्भात स्पष्टपणे लेखी स्वरुपात किंवा छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत रजिष्टर पोष्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ४०९/२००९ हे खारीज करण्यात येते.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- १८.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४०२/२००९.

सौ. गंगाबाई बापूरावजी मोरे,
वायगांव निपाणी, ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, जि. वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख,
जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ती यांनी दिनांक २१.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व त्यांचे चिरंजीव श्री. कैलाश मोरे हे हजर आहेत. अपीलकर्ती यांचे तर्फे श्री. के. आर. लुले, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २३.२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक भुमी अभिलेख, वर्धा यांचेकडे मौजा दापूरी ६०/३९ वर्धा येथील शेत नं. ७ व ९ मध्ये बदल करण्याकरिता आपण महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरुस्ती बाबत केलेल्या कारवाई संबंधीचे दोन्ही शेत मालकाचे ७/१२ सोबत दिलेल्या शेतबदल संबंधीचे अर्जाची. दोन्ही शेताचे स्थळ परिक्षण अहवालाची. जिल्हाधिकारी यांचे मंजूरी पत्राची व संबंधित आवश्यक दस्ताऐवजाची सत्यप्रत मिळण्याबाबत. दिनांक १३.८.२००३ ते दिनांक १८.६.२००८ पर्यंत या कालावधीतील माहिती त्यांनी मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक ७.३.२००९ रोजी मागील सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन

दिलेली दिसून येतात. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १६.३.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही. परंतु टिप्पणीमध्ये मौजा दापोरी येथील स.नं. ७ व ९ बाबत जे काही बदल झालेले आहेत त्या बदलाबाबतची माहिती म्हणजेच दिनांक १३.८.२००३ ते दिनांक १८.६.२००८ या कालावधीतील आदेश दुरुस्ती प्रक्रिया अशी माहिती आवश्यक होती. त्याबाबत लोकशाही दिनातील तक्रारी अर्जावर मी आज दिनांक ३१.३.२००९ रोजी बयाण दिलेले असून स.नं. ७ व ९ चे दुरुस्तीबाबतचे आदेशाबाबत मला संपूर्ण माहिती मिळाली असल्याने माझा दिनांक १६.३.२००९ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१) नुसार केलेला अपील अर्ज विनाकार्यवाही निकाली काढण्यात यावा. त्याबाबत माझी कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत राहणार नाही असे लेखी असून त्यावर अपीलकर्ती यांची स्वाक्षरी आहे. तसेच अपीलकर्ती यांच्या दिनांक ११.६.२००८ च्या अर्जाचे संदर्भात राज्य माहिती आयोगाकडे अपील क्रमांक ७६५/२००८ चा निर्णय हा दिनांक २१.५.२००९ रोजी झाला आहे ज्यात माहिती आहे आदेश उपलब्ध झाला आहे व त्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले आहे. त्यात अपीलकर्ती यांना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या प्रमाणे उपविभागीय अधिकारी यांचेकडे ७/१२ चे दुरुस्तीसाठी अपील दाखल करावे असे निर्णयामध्ये सुचना केलेली आहे. परंतु अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना १९९८ पासून माहिती दिलेली आहे मात्र त्यात सन २००३ ते २००८ या कालावधीतील माहिती उपलब्ध करुन दिली नाही व ती त्यांना उपलब्ध करुन द्यावी अशी त्यांची मागणी आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे त्यांनी तसे कां लिहून दिले असे त्यांना विचारले असता त्यांनी तोंडी समजविल्यामुळे आम्ही लिहून दिले आहे. मात्र माहिती मिळावी अशी विनंती आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून त्यांच्या दिनांक २३.२.२००९ च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या माहिती प्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपामध्ये सदरचा बदल कशाचे आधारावर झाला त्याबद्यलची कागदपत्रे त्यांना रजिष्टर पोष्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- १८.८.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५१/२००९.

श्री. कृष्णराव घनश्याम मोहाडीकर,
पटवी मंदीर गल्ली, खद्दीचा आखाडया जवळ,
गोळीबार चौक, नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आगवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, नागपूर.

श्री. बेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भुमापन अधिकारी क्रमांक - १,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रमांक -१, नागपूर यांच्याकडे श्री. नारायण बय्यासेटे मोहाडीकर (हेडाऊ) सर्कल नं. १५/२१ यांचे जागेचे मोजणी करुन अतिक्रमण चुकीचे दाखविल्यामुळे ती चुक दुरुस्ती करण्याबाबत. मोजणी तारीख २९.५.२००० अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.३.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक

... २

२८.४.२००९ रोजी देण्यात आला असून अर्जदार यांनी ईकडील कार्यालयात महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ च्या कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरुस्ती अर्ज करावा असा निर्णय दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचा निर्णय हा विहित मुदतीत दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली व त्याप्रमाणे महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम, १९६६ च्या कलम १०६ अन्वये क्षेत्र दुरुस्ती अर्ज दाखल केलेला असल्यामुळे त्यांचा हेतु साध्य झाला आहे असे आयोगाचे पुढे सांगितले. परंतु माहिती विलंबाने मिळाली असेही सांगितले. वास्तविक अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिनांक १०.३.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे दिनांक २४.३.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिली होती. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर ३० दिवसांचे आंत प्रथम अपील दाखल करावयाचे असते. परंतु अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे ९ महिन्यानी दाखल केलेले आहे व त्यानंतर प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये सुध्दा त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे माहिती विलंबाने उपलब्ध झाली हा अपीलकर्ता यांचा मुद्या विचारात घेता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३७२/२००९ व अपील क्रमांक ३७३/२००९.

श्री. सुरेश शालिकराम दुरुगकर,
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बा भवनच्या जवळ,
गोंदिया - ४४१ ६०१. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी नायब तहसीलदार (अन्न विभाग),
गोंदिया.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा पुरवठा अधिकारी,
गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी,
गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००९ रोजी व दिनांक १६.४.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. दिनांक १२.८.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी मुदत मिळावी म्हणून अर्ज दिला होता. परंतु जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर झाले होते त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले व अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी आज दिनांक २०.८.२००९ रोजी तारीख देण्यात आली होती व त्यांचे म्हणणे आज ऐकून घेण्यात आले.

२.        अपील क्रमाक ३७२/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून तहसीलदार, गोंदिया यांचे कार्यालयात एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.१.२००९ रोजी म्हणजे विहित मुदतीत आपण माहितीचा अधिकार २००५ अन्वये माहिती मिळावे म्हणून दिनांक १६.१.२००९ (१४.१.२००९) ला अर्ज दिलेला आहे. त्याप्रमाणे आपण आज दिनांक २७.१.२००९ ला रेकॉर्ड पाहणी केले असून मागितलेली माहितीची १७ पान असल्यामुळे १७ x २/- = ३४/- रुपये खजाना दाखल केल्याची चालान कार्यालयात सादर करावे व माहिती घेऊन जावे असे कळविलेले दिसून येते. त्याच दिवशी अपीलकर्ता यांनी आज दिनांक २७.१.२००९ ज्या वैकुंठी सरच्या समक्ष रेकॉर्ड पाहणी केले. त्यामधून १७ नगची आवश्यकता छायांकित मला देण्यात यावी. मी आवश्यकता नुसार फिस भरण्यास तयार आहे असे अपीलकर्ता यांनी लिहून दिलेले दिसून येते. त्यावर पुन्हा दिनांक २८.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना एकूण ९ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु संबंधित अपीलकर्ता यांनी १ ते ९ वरीलप्रमाणे आज दिनांक २९.१.२००९ ला मला १ ते ९ माहिती मिळाली आहे अशी पोच दिलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने तहसीलदार, गोंदिया यांचे कार्यालयातून जनमाहिती अधिकारी (अन्न विभाग), गोंदिया यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे पत्र दिलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी सुनावणीस हजर राहण्याचे संदर्भात संदर्भीय पत्राचे अनुषंगाने व विषयांकित दिलेल्या विषयानुसार माहितीचा अधिकार २००५ चे कायद्याच्या अन्वये आपले कार्यालयात दिनांक १४.१.२००९ ला नमुना अ च्या नमुन्यात माहिती मागितली होती. ती अर्धवट व अशी माहिती मला आपले कार्यालयातून पुरविण्यात आली या कारणास्तव दिनांक २०.२.२००९ रोजी ब मध्ये आपणाकडे अपील अर्ज सादर केला. त्यानुसार आपले कार्यालयातून प्राप्त झालेल्या नोटीस आज दिनांक ४.३.२००९ रोजी आपले कार्यालयात हेच माझे लेखी बयान गृहीत धरण्यात यावे. दिनांक १४.१.२००९ तसेच दिनांक २०.२.२००९ च्या अर्जात आपण अवलोकन करावे जेणे करुन आपणास मला माहिती पुरविण्यास सोयीचे होईल असे लेखी दिलेले दिसून येते व त्याप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रकरणाचे अवलोकन व वाचन केले असता अपीलकर्ता यांनी मागणी केलेली माहिती त्यांना उपलब्ध झाली नाही असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी

यांनी सादर केलेल्या मुद्या क्रमांक १ मध्ये नमुद शासन राजपत्र व शासन निर्णयाचे प्रती आकारणी न घेता या आदेशासह अपीलकर्त्यास पुरविण्यात येत असल्याने अपीलकर्ता यांचे अपील अर्ज अंशतः मान्य करण्यात येते व प्रकरण दफ्तर दाखल करण्यात येते असा निर्णय दिलेला आहे. आदेशासह पान १ ते ९ ची शासन परिपत्रक प्राप्त झाले ते १६.३.२००९ सुरेश शा. दुरुगकर दुपारी १:०० वाजता. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे हे सिध्द होते अन्यथा अपीलकर्ता यांनी त्याच वेळेस आक्षेप घेणे आवश्यक आहे. तसा आक्षेप न घेता अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले व माहिती उपलब्ध झालीच नाही असे आयोगाची दिशाभूल करणारा युक्तिवाद केलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

३. अपील क्रमांक ३७३/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून जिल्हा पुरवठा जिल्हा कार्यालय, गोंदिया यांचेकडे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.१.२००९ रोजीचे पत्रान्वये तपशीलामध्ये म्हणजे विहित मुदतीत संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.३.२००९ रोजी देण्यात आले असून सदरचा निर्णय हा तपशीलात असून सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

४. द्वितीय अपीलामध्ये त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली असून सुध्दा व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा हा स्वयंस्पष्ट असून सुध्दा चुकीची, दिशाभूल, अर्धवट, खोटी, बनावट प्रथम अपीलीय अधिकारीने खोटी माहितीची आदेश पारित केले. तसेच रेकॉर्ड ठेवणे आवश्यक आहे. यावरुन शिस्तभंगाची व जास्तीत जास्त आर्थीक दंडाची कार्यवाही करण्यात यावी अशा प्रकारचे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये अपीलकर्ता यांनी संबंधित तहसीलदाराकडे संपर्क साधुन माहिती घेणे आवश्यक होते. एकत्रित अभिलेख ठेवल्या जात नाही व त्यामुळे ती माहिती तयार करुन देता येत नाही असे जे म्हटले आहे ते अधिनियमाचे तरतुदीशी सुसंगत आहे. जी माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध आहे ती माहिती उपलब्ध

करुन मिळते. कोणत्याही प्रकारे माहिती संकलीत करुन देणे हे "माहिती" व "माहितीचा" अधिकार या दोनही व्याख्येमध्ये अभिप्रेत नाही. यावरुन अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती मुदतीत आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

५. अपीलकर्ता यांनी वरील दोनही अपीलांमध्ये जी माहिती मागितलेली आहे ती माहिती हया अधिनियमाचे उद्येशाप्रमाणे म्हणजे कोणत्याही सार्वजनिक हिताकरिता मागितलेली नसून त्यांच्या स्वतःचा बी.पी.एल. कार्ड रद्द केलेला आहे त्यामुळेच त्यांनी माहिती मागितलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चा उद्येश हा निश्चितच सार्वजनिक हिताकरिता आहे स्वहिताकरिता नाही हे मुद्याम त्याचेकरिता घेतले आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक ३७२/२००९ व अपील क्रमांक ३७३/२००९ मध्ये माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे दोनही अपील हे खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २०.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५४/२००९.

श्री. बेनी महादेव सपहा,
भाजी मंडी, दर्गाह जवळ,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. कुळमेथे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
नागपूर.

श्रीमती तालेवार,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
कामठी, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.८.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ती यांनी दिनांक २५.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कामठी यांचेकडे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती अतिशिघ्र स्पिड पोष्टाद्वारे हवी असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ११.१२.२००८ रोजी आपण विचारणा केलेली गडरिया या जातीचे दिनांक २५.३.२००६ निर्गमित करण्यात आलेले प्रकरणात आपणास कोणती कागदपत्रे पाहिजे आहे त्याचे अवलोकन करण्याकरिता आपण कार्यालयीन वेळेत हवी असलेली माहितीच्या कागदपत्राची रक्कम भरणा करुन माहिती घेऊन जावी. पुढील कागदपत्राकरिता दिनांक ८.१.२००९ ला संबंधित कागदपत्राकरिता ठेवण्यात आली असे त्यावर नमुद केलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही

म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक ३१.१२.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ती यांना दिनांक ७.८.२००९ रोजी दुपारी १२:०० वाजता आपल्या कार्यालयात बोलाविले होते मी वेळेच्या १ तास आधी आपल्या कार्यालयात हजर झालो. परंतु उत्तरार्थी तहसीलदार उपस्थित झाले नाही म्हणून आम्ही परत जात आहे. तरी कृपया अर्जावर स्वाक्षरी करुन माझी हजेरी लावून घ्यावी. कारण मला माहिती आयुक्त यांचेकडे दिनांक २०.८.२००९ रोजी हजर रहायचा आहे. असा आक्षेप घेणारे पत्र दिलेले होते. परंतु अपीलकर्ती यांना दिनांक ३.७.२००९ रोजी दिनांक २८.११.२००८ चे माहितीचे अधिकारांतर्गतचे अर्जानुसार दिनांक ८.७.२००९ रोजी दुपारी १२:०० वाजता उपस्थित राहण्याकरिता नोटीस काढण्यात आली होती. त्यावर "नोटीसदाराच्या मौक्यावर नोटीस घेऊन गेलो असता नोटीसदार हजर. नोटीसदार नोटीस घेण्यास इन्कार" असा रिपोर्ट देण्यात आलेल्या सदरच्या नोटीसची एक प्रत त्यांच्या राहत्या घराच्या दाराला चिपकवून नोटीस चस्पा केला दिसतो. त्यावर पुन्हा नोटीस काढून दिनांक ७.८.२००९ रोजी नोटीस बजाऊनही गैरहजर. तहसीलदार, कामठी हजर त्यांच्या अभिलेखानुसार अपीलार्थीस माहिती घेऊन जाणेबाबत कळविले असल्याचे दिसून येते. तथापी ज्या व्यक्तींची प्रमाणपत्रे आहेत त्यांची सहमती घेतल्याचे दिसून येत नाही. माहितीशी संबंधित व्यक्तींची सहमती घेऊन अपीलार्तीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश तहसीलदार तथा जनमाहिती अधिकारी, कामठी यांना देण्यात येतात. पुन्हा दिनांक ८.७.२००९ रोजी आजचे सुनावणीचा नोटीस घेण्यास इन्कार केल्याने नोटीसचा चष्मा करण्यात आला. तरीही अपीलकर्ती हजर झाले नाही. उत्तरवादी सुध्दा गैरहजर आहेत आणि प्रथम अपीलीय अधिकारी सुध्दा दौऱ्यावर असल्याने प्रकरण पुढील तारखेवर सुनावणीस ठेवण्यात येते. दिनांक २८.७.२००९ अशी टिपणी दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे व त्या प्रतिज्ञा पत्रामध्ये त्यांना अद्याप पर्यत माहिती उपलब्ध झ ाली नाही. तसेच प्रत्येक वेळेस बोलाविले परंतु माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. पुन्हा त्यांना अशा प्रकारे तेथील कारकुनांनी सांगितले पैसे घेऊन माहिती देऊन टाका पण कारकूनांनी आम्हाला दुसऱ्या रुममध्ये नेले सांगितले माहिती पाहावी लागेल तुम्ही दिनांक ८.१.२००९ रोजी या अशी तारीख दिली पण त्या कागदावर सही केली नाही. कार्यालयाचा स्टॅम्प मारला नाही. माहिती अधिकारीनी माहिती देण्यास टाळाटाळ

केली वगैरे प्रतिज्ञापत्र केले दिसून येते. अपीलकर्ती यांना दिनांक १६.७.२००९ रोजी तहसीलदार, कामठी यांनी उत्तर दिलेले दिसून येते. त्या संदर्भात अपीलकर्ती यांनी आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. मुद्या क्रमांक १ :- दिनांक २५.३.२००६ पासून अद्याप पावेतो आपले कार्यालयामार्फत गडरिया समाजाचे लोकांना एन.टी.(सी.) अंतर्गत भटक्या जमातीच्या आधारावर किती जातीचे प्रमाणपत्र लेखी स्वरुपात देण्यांत आले. कारण की गडरिया समाज हे शासन परिपत्रक क्र. ओ.बी.सी. १०/२००४ प्र.क्र. ४९१/मावक-५, सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य क्रिडा व विशेष सहाय विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२. दिनांक १२ ऑगष्ट २००४ अन्वये अनु क्र. ३२८ वर इतर मागासवर्गीयांच्या जातीमध्ये समाविष्ट करण्यांत आली आहे. मुद्या क्रमांक २ :- या गडरिया जातीच्या लोकांना आपले कार्यालयामार्फत मा. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी मा. उपविभागीय अधिकारी, नागपूर यांना महाराष्ट्र शासनाचे जी.आर.चे विरुध्द बेकायदेशीर लेखी शिफारस करुन गडरिया जातीचे व्यक्तींना महाराष्ट्र शासन जी.आर. सी.बी.सी.१०९८/वी.के. १८५/इएमव्ही-५, दिनांक १४.२.२००१ अन्वये गडारिया ही जात धनगर २९ तत्सम २२ वर नमुद आहे या आधारावर संबंधित कार्यालयामार्फत खोटे व दिशाभूल करणारे दस्तऐवजांची काहीही पडताळणी न करता गडरिया समाज ओ.बी.सी. जातीचे किती व्यक्तींना एन.टी.सी. भटक्या जातीचे जातीय प्रमाणपत्र देण्यात आले त्यांचे नांव, नांव व पत्ता याबाबत लेखी स्वरुपात मिळणेस दिनांक २८.११.२००८ रोजी अर्ज सादर केले होते. त्याची प्रत अवलोकनार्थ सोबत संलग्न करण्यांत आली आहे. मुद्या क्रमांक ३ :- कु.मिनल शिवकुमार पाली यांना वरील नमुद कार्यालयामार्फत गडरिया जातीचे जाती प्रमाणपत्र दिनांक २५.३.२००६ ते आज पर्यंतच्या काळात देण्यांत आले काय ? दिले असल्यास त्या प्रकरणाच्या दस्ताऐवजांची छायांकन प्रत साक्षांकित करुन मिळणेस विनंती केली असता शासकीय माहिती अधिकारी यांनी नियमानुसार वेळ मर्यादामध्ये माहिती अर्जदारास दिली नाही ? यानंतर तहसीलदार, कामठी यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्र. प्रस्तु/तह.कामठी/कावि- ४७८/२००९, दिनांक १६.७.२००९ अन्वये लेखी पत्राद्वारे कळविले की, कु. मिनल शिवकुमार पाली यांना गडरिया या जातीचे दिनांक २५.३.२००६ रोजी निर्गमित करण्यांत आलेले नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक १ मध्ये अर्जदाराने मागितलेली माहिती बद्यल काहीही माहिती न देतां तो सुध्दा त्यांचे पत्रामध्ये वगळण्यांत आला आहे. याबाबतचे संदर्भांकित पत्राची छायांकन प्रत सोबत संलग्न करण्यात आली आहे. संबंधित शासकीय माहिती अधिकारी यांनी जी बाब व दस्ताऐवज आपल्याकडे डांबून ठेवलेली आहे ती माहिती लेखी स्वरुपात अर्जदाराकडे उपलब्ध आहे संबंधित

माहिती अर्जदार दिनांक २०.८.२००९ रोजी आपल्या समक्ष सादर करील. त्यावरुन सत्यपरिस्थिती निष्पण होईल व त्यावरुन सर्व संबंधित अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम २० प्रमाणे शास्ती होणेस विनंती अर्ज सादर आहे. अपीलकर्ती यांचे तर्फे त्यांचे सहाय्यकांनी असे सांगितले की, प्रत्येक वेळेस त्यांचे तर्फे माहिती घेण्यास गेलो असता त्यांना माहिती देण्यात आली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे सुनावणीचे दिवशी बैठक सुरु होती. १२:०० वाजताची वेळ दिली असल्यामुळे त्यांचेकडे बैठक सुरु होती तरी सुनावणी ठेवण्यात आली इतर थांबले त्यांची सुनावणी घेण्यात आली मात्र संबंधित अपीलकर्ती हे पत्र देऊन निघुन गेले होते व त्यामुळेच त्यांना प्रथम अपीलाची सुनावणी घेता आली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सुध्दा असे सांगितले की हे कार्यालयात येतात माहिती अधिकारी यांना भेटत नाहीत व त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही. अशी तक्रार करतात मात्र याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत पत्र व्यवहार केलेला आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये वस्तुस्थिती निदर्शनास आलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांनी संपूर्ण जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता सन १९९९ पासूनची माहिती अतिशय व्यापक प्रमाणात आहे. त्यामुळे अपीलकर्ती यांनी संबंधित अभिलेखाची पाहणी करावी व त्यातून आवश्यक असतील त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्यावर अपीलकर्ती यांना दिनांक २६.८.२००९ किंवा २९.८.२००९ रोजी अभिलेख उपलब्ध करुन देण्यास मान्य केले. त्याप्रमाणे अपीलकर्ती यांना जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी कार्यालयात उपस्थित राहून अभिलेख पाहणी करणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना सदरच्या माहितीकरिता दिनांक २६.८.२००९ किंवा २९.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अभिलेख उपलब्ध करुन देण्यात यावी. त्या अभिलेखाची पाहणी अपीलकर्ती यांनी करावी व त्यातील आवश्यक असेल ती माहितीची छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घेण्यात यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५३/२००९.

श्री. मिलिंद शिवाजी भगत,
प्लॉट नं. ४०, शिवराजनगर, रोड क्रमांक ६,
विश्वकर्मा नगर, नागपूर - ४४० ०२७. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती वर्षा बेले,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (माध्यमिक)
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था परिसर,
रविनगर, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.८.२००९)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.११.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, वेतन पथक, रविनगर, नागपूर यांचेकडे एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. माहितीचा कालावधी दिनांक ३१.३.१९८९ ते दिनांक ६.१२.१९९१ असा असून सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.१२.२००८ रोजी अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (माध्यमिक), नागपूर यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे अर्जातील मागविलेली माहिती संदर्भ आपले कार्यालयाशी संबंधित पत्रासंबंधी असल्यामुळे हा अर्ज पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव आपणाकडे सादर करण्यात येत आहे असे पत्र दिलेले दिसून येते

व त्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना देऊन कार्यालयाशी संपर्क साधावा असे कळविण्यात आलेले दिसून येते ते मुदतीत आहे व त्यानंतर दिनांक २७.२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना अधिक्षक वेतन पथक यांच्याकडे दिनांक २८.११.२००८ ला दाखल केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता अर्जात मागितलेली माहिती २० वर्षावरील असल्यामुळे उपलब्ध करुन देता येणार नाही. यापूर्वी या कार्यालयाचे पत्र क्रमांक ७४७४, दिनांक १६.१२.२००८ अन्वये आपणास कळविण्यात आले आहे असेही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्णय दिलेला दिसून येतो. याचा अर्थ अपीलकर्ता यांना दिनांक १६.१२.२००८ रोजी विहित मुदतीत त्यांचे अर्जाचे संदर्भात उत्तर दिलेले दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून भष्ट्राचाराचे प्रकरण उघडकीस येण्याचे भितीमुळे माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे वगैर कारण द्वितीय अपीलात दिलेले दिसून येते. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अधिनियमाचे कलम ८ (३) (४) परंतुकाप्रमाणे २० वर्षा पुर्वीची माहिती मागता येत नाही म्हणून त्यांना तसे कळविले. परंतु कलम ८(३) चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कलम ८ मधील पोटकलम (१) मधील खंड ८ (आय) यासंदर्भातील माहिती सोडून इतर सर्व माहिती २० वर्षापुर्वीचा दस्ताऐवज कालावधीतील असला तरी पुरविण्यात येईल अशी तरतुद आहे. याचा अर्थ खंड (ए) (सी) (आय) यासंदर्भातील २० वर्षापूर्वीची माहिती पुरविता येणार नाही इतर सर्व माहिती पुरवावी लागेल असे होते. परंतु त्याचा चुकीचा अन्वार्थ जनमाहिती अधिकारी यांनी लावला आहे असे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांनी असे सांगितले की, प्रशिक्षण वर्गामध्ये त्यांना तसे शिकविले आहे त्यामुळेच त्यांनी तसा अन्वार्थ लावला. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही कलम ८ पोटकलम (१) मधील (ए) (सी) (आय) मधील अटीशी संबंध नाही व त्यामुळे संबंधित माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते परंतु तरीही प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सदरची माहिती सन १९८९ मधील असल्यामुळे ती उपलब्ध होईल अशी खात्री करण्यात येऊन नंतर ती माहिती नस्ती करण्यात आली असावी. शासनामध्ये सर्वच कागदपत्रे ही कायम स्वरुपी जतन करण्यात येत नाही तरी कागदपत्राची प्रतवारी प्रमाणे कागदपत्रे जतन करण्याचा कालावधी दिलेला आहे. त्यामुळे सदरची कागदपत्रे नस्ती झाले असतील असे त्यांनी मत व्यक्त केले. त्यावर सदरच्या कागदपत्रांचा शोध घेण्यात यावा व माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.११.२००८ च्या अर्जाप्रमाणे माहितीचा शोध घेऊन उपलब्ध झाल्यास छायांकित प्रती विनामुल्य रजिष्टर पोष्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २०.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५२/२००९.

श्री. पुरुषोत्तम विठ्ठलराव वानखेडे,
५९, सन्मार्गनगर, नं. २,
हुडकेश्वर नगर, नागपूर - ४४० ०३४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आगवणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भुमि अभिलेख, नागपूर.

श्री. जे. एन. बेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी, क्रमांक - २,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २०.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर भुमापन अधिकारी - २, भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर यांचेकडे दिनांक १.१०.२००८ रोजीच्या (संलग्न) अर्जावर काय कारवाई झाली त्याची लेखी माहिती द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.११.२००८ रोजी आपणास वरील संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विषयांकित बाबी संबंधी आपण मौजा बिडीपेठ येथील नगर भूमापन क्रमांक १४४२ यावरील गृहनिर्माण संस्थेच्या ले आऊट प्रमाणे क्षेत्रफळाची आखीव पत्रिकेत नोंद व्हावी याकरिता केलेल्या मागणीप्रमाणे सदर नगर

भुमापन आखीव पत्रिकेवर क्षेत्राची दुरुस्तीबाबत आपण वरिष्ठ कार्यालयाकडे दाद मागावी लागेल असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ५.६.२००९ रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती नगर भुमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर यांनी दिनांक १.११.२००८ व दिनांक २०.१.२००९ रोजी दिली आहे. दिनांक १.१०.२००८ च्या अर्जावर आपण नगर भूमापन अधिकारी क्रमांक २, नागपूर या कार्यालयाशी संर्पक साधावा. तसेच प्रथम अपीलाचा निष्कर्षामध्ये वादी यांचे तक्रार मिळकतीच्या क्षेत्रदुरुस्ती बाबत आहे. त्यांनी क्षेत्र दुरुस्ती करता मिळकतीची मोजणी फी नगर भुमापन अधिकारी क्र. २, नागपूर यांचेकडे अर्ज करावा व मोजणी केल्यानंतर क्षेत्र वाढते किंवा नाही याची खात्री झाल्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम १०६ व १३५ अन्वये प्रस्ताव उपविभागीय अधिकाऱ्यांकडे पाठविता येतो. म्हणून खालील प्रमाणे आदेश माहिती अधिकार २००५ च्या कलम १९ अन्वये आदेश दिलेले आहेत असा निष्कर्ष काढलेला दिसून येतो. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. द्वितीय अपील मेमोमध्ये आखीव पत्रिकेत नगर भुमापन क्रमांक व आराजीची दुरुस्ती असा विषय दिलेला आहे व तसेच दिनांक १.१०.२००८ रोजी केलेल्या अर्जाप्रमाणे कारवाई करावी अशी विनंती केलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अर्जाप्रमाणे कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती मुळात कोणत्याही प्रकरणातून कार्यवाही करुन मिळत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती विहित मुदतीत व योग्य अशी दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२००८ रोजी अर्ज हा चुकीची दुरुस्ती करण्यासाठीच केलेला आहे. परंतु त्यांचे जनहितार्थ तक्रार असे स्वरुप दिलेले दिसून येते व त्यामुळे नगर भुमापन अधिकारी - २ यांनी सदरच्या अर्जावर कार्यवाही करणे आवश्यक होते व तशा प्रमाणे अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात सुध्दा दिलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या दिनांक १.१०.२००८ च्या अर्जावर नगर भुमापन अधिकारी - २ यांनीच कार्यवाही करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १.१०.२००८ रोजी दाखल केलेला अर्ज हाच मुळात दुरुस्ती अर्ज दिसून येत असल्यामुळे त्या अर्जावर कार्यवाही नगर भुमापन अधिकारी क्रमांक - २ यांनी करणे आवश्यक आहे व तशी कार्यवाही झाल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २०.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २५५/२००९ व अपील क्रमांक २५६/२००९.

श्री. वसंत प्रभाकरराव मुदलियार,
२८९, नाना सोनी लाईन, सिताबर्डी,
नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. चंद्रमणी बोरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर.

श्री. श्रीराम चव्हाण,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर.

श्री. दत्तात्रय गो. जगताप,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती.

श्री. विजय गुल्हाणे,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
अमरावती. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २०.८.२००९)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.३.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक २०.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपील क्रमांक २५५/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, नागपूर यांचेकडे सौ. मनाबाई ढवळे, शिपाई हिचे नागपूर विभागीय मंडळात १९९२ मध्ये नियुक्ती झाली होती हे खरे आहे काय या संदर्भात एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.१०.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २४.१०.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २०.११.२००८ रोजी कु. शालिनी ढवळे (वारसदार) यांचा कार्यालयाला अर्ज प्राप्त झाला असून त्यात माझ्या आईबाबत कोणत्याही प्रकारची माहिती कोणत्याही व्यक्तीला देण्यात येऊ नये अशी विनंती केली आहे. त्यामुळे दिवंगत मनाबाई ढवळे यांच्या बाबतची आपण मागितलेली माहिती आपणाला यापुढे देता येणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरची माहिती ही उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, सौ. मनाबाई ढवळे, शिपाई या आता मय्यत झालेल्या आहेत व त्यांचा नियुक्तीचा कालावधी १९९२ हा होता व त्यांचे मुलीने कळविले असल्यामुळे त्यांना ती माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. तसेच अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे ती प्रश्नार्थक स्वरुपात आहे. म्हणून उपलब्ध असलेली माहिती त्यांना मिळाली नाही तरी हे खरे आहे काय. यावरुन प्रचंड प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे असा निष्कर्ष काढून जबाबदार अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आली आहे काय असे प्रश्न विचारलेले आहेत. यावरुन अपीलकर्ता यांना निश्चित अशी कोणत्याही प्रकारची माहिती नाही व प्रश्नाचे माध्यमातून माहिती मागून भ्रष्टाचार झाला आहे किंवा नाही असे मोघम आरोप त्यांनी केलेले आहेत. तेही १८ वर्षापूर्वीची माहिती आहे त्यामुळे अपीलकर्ता यांनी जे उत्तर दिले ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

४. अपील क्रमांक २५६/२००९ मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२००८ रोजी माहिती अधिकारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, अमरावती यांचेकडे कनिष्ठ लिपिक श्री. संजय एरंडे यांच्या विरुध्द पदावनत करण्याची कार्यवाही कां करण्यात आली होती याबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ४.१०.२००८ रोजी श्री. संजय अेरंडे, वरिष्ठ लिपिक, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक यांना आपली वैयक्तिक माहिती असल्याने संबंधितांनी मागणी केलेली माहिती देण्याबाबत आपले काही आक्षेप आहे काय ? असल्यास दहा दिवसांचे आत आपले आक्षेप किंवा हरकत

नसल्यास तसेही या कार्यालयास कळविण्यात यावे. जेणे करुन सदर अर्जावर निर्णय घेण्याचे दृष्टिने पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. त्यावर दिनांक १६.१०.२००८ रोजी श्री. संजय अेरंडे यांनी माहिती अधिकारी तथा सहा. सचिव, अमरावती यांना श्री. मुदलीयार यांनी मागितलेली माझी वैयक्तिक माहिती माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील नियम ११(१) नुसार माझे वैयक्तिक हिताला बाधा पोहचविणारी असल्याने कृपया देण्यात येऊ नये. तसेच श्री. मुदलीयार यांनी मागितलेली माहिती माझी बदनामी करण्याचे दृष्टिने तसेच मी सद्यःस्थितीत अमरावती विद्यापीठात अधिक्षक पदावर नुकताच रुजू झालो असून सदर नियुक्ती ठिकाणी माझी बदनामी करुन माझेवर दबावतंत्राचा वापर करुन मला पैशाची मागणी (ब्लॅकमेल) करण्याची शक्यता वाटते. सदर माहिती जनहितार्थ मागण्यात येत नसून वैयक्तिक स्वार्थापोटी मागण्यात आलेली असावी असे मला वाटते असेही कळविलेले दिसून येते व त्यामुळे दिनांक २१.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांना सदरची मागणी अमान्य करण्यात आलेली आहे असे कळविलेले दिसून येते. दिनांक १७.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा दिनांक २२.१२.२००८ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे व त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम करण्यात आलेला दिसून येतो व त्याविरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

५. द्वितीय अपील मेमोमध्ये पदावनत करतांना कायद्याचे संज्ञान न ठेवता जाणून अशी कार्यवाही करणे ज्याचा लाभ गुन्हेगारी करणाऱ्यास देणे. खोटया कारणांचा आधारावर माहिती लपविणे तसेच देण्यास नकार देणे. भ्रष्टाचार लपविण्याचा प्रयत्न करणे अशी कारणे दिलेली दिसून येतात. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता सदरची माहिती ही अपीलकर्ता यांना निश्चित माहिती नाही व ती जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्रश्नाचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेऊन माहिती व त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती नसतांना त्यातून मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे असा आधीच त्यांनी निष्कर्ष काढलेला दिसतो व त्यामुळे श्री. संजय अेरंडे यांनी जी भिती निर्माण केली ती साधार दिसून येते व त्यामुळे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांना दिलेला निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील क्रमांक २५५/२००९ व अपील क्रमांक २५६/२००९ हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**दिनांक :- २०.८.२००९**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४२३/२००९.

श्री. विश्वासराव स. आंबटकर,
मु. पो. ता. मुल, नागपूर रोड,
जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त,
नगरपालिका प्रशासन,
नागपूर.

श्री. सुर्यकांत येवले,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी मुख्याधिकारी,
नगर परिषद, मूल, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२००९)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, मुल यांचेकडे माझ्या मालमत्तेवरील कर आकारणी संदर्भात १९९५ पासून कर भरणा अहवालची सत्यप्रत. माझ्या करपात्र मालमत्तेची कनिष्ठ अभियंता यांचे मार्फत मौका पंचनामा/चौकशी करण्यात आली त्यासंदर्भाचे दस्तऐवजाची सत्यप्रत. मालमत्ता धारकाची एकूण मालमत्ता (करपात्र) त्यावरील कर, मालमत्तेवरील बांधकाम व त्यावरील कर याची सविस्तर माहिती मिळण्यात यावी. श्री. अनील मोगरे व इतर १८ लोकांची मालमत्ता कराची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.२.२००८ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १६.४.२००८ रोजी देण्यात

आला असून अपीलकर्ता यांना निर्णय उपलब्ध झाला नाही. ७ दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला दिसून येतो व तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी मालमत्तेवरील बांधकामाबाबत माहिती या विभागाशी संबंधीत नाही असे बेजबाबदारपणाचे उत्तर दिले असाही निष्कर्ष काढण्यात आलेला दिसून येतो. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १३.५.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांचे अर्जाचे अनुषंगाने तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २७.२.२००८ रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती कोणत्याही प्रकारे अर्जाचे अवलोकन न करता उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती ही बेजबाबदारपणाची आहे असा निष्कर्ष काढलेला आहे व त्यावेळेस तत्कालीन जनमाहिती अधिकारी किंवा त्यावेळेस सदरचा अर्ज हाताळणारे कर्मचारी असतील हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला आहे. परंतु माहिती उपलब्ध करुन देण्यास २ दिवसाचा विलंब झालेला आहे. द्वितीय अपीलामध्ये विनंती करतांना अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक ९.५.२००८ पर्यंत अपीलार्थीस माहिती मिळणे आवश्यक होते. परंतु विनाकारण गैरवाजवी त्रास देऊन सुध्दा ती दिनांक १३.५.२००८ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यातही अपीलकर्ता यांनी त्यांच्या आयोगाच्या खुलाश्यामध्ये क्षेत्रफळ उपलब्ध करुन दिलेले नाही त्याबद्यल अपीलकर्ता यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जात किंवा इतर अर्जात क्षेत्रफळाची माहिती मागितलेली नव्हती त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. तसेच १९९७ पासून माहिती उपलब्ध करुन दिली असून त्यावरुन माहिती शोधून माहिती उपलब्ध करुन द्यावी लागेल व त्यामुळे सार्वजनिक प्राधिकरणाची यंत्रणा शोधण्यास प्रमाणाबाहेर लागेल व त्यामुळे न मागितलेली माहिती उपलब्ध करुन देणे हे संयुक्तिक राहणार नाही. असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. यावरुन अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही उपलब्ध झाली परंतु विलंबाने उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ११.२.२००८ च्या अर्जाचे अनुषंगाने संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी किंवा संबंधित कर्मचारी किंवा अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. शिस्तभंगाची कार्यवाही करतांना जबाबदारी निश्चित करण्यात यावी व त्यानंतरच शिस्तभंगाची कार्यवाही करावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ४२२/२००९.

श्री. अरुण आनंदराव भोयर,
मु. सोनेगांव (सिरास), पो. सावरगांव,
ता. चिमुर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर,
जि. चंद्रपूर.

श्री. जे. जी. मेलकापल्लीवार,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.८.२००९)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.८.२००९ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.९.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांचेकडे सन २००० ते २००८ वर्षाची आकारणी नामे श्री. आनंदराव हिरामण भोयर, रा. सोनेगांव (सिरास) हे गांव गटग्राम पंचायत, काग मधी आहे यांच्या राहाते घराची कर आकारणी व खाली जागेची सत्यप्रतीमध्ये कर आकारणी व नमुना ८ देण्याबाबत सादर करीत आहे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.१.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर दिनांक २.२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

.. २

३. द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये खालील प्रमाणे खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, चिमूर यांनी दाखल केलेला आहे. उपरोक्त संदर्भीय अपील सुनावणी नोटीसचे अनुषंगाने खुलासा सादर करण्यांत येते की, श्री. अरुण आनंदराव भोयर, रा. सोनेगांव (सिरास), पो. सावरगांव, ता.चिमूर यांनी दिनांक ७.१.२००९ ला अपील अर्ज सादर केलेला होता. उक्त अपील अर्जावर कार्यालयीन नोटीस क्रमांक/पंसचि/साप्रवि/स्था-१/८३/२००९, दिनांक १७.१.२००९ अन्वये दिनांक २३.१.२००९ ला सुनावणी ठेवण्यांत आली. सुनावणीचे दिवशी सचिव, ग्राम पंचायत, काग व अपीलार्थी अर्जदार उपस्थित न झाल्यामुळे कार्यालयीन नोटीस क्रमांक पंसचि/साप्रवि/स्था-१/७८/२००९ अन्वये दिनांक २.२.२००९ ला सुनावणी ठेवण्यांत आली. सुनावणीचे वेळी सचिव, ग्राम पंचायत, काग व अपीलार्थी अर्जदार उपस्थित झाले. सचिव, ग्राम पंचायत, काग यांनी दिनांक १३.१.२००९ ला माहिती अर्जदारांस सादर केली असल्याचे सांगण्यात आले. तरीपण अर्जदाराचे समाधान न झ ाल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी हे दौऱ्यावर असल्यामुळे पुढील सुनावणी दिनांक ९.२.२००९ ला ठेवण्यांत आली. सुनावणीचे दिवशी सचिव, ग्राम पंचायत, काग व अर्जदार उपस्थित होते. त्यात दोन्ही पक्षाचे ऐकूण घेऊन सचिव यांचे म्हणण्यानुसार अर्जदारास नमुना ८ अ पान क्र. ४० ची प्रत (सन २००५-२०१० पर्यंतची) मालमत्ता क्रमांक ५३ मध्ये मातीचे मकान <u>१० x १४</u> लिहिलेले असून १४० मालकाचे नांव अरुण आनंदराव भोयर यांचे नांवे लिहिलेले असून मालमत्ता वर्णन <u>१० x १४</u> हे व्हाईटनर लावून १४० लिहिलेले असून त्याची प्रत देण्यात आलेली आहे. यापुर्वी आनंदराव भोयर यांचे नांवे २ प्लॉट होते व अरुण आनंदराव भोयर यांचे नांवे १ प्लॉट असे ३ प्लॉट असतांना त्यानंतर अरुण भोयर यांचे नांवे २ प्लॉट व आनंदराव भोयर यांचे नांवे १ प्लॉट दर्शविण्यांत आलेला आहे. सचिव, ग्रामपंचायत, काग यांचे म्हणण्यानुसार सन २००१-०५ च्या नमुना ८ नुसार मालमत्ता क्रमाक ५२ क्षेत्रफळ २३ x १४ च्या प्लॉट अरुण भोयर च्या नांवे व त्यांचे वडील आनंदराव भोयर यांचे नांवे मालमत्ता क्रमांक ८५ मध्ये ५०/३० चा १ प्लॉट आहे. नमुना ८ सन २००५-२०१० पर्यंत श्री. अरुण भोयर यांच्या नांवे मालमत्ता क्रमांक ५३ व ५४ अनुक्रमे १० x १४ व २३ x १४ असे २ प्लॉट आहेत. यामध्ये मालमत्ता क्रमांक ५४ ही आनंदराव हिरामण भोयर यांचे नावे होती. परंतु कर आकारणी सन २००१-२००५ नुसार ग्राम पंचायत मासिक सभा ठराव क्रमांक ९/१ दिनांक १९.१२.२००८ नुसार ही मालमत्ता श्री. अरुण आनंदराव भोयर यांचे नांवे करण्यांत आली. तसेच त्यांचे वडीलांचे नावाने मालमत्ता क्रमांक ९९ मध्ये ५० x ३० चा १ प्लॉट आबादी आहे. असे सांगण्यांत आले. त्यावर ठरावाची सत्यप्रत ३ दिवसांत अर्जदारास देण्यांत येईल. सचिव, ग्राम पंचायत, काग यांना कार्यालयीन टिपणीवर आदेश देण्यांत आले व अर्जदारांस निर्णय मान्य असून तशी त्यांनी टिपणीवर स्वाक्षरी केलेली आहे. वरील खुलाश्यावरुन जरी

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असली तरी त्यांचे म्हणणे असे आहे की, माहिती ही संपूर्ण उपलब्ध झाली नाही असे असल्यास अपीलकर्ता यांना त्यांच्या घराच्या व खुल्या जागेच्या संदर्भामध्ये ग्राम पंचायतमध्ये पाहणे आवश्यक राहिल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत सचिव, ग्रामपंचायत, सोनेगांव (सिरास) यांचेकडे कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ कळवून उपस्थित राहावे. अपीलकर्ता हे उपस्थित झाल्यानंतर अपीलकर्ता यांचेकडे संपूर्ण नस्ती उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यांना आवश्यक असतील त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

**दिनांक :- २४.८.२००९**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**